म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. 2345
REFBK-0009749
REFBK-0009749

# पवित्र भारत वर्णन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... मा. दि. ....................

॥ भगवान् सूर्यनारायण ध्यान श्लोक ॥

ध्येयः सदा सावितृमंडलमध्यवर्ती ।
नारायणः सरसिजासनसन्निविष्टः ॥
केयूरवान् मकरकुंडलवान् किरीटी ।
हारी हिरण्मयवपुर्धृतशंखचक्रः ॥ १ ॥

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. २३५




आदित्यस्य नमस्कारं, ये कुर्वंति दिने दिने ।
जन्मांतरसहस्रेषु, दारिद्र्यं नोपजायते ॥ १ ॥

( प्रभातकालीं नित्य शीतजलांत स्नान करून जे सूर्यास अष्टोदशें १०८ सशास्त्र साष्टांग नमस्कार नित्य घालतात ते मनानें, वाणीनें व शरीरानेंहि मर्द बनतात ! )

किंमत २ रु.

# पवित्र भारत वर्णन

## क्षेत्रानुक्रमणिका.


| क्षेत्र | पृष्ठांक | क्षेत्र | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| अक्कलकोट | १३५ | गया | १८० |
| अत्रि–अनसूया | १२८ | गरुडेश्वर | १२५ |
| अमलेश्वर | ५१ | गाणगापूर | १३० |
| अमृतसर | १९४ | गिरनार | १११ |
| अयोध्या ( श्रीराम ) | ३४ | गुप्तकाशी | १७ |
| आळंदी | १६४ | गोकर्ण ( महाबळेश्वर ) | ८२ |
| उखीमठ | १८ | गंगोत्तरी | ५ |
| उज्जैनी | ४८ | घारापुरी लेणी. | ९९ |
| उत्तर काशी | ६ | घृष्णेश्वर | ९६ |
| ओझर | १६२ | चामुंडी | ७३ |
| ओंकारेश्वर | ५२ | चितोडगड | ४७ |
| औंढ्या नागनाथ | ९१ | त्रिशकूट | १७५ |
| औदुंबर | १४७ | चिंचवड | १६४ |
| कण्हेरी लेणी | ९९ | जगन्नाथ | ५४ |
| कनखल | ३२ | जम्नोत्तरी | १ |
| कनकेश्वर | १९२ | जेजुरी | १६६ |
| कन्याकुमारी | ७० | जोशी मठ | १९ |
| महाकाली ( कलकत्ता ) | १८१ | डाकूर | १०३ |
| काशी | १७६ | तिरुपल्ली, तिरुपति | ५८ |
| कांची | ५९ | तिरु म्हणजे ‘ श्री ’ | ,, |
| किन्हई | १५० | तीर्थ–स्थळें | ११६ |
| किष्किंधा ( हंपी ) | ८६ | तुळजापूर | १३५ |
| कुरुक्षेत्र | ४५ | तुंगनाथ | १८ |
| केदारनाथ | ९ | त्रिजुगी नारायण | ११ |
| कैलास | १८५ | त्रिवेंद्रम् | ६१ |
| कोल्हापूर | १४३ | त्र्यंबकेश्वर | १७० |
| कोल्नृसिंहपूर | १९७ | थेऊर | १५८ |
| गणेशावतार | १५६ | | |


( मुखपृष्ठ ३ पहा )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत.

# पवित्र भारत वर्णन

क्रमांक ........................ नों: दि: ..................

ह्यांत अखंड भारतांतील सर्व प्रमुख क्षेत्रमाहिमा
गाइला आहे.

धृतिः क्षमा दमोऽस्तेयं; शौचमिंद्रियनिग्रहः ।
धीर्विद्या सत्यमक्रोधो; दशकं धर्मलक्षणम् ॥ १ ॥

( श्रीमनु. अध्याय ६, श्लोक ९२ )

लेखक,

केशव बळवंत जोशी, प्रवचनालंकार ( काशी )
२५५।१० सदाशिव पेठ, पुणें नं. २, पहिला मजला, खोली नं ८

( ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

पु

चित्र ं २.

REFBK-0009749

कार्तिक शु. ११, शके १८७९

प्रथमावृत्ति, प्रती २०००

प्रकाशक—महामहोपाध्याय, विद्यानिधि, सिद्धेश्वर विष्णु चित्रावशास्त्री,
५८, शनिवार पेठ, पुणें २.

मुद्रक—दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. ( टिळक ),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें २

किंमत २ रु.

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | प्यारा | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १५ | ४ | २ | देव | रेत |
| १६ | ३ | १ | ५३ | ५० |
| २७ | ३ | ११ | ५१ | ५० |
| २८ | ३ | ३ | क | कः |
| ३३ | २ | ४ | ऋ | ऋ |
| ५७ | ३ | ६ | हस्तीने | हस्ती |
| ६२ | २ | ४ | रामश्वरी | रामेश्वरी |
| ७५ | २ | १ | पट्टणापासून | पट्टणांत. |
| ७९ | २ | १ | खुर्च्या बनवून तीं बाकें | खुर्च्या, बाकें बनवून तीं |
| ७९ | ३ | ४ | साठ | पंच्याहत्तर |
| १५१ | ७ कविता | १ | | पूजा |
| १५८ | ४ | ४ | हणून ग्यां | म्हणून ह्या |
| १६१ | २ | ८ | दुसरा ॐ | दुसरा ॐ नको |
| १६६ | अभंग | ८ | पाप | माप |
| १८३ | १ | १ | तरी | तेरा |
| ,, | ,, | ३ | दुसरा मार्ग | पोखरा मार्गे |
| ,, | ,, | ,, | बागदूण | बागलूण |
| १८६ | २ | ६ | अलमोडा | अलमोरा |
| १८७ | १ | ३ | दृष्टा | दृष्टी |
| १९३ | श्लोक | ४ | पध्ये | मध्यें |

---

ॐ वषट्ते विष्णवास आकृणोमि । तन्मे जुषस्व शिपविष्ट हव्यम् ।
वर्धंतुत्वा सुष्टुतयो गिरोमे । यूयंपात स्वास्तिभिः सदानः ॥ १ ॥
( हे विष्णु, आपण, मी केलेल्या भक्तीचा स्वीकार करावा व माझ्या वाणींतून आपलीं सुंदर स्तोत्रें बाहेर पडोत ! )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
नों: दि: ........

# अल्प परिचय

' उद्योग्याचे घरीं ऋद्धि-सिद्धि पाणी भरी ।।'

प्रस्तुत पुस्तकाचे कर्ते श्री. केशव बळवंत जोशी, यांचा जन्म जंजिरा संस्थानांत श्रीवर्धन या गांवीं इ. स. १८८५ मध्यें झाला. प्रसिद्ध पेशवे घराण्याचे मूळ पुरुष श्रीवर्धन या गांवींच राहात असल्यामुळें हा गांव इतिहासांत प्रसिद्ध आहे. केशवरावांचे वडील त्यांच्या वयाच्या पांचव्या वर्षीच दिवंगत झाल्यामुळें त्यांच्या संगोपनाची जबाबदारी त्यांची मातु:श्री व वडील बंधु श्री. गणेश बळवंत जोशी ऊर्फ दादा यांजवर पडली. केशवरावांचें मराठी पांचवीअखेर शिक्षण श्रीवर्धन गांवीं झालें. पांचवी इयत्ता झाल्यानंतर त्यांचें एक वर्ष जंजिरा संस्थानांतील कोळेंगांवीं काबाडकष्ट करण्यांत गेलें ! त्या काळांत घरचीं लांकडें फोडणें, गाईला शेतबांधावर चरावयास नेणें व फेरीवाल्यांचें काम करणें इत्यादि कामें त्यांस करावीं लागलीं. हे स्वत: भाविक व धर्मनिष्ठ आहेत. त्यामुळें वरीलप्रमाणें हे कष्ट करीत असतांहि ते रुद्र व महिम्न शिकले.

श्री. जोशी यांच्या लहानपणीं देशाची एकंदर धार्मिक व सामाजिक स्थिति बरी होती. जंजिरा संस्थानचा राजा मुसलमान होता; तरी त्यांजपासून हिंदूंना कांहींहि उपद्रव नव्हता. हिंदु व मुसलमान बंधुभावानें वागत असत. ब्राह्मणांतहि वेदविद्येविषयीं भक्ति होती. ब्राह्मणांचीं घरें शंभर होतीं. त्यांतील पंचवीस कुटुंबें वेद व शास्त्रें ह्यांत पारंगत होतीं ! जोशी यांचें घराणें मूळ भिक्षुकाचें होतें. त्यांचे वडील वे. शा. सं. बाळूभटजी हे गांवांत भिक्षुकी करीत. त्यामुळें घरीं भिक्षुकी वळण असल्याकारणानें जोशी हे आपला मराठी शाळेचा अभ्यास संभाळून रोज तास दीड तास वे. शा. सं. केशवभटजी वैसास यांजकडे जाऊन ब्रह्मकर्म शिकत. तो त्यांचा अभ्यास पूर्ण झाला. श्री. केशवपंत ह्यांचे वडील वे. शा. सं.



श्रीमंत थोरले बाजीराव बाळाजी भट ऊर्फ पेशवे, श्रीवर्धन

लक्ष्मण गणेश ऊर्फ बाळू जोशी व मातुःश्री सौ. गंगाबाई ह्यांस चि. गणेश, गोपाळ, गोविंद व केशव असे चार पुत्र व चि. साळूंका, अहिल्या, द्रौपदी व काशी अशा चार कन्या अशीं एकंदर आठ अपत्यें झालीं. ह्या सर्वांची भावी सुप्रजा पुत्र, पौत्र, प्रपौत्र, पुत्री, पौत्री, प्रपौत्री अशीं एकंदर दोनशेंवर आज जिवंत आहेत !

हे दिवस प्लेगच्या धामधुमीचे होते. इ. स. १९०० सालीं श्रीवर्धन गांवीं प्लेग सुरू झाला. सगळा गांव बाहेर पडला. सर्व शाळा बंद झाल्या ! तेव्हां जोशी हे श्रीवर्धन सोडून चिपळूणास आपल्या सौ. काशी बहिणीकडे शिकण्याकरितां गेले. तेथें त्यांचे मेहुणे कै. श्री. **भालचंद्र बाबाजी घाणेकर** पोस्टमास्तर होते, त्यांजपाशीं राहिले. तेथील मराठी शाळेंत सहावी इयत्ता पुरी करून प्राथमिक शाळा प्रमाण परीक्षेस रत्नागिरीस बसले व ती परीक्षा ते इ. स. १९०१ त उत्तीर्ण झाले. यानंतर मुंबईस येऊन त्यांनीं मराठी शाळेंत शिक्षकाची नोकरी पतकरली व इ. स. १९०४ मध्यें ते पुणें ट्रेनिंग कॉलेजच्या प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण होऊन त्यांनीं कॉलेजांत प्रवेश मिळविला. इ. स. १९०५ त दुसऱ्या वर्षाचें सर्टिफिकीट मिळवून ते कॉलेजांतून बाहेर पडले. इ. स. १९०६ सालीं ते मुंबईस पुन्हां फ. अ. म्हणून ताडदेवच्या शाळेंत रुजू झाले. इ. स. १९०८ त री ट्रेनिंग परीक्षा पास झाले. इ. स. १९१० त ह्यांनीं तिसऱ्या वर्षाचे सर्टिफिकीट मिळविलें. तेव्हांपासून १९१२ पर्यंत ताडदेव, भायखळा व लॉर्ड हारीस ( कोट ) येथें फ. अ. चें काम केल्यावर इ. स. १९१३ त जोशी यांची वाळकेश्वरावरील मराठी शाळेंत मुख्याध्यापकाच्या जागीं नेमणूक झाली.

इ. स. १९३८ पर्यंत शिक्षक या नात्यानें उत्तम लौकिक मिळवून हे सेवानिवृत्त झाले. त्या वेळीं यांस १५० रुपये दरमहा पगार मिळत होता. शाळेंतील काम संभाळून ते खाजगी शिकवण्याहि करीत असत. त्यांत डॉ. मुकुंदराव ऊर्फ बाबासाहेब जयकर, सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर व दिवाण बहादूर गणपत सदाशिव राव यांजकडील शिकवण्यांचा प्रामुख्यानें निर्देश करावयास पाहिजे. सेवानिवृत्तीनंतर मुंबईसच राहून जोशी यांनीं

हिंदीची एक परीक्षा दिली. व इ. स. १९३९ त मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण झाले. या परीक्षेकरितां त्यांनीं पुष्कळ वर्षे फारच परिश्रम केले असल्यामुळें या यशानें त्यांना एक प्रकारचें मानासिक समाधान मिळालें! त्याच काळांत त्यांनीं आसनें, प्राणायाम यांचा स्वामी कुवलयानंद यांच्या मुंबईतील **कैवल्यधामांत** अभ्यास करून त्यांत ते यशस्वी झाले. सांगलीचे श्री. परांजपे वैद्य ह्यांच्या सूर्य–सशास्त्र साष्टांग–नमस्कार परीक्षेंत उत्तीर्ण झाले.

श्री. जोशी ह्यांनीं आपल्या चिरंजीव वासुदेवासाठीं त्यांना योग्य वेळीं विहिरीसह बाग, घर व शेतें स्वतःचीं संपादन करण्यासाठीं सुमारें नऊ हजार रुपये सरकारी खात्यांत गुंतवून ठेवले आहेत. ह्या रकमेचें व्याजच चि. वासुदेव यांस मिळण्याची सुव्यवस्था करून ठेविली आहे. मुंबईहून श्री. जोशी हे पुण्यास इ. स. १९४० मध्यें कायमचे राहावयास आले. येथें आल्यावर त्यांच्या उद्योगी स्वभावाप्रमाणें स्वस्थ न बसतां त्यांनीं हिंदी–प्रवेश व परिचय, कीर्तन–प्रवेश–परीक्षा, सदीप व्याख्यान व वक्तृत्व ह्या परीक्षा देऊन त्यांत ते उत्तीर्ण झाले. ह्याच वर्षापासून श्रीहरिकीर्तन पाठशाळेचे आद्य निष्काम सेवक झाले. इ. स. १९४१ त अयोध्या व काशी येथील संस्कृत कार्यालयांकडून त्यांस **प्रवचनालंकार** ही पदवी मिळाली. श्री. जोशी यांनीं 'सचित्र अंकाचा नकाशा', 'कनकेश्वर वर्णन', 'संक्षिप्त गरुडपुराण', 'सचित्र बाल मनोरंजन', वगैरे पुस्तकें लिहिलीं, हीं प्रकाशित झालीं असून तीं सर्व संपलेलीं आहेत !

ह्या पुस्तकाचा आणि 'संक्षिप्त गरुड पुराण' ह्याशिवाय वरील नकाशा व पुस्तकें **ह्यांचे सर्व** हक्क आपले पश्चात् ह्यांचे सुपुत्र चि. **वासुदेव केशव जोशी**, ट्रेंड शिक्षक, हल्लीं वस्ती श्रीपार्लेश्वर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, चाळ नं. १, खोली नं. ५, मुक्काम व पोस्ट विलेपार्लें (पूर्व), मुंबई नं. २४ ह्यांस **बहाल केले आहेत** ! अलिबाग येथील कलेक्टर कचेरींतील र. नं. ११८८, ता. ९-११-१९४३ इ. च्या मृत्युपत्राप्रमाणें श्रीवर्धन येथील गणेश पाखाडींतील त्यांच्या वडील बंधूंच्या स्थावर व जंगम इस्टेटींत, सनदा, वृत्ति वगैरेंत न्यायानें चौथा हिस्सा त्यांच्या पुत्रपौत्रांनीं

हक्कानें उपभोगावयाचा आहे. इ.स.१९४२ मध्यें दुसरें महायुद्ध ऐन रंगांत आलें होतें. त्या वेळीं वैमानिक हल्ल्यांच्या भीतीनें कांहीं लोक पुणें सोडून गेले. त्यांत जोशी हेहि असून ते अलिबाग तालुक्यांत नागांव या गांवीं रहावयास गेले. या दोन वर्षांच्या मुक्कामांत त्यांनीं तेथील इंग्रजी शाळेंत कांहीं दिवस शिक्षकाचें काम केलें व 'सचित्र बाल मनोरंजन' नांवाचें एक पुस्तक लिहिलें. नागांवाहून इ. स. १९४५ सालीं मुंबईस आले व तेथें त्यांनीं रेशनिंग ऑफिसांत सव्वा वर्ष क्लार्कची नोकरी केली. जोशी यांना सार्वजनिक कार्याची पहिल्यापासून हौस आहे. त्या हौसेखातर त्यांनीं मुंबईची ब्राह्मणसभा, वालुकेश्वर येथील वैदिक संस्कृत पाठशाळा ह्यांचीं पंचवीस तीस वर्षें निर्वेतन सेवा केली व अजूनहि ते मुंबईच्या ब्राह्मणसभेस सभासद मिळवून देण्याचें काम करीत आहेत. श्री. जोशी यांस एक पुत्र चि. वासुदेव व एक कन्या चि. सौ. शांताबाई ऊर्फ सौ. प्रतिभा, भ्रतार श्री. विनायकपंत गंगाधर ऊर्फ बाबासाहेब पटवर्धन, बी. ए. पुणें ४. अशीं दोन अपत्यें आहेत. तीं सुस्वभावी, शिक्षित, संतति, संपत्ति, कीर्ति ह्यांनीं युक्त आहेत.

हे पुनरपि पुण्यास राहावयास इ. स. १९४६ सालीं आले, तेव्हांपासून चार वर्षें त्यांनीं कीर्तन, प्रवचनांचा अभ्यास केला. इ. स. १९४८–४९ त वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या ऋग्वेद नित्यविधीच्या दोन परीक्षांत उत्तीर्ण झाले. त्यांचें वय आतां ब्याहत्तर वर्षांचें आहे. भारतांतील सर्व यात्रा केल्यामुळें त्यांना सात्त्विक समाधान प्राप्त झालें आहे; तरी त्यांची कार्यक्षमता व उमेद अद्यापि कायम आहे. ते मधून मधून कीर्तनें व प्रवचनें करितात. त्यांत मिळणारी बिदागी हरिकीर्तन पाठशाळेस देतात किंवा परार्थ खर्च करितात. अशा रीतीनें त्यांचें ऐहिक व पारमार्थिक जीवन यशस्वी झालें आहे!

श्री. जोशी यांचा दैनिक कार्यक्रम पुढीलप्रमाणें आहे. रोज संध्याकाळीं नवग्रह व रामरक्षा स्तोत्रें म्हणतात. रात्रीं शुचिर्भूतावस्थेंत कांहीं वेळ रामभजन करून, त्यास शरण जाऊन, स्वकर्में त्यांस अर्पण करून दहा वाजतां परमेश्वर चिंतनांत झोंपीं जातात. पहाटेस पांच वाजतां जागे होतांच वरीलप्रमाणें तिन्ही कर्में केल्यावर भारतसावित्री म्हणून करदर्शन घेऊन

भूमि,तुळस, सप्तऋषि, गाय, पितर ह्यांस वंदन करितात. गणेश, राम, वेदान्त-भूपाळीपंचक, द्वादशज्योतिर्लिंगें, दशावतार, गंगा इत्यादि भूपाळ्या



म्हणून शौचमुखमार्जन, दंतधावन झाल्यावर स्नानविधीनें सूर्योदयापूर्वी शीतजलांत स्नान करितात. भस्म धारण करून संध्या, मानसिक देवपूजा, देव, ऋषि व पितर -ह्यांचें तर्पण करितात. शीर्षासनादि आसनें, रोज हजार गायत्री मंत्रजपांत साठ प्राणायाम व पावणे चारशें सूर्यास साष्टांग नमस्कार घालून रोज पंधरावा अध्याय म्हणतात. मानसिक बलिहरणासह वैश्वदेव करून 'गोविंद'

**वे. शा. सं. केशव बळवंत जोशी**

म्हणून भोजन करितात. ईशाचिंतन, अध्ययन, अध्यापन, निर्वेतनानेंच परार्थ परोपकारी संस्थांस धन मिळवून देणें, प्रसंगोपात्त कीर्तनें व प्रवचनें करणें हे त्यांचे उद्योग आहेत.

---

## ॥ अध्ययन निष्कर्ष श्लोक ॥

आलोढ्य सर्वशास्त्राणि, विचार्यैवं पुनः पुनः ।
इदमेकं सुनिष्पन्नं, वैद्यो नारायणो हरिः ॥ १ ॥

## इंद्रिय-प्रार्थना

जिव्हे कीर्तय केशवं मुररिपुं, चेतो भज श्रीधरं ।
पाणिद्वंद्वसमर्चयाच्युतकथां, श्रोत्रद्वयं त्वं शृणु ।
कृष्णं लोकय लोचनद्वयहरे, गच्छांघ्रियुग्मालयं ।
जिघ्र घ्राणमुकुंदपादतुलसीं, मूर्धन्नमाधोक्षजम् ॥ १ ॥

| | |
|---|---|
| श्रीगणेशचतुर्थी, | अल्पचरित्र लेखक, प्रेमळ बंधु, |
| शके १८७९, | **श्रीधर सदाशिव जोगळेकर,** |
| शनिवार, घ. नं. ४२५, पुणें नं. २ | सेवानिवृत्त क्लार्क ऑफ कोर्ट, पुणें. |

# प्रस्तावना

## चौदा हेर-श्लोक

आदित्यचंद्रावनिलो नलश्च, द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च ।।
दिवा च रात्रिश्च उभे च संध्ये, धर्मोऽहि जानाति नरस्य वृत्तम् ।। १ ।।
— श्रीकालिदास.

प्राणिमात्राच्या वर्तनावर सतत देखरेख करणारे चौदा हेर असतात. प्रस्तुत ग्रंथ माझ्या अनेक वर्षांच्या परिभ्रमणांचें फल आहे. मी मुंबईस मराठी अध्यापक व मुख्याध्यापकांचें काम तेहेतीस वर्षें केलें आहे. त्या काळांत नोकरी संभाळून प्रवासास जाणें मला फारसें शक्यच नव्हतें. मी प्रवास हा केवळ देश पाहाणें या उद्देशानें केलेला नाहीं. मी धार्मिक वृत्तीचा असल्यामुळें निरनिराळीं क्षेत्रें पाहावीं, तेथें स्नानसंध्यादि कर्में करावीं, देवदर्शन घ्यावें, सत्पुरुषांची भेट घ्यावी. त्यांजबरोबर आध्यात्मिक विषयांची चर्चा करावी, सद्ग्रंथावलोकन करावें इत्यादि गोष्टींकडेच मनाचा मुख्य कल असे. पारमार्थिक कल्याण साधण्याच्या ध्येयानेंच प्रवास केला. अर्थात् अशीं क्षेत्रें पाहात हिंडत असतांना जीं क्षेत्रें मनाला फार आवडलीं व जेथें मन रमलें, अशा क्षेत्रांत मी महिना-महिनाहि मुक्काम केला. हा हेतु सिद्धीस जाण्याकरितां मला सेवानिवृत्त होण्याची वाट पाहावी लागली. त्याप्रमाणें मी दिनांक ३।८।३८ सालीं सेवानिवृत्त झालों. तथापि मला माझा मुख्य हेतु सिद्धीस नेण्यास लागलीच संधि मिळाली नाहीं !

माझें सर्व शिक्षण मराठींतून झालें होतें; पण आपण इंग्रजी शिकावें व निदान मॅट्रिक परीक्षा द्यावी असें वारंवार मनांत येई; पण नोकरी, शिकवण्या व संसार संभाळून या कार्याकडे लक्ष देण्यास अगदीं थोडी फुरसत मिळे. तेवढ्या वेळांत मी सतत तेहेतीस वर्षें इंग्रजीचा अभ्यास

करीत होतों व इ. स. १९२१ त मॅट्रिकच्या परीक्षेस बसण्याचें धाडस केलें. पण त्यांत मला अपयश आलें; तरी मी परीक्षेचा पिच्छा सोडला नाहीं. बहुधा दरसाल परीक्षेस बसत असे व नापास होत असे. माझी नोकरी संपेपर्यंत मी ही परीक्षा पास झालों नाहीं. ह्यासाठीं इ. स. १९३८ सालीं सेवानिवृत्त होतांच हा हेतु पूर्ण करण्याचा मी दृढ निश्चय केला व वुइल्सन हायस्कूलमधून मॅट्रिकच्या परीक्षेस इ. स. १९३९ सालीं बसून ती परीक्षा उत्तीर्ण झालों ! त्या वेळीं मी छप्पन्न वर्षांचा होतों. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळें मनाला फार समाधान वाटलें ! तथापि त्याचा आतां कांहीं बढतीच्या दृष्टीनें तादृश उपयोग नव्हता. या काळांत दुसरें महायुद्ध झालें. महागाई फार झाली म्हणून मला खासगी नोकऱ्या कराव्या लागल्या. त्यांतून मी इ. स. १९४६ त मुक्त झालों.

त्यानंतर पंढरपूरची यात्रा ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीबरोबर इ. स. १९४८ या वर्षी पायीं केली, याशिवाय कांहीं किरकोळ क्षेत्रें पाहिलीं. पण तेवढ्यानें तृप्ति झाली नाहीं. मला सर्व भरतखंड पाहावयाचें होतें व हिमालयांतील यात्राहि करावयाच्या होत्या. प्रयाग, काशी व गया यांची यात्रा मी इ. स. १९११ त केल्यामुळें त्या या नवीन उपक्रमांत वगळण्यांत आल्या. प्रथम मी इ. स. १९५० त हिमालयांतील यात्रेस गेलों व तेथून दोन महिन्यांनीं परत आल्यावर पूर्वेस जगन्नाथापर्यंत, दक्षिणेस रामेश्वर–कन्याकुमारीपर्यंत व पश्चिमेस द्वारकेपर्यंत मी प्रवास केला. हा प्रवास एक वर्ष सुरू होता. त्या बारा महिन्यांत लहान थोर बहुतेक सर्व क्षेत्रें मी पाहिलीं. या कामीं मला सुमारें दीड हजार रुपये खर्च आला.

ही यात्रा पूर्ण केल्यावर आपण केलेल्या यात्रेचें वर्णनपर पुस्तक इतरांच्या उपयोगाकरितां मराठींत लिहावें असा विचार सुचला. त्याचीं टिपणेंहि वेळोवेळीं करून ठेविलीं होतीं. त्या सर्वांचें संकलन करून संक्षिप्त व व्यवस्थित असें पुस्तक त्वरित लिहिणें हें काम फार कठीण होतें; म्हणून जे लेखक या नात्यानें सुप्रसिद्ध होते अशा कांहीं तरुणांना या कामीं

मदत करण्यास मी विनंति केली. ती त्यांनीं मान्यहि केली; पण त्यांजकडे हीं टिपणें दोन वर्षें पडून राहूनहि त्यांच्या हातून हें कार्य घडलें नाहीं !

**"सत्य संकल्पाचा दाता भगवान। सर्व करी पूर्ण मनोरथ ॥१॥"**

या संतोक्तीप्रमाणें माझें कार्य यंदा **श्रीयुत वासुदेव कृष्ण भावे**, बी. ए. माजी संपादक 'केसरी', पुणें, ह्यांच्या कळकळीच्या व तत्परतेच्या साह्यानें अल्प काळांत पार पडलें, ही संतोषाची गोष्ट होय. ह्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे ! भारतांतील क्षेत्रांच्या वर्णनाचीं पुस्तकें मराठींत व हिंदींत बरीच आहेत. गोरखपूरच्या 'कल्याण' मासिकानें यंदा आपला विशेषांक याच विषयावर काढून वाचकांच्या हातीं दिला आहे. त्यांत भारतांतील एकंदर अठराशें क्षेत्रांचें वर्णन आलें आहे. पण तो अंक हिंदींत आहे, मराठींत नाहीं. मराठींतहि श्री. महादेवशास्त्री जोशी यांचें 'तीर्थरूप महाराष्ट्र' या नांवाचें एक पुस्तक झालें आहे; पण तें केवळ महाराष्ट्रांतील क्षेत्रांपुरतेंच आहे. पुण्यांतील कलागृह छापखान्याचे मालक श्रीयुत **रा. रा. शंकर सखाराम** ऊर्फ **काका दाते** यांनीं 'हिमालयदर्शन' या नांवाचा एक मोठा ग्रंथ मराठींत प्रसिद्ध केला आहे.

त्यास मुंबई राज्य सरकारनें एक सहस्र रुपयांचें पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला आहे ! ह्या पुस्तकाचा मला मोठा उपयोग झाला, ह्याबद्दल मी निःसीम शिवभक्त काकांचा फार आभारी आहें ! तथापि त्यांतील वर्णन हिमालयांतील यात्रांपुरतेंच आहे. पण माझ्या या पुस्तकांत भारतांतील व हिमालयांतीलहि प्रमुख व इतर पुष्कळ क्षेत्रांचें वर्णन आलें आहे व तेंहि अगदीं त्रोटक व अदमासें दोनशें पृष्ठांत मावेल इतक्या बेतानें लिहिलें आहे. हेतु हा कीं, ज्यांना भारतीय क्षेत्रें पाहावयाचीं असतील त्यांना जरूर ती माहिती मिळून त्यांना तें मार्गदर्शक व्हावें व त्याची किंमत त्यांच्या आटोक्यांत राहावी. ह्या पुस्तकांतील विशिष्ट क्षेत्रांतील देव-देवतांचीं चित्रें काळ व धन ह्यांच्या अभावामुळें देतां आलीं नाहींत; म्हणून त्या त्या देव-देवतांचीं प्रसिद्ध चित्रें घातलीं आहेत.

या क्षेत्रांचें वर्णन देतांना मला मार्गांत भारतांतील जीं लहानमोठीं गावें व नगरें लागलीं त्यांचीहि संक्षिप्त माहिती ह्या पुस्तकांत मी दिली आहे व हा प्रवास करीत असतांना सामाजिक, औद्योगिक, शिक्षणविषयक व धार्मिक बाबतींत जें विचार मला प्रसंगोपात्त सुचले तेहि मी दिले आहेत. अशा रीतीनें हें पुस्तक वाचकांना जितकें उद्बोधक, मनोरंजक व मार्गदर्शक करतां येईल तितकें करण्याचा मी स्वशक्तीप्रमाणें प्रयत्न केला आहे; तो महाराष्ट्रीय वाचक गोड करून घेवोत अशी त्यांस माझी सविनय प्रार्थना आहे!

अथवा बहुनैतेन, किं ज्ञातेन तवार्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ।। १ ।।

श्रीमद्भगवद्गीता अ. १०, श्लोक ४२.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 23364 दि: 31.5.
क्रमांक 235 नों: दि: 20/5/84
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ..........

# पवित्र भारतवर्षांत

## मनोगत

हिमालयाची यात्रा आजपर्यंत असंख्य लोकांनीं केली आहे. तिचीं वर्णनें पुष्कळांच्या तोंडून ऐकल्यावर मलाहि ती यात्रा करण्याची स्फूर्ति झाली. मी या यात्रेस दिनांक ५ मे सन १९५० इ. रोजीं मुंबईहून निघालों. हे दिवस उन्हाळ्याचे म्हणून हिमालयांत प्रवास करण्यास हवेच्या दृष्टीनें सोयीचे असतात. हिमालय म्हटला कीं, तें थंडीचें आगर. ह्यांत कोणत्याहि ऋतूंत गेलें, तरी थंडी ही असावयाचीच; म्हणून मला मुंबईहून निघतांना उबेचे कपडे मुद्दाम करून घ्यावे लागले. त्यांस सुमारें पन्नास रुपये खर्च आला. मी एरवीं सहसा बूट घालीत नसे, पण हिमालयांतून हिंडतांना बूट घालणें आवश्यक आहे असें ऐकल्यावरून मला ही व्यवस्था करावी लागली.

मुंबईहून मी रात्रीं ११॥ च्या गाडीनें जी. आय्. पी. म्हणजे सेंट्रल रेल्वेनें बोरीबंदर स्टेशनाहून दिल्लीस जावयास निघालों. मी दिल्लीस ३० तासांनीं म्हणजे निघाल्यापासून तिसऱ्या दिवशीं सकाळीं पोंचलों. हें अंतर ९५७ मैल आहे. दिल्लीस नया बाजार, घर नं. ११५ मध्यें महाराष्ट्रीय स्नेहसंवर्धक समाज आहे. तेथें राहाण्यास तीन दिवस फुकट जागा मिळते. तेथें गोखले भोजनालय आहे. त्यांत जेवावयास रोज दीड रुपया पडतो. दिल्लीस फार वेळ मुक्काम न करतां मी त्याच दिवशीं रात्रीं हरिद्वारास जावयास निघालों. दिल्लीहून हरिद्वारास आगगाडीनें पोंचण्यास १० तास लागतात. यांमधील अंतर २०४ मैल आहे. हरिद्वारास माझा मुक्काम दोन दिवस श्री. बाबा वाशीमकर यांच्याकडे होता. हिमालयांत

चढउतार फार आहे. त्याकारणानें उंच काठी टेकावयास अवश्य लागते. तिला दंडा म्हणतात. ती काठी एक रुपयास घेतली. आणि तेथून हृषीकेशास मोटारीनें गेलों. हें अंतर पंधरा मैल आहे. तेथें एक दिवस काळीकमळीवाला ह्यांच्या धर्मशाळेंत उतरलों. येथें 'काळीकमळीवाला' या संस्थेची मुख्य कचेरी आहे. तेथें पुढील प्रवासांत सामान वाहून नेण्याकरितां जे मजूर लागतात ते येथें ठरवावयाचे असतात. जो मजूर करावयाचा तो मिळाल्यास आपल्या वर्णाचा, सुस्वभावी, कामसूळ, आज्ञाधारक व प्रामाणिक असावा. स्वयंपाक करण्यांत तरबेज असलेला सोयीचा होतो.

जो यात्रेकरू कंडींतून म्हणजे खुर्चींतून प्रवास करतो, त्याला माणशीं दर मैलास एक रुपया भाडें पडतें. दंडीला दोन मजूर लागतात. म्हणून दर मैलास दोन रुपये भाडें द्यावें लागतें. मेण्यास अगर झापानास जितके मजूर लागतील तितके रुपये भाडें दर मैलास पडतें. घोड्यावरून प्रवास करणारास दर मैलीं एक रुपया भाडें पडतें.

हिमालयांत मुख्य क्षेत्रें जम्नोत्तरी, गंगोत्तरी, केदारनाथ, उपक्षेत्र तुंगनाथ व बदरीनारायण अशीं चार आहेत. त्यांस जावयास भाड्याचे दर, एक शेरास एका क्षेत्रास पावणे दोन रुपये, दोन क्षेत्रांस साडेतीन रुपये, तीन क्षेत्रांस सव्वा पांच रुपये, व चार क्षेत्रांस सात रुपये असे होते. ह्यांपैकीं जम्नोत्तरी व गंगोत्तरी या दोन क्षेत्रांच्या वाटा फार बिकट असून त्या मानानें केदारनाथ व बदरीनारायण यांच्या वाटा सोप्या आहेत. म्हणून कित्येक यात्रेकरू पहिलीं दोन क्षेत्रें गाळून दुसऱ्या दोन क्षेत्रांच्या यात्रा करितात.

प्रथम मी मोटारीनें तेहरीला गेलों. तेथें जाण्यास मला पांच तास लागले. हें अंतर ५० मैल आहे. तेहरीच्या पुढें धारासू आहे. तो प्रवास मोटारीनें सात तासांचा आहे. अंतर ७५ मैल आहे. धारासूपासून पायीं पंधरा मैल चालून सिलक्यारा चट्टींत दुपारीं उतरलों. साधारणतः

या प्रवासास रोज आठ दहा मैल चालावें लागतें. या चालीनें धारासूपासून मनुष्य जम्नोत्तरीस सहाव्या दिवशीं पोंचतो. दोन चट्टयांमध्यें स्थूलमानानें आठ दहा मैलांचें अंतर असतें.

जम्नोत्तरी व गंगोत्तरीच्या मार्गांत हिमालयांत विंचवाचीं झाडें आजूबाजूंस लागतात. हें झाड कमरेएवढें उंच असून त्यावर कांटे असून तें हिरव्या रंगाचें असतें. याचा अंगास स्पर्श होतांच विंचू चावल्याप्रमाणें कळा येतात. जेथें स्पर्श झाला त्या स्थळीं ह्या झाडाच्या मुळाशीं उगवणाऱ्या 'दवणा' झाडाच्या पाल्याचा रस लावला कीं फणफणाट थांबतो. तेथील लोक ढोरांस हा पाला खावयास घालून अधिक दूध मिळवितात. हें दवणा झाड आपल्याकडील सुवासाच्या दवणा झाडाहून निराळें असतें.

जम्नोत्तरीस जातांना धारासूपासून सिलक्यारी १५ मैल, गंगाणी १२ मैल, सिमली २ मैल, जम्ना ६ मैल, हनुमान १२ मैल, जानकी ४ मैल, जम्नोत्तरी ४ मैल अशा सहा चट्टया लागतात. गंगाणीस अधिक सामान ठेवतात. जम्ना चट्टीपासून हिमाच्छादित पर्वतांच्या रांगा दिसूं लागतात. येथें थंडी फार असल्यामुळें गरम कपड्यांची जरूरी विशेष भासूं लागते. धारासूपासून जम्नोत्तरी अठ्ठावन मैल आहे. मी जम्नोत्तरीस सकाळीं पोंचलों व गरम कुंडांत स्नान केलें.

जम्नोत्तरीस यमुनेचें मंदिर असून त्यांत श्रीयमुनादेवीची मुख्य मूर्ति आहे. यमुनेची मूर्ति फूटभर उंचीची व काळ्या पाषाणाची आणि गंगेची मूर्तीहि तितकीच उंच असून ती पांढऱ्या संगमरवरी पाषाणाची आहे. वैशाख अक्षय्य तृतीयेपासून आश्विन शु. १५ पर्यंत येथें पूजन होतें व इतर काळीं हा प्रदेश बर्फमय असल्यामुळें ह्यांचें पूजन खरसाळीस होत असतें. हें देऊळ जुनें झालें असल्यामुळें नवें देऊळ बांधण्याचें काम सुरू होतें. या देवळाच्या उत्तरेच्या बाजूनें बर्फमय थंड पाण्याचे प्रवाह व दक्षिणेच्या बाजूनें उष्ण पाण्याचे प्रवाह वाहात असतात. या दोन्ही प्रवाहांचा देवळाच्या खालच्या बाजूस संगम झाला आहे. हा चमत्कार

पाहून यात्रेकरू चकित होतो. या ठिकाणीं उष्णोदकाचीं एकंदर चार कुंडें आहेत. त्यांपैकीं एकांतील पाणी इतकें कढत असतें कीं, त्यांतून उकळी फुटत असते. या कुंडांत तांदूळ व बटाटे पुरचुंडींत बांधून बुडवून ठेविले असतां अर्ध्या तासांत शिजून निघतात. हा शिजलेला प्रसाद यात्रेकरू मोठ्या हौसेनें कुतूहलानें व अत्यानंदानें भक्षण करितात. या क्षेत्रांत एकंदर तीस पंड्ये असून ते येथून चार मैलांवरील खरसाळी गांवीं राहतात. मी दुसरे दिवशीं गरम पाण्याच्या प्रवाहांत स्नान करून देवीचें दर्शन घेतलें व निघण्यापूर्वी ब्राह्मण–सुवासिनीस भोजन व दक्षिणा मिळून प्रत्येकीं दीड रुपया दिला. त्यानंतर माझा परतीचा प्रवास सुरू झाला.

जम्नोत्तरीच्या प्रवासांत यात्रेकरू दुसऱ्या मनुष्यास भेटला कीं ‘ जय जम्नामैय्या की जय ” असें म्हणून नमस्कार करितात. मी तेथून सकाळीं नऊ वाजतां निघून जानकी चट्टीस आलों व तसाच हनुमान चट्टीस जाऊन तेथें वस्ती केली. जानकी चट्टीस मार्कंडेयाचें देवालय आहे. हनुमान चट्टीस रात्रीं विश्रांति घेऊन जम्ना चट्टीस दुपारीं भोजन केल्यावर संध्याकाळीं गंगाणी चट्टीस मुक्कामास आलों. गंगाणीहून जम्नोत्तरीस जाण्यापूर्वी आम्हीं तेथें न लागणारें विशेष सामान गंगाणी चट्टीस ठेविलें. होतें तें आतां मला परत मिळालें.

वरील वर्णनांत चट्टी हा शब्द वारंवार आला आहे. त्याचा अर्थ दुकाना-जवळची राहावयाची जागा असा होतो. या दुकानांत जे यात्रेकरू लागणाऱ्या जिनसा खरेदी करितात त्यांस राहाण्याकरितां दुकानदार जागा मोफत देतो व जरूर तर भांडीं देतो. त्या जागेंत चुले मांडलेले असतात. त्यावर यात्रेकरूंनीं स्वयंपाक करावा, तेथें जेवावें, विश्रांति घ्यावी व मार्गस्थ व्हावें. हरएक दिवशीं विशिष्ट चट्टीवर जे इसम लवकर जातात, त्यांस आपल्या मना-प्रमाणें अगोदरच सर्व सोयी मिळतात. हिमालयाच्या यात्रेस मध्यम वयाचे व वृद्ध जातात, त्यांत कित्येक दुर्बल व व्यंगीहि असतात. अशा सर्वांनाहि हा इतका अवघड प्रवास कसा सोसतो, अशी शंका कोणासहि


येण्यासारखी आहे. तिचें समाधान असें करितां येतें कीं, हिमालयांतील हवा अतिशय थंड पण उत्साहजनक असते, पाणी पाचक व मधुर असतें, सर्वत्र उत्कृष्ट सृष्टिसौंदर्य पसरलेलें असतें आणि मुक्कामाहि कित्येक क्षेत्रीं जवळ जवळ असतात. भूकहि इतकी प्रखर लागते कीं, मनुष्याला कधीं जेवीन असें होतें. या कारणानें मनुष्याच्या शरीरांत आजाराला प्रवेश मिळणें शक्य नसतें. प्रवासामुळें रात्रीं झोंपहि गाढ लागते व दुसरे दिवशीं पहाटेस शौचास साफ होतें. वाटेनें अंतराअंतरावर चहा, खवा, दूध, दहीं, मुंगफळीच्या म्हणजे भुईमुगाच्या शेंगा, पकोडी ( म्हणजे बटाट्याचे चणेपीठ मिश्रित तळलेले बोटाएवढाले तुकडे असतात.) इत्यादींचीं दुकानें लागतात, म्हणून खाण्यापिण्याची चंगळ असते. बरें, स्नान करावयाचें तेंहि थंड पाण्यानें, पण ऊन आल्यावर; याकारणानें तें बाधत नाहीं. जशा वाटेनें ठिकठिकाणीं चट्ट्या आहेत, त्याप्रमाणेंच बाबा काळी-कमळीवाला ह्यांच्या धर्मशाळाहि आहेत. या धर्मशाळांत राहावयास फुकट जागा मिळते व स्वतंत्र खोल्याहि मिळतात. त्यांत राहावें व दुकानांतून माल आणून पाकसिद्धि करावी.

## गंगोत्तरी

गंगाणी चट्टीस त्या रात्रीं विश्रांति घेऊन दुसरे दिवशीं सकाळीं गंगोत्तरीकडे जावयास निघालों. येथून गंगोत्तरी पाऊणशें मैल असून तिला जावयाचा रस्ता वेगळा आहे. जेथें रस्ते फुटतात तेथें स्थलनिदर्शक पी. डब्ल्यू. डी. नें पाट्या लावल्यास यात्रेकरूंची एक मोठी गैरसोय दूर होईल. गंगाणीहून सिमली हें ठिकाण २ मैल आहे. तेथून गंगोत्तरीकडे रस्ता फुटतो. हें अंतर अठ्ठावीस मैलांचें आहे. सिमली येथून गंगोत्तरीस जावयास आठ दिवस लागतात. सिमलीपासून गंगोत्तरीकडे जातांना वाटेंत सिंगोटी ७, नाकुरी ४, उत्तरकाशी ६, गोराणी ३, मल्ला १३, पाराशर १०, गंगणाणी १, सुख्खी ९, झाला ३, धराली ३, हरसिल ३, जंगला ४, भैरव ३ व शेवटीं गंगोत्तरी ६ मैल येणेंप्रमाणें ठिकाणें म्हणजे चट्ट्या

लागतात. हें एकंदर अंतर १०३ मैलांचें आहे. ह्या सर्व ठिकाणीं चट्ट्या म्हणजे उतरण्याच्या सोई आहेत.

गंगोत्तरीच्या मार्गात 'जय गंगामैय्या की जय' म्हणून यात्रेकरू परस्परांस वंदन करितात. गंगाणीहून मी सकाळीं दि. २०।५।५० रोजीं निघून सात मैल चालून दुपारीं सिंगोटीस पोंचलों व तेथें भोजन केलें. तेथून चार मैलांवर नाकुरी चट्टी आहे. तेथें रात्रीचा मुक्काम केला. त्याच्या पुढचा मुक्काम सहा मैलांवरील उत्तरकाशी हा होय. हें क्षेत्र शहरासारखें आहे. येथें अवश्य त्या सरकारी



हिमालय दर्शन—पहाटे ५॥ वाजतां

कचेऱ्या आहेत. श्रीकाशीविश्वनाथाचें मंदिर आहे. येथून तीन मैलांवर गौराणी चट्टी आहे. पुढील मल्ला चट्टीवर अधिक सामान ठेविलें. येथून पुढें गंगोत्तरीस जातांना आजूबाजूंस गंगा नदी व खोल, भव्य दऱ्या, खोरीं आहेत. ह्यांतील एका मोठ्या खिंडींतून गंगा नदी मोठ्या सोसाट्यानें भयंकर आवाज करीत व गुरगुरत चालली होती. तिच्या

प्रवाहाबरोबर मोठमोठे काळे, तांबडे, पांढरे गोटे वाहात जात होते. वाटेनें जातांना आपल्याभोंवतालीं वनश्री हिरवीगार व फारच आल्हाददायक होती. गगनचुंबित चीडवृक्ष व पर्वतशिखरें ठिकठिकाणीं दृष्टीस पडून मन सुप्रसन्न होत असे. मधून मधून थंडगार स्वच्छ व शुद्ध पाण्याचे झरेहि आढळत. त्यांचें पाणी पिऊन श्रम-परिहार होत असे. उत्तर दिशेस हिमाच्छादित शिखरांवरून



हिमालयांतील डोंगराच्या उतरणीवरील पायऱ्या-पायऱ्यांची शेती.

पाझरणारें बर्फाचें पाणी मोत्यांप्रमाणें चमकत होतें. बहुतेक सर्वत्र प्रवास पर्वताच्या बुडाजवळून व नागमोडी वाटांनीं होत असे. कांहीं ठिकाणीं वाटा इतक्या अरुंद व धोक्याच्या आहेत कीं. त्यावरून मनुष्य एखादे वेळीं खालीं पडून गंगेंतच जलसमाधि घ्यावयाचा, हें संकट लक्षांत घेऊन कोणी धनिकांनीं तीं ठिकाणें रुंद वाटांचीं केल्यास त्यांस पुण्याची मोठी जोड होण्यासारखी आहे. मी दिनांक २७।५।५० रोजीं सकाळीं नऊ वाजतां गंगोत्तरीस सुखरूप पोंचलों.

" विष्णुपादाब्जसंभूता गंगा त्रिपथगामिनी ।
भागीरथी भोगवती जाह्नवी त्रिदशेश्वरी " ॥ १ ॥

गंगा सात धारांनीं हिमालयावरून खालीं पडते. त्या सात धारा म्हणजे पुढील नद्या होत: १ सिंधु, २ सतलज, ३ यमुना, ४ गंगा, ५ गण्डकी, ६ शरयू व ७ ब्रह्मपुत्रा म्हणजे सरस्वती होय.



हिमालयांतील मुलें

" नमामि गंगे तव पादपंकजम् । सुरासुरैर्वंदितदिव्यरूपम् ।
भुक्तिं च मुक्तिं च ददासि नित्यम् । भावानुसारेण सदा नराणाम्" ॥१॥

येथें श्रीगंगेचें सुंदर मंदिर आहे. मंदिरावर समोर तीन व चारहि दिशांस चार असे सात सुवर्णमय मनोरे आहेत. सकाळीं नवाच्या

सुमारास श्रीगंगादेवीची पालखी रहिवाशांनीं देवळाभोंवतीं फिरविली. मी गौरीकुंड व येथें बारा महिने राहाणारे साधु ह्यांचें दर्शन घेतलें. हे साधु उघडे असून गवताच्या आसनावर मौन धारण करून शांत चित्तानें बसले होते. येथून रविवार दिनांक २८।५।५० इ. रोजीं सकाळीं निघून मुक्काम करीत करीत परत मल्ला चट्टीस आलों. तेथें अधिक ठेविलेलें सामान घेऊन मी श्रीकेदारनाथास जावयास निघालों.

## केदारनाथ

गंगोत्तरीपासून मल्ला चट्टीस मी परत आलों. तें अंतर एकेचाळीस मैल आहे. मल्ला चट्टीपासून केदारनाथास जाण्याचा रस्ता लागतो. येथून केदारनाथ सुमारें ८२ मैल आहे. त्या रस्त्यावर भटवाडी २ मैल, लूणा ५ मैल, बेलाक ४ मैल, पंगराणा ५ मैल, झाला ४ मैल, बुढाकेदार ५ मैल, भैरव ६ मैल, भुवन ६ मैल, घुत्तू ९ मैल, वीर ३ मैल, दुफंदा ३ मैल, पवाली ३ मैल, मुग्गूकी मांडा ९ मैल, त्रिजुगीनारायण ५ मैल, सोनप्रयाग ३ मैल, गौरीकुंड ३ मैल, रामपूर ४ मैल व शेवटीं केदारनाथ ३ मैल अशीं स्थळें लागतात. ह्या सर्व ठिकाणीं राहाण्याची व जेवण्याची सोय करून घेतां येते. ह्या चट्टयांमधील अंतर किमान दोन मैलांपासून तें कमाल नऊ मैलांपर्यंत आहे.

केदारनाथाच्या रस्त्यांत यात्रेकरी "जय केदारनाथमहाराज की जय" असें तोंडानें म्हणून परस्परांस वंदन करितात. केदारनाथास जातांना प्रवासी आपलें विशेष सामान सोनप्रयाग येथें ठेवितात. परत येतांना तें घेऊन जातात.

भटवाडी चट्टीवर हिंदी पाठशाळा व पोस्टाची पेटी आहे. बुढाकेदारनाथ येथें धर्मराज युधिष्ठिरानें उग्र तप केलें. आद्य केदार येथें धर्मगंगा ही नदी गांवांतून वाहात जाते. तिला बालगंगा मिळून दोहींचा संगम झाला आहे. या संगमावरील स्नानाचा महिमा विशेष आहे. येथें बुढाकेदार मंदिर असून मंदिरांत बुढाकेदाराची छातीइतक्या उंचीची पाषाणमय मूर्ति आहे.

घुत्तू चट्टीला भृगू अथवा भिलंगना गंगा वाहात आली आहे. पवाली गांवापासून पुढील गांवीं म्हशी बाळगण्याचा प्रघात विशेष दिसला. मोठमोठ्या खोल, भव्य, अत्युच्च वृक्षाच्छादित खिंडी लागतात. मध्यम चढण–उतरणीनें रस्ता आक्रमावा लागला. वाटेंत बाबा काळीकमळीवाला ह्यांची चट्टी नाहीं व पाणीहि मुबलक नाहीं. लोकांचीं राहावयाचीं घरेंहि फार उंच चढणीवर, उतरणीवर व जंगलांतहि आढळतात. इतक्या भयंकर स्थळीं हे लोक आपल्या बायकांमुलांसह कसे राहातात याचें आश्चर्य वाटतें. या सर्व रस्त्यांत पवालीचा चढ फारच अवघड आहे. त्या चढाला सुरुवात घुत्तू चट्टीपासून होते. येथें दहा पंधरा घरांची वस्ती आहे. धर्मशाळा व चट्ट्या चांगल्या आहेत. घुत्तू चट्टीपासून दुफंदापर्यंत सहा मैल खडी चढण आहे. पुढें दांडी म्हणजे माथा लागतो. येथें उंची बारा हजार फुटांच्या वर जाते. चारीहि धामांपैकीं एकाचीहि उंची इतकी नाहीं. तथापि तुंगनाथ व वसुधारा ह्या उपतीर्थांची उंची एवढी आहे. पवालीधार ऊर्फ दांडी संपली म्हणजे जो उतार लागतो, तो मुंग्रूकी मांडापर्यंत सहा मैल आहे. पुढें त्रिजुगीनारायण पांच मैल व त्याच्याहि पुढें सोनप्रयाग तीन मैल असा हा सत्तावीस मैलांचा पवाली दांडीचा व्याप आहे.

ज्याप्रमाणें परीक्षेंत एकटाच विद्यार्थी येत असलेलें ज्ञान लिहितो त्याप्रमाणें प्रवासांत एकेकटा प्रवासी खडतर मार्गांत चढणीला दम लागल्यावर श्वास घेतेवेळीं 'कोऽहं' म्हणजे 'मी कोण' असा आवाज आंतून निघतो व याचें उत्तरहि उच्छ्वासाबरोबरच 'सोऽहम्' म्हणजे तो परमात्मा तूंच आहेस अशा स्मरणानें अगर चिंतनानें प्रवासश्रम परिहार होतात असा स्वानुभव आहे.

पहिल्या घाटांत खडे चढउतार व वेडीवांकडी वाट आहे. तेथेंच घसरून पडण्याचे धोके आहेत; पण दुसऱ्या घाटांत पहिल्यांतील सर्व धोके द्विगुणित झाले असून शिवाय भयंकर वादळें, हिमवर्षाव, गारा व पाऊस ह्यांच्या आकस्मिक माऱ्यापासून प्राणांतिक धोके असतात. ह्या सर्व गोष्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २२३४५ (१.१.) वि: ९२.५५१२७
क्रमांक २२३५ नों: दि: ९।५।५।५८

नीट लक्षांत ठेवून पर्वालीतील प्रवासाचें वेळापत्रक हवामानाकडे दृष्टि देऊन बोजेवाल्यांचा विचार घेऊन ठरवावें.

या प्रवासांत त्रिजुगीनारायण हें एक महत्त्वाचें क्षेत्र आहे. तें डोंगर-माथ्यावर असून त्याची उंची ७५४० फूट आहे. गांवांत पांचपन्नास उंबरठा असून तो त्रिजुगीनारायणाच्या देवळास लागून आहे. येथें धर्मशाळा आहे. पण पाण्याची टंचाई आहे. बोटाएवढी एक पाण्याची धार आणि तिजवर सर्व गांवाचा निर्वाह. गांवापासून एक मैलावर वाहातें पाणी आहे.

त्रिजुगीनारायण मंदिर दगडी बांधणीचें आहे. देवापुढील सभामंडप त्यास साजेसा नाहीं. हा छपरीवजा आहे. गाभाऱ्यांत वीत दीड वीत उंचीच्या तीन मूर्ति आहेत. मधली मूर्ति महाविष्णूची चतुर्भुज असून डावीउजवीकडे देवीच्या दोन मूर्ति आहेत. एक भू व दुसरी लक्ष्मी आहे. त्रिजुगीनारा-यणाच्या देवळाबाहेर अन्नपूर्णा, गणपति व शिवलिंग हीं आहेत. समोर वाहात्या पाण्याचीं चार कुंडें आहेत. त्यांचीं नांवें ब्रह्मा, विष्णु, महेश व सरस्वती अशीं आहेत. ह्या कुंडांत छातीइतकें पाणी असतें. पहिल्या दोन कुंडांत स्नान करितात. सरस्वती कुंडावर देव, ऋषि, पितृ यांचें तर्पण व महेश कुंडांतून तीर्थोदक प्राशन करितात. दक्षप्रजापतीच्या यज्ञांत त्याची मुलगी सती हिनें अग्निप्रवेश केला. आणि पुढें तिनें हिमालयाच्या पोटीं जन्म घेतला. तिचेंच नांव गिरिजा पार्वती होय. त्रिभुवनाधिपति जो शंकर तो हिचें पाणिग्रहण करणार, हिच्या पोटीं षडानन म्हणजे कार्तिकस्वामी जन्म घेणार. तो देवांचें सेनाधिपत्य पत्करून उन्मत्त झालेल्या तारकासुराला मारणार, आणि त्याच्या अनन्वित छळांतून देवादिकांची मुक्तता करणार असें पार्वतीचें विधिलिखित होतें. तें मुनिश्रेष्ठ नारदास अवगत होतें.


शंकर–पार्वती त्यांचा विवाहसोहळा हिमालयाच्या घरीं म्हणजेच हिमवतपूर राजधानींत झाला. तेंच स्थान परंपरागत माहितीनें आजहि त्रिजुगीनारायण येथें पाहावयास मिळतें.

त्रिजुगीनारायणाच्या सभामंडपांत चार हात लांबीरुंदीचें व दोन हात खोलीचें एक अग्निकुंड आहे. व शेजारीच धर्मशिला आहे हें शंकर–पार्वतीविवाहप्रसंगीं सिद्ध केलेल्या गार्हपत्याग्नीचें कुंड आहे. "या शिलेवर हे पार्वती, तूं आरोहण कर आणि तिच्याप्रमाणें तूं आपले संबंध निश्चित कर" असा शंकरांनीं तिला उपदेश केला. ती धर्मशिला कुंडाजवळच आहे. लग्नाचे लाजादि होम याच अग्नीवर होऊन त्या वधूवरांनीं तीन प्रदक्षिणा ह्याच अग्नीस घातलेल्या आहेत. असा हा सत्ययुगारंभीं जगज्जनक–जननी-विवाहमंगलसमयीं सिद्ध केलेला अग्नि तीन युगें होऊन गेलीं तरी अजून तसा जागृत राहिला, म्हणून या गांवास त्रिजुगीनारायण हें नांव पडलें. या कुंडांतील अग्नि जागृत ठेवण्याकरितां आला गेला यात्री कुंडांत इंधनें टाकतो. अगदीं अल्प किंमतींत म्हणजे एका पैशापासूनसुद्धां जागच्या जागीं इंधन मिळण्याची सोय येथील पंड्यांनीं केली आहे. त्रिजुगी-नारायणापासून सोनप्रयाग तीन मैल आहे. सोनप्रयागापासून एका मैलावर मुंडकटा गणेश व मुंडकटा गणेशपासून दोन मैलांवर गौरीकुंड आहे. मुंडकटा गणेश येथें मोठ्याशा कोनाड्याएवढें लहानसें देऊळ आहे. त्यांत गणेशाची स्थापना आहे. त्या मूर्तीस डोकें नाहीं, म्हणून तिला मुंडकटा गणेश म्हणतात. गौरीकुंडांतील पाणी सतत कढत असतें. एकदां पार्वतीदेवी त्या कुंडावर न्हाहण्यास बसल्या होत्या. त्यांनीं आपल्या अंगा-वरील उटण्याची मूर्ति करून तेथें बसविली होती व तिची प्राणप्रतिष्ठा करून तिजकडे द्वाररक्षकाचें काम दिलें होतें. हाच तो गणेश; इतक्यांत तेथें शंकर आले. त्यास गणपतीनें पुढें जाण्यास प्रतिबंध केला, तेव्हां दोघांची झटापट होऊन शंकरांनीं गणपतीचें डोकें उडविलें आणि ते पार्वतीकडे गेले. पार्वतीनें त्यांना गणेश भेटला का म्हणून विचारलें; तेव्हां त्यांनीं घडलेला तिला वृत्तांत सांगितला. तो ऐकतांच पार्वतीस दुःख झालें. त्या म्हणाल्या, गणेश माझा वरदपुत्र होता. हें समजतांच शंकरांनीं इंद्राच्या एका गजाचें तोंड आणलें व तें बसवून त्यास जिवंत केलें! अशी ही कथा पद्म, स्कंद, मत्स्य इत्यादि पुराणांत वर्णिली आहे.

गौरीकुंड हा गांव नऊ हजार फूट उंचीवर आहे. तेथें दहा वीस घरांची वस्ती आहे. गौरीकुंडाहून केदारनाथास जातांना वाटेंत भूर्जपत्र झाडाच्या खोडाच्या केलेल्या कांहीं जिनसा वाटेंत आढळल्या. प्रत्येक वाटी तीन चार आण्यांस देत. गडव्यास व चंबूस रुपया दीड रुपया पडत होता. हीं भांडीं सुबक व मजबूत होतीं. गौरीमाईचें मंदिर, गौरीकुंड व अमृत-कुंड ह्यांमुळें ह्या स्थानास इतकें माहात्म्य आहे. या कुंडांत कढत पाण्याची मनगटाएवढी धार सतत पडत असते. याच कुंडांत पार्वतीनें स्नान केलें, म्हणून ह्यास 'गौरीकुंड' असें म्हणतात. कुंडाजवळूनच मंदाकिनी उसळून वाहात आहे; येथून एक फर्लांगावर अमृत कुंड आहे व तें गार पाण्याचें आहे. प्रथम अमृत कुंडांत स्नान करून मग गौरी कुंडांत स्नान करावयाचें, अशी वहिवाट आहे. सर्व सुवासिनी बायका पार्वतीमाईचा प्रसाद म्हणून येथें न्हाल्याशिवाय पुढें जात नाहींत.

रामपुरापासून केदारनाथ तीनच मैलांवर आहे. वाटहि चांगली असून वावभर रुंदीची आहे. येथून पुढें गेल्यावर मैल सव्वा मैल अंतरावरून केदारपुरी दिसूं लागते व तेथूनच केदारनाथ मंदिराच्या शिखराचें प्रथम दर्शन होतें. केदारपुरीच्या सीमेवर मंदाकिनी आडवी येते. साकववजा लहानशा लाकडी पुलावरून गंगा म्हणजे मंदाकिनी ओलांडून गेलें म्हणजे केदारपुरींत जातांना मुख्य वाटेस एक फांटा फुटून तो गंगेच्या घाटाकडे गेला आहे. हा घाट खडकांत खोदून केला आहे. तो लहानसाच असला तरी त्यामुळें कांठाशींच पायरीवर बसून स्नान करण्याची उत्तम सोय झाली आहे. मंदाकिनी ओलांडून पुरींत जातांना सरस्वती व मंदाकिनी यांचा संगम झाला आहे व तेथेंच दोन लहानशीं देवळें आहेत. एक संगमेश्वराचें व दुसरें गंगामाईचें आहे. केदारनाथाचें देऊळ गांवाच्या अगदीं टोंकास आहे. तें रस्त्यापासून दोन अडीच पुरुष उंचीवर आहे. वर जाण्यास पायऱ्या आहेत. देवळापुढें चार पांचशें माणसें मावतील असें एक प्रशस्त फरसबंदी पटांगण आहे. महाद्वारापुढें चौथऱ्यावर मोठा नंदी

आहे. नंदीच्या मार्गे पण पटांगणाच्या कडेस लोखंडी खांबाच्या चौकटीस एक पांच सात मणांची मोठी थोरली घंटा टांगली आहे. पटांगणापासून गुडघाभर उंच देवळाचा चौथरा आहे. सर्व देऊळ घडीव चिरेबंदी बांधलें आहे. देवळांतील गाभारा पुण्यांतील ओंकारेश्वराच्या गाभाऱ्याएवढा आहे. शिवलिंग शाळुंका पिंडी आकाराचें नसून तें कैलास शिखराप्रमाणें किंवा धान्याच्या शिगेप्रमाणें घुमटाकार असून त्याचा माथा थोडा बसकट आहे. हें लिंग स्वयंभू आहे. तळाचा घेर दहा बारा हातांचा व लिंगाची



श्रीकेदारनाथ मंदिर व हिमाच्छादित पर्वत

उंची कमरेइतकी आहे. गाभाऱ्यांत अंधार आहे. तुपाचे नंदादीप अहोरात्र असतात. सभामंडपांतील चौफेर भिंतींत कमरेइतक्या उंचीवर पांच पांडव, द्रौपदी, कुंती, पार्वती, लक्ष्मी, इत्यादि देवतांच्या पाषाणी मूर्ति बसविल्या आहेत.

येथील पूजनविधि अगदीं निराळा आहे. देवास अभिषेक नाहीं, अथवा लिंगावर पाणीहि घालावयाचें नाहीं. त्याऐवजीं लिंगावर यथाशक्ति

तूप थापावयाचें असतें. बाकीचे उपचार सारखेच असतात. बेल व फुलें मिळत नाहींत. इतर साहित्य थोडें फार मिळतें. नैवेद्याकरितां नारळ ( गोटा ), पंच मेवा, सुकी फळें, बदाम, मिठाई वगैरे, धूप, दीप, नैवेद्य, वस्त्र, फल, दक्षिणा, गंधाक्षता आणि विशेष भेट ह्यांनीं पूजा होते. लिंग फार उंच असल्यामुळें पंडे देवाच्या अंगावर बसून यजमानाची पूजा चढवितात. आपला पाय देवाला लागतो हें त्यांच्या गांवींहि नसतें.

सर्व पूजा झाली म्हणजे लिंगावर तूप घालून त्यास छातीचा स्पर्श करून भेट द्यावयाची प्रथा आहे. लिंगास आंतल्या आंत प्रदक्षिणा घालतां येते. कोणास महापूजा करावयाची असेल तर संस्थानाकडून ती व्यवस्था केली जाते. त्यांत पंचपक्वान्नी नैवेद्य असतो. साधी पूजा असेल तर तीहि व्यवस्था आहे. पहिलीस एकशें एकवीस रुपये व दुसरीस अकरा रुपये घेतात. येथें सोवळ्या-ओवळ्याचा विधिनिषेध नाहीं. सर्वच यात्रेकरू व पंडे राजरोसपणें पूजाअर्चा, जेवणखाण कपडे घालूनच करतात.

मंदाकिनीच्या कडेकडेनें जवळच दिसणाऱ्या पर्वतावर थोडें पुढें गेलें म्हणजे तेथें एक सरोवर आहे. त्यास कैलास असें म्हणतात. त्या सरोवरांतूनच मंदाकिनीचा उगम झाला आहे. श्रावण-भाद्रपद महिन्यांपर्यंत बर्फ वितळून त्याचें पाणी झालें म्हणजे हें सरोवर दिसूं लागतें. त्यांत नीलकमलें उगवतात. तीं केदारनाथास वाहाण्यासाठीं पंडे आणून देतात व तीं वाळलीं म्हणजे केदारनाथाचा प्रसाद म्हणून यात्रेकरूंस देतात.

केदारनाथाच्या देवळाबाहेर प्रदक्षिणेच्या वाटेवर अष्ट दिशांस आठ कुंडें आहेत. त्यांचीं नांवें—अमृत कुंड, देव कुंड, उदक कुंड, रुद्र कुंड, ऋषि कुंड, हंस कुंड व स्वर्गद्वार इत्यादि जवळ आहेत. यांतील उदक कुंड सोडून बाकींच्यावर आचमन, मार्जन विहित आहे. येथें जवळच भैरवझांप वा भृगुपतन म्हणून एका उंच पर्वतशृंगावर स्थान आहे. तेथून खालच्या दरींत उडी घेऊन देहार्पण केलें म्हणजे आत्महत्येचा दोष तर लागत

नाहींच, पण अतृप्त वासनांचा पुढील जन्मीं फलभोग मिळतो, असें क्षेत्र-माहात्म्य आहे.

केदारनाथाचें देऊळ दररोज सकाळीं आठ वाजतां उघडतें व सायंकाळीं पांच वाजतां बंद होतें. बंद होण्यापूर्वी चार वाजतां नैवेद्य अर्पण होतो. ह्याला इकडे भोग म्हणतात. संध्याकाळीं ७ ते ८ पर्यंत पंडे लोकांस देव-दर्शन होत असतें. हें देऊळ दरवर्षी वैशाख ते आश्विनापर्यंत सहाच महिने उघडें राहातें. नंतर आश्विन ते चैत्रअखेर बर्फांत बुडालेलें असतें! जेव्हां देऊळ बंद असतें, तेव्हां हे पंडे उखी मठास राहातात. ह्या काळांत उखी मठक्षेत्रीं पूजा होते. श्रीकेदारनाथास पन्नासावर धर्मशाळा आहेत. लांकडाचें फारच दुर्भिक्ष आहे. मला आठ आण्यांस पावशेर लांकडें घ्यावीं लागलीं. म्हणून येथें स्वतंत्र स्वयंपाक करतां येत नाहीं; आयते पदार्थ विकत घेऊनच भोजन भागवावें लागतें. 'ज्योतिर्लिंग' ह्या शब्दांत लिंग म्हणजे खूण व ज्योति म्हणजे तेजोमय रूप होय. ज्योतिर्लिंग चयन–यज्ञा-मध्यें विधिपूर्वक केलेल्या वेदीवर जो अग्नि सिद्ध होतो, त्यालाच रुद्र म्हटलें आहे. चयन वेदीचा आकार महादेवाच्या पिंडीसारखा असतो. पिंडीलाच बाण अगर शिवलिंग म्हणतात. वैदिक काळांतील यज्ञकर्मांत वेदीवर प्रकट होणारा अग्नि हें त्या महादेवाचें रूप होतें तेंच पौराणिक काळांत शाळुंका पिंडीरूपानें रूढ झालें आहे.

## बदरीनारायण

केदारनाथाहून दिनांक १३।६।५३ रोजीं सकाळीं निघून दहा मैलां-वरील सोनप्रयागास परत आलों. तेथें ठेवलेलें विशेष सामान बरोबर घेऊन गुप्तकाशीस जावयास निघालों. तें अंतर चौदा मैलांचें आहे. गुप्तकाशी हा पन्नास घरांचा गांव आहे. तो शहरी थाटाचा आहे. येथें श्रीविश्वेश्वर गुप्तरूपानें वास करीत आहेत. म्हणून या गांवास गुप्तकाशी असें नांव पडलें आहे. पुराणांत ह्यास 'गुप्त वाराणसी' असें नांव आहे. गुप्तकाशी या नांवामुळें येथें मनकर्णिका कुंडावर जो दानधर्म करावयाचा,

तो गुप्तदान असावा, असें पंडे सांगतात. कुंडांत स्नान करण्यास किंवा देवदर्शन घेण्यास मुक्तद्वार आहे. दक्षिणा वा कर नाहीं. गुप्तकाशीचें माहात्म्य तेथील विश्वेश्वराचें स्थान व मनकर्णिका कुंड यांमुळें आहे. विश्वेश्वराच्या मंदिरांत शाळुंका पिंडी आहे. देवळाला सोन्याचा कळस आहे. पिंडीजवळ अष्ट धातूंची गौरीची मूर्ति आहे. या देवळाच्या उत्तर अंगास लागूनच एक लहानसें मंदिर आहे. त्यांत अर्धनारीनटेश्वराची नंदीवर आरूढ झालेली संगमरवरी पांढरी शुभ्र सुंदर मूर्ति आहे. विश्वेश्वर-मंदिरापुढें मनकर्णिका कुंड आहे. त्यांत डाव्या हाताच्या गोमुखांतून यमुनेची व उजव्या हाताच्या सिंहमुखांतून भागीरथीची अशा दोन मनगटाएवढ्या जलधारा अक्षय्य पडत असतात. दोन्ही धारांचें पाणी भिंगासारखें स्वच्छ व गार आहे. धारेखालीं चांगलें उभें राहून स्नान करतां येतें. देवळाच्या आवारांत चांगली प्रशस्त धर्मशाळा आहे.

गुप्तकाशी गांव सहजसुंदर आहे. त्याचें दर्शन होतांच मन एकदम आकर्षिलें जातें. हवा पांच हजार फूट उंचीवरची आहे. पाणी उत्तम व निसर्गशोभा अवर्णनीय. डोंगरपायथ्यास मंदाकिनीचा अफाट प्रवाह आणि माथ्यास शुभ्र बर्फाचिलेपन ह्या सर्व गोष्टींमुळें हें स्थान ऐहिक दृष्टीनें विश्रामधाम आणि पारमार्थिक दृष्टीनें तपोभूमि होऊन राहिलें आहे. हवा, पाणी, उंची ह्या दृष्टीनें हें स्थान सर्वतोपरी आरोग्यास हितावह आहे. ह्या मार्गांत बर्फांतलि व अंधारांतील मार्ग मला अकस्मात् तरुण पुरुषानें दाखवून संकटमुक्त केलें.

केदारनाथापासून बदरीनारायणाचें अंतर एकशेंचार मैल आहे. केदारनाथ ते सोनप्रयाग १० मैल, येथें अधिक ठेवलेलें सामान घेऊन पुढें जातात. गुप्तकाशी १४ मैल, उषामठ २ मैल, गणेश ३ मैल, तुंगनाथ ११ मैल, मंडल ६ मैल, गोपेश्वर ३ मैल, चमोली ८ मैल. येथें अधिक सामान ठेवतात. पिप्पलकोटी ९ मैल, गरुडगंगा ४ मैल, पाताळगंगा ४ मैल, गुलाबकोटी २ मैल, हेलंग २ मैल, जोशीमठ ७ मैल, विष्णुप्रयाग २ मैल,

घाट ४ मैल, पांडुकेश्वर २ मैल, लामबगड ३ मैल, हनुमान ३ मैल व बदरीनारायण ५ मैल अशीं प्रमुख गांवें लागतात. ह्या सर्व ठिकाणीं चट्ट्या आहेत. बदरीनारायणाच्या प्रवासांत यात्रेकरी एकमेकांस 'जय बदरीनारायण की जय' अगर 'जय बदरीविशाल की जय' म्हणून जयजयकार करतात.

गुप्तकाशी व उखीमठ हीं एकमेकांसमोरील दोन डोंगरांवरचीं दोन गांवें आहेत. एका डोंगराचा उतार संपला कीं, लगेच दुसऱ्याचा चढ सुरू होतो. दोन डोंगरांमधून मंदाकिनीचा प्रवाह वाहात आहे. तेथें पात्राची रुंदी सव्वाशें फूट आहे आणि त्यावर तितक्या लांबीचा लोखंडी तारांचा पक्का झुलता पूल आहे. उखीमठ गांव गुप्तकाशीपेक्षां मोठा आहे. जवळच एक सुंदर सरोवर आहे. उषामठाचें 'उखीमठ' हें अपभ्रष्ट रूप आहे. प्रल्हादपुत्र बाणासुर ह्याची ही राजधानी होती. बाणासुराला उषा नांवाची मुलगी होती. तिनें श्रीकृष्णाचा नातु अनिरुद्ध ह्याच्याशीं गांधर्व-विवाह केला होता. तें जोडपें येथें राहात होतें. मुलीचें हें कृत्य बाणासुरास समजलें, तेव्हां त्याला आनिरुद्धाशीं युद्ध करावें लागलें. श्रीकृष्णानें बाणासुराचा पराभव केला, तेव्हां बाणासुरानें तिचें अनिरुद्धाशीं लग्न करून दिलें. बापाची वारस उषा म्हणून तिजकडे सर्व राज्याचा वारसा आला, त्यामुळें या नगरीस 'उषामठ' असें नांव पडलें.

उखीमठ ही केदाराची गादी आहे, म्हणजे केदारनाथाची येथें हिंवाळ्यांत सहा महिने वस्ती असते. त्या वेळीं केदारनाथाची दैनंदिन पूजाअर्चा येथेंच होते. उखीमठास एका प्रशस्त प्राकारांत ॐकारेश्वराचें भव्य देवालय आहे. त्यांत शाळुंका पिंडी आहे; व राजऋषि मांधाता ह्याची पाषाणमूर्ति देवाच्या मागच्या बाजूस आहे.

बदरीनारायणाच्या वाटेवरील महत्त्वाच्या ठिकाणांपैकीं **तुंगनाथ** हें एक होय.

प्रभु आपकी माया अपार है। उसे जानना मानव धर्म है ॥
आप भक्तीसे सेवक होता है । अतः अखंड ध्यान अवश्य है ॥१॥

एवढी उंची चारहि धामांपैकीं एकाचीहि नाहीं. ती बारा हजार फुटांवर आहे. तुंगनाथाचें देऊळ मोठें आहे. आवार प्रशस्त आहे. लिंग लहानच आहे. त्यास छत्रचामर, पंचमुखी चांदीचा मुखवटा वगैरे उपकरणें आहेत. पंचकेदारांपैकीं हें तिसरें स्थान असून तें बाहूंच्या ठिकाणीं कल्पिलेलें आहे. उखीमठापासून हें साडेएकवीस मैल आहे. केदारनाथास जाणाऱ्या यात्रेकरूंपैकीं सहस्रांत फार तर दहा बारा यात्रेकरू तुंगनाथास जातात. उखीमठ सोडल्यानंतर मोठी व सोईस्कर अशी मंडल चट्टीच प्रथम लागली. ती तुंगनाथ पहाडाच्या पायथ्याशीं आहे. मंडल चट्टीपासून अकरा बारा मैलांवर केदारनाथाच्या विराट स्वरूपाचें मुखस्थान जें रुद्रनाथ तें आहे. पंचकेदारांपैकीं हें चौथें स्थान आहे.

मंडल चट्टीपासून ८ मैल **चमोली** गांव अलकनंदेच्या कांठीं उंचावर आहे. वस्ती फारशी नाहीं. तरी तालुक्याच्या ठिकाणाप्रमाणें। पोस्ट, तार वगैरे कचेऱ्या आहेत. येथें सर्व प्रकारचे जिन्नस मिळतात. गांवांत धर्मशाळा आहेत. गांवांत जाण्यास अलकनंदेवर सव्वा दोनशें फूट लांबीचा व पांच फूट रुंदीचा तारांचा झुलता पूल आहे. गांवांत पाण्याची गैरसोय आहे. येथून बदरीनारायण सत्तेचाळीस मैल आहे. यात्रेकरू फालतू सामान येथें ठेवतात. बदरीनारायणाहून परत येतांना तें घेतात. चमोलीपासून पूर्वेस पंचवीस मैलांवर **त्रिशूळ** नांवाचें हिमशिखर २५,६६० फूट उंचीचें आहे.

-चमोलीपासून नऊ मैलांवर पिप्पलकोटी आहे. येथें पांचपंचवीस घरें असून बाजार व चट्टी आहे. बाजारांत शिलाजित, गंगावन, चवऱ्या, कस्तुरी, सुरमा, मृगाजिन, व्याघ्राजिन वगैरे वस्तु मिळतात. पिप्पलकोटीपासून हेलंग चट्टी बारा मैलांवर आहे. तेथून एका मैलावर खनोल्टी चट्टी लागते. तेथून अर्ध्याच मैलावर वृद्ध किंवा आदिबद्री हें स्थान आहे. पंचकेदाराप्रमाणें पंचबदरीहि आहेत. त्यांचीं नांवें:— १. आदिबदरी २. विशालबदरी ३. भविष्यबदरी ४. योगबदरी व ५ ध्यानबदरी ह्या आहेत. याच वाटेवर जोशी मठ हा तालुक्याचा गांव आहे. श्रीशंकराचार्यांनीं

बौद्ध मताचें खंडन करून भारतवर्षाच्या चारहि दिशांना चार मठ स्थापन केले. त्यांपैकीं उत्तरेस एक मठ बदरिकाश्रमीं स्थापन केला. त्याची गादी येथें आहे; पण आचार्यांनीं स्थापन केलेली येथील मठाधिपतीची शिष्य-परंपरा खंडित झाल्यामुळें तो अधिकार आतां रावळांकडे गेला आहे. येथील मुख्य देवळें शारदांबा व दुर्गादेवी हीं होत. येथें दंडधारा नांवाचें तीर्थ आहे. त्याच्या दोन जलधारा सतत वाहात असतात, म्हणून त्यास दंडधारा म्हणतात. जोशी–मठापासून बदरीनारायण वीस मैल आहे. हें बदरीनारायणाचें नाक आहे. बदरीनारायणाच्या पुण्यतपोभूमीस येथूनच प्रारंभ होतो. येथूनच कैलास मानस सरोवराकडे मार्ग जातो. मी मुक्काम करीत करीत बदरीनारायणास दिनांक २३।६।५० इ. रोजीं अधिक आषाढ शु. अष्टमीला शुक्रवारीं दुपारीं बारा वाजतां पोंचलों. वाट भारी अरुंद, डोंगर ठिसूळ, डोंगरावरील दगड कोसळून अंगावर कधीं पडेल व मनुष्याचा त्याखालीं केव्हां चुराडा उडेल याचा नेम नसे. एका बाजूस नदी वाहात आहे व दुसऱ्या बाजूस उंच खडा डोंगर आहे, असें येथील दृश्य आहे.

## हिंदी शब्दांचा मराठी अर्थ

चट्टी–यात्रेकरू उतरण्याची जागा. तट्टी–पायखाना, संडास. आलू–बटाटा. पगंडी–पायवाट. पकोडी–बोटाएवढीं जाड व लांब बटाटा भर्जी. लाला–दुकानदार. निमक–मीठ. आटा–कणीक. रोटी–पोळी. चौल–तांदूळ. डाळ–आमटी. लकडी–लांकडें. दंडा–टेंकायची काठी. कंडी–खुर्ची. दांडी–डोली. झापान–मोठी डोली, जींत दोन चार.माणसें सामावतात.

पंचप्रयागाचीं नांवें—नंद, कर्ण, रुद्र, देव व विष्णु हीं होत. प्रयाग म्हणजे दोन अथवा अधिक नद्यांचा संगम ज्या स्थळीं होतो त्यास प्रयाग असें म्हणतात.

**गरुडगंगा**–चट्टीपासून दोन मैलांवरील टंगणी चट्टीला पिंचफळें आहेत. येथपासून पुढें चट्टयांचीं नांवें आरंभीं व शेवटीं अशीं दोन वेळां

एकेका लांकडी फळीवर देवनागरी लिपींत स्पष्ट लिहिलेली आढळली. हीच पद्धत सर्व गांवांत व प्रत्येक चट्टीवर सुरू होणें अवश्य आहे.

## बदरीनारायण

गांवांत जातांना वाटेंत अलकनंदेचा प्रवाह असून त्याला कांचनगंगा मिळाली आहे. गांवाजवळच ऋषिगंगा व अलकनंदा यांचा संगम झाला आहे. ऋषिगंगेवरील पूल ओलांडला म्हणजे गांवांत प्रवेश होतो. तेथून



श्रीबदरीनाथपुरी दूरदर्शन व मागें हिमाच्छादित नीलवर्ण पर्वत

अलकनंदेचा प्रवाह, तिच्या कांठापासून वर होत गेलेला गांवाचा विस्तार, बदरीशाच्या देवळाचें महाद्वार व शिखरें, तप्त वा अग्निकुंडाचें मंदिर, पार्श्वभागीं गंधमादन पर्वताचीं हिमशिखरें, हें सर्व पाहून मन मोहून जातें व पवित्र होतें. मी बदरीनारायणास पोंचल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं ऋषिगंगेवर स्नान केलें व नंतर बदरीनारायणाच्या दर्शनास गेलों. ऋषिगंगेपासून गांवाची पूर्वपश्चिम लांबी अर्धा मैल व रुंदी पाऊण फर्लांग

आहे. गांवांत मोठमोठ्या व सोईस्कर धर्मशाळा पुष्कळ आहेत व पंड्यांचीं घरेंहि आहेत. गांवांत बाजारपेठ मोठी असून तेथें खाण्यापिण्याच्या व इतर सर्व वस्तु मिळतात, पण ह्या फार महाग असतात.

गंगेच्या उजव्या कांठीं गांवांत साधारण मध्यावर बदरीनारायणाचें भव्य मंदिर आहे. रस्त्यापासून ते दीड दोन पुरुष उंचीवर असून त्याकडे जाण्यास प्रशस्त पायऱ्या चढून गेलें कीं एक चौथरा लागतो. त्याच्यापुढें महाद्वार व त्यावर माडी आहे. तिच्या दर्शनी अंगास नक्षीदार कमानी असून बांधकाम डौलदार व प्रेक्षणीय आहे. माडीवरची जागा धर्मशाळेसारखी मुक्तद्वार आहे. महाद्वार पर्वतीच्या देवळाप्रमाणें मोठें व शोभिवंत आहे. महाद्वाराच्या आंत थोडी मोकळी जागा सोडून दोन दालनी मंदिरें आहेत. त्यांतील पुढचें दालन म्हणजे सभामंडप व मागचें दालन म्हणजे गाभारा होय. सभामंडप सुमारें शंभर माणसें मावतील एवढा मोठा आहे. त्यांत हवा व उजेड भरपूर आहे. गाभाऱ्यांत मात्र अंधार आहे. ( प्रत्येक देवळाच्या दरवाजावर देवाचें नांव स्पष्टपणें हिंदींत लिहिलेलें असावें. यायोगें प्रत्येक यात्रेकरूस देव कोणता तें स्पष्ट कळेल. तसेंच गाभाऱ्यांत अगर अंधारी देवळांत भरपूर दिवे असावेत, जेणेंकरून प्रत्येक यात्रेकरूस विशिष्ट वस्तु स्पष्ट दिसेल. ) त्यांत समया व नीरांजनें यांचा उजेड पडेल तेवढाच. सभामंडपावर मोठा डेरेदार व उंच कळस आहे. गाभाऱ्यावर दोन छपरी शिखर आहे. छपरावर सोन्याचे पत्रे ठोकून तें चोहोंबाजूंनीं मढविलें आहे. देवळाभोंवतीं प्रदक्षिणेकरितां दहा पंधरा फूट रुंदीची पायवाट आहे. देवळाच्या आवारांतच डावे उजवे हातास सोपे व घरें आहेत. त्यांत पाठशाळा, कचेऱ्या व रावळजींचें राहणें असतें. नारायणाचें देवालय गढवालच्या महाराजांनीं तेराव्या शतकांत बांधलें; व देवी अहल्याबाई होळकर ह्यांनीं त्यावर सोन्याचा कळस बसविला.

गाभाऱ्यांत कमरेइतक्या उंचीच्या सिंहासनावर मध्यभागीं काळ्या कुळकुळीत पाषाणाची पद्मासनस्थ ध्यानमुद्रा लावून बसलेली भगवंताची

चतुर्भुज मूर्ति आहे. तिची उंची तीन फूट आहे. दोन हात जुळलेले आहेत व दुसऱ्या दोन हातांत शंख–चक्र आहे. नारायणास नेहमीं सुवर्ण मुखवटा घातलेला असतो. मुकुट, छत्रचामर सोन्याचीं आहेत.



बद्रीनाथाचें हिमपूजन

मुकुट हिरेजडित आहे. डाव्या अंगास लक्ष्मी चवरी ढाळीत उभी असून तिच्या पलीकडे नरनारायणाच्या शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेल्या दोन चतुर्भुज मूर्ति आहेत. उजव्या अंगास कुबेर व गणपति आहेत.

या ओळीच्या खालच्या पायरीवर उजव्या बाजूस गरुड, मध्यें उद्धव व डाव्या बाजूस नारद आहेत. नारदापलीकडे अक्षय्य नंदादीप आहे.

नारायणाची मूर्ति ही फार प्राचीन काळची आहे, असें पंडे लोक सांगतात. बौद्ध काळांत बौद्ध लोकांनीं ही अलकनंदेंत टाकून दिली. पुढें अगदीं योग्य प्रसंगीं श्रीमदाद्य शंकराचार्य यांना दृष्टान्त होऊन त्यांनीं ती नारदकुंडांतून काढून तत कुंडाशेजारीं असलेल्या गरुडकोटी गुंफेंत तिची स्थापना केली. आचार्यांनीं या मूर्तीची स्थापना केली असल्यामुळें यांच्या जातीच्या नंबुद्री ब्राह्मणांकडेच पूजाअर्चेचे सर्व अधिकार परंपरेनें चालत आलेले आहेत. मुख्य पुजारी ह्यास रावळ म्हणतात. आचार्यांनीं भारतांत धर्मरक्षणाकरितां चारहि दिशांना चार मठ स्थापिले. त्यांतील उत्तरेचा मठ बदरिकाश्रमीं आहे. प्रदक्षिणेच्या वाटेवर लक्ष्मी, गणपति, घंटकर्ण ( नगरपाल ) यांचीं देवळें असून महाद्वारांतून आंत गेलें म्हणजे डाव्या हातास एका कमानींत वीर मारुतीची मोठी मूर्ति आहे. ही रामदासस्वामींनीं स्थापिली असें म्हणतात. देवळासमोर गंगेच्या पात्रापर्यंत उतरून जाण्यास घाट आहे. त्याच्या अर्ध्या वाटेवर केदारनाथाचें देऊळ आहे. जे यात्रेकरू बदरीकेदारास जाऊं शकत नाहींत, त्यांच्यासाठीं हें देऊळ आहे.

बदरीनारायणाच्या नैवेद्याकरितां दररोज दोन तीन मणांचा भात शिजतो. त्याच प्रमाणांत आमटीहि तयार करितात. हे पदार्थ शिजविण्याचें काम तत्प्रांतीय ब्राह्मण करितात. तो नैवेद्याचा भोग देवाला चढविण्यास दुपारचे दोन तीन वाजतात. नंतर त्या नैवेद्याचा भात प्रसाद म्हणून विकला जातो. ब्रह्मकपाटीं पिंडदान–श्राद्धाकरितां लागणारे पिंडहि ह्याच भाताचे रुपयाएवढे वाटोळे व चपटे केलेले विकत मिळतात. या सोईमुळें शेंकडा नव्याण्णव यात्रेकरू चूल पेटविण्याच्या भानगडींत पडत नाहींत.

या देवस्थानाला साडेतीनशें खेडीं इनाम असून त्यांचें उत्पन्न पाऊण लक्षापर्यंत येतें. त्याशिवाय देवापुढें ठेवलेल्या द्रव्याचें उत्पन्न दीड दोन

लक्षांपर्यंत होतें. हें उत्पन्न रावळजींस मिळत असलें तरी त्यावर सरकारची देखरेख असते. पूर्वी हे रावळ शंकराचार्यांच्या जातीचे नंबुद्री ब्राह्मण



बर्फात बुडालेला बदरीनाथ गांव

असत. पण अलीकडे ती गादी वंशपरंपरेची झाली आहे. बदरीनारायण क्षेत्रांत पांच शिलास्थानें आहेत. तीं अशीं:—१ गरुड, २ नारद, ३ मार्केंडेय, ४ वराह व ५ नरसिंह अशीं आहेत. त्याचप्रमाणें पांच तीर्थें

आहेत तीं अशीं:—१ ऋषिगंगा, २ कूर्मधारा, ३ प्रल्हादधारा, ४ तप्त कुंड, व ५ नारद कुंड अशीं आहेत. बदरीनारायणापासून उत्तरेस अर्ध्या



वसुधारा

मैलावर अलकनंदेच्या कांठीं एक मोठा खडक आहे, तेथेंच तिच्या कांठाशीं घाट खोदून दोन पायऱ्या केल्या आहेत. या स्थानास ब्रह्मकपाल वा पितृतीर्थ म्हणतात. तेथें पितरांचें पिंडदानपूर्वक श्राद्ध करितात. तें केलें म्हणजे पुन्हा पिंडदानश्राद्ध करावें लागत नाहीं. गयेला विष्णुपदीं पिंडदान केलें म्हणजे पितरांना विष्णुलोक प्राप्त होतो, पण ब्रह्मकपालीं पिंडदान केल्यानें ते ब्रह्मलोकास जातात. म्हणजे त्यास सायुज्यमुक्ति प्राप्त होते.

बदरीनारायणापासून पुढील उपक्षेत्रें पाहावयाचीं असल्यास त्याचें अंतर पुढीलप्रमाणें आहे. बदरीनारायण ते मातामूर्ति दोन मैल, लक्ष्मीवन सहा मैल, सौधारा अडीच मैल, चक्रतीर्थ तीन मैल, सतोपथ अडीच मैल, सोनकुंड दीड मैल व विष्णुकुंड अर्ध्या मैलावर आहे. सुमारें साडे अठराशें फूट उंचीवर माना गांवाजवळ सरस्वतीचा उगम आहे. ह्याच्या कांठीं गणेशगुंफा व व्यासगुंफा आहेत. येथें व्यासांनीं आपलें वाङ्मय लिहिलें. आद्य शंकराचार्यांनीं भाष्य केलें. श्रीरामदासस्वामी, विवेकानंद व सुभाषचंद्र ह्यांना विशिष्ट अतुल पौरुषी सत्कृत्यें करण्यास येथून स्फूर्ति झाली. व्यासगुंफेजवळ मुचकुंदा गुंफा, मातामूर्ति–मंदिर व वसुधारा वगैरे स्थळें आहेत.

दिनांक २६–६–५० इ. रोजीं सकाळीं तप्तकुंडांत स्नान करून बदरीनारायणाहून निघून नऊ मैलांवरील विनायकी चट्टीवर दुपारीं मुक्काम केला. आतां माझा परतीचा प्रवास सुरू झाला. दिनांक २९–६–५० इ. रोजीं **मठ** चट्टीवर आलों. तेथें मीं ठेवलेलें अधिक सामान ताब्यांत घेतलें.

वास्तविक भर दुपारीं मठ चट्टीवरच भोजन करून चमोलीस जावयास पाहिजे होतें; पण चमोली गांव मठ गांवापेक्षां मोठा, म्हणून तेथें भोजन करण्याच्या इच्छेनें गेलों; पण तेथें भोजन करण्याच्या अनेक अडचणींनीं मुळींच जमलें नाहीं. भोजनाशिवाय उपाशींच राहून दुकानांतील पदार्थ विकत घेऊन ते खाण्यावर दोन दिवस कंठावे लागले. पाऊस फार पडल्यामुळें रस्ते बिघडले, मोटारीच न मिळाल्यामुळें पायीं दोन दिवस प्रवास करावा लागला. मोटारी बिघडलेल्या रस्त्यांत चालू न शकल्यामुळें कामापुरता सर्व यात्रेकरूंना पुढील रस्ता सुरळीत करून घ्यावा लागला. नंतर मोटारी कंपनीचे मालक सहकुटुंब आमच्याबरोबरच कर्मधर्मसंयोगानें सांपडले गेल्यामुळें त्यांच्या खड्या आज्ञेनें दोन मोटारी जादा काढून मोठ्या माराकुटीनें दिनांक २–७–५१ रोजीं सायंकाळीं हृषीकेशास सुखरूप पोंचलों.

श्रीनगर येथें पाहाण्यासारख्या दोन गोष्टी आहेत. एक कमळेश्वरमंदिर व दुसरें श्रीमज्जगद्गुरु आद्य शंकराचार्यांनीं स्थापन केलेलें 'श्री' यंत्र होय.

श्रीकृष्णानें कमळेश्वरास सहस्र कमळें वाहाण्याचा संकल्प केला. एक कमळ कमी आलें तें आपलें नेत्रकमल पटकन् वाहिलें. या भक्त्युत्कटते-मुळेंच महादेवानें कृष्णास त्रिभुवनाचें संरक्षण करणारें सुदर्शनचक्र दिलें. ही कथा पुष्पदंतांनीं आपल्या महिम्नस्तोत्रांत गायिली आहे.

हरिस्ते साहस्रं कमलबालिमाधाय पदयो– ।
र्यदेकोने तस्मिन्निजमुदहरन्नेत्रकमलम् ॥
गतोभक्त्युद्रेक परिणातिमसौ चक्रवपुषा ।
त्रयाणां रक्षायै त्रिपुरहर जागर्ति जगताम् ॥ १ ॥

कमळेश्वर देवळाच्या आवारांत उजवीकडे माडीवर आद्य शंकराचार्यांची गादी आहे. शेजारच्या माडींत वीत लांबी-रुंदीचे दोन ताम्रपट आहेत. त्यावर श्रीयंत्र कोरलेलें आहे. श्रीयंत्र म्हणजे त्रिकोणांत त्रिकोण उलटे सुलटे मिळून नऊ असे काढलेले असतात कीं, मोठ्या–दोन्ही त्रिकोणांचे सहा कोन भोंवतीं काढलेल्या परिघास चिकटले जावेत. ह्या परिघाबाहेर आणखी दोन वर्तुळें असतात. त्यांत बाहेरच्या वर्तुळांत सोळा व आंतल्यांत आठ कमळदळें असतात. निर्गुण उपासनेपेक्षां सगुणोपासना सुलभ पडते. ह्या सगुणोपासनेंतील एका विशिष्ट आकृतीला 'श्रीयंत्र' असें नामा-भिधान आहे.

चमोलीहून हृषीकेशास जाण्याकरितां मोटारी मिळतात. येथें येतांच बरो-बरच्या मजुरास सर्व मजुरी चुकती करून त्या जबाबदारींतून मोकळा झालों.

## हृषीकेश

हें क्षेत्र भागीरथीच्या कांठीं आहे. गांवापासून अर्ध्या मैलावर गंगेच्या पात्रांत चंद्रेश्वर महादेवाचें लहान मंदिर आहे. लिंग स्वयंभू आहे. हें देवालय आद्य शंकराचार्यांनीं बांधलेलें असावें. गांवांत भरत व रामचंद्र

ह्यांचीं स्वतंत्र देवळें आहेत. भरताची मूर्ति चतुर्भुज आहे. रामाच्या देवळासमोर ऋषिकुंड असून त्यावर रामाच्या पादुका आहेत. येथें टपाल, तारघर व पोलीस-चौकी आहे. बाबा काळीकमळीवाला या संस्थेची मुख्य कचेरी येथें आहे. तिजकडून सर्व यात्रेकरूंस सर्व तऱ्हेची इच्छित मदत मिळते. हृषीकेश गांव अर्धा अधिक या संस्थेचाच आहे.

बाबा काळीकमळीवाले हे पूर्वाश्रमीं व्यापारी होते. त्यांत अपयश येऊन ते निराश झाले; अशा स्थितींत त्यांस एका साधूच्या कृपेनें पुन्हा बरेंच द्रव्य मिळूं लागलें. तें द्रव्य हे त्या साधूंना देऊं लागले. त्या महाभागांनीं बाबांस सांगितलें कीं, तूं हें द्रव्य हिमालयांतील यात्रेकरूंच्या दुःखशमनार्थ सर्व खर्च कर. तेव्हांपासून हे पुढें विरक्त बनून स्वतः कांबळें वापरून सर्व द्रव्य यात्रेकरूंस सुख देण्याच्या कामीं खर्चूं लागले! पुढें त्यांचीं परोपकारी कृत्यें पाहून अनेक दात्यांनीं देणग्या देऊन ही संस्था हल्लीं मोठी चिरस्मरणीय केली आहे!

येथील धर्मशाळेंत चार हजार यात्रेकरू मावतात. यात्रेकरूंच्या उपयोगासाठीं भांडींकुंडीं मिळतात. दररोज साधू, बैरागी, संन्यासी अशा सातआठशें गरजू यात्रेकरूंस एक वेळ पोट भरेल इतका कोरडा शिधा किंवा अन्न वांटलें जातें. हिमालयांतील यात्रेच्या वाटेवर वस्तीच्या ठिकाणीं अशीं सदावर्तें आहेत. ज्यांच्याजवळ निदान पांच तरी रुपये आहेत, अशाच गरजू लोकांस शिधा मिळण्याबद्दल चिठ्या मिळतात. पुढच्या ठिकाणीं ही चिठ्ठी दिली कीं शिधा मिळतो व पुढची चिठ्ठी मिळते. अशी ही सांखळी आहे. हृषीकेशापासून सुमारें दीड मैलावर मुनी की रेती म्हणून गांव आहे. तें गंगेच्या कांठीं आहे. येथें शत्रुघ्नाचें मंदिर आहे. धर्मशाळा आहे. स्वामी रामतीर्थ हे येथें येऊन कांहीं काळ एकांतांत राहात असत. त्यांच्या स्मरणार्थ 'रामाश्रम' नांवाचें संस्कृत वाचनालय आहे. हृषीकेशापासून तीन मैलांवर भागीरथीवरून पलीकडे जाण्यासाठीं लोखंडी तारांचा झुलता पूल आहे. त्यास 'लक्ष्मण झूला' म्हणतात. हा झूला कलकत्त्याचे दानशूर शेठ सूरजमल्ल ह्यांनीं हजारों रुपये खर्चून बांधला. लक्ष्मण झूल्याजवळ लक्ष्मणमंदिर आहे.

हृषीकेशापासून लक्ष्मण झूल्यापर्यंतची भूमि ही तपोभूमि आहे. पुढें स्वर्गभूमि लागते. या तपोभूमीच्या दोन्ही बाजूंस डोंगर असून ते वनश्रीनें आच्छादिले आहेत. त्यांच्यामधूनच भागीरथीचा अखंड प्रवाह सुरू आहे. हिमालयाच्या वैभवाची चुणूक प्रथम येथेंच दिसते. अशा या तपोभूमींत भागीरथीच्या कांठीं स्वर्गाश्रम नांवाचें एक रम्य स्थान आहे. भागीरथीला तेथेंच एक लहानसा सुंदर घाट आहे. भागीरथीचें पात्र तीनशें फूट रुंद आहे. येथें एका कांठावरून दुसऱ्या कांठावर जाण्यास एक नाव सतत चालू असते. तिला भाडें पडत नाहीं. स्वर्गाश्रमाच्या आसपास गंगेच्या कांठानें दूर दूर अशा पर्णकुटिका व साधीं घरें बांधून त्यांत साधु, संन्यासी, बैरागी वगैरे विरक्तीच्या मार्गास लागलेले साधक राहातात. यांचा आचार नियमित व एकनिष्ठेचा दिसतो. कोणाचें जपानुष्ठान, तर कोणाचें रामनाम, कोणाचें वेदान्ताध्ययन, तर कोणाचीं योगासनें, प्राणायाम, ध्यान-धारणा इत्यादि चालू असतात. येथील वातावरण शांत, प्रसन्न व म्हणूनच एकाग्रतेस अनुकूल आहे.

स्वर्गाश्रमानजिक गीताभवन आहे. हें गोरखपूरच्या गीतामंडळानें हजारों रुपये खर्चून बांधलें आहे. हें तटबंदीचें असून आंत पुष्कळ लोक वसतील इतकें तें मोठें आहे. गीताभवनांत भिंतीवर गीतेचे सातशें श्लोक उत्तम वळणदार अक्षरांत लिहिलेले आहेत. सर्व सोयी असून यांत नयनमनोहर प्रवचनमंदिरहि आहे.

## स्वर्गवर्णन

मेरू पर्वताचा विस्तार चौऱ्याऐंशी हजार योजनें आहे. मेरू पर्वताच्या अलीकडे हिमालय पर्वत आहे. येथपर्यंत धर्माशिवाय इतर पांडव आले. पुढें धर्म व श्रीकृष्ण चालले. पुढील मार्ग फारच खडतर आहे. मेरू पर्वताचीं तीन शिखरें आहेत. त्यांवर ब्रह्मा, विष्णु व महेश राहातात. ह्यांपैकीं सत्यलोकांत ब्रह्मदेव, पांचेच्या वैकुंठांत विष्णु व स्फटिकमय कैलासांत शंकर राहतात. सत्यलोकाखालीं इंद्राचा अमरावतीलोक आहे. ह्या स्थळीं

गण, गंधर्व, लोकपाळ, तेहतीस कोटी देव राहातात. हा लोक सुवर्णाचळ चौदा स्थळांनीं वेष्टित आहे. येथें कामधेनूचीं खिल्लारें, कल्पतरूचीं वनें, अमृताचीं पुष्कळ सरोवरें उचंबळत आहेत. येथील भूमि सुवर्णमय आहे. येथें हिरे, रत्नें, परिसादिकांच्या खाणी आहेत. येथें नवरत्नांच्या शिला आहेत. येथील वातावरण सदा सर्वकाळ आनंदमयच असतें.

दिव्य सुमनांच्या व मधुर फळांच्या सुवासानें हें स्थळ दरवळलेलें असतें. येथें अमृतमय भोजन असतें. अष्टनायिका व गंधर्व हीं नित्य गायन करीत असतात. येथील जीवांचें नेहमीं तारुण्य टिकतें. आधिव्याधि, वृद्धावस्था व मरण हीं कधीं येत नसतात. येथें अमर्याद सौंदर्य, चातुर्य, शौर्य व औदार्य हीं नांदतात. येथील जीवांचीं शरीरें विजेसारखीं तेजस्वी असतात. येथील जीवांत यश, कीर्ति व प्रताप हीं अमर्याद वसतात. प्राणी ज्या देवाची उपासना करतो त्या लोकीं तो राहातो. स्वर्लोकप्राप्तीनंतर क्रमानें इतर लोक मिळतात. सलोकता, समीपता व स्वरूपता या तीन मुक्तींत विशिष्ट काळ राहावें लागतें; पण चौथी मुक्ति सायुज्य म्हणजे निर्गुण व निश्चल ब्रह्मांत विलीन होणें म्हणजे तद्रूप बनणें होय. ही मुक्ति शाश्वत व सुदुर्लभतम असते. ती फक्त ब्रह्मज्ञानी मनुष्यालाच मिळूं शकते. उलटपक्षीं प्राण्यास आसुर वृत्तींनीं अठ्ठावीस प्रकारच्या नरकवासांचें असह्य दुःख सोसावें लागतें!

## हरिद्वार

हरिद्वारास हरद्वार व गंगाद्वार अशीं नांवें आहेत. हिमालयाच्या पायथ्याच्या भागास तराई म्हणतात. हरिद्वार हें त्याच भागांत गंगातीरीं आहे. गंगा, खिंडींतून बाहेर पडते त्या ठिकाणीं एक मोठें कुंड आहे. तेथें एकाच वेळीं शेंपन्नास माणसें स्नान करतील इतकें मोठें आहे. कुंडापाशीं हरीचें मंदिर आहे. यासच हरीची पायरी म्हणतात. गंगा हरीच्या पायाजवळ उतरून आली, म्हणून या स्थळास हरिद्वार म्हणतात. गांवाशेजारीं गंगेला फार मोठा घाट आहे. घाटावर अलीकडे बिर्ला शेठजींनीं

एक मोठा उंच मनोरा बांधला आहे. त्यावर एक मोठें घड्याळ बसविलें आहे. घाटास तीन पायऱ्या आहेत. पाण्यास इतकी ओढ असते कीं, कांठाशीं बसविलेल्या सांखळदंडास घट्ट धरल्याशिवाय गंगेंत स्नान करणें कठीण असतें. हरिद्वार येथें भारताच्या सर्व भागांतून सर्व जातींचे व पंथांचे हिंदु स्त्रीपुरुष मोठ्या भक्तिभावानें येतात. घाटावर सायंकाळीं दररोज कथा, कीर्तन, पुराण, प्रवचन, भजन, पूजन, प्रवाहांत सोडलेल्या दीपारत्या इत्यादि प्रकारांनीं सर्व वातावरण भक्तिभावानें भरून गेलेलें असतें.

हरिद्वारपासून बिल्वकेदार हें महादेवाचें लहानसें देऊळ एक मैलावर आहे. येथें बेलाचीं बरींच झाडें आहेत. याशिवाय हरितालिकेचेंहि देऊळ आहे. हरिद्वारच्या दक्षिणेस दोन मैलांवर कनखल नांवाचें पुराणप्रसिद्ध तीर्थ आहे. दक्ष-प्रजापतीची ही राजधानी होती. कनखलाच्या समोर नील पर्वत आहे. कनखल येथें दक्षेश्वर-मंदिर, सतीचें कुंड, नीलधारा व भागीरथी ह्यांचा संगम, संगमावर घाट व धर्मशाळा आहेत. कनखलापासून जवळच गुरुकुल व ऋषिकुल या संस्था आहेत. या दोन्ही संस्थांचीं कामें प्राचीन विद्यालय पद्धतीनें चालू आहेत. ह्या संस्था आदर्शभूत आहेत. विद्यार्थ्यांची साधी व स्वावलंबी राहाणी, सतेज कांति व संस्कृत विषयाची पारंगतता पाहून समाधान वाटतें. हरिद्वारला जाण्यास रेल्वेची सोय आहे. स्टेशनाजवळच गांव आहे. गांवांत जाण्यास टांगे मिळतात. कुशावर्तावर देवी अहिल्याबाईची धर्मशाळा आहे. त्याला लागूनच श्री बाबूशास्त्री वाशीमकर यांचें निवासस्थान आहे. ह्या दोन्ही ठिकाणीं राहावयास जागा मिळते. दक्षिणी लोक बहुधा येथेंच उतरतात. जवळच गंगा आहे व गंगेला घाट आहे.

हरिद्वार हें उत्तर प्रदेशांतील सहारणपूर जिल्ह्यांत एक प्रसिद्ध क्षेत्र आहे. यात्रेकरूंस उतरण्यासाठीं येथें मोठमोठ्या व सोयीच्या पुष्कळ धर्मशाळा आहेत. त्यांत राहाण्यास भाडें पडत नाहीं. गांवांत नळ व विजेचे दिवे आहेत. वस्ती स्वच्छ आहे. गंगेच्या पाण्यांत रेती असते,

अनुक्रम २३३०५ दि: ७-५-५२
क्रमांक २३५ नों: दि: १०-५-५८


म्हणून लोक तें पाणी पीत नाहींत. त्याऐवजीं नळाचें पाणी पितात. येथील बाजारपेठ मोठी असून तिच्यांत सर्व तऱ्हेचे जिन्नस चांगले व योग्य भावानें मिळतात. दहीं, दूध, तूप, भाजीपाला, फळफळावळ विपुल, ताजी व स्वस्त मिळते. येथें हिरव्या फणसाच्या गऱ्यांचीं मोठमोठीं भर्जी बनवितात. तीं रुचकर असतात. फणसाला येथलि लोक 'कटहरी' असें म्हणतात. घरून निघतांना जे प्रवासोपयोगी जिन्नस आपण आपल्या गांवीं विकत घेतों, ते सर्व येथेंच विकत घ्यावे; म्हणजे वाहतुकीचा खर्च व सांभाळण्याची जोखीम वांचते.

हरिद्वाराच्या घाटावर **बाबू सुभाषचंद्र बोस** ह्यांचा बालपणचा सफेत संगमरवरी पुतळा आहे. श्रीरामकृष्ण मिशन आहे. येथून तीन मैलांवर ज्वालापूर आहे. तेथें जैनमंदिर आहे. हरिद्वारचे कांहीं पंडे तेथें राहतात. ऋषिकुलाजवळ अवधूत-मंडळ आहे. हें स्थान निरहंकारी व वैरागी संतांचें आहे. पाऊण मैलावर ब्रह्मचर्याश्रम आहे. ही सनातनी धर्माची प्रमुख संस्था आहे. इ. स. १९५० च्या चैत्र-वैशाखांत येथें फार मोटा कुंभ-मेळा जमला होता. त्याला लाखों यात्रेकरू जमले होते. दर बारा वर्षांनीं कुंभराशीला गुरु आला म्हणजे हा मेळा भरतो.

## नैमिषारण्य

हरिद्वाराहून दिनांक १२।७।५० इ. रोजीं रात्रीं ९॥ वाजतां निघून दिनांक १३।७।५० इ. रोजीं मी सकाळीं बाळाभाऊ स्टेशनावर उतरलों. तेथून नैमिषारण्य सोळा मैलांवर आहे. तेथें मोटारीनें जाण्यास सहा आणे भाडें पडलें. सर्व जमीन सपाट आहे. मधून मधून ऊंस व भातशेती आहे. कुरणेंहि आहेत. त्यांत गाई, बैल, घोडे, मेंढरें, रेडे, म्हशी चरतांना दिसल्या. आंबा व जांभूळ ह्यांचीं झाडें पुष्कळ आहेत. या प्रदेशांत मातीच्या रांजणांत धान्य सांठवून ठेवण्याची पद्धत आहे. प्रत्येक रांजण इतका मोठा असतो कीं, त्यांत पांच सहा मण धान्य मावतें. येथील अरण्यांत मोर फार

आहेत. येथें गोमती नदी वाहात असून तिच्या वाळवंटांत शहामृग दिसतें. व्यासांनीं आपलें सर्व वाङ्मय येथेंच तयार केलें. सूतांनीं शौनकादिक ऋषींस व्यासांचीं पुराणें येथेंच सांगितलीं. गोमतीच्या तीरावर मारुतीची अतिभव्य दगडी मूर्ति आहे. तींत मारुति महिरावणास ठार मारीत आहे व मारुतीनें रामलक्ष्मणास खांद्यावर घेतलें आहे, असें दृश्य आहे. ही मूर्ति सुमारें दहा फूट उंच व चार फूट रुंद आहे. जवळच द्रौपदी, व्यास, पाराशर व परीक्षिति राजा ह्यांचीं देवळें आहेत व व्यासपीठहि आहे. याच पीठावर बसून व्यासांनीं आपलें सर्व वाङ्मय लिहिलें असें म्हणतात. अनेक साधूंनीं ज्यांत बसून तपश्चर्या केली, अशा गुहा आहेत. ब्रह्मदेवानें जेथें तपश्चर्या केली तें ब्रह्मकुंड आहे. दर अमावास्येस येथें मोठा मेळा भरतो. या स्थळीं नैमिषारण्य नांवाचें लहानसें गांव असून तेथें पंडे राहातात.

येथून सहा मैलांवर मिस्त्रिक नांवाचें क्षेत्र आहे. तेथें दधीचि ऋषींचें कुंड आहे. त्यांत यात्रेकरू स्नान करितात. हें पुष्करणीवजा असून सर्व बाजूंनीं पायऱ्यांनीं बांधलेलें आहे. येथें माकडें फार आहेत. कुंड अतिभव्य व रम्य आहे. या ठिकाणीं दधीचि ऋषींनीं उग्र तप करून आपल्या आस्थि वज्रासाठीं इंद्राला दिल्या व येथेंच समाधि घेतली. दिनांक १३।७।५० इ. रोजीं सायंकाळीं सात वाजतां बाळाभाऊ स्टेशनावर गाडींत बसून रात्रीं लखनौला आलों. लखनौंत मला राहाण्यास सवड नसल्यामुळें बसमधून शहरांतून एक चक्कर मारली; शहरांतील बाजार, इमाम वाडा यासारख्या भव्य इमारती पाहून दुपारीं दोनच्या गाडीनें निघून अयोध्येस संध्याकाळीं पोंचलों. लखनौहून अयोध्या सुमारें शंभर मैलांवर आहे. लखनौस मी गेलों, तेव्हां महाराष्ट्रीय समाज नुकताच स्थापन झाला होता व त्याचे चिटणीस श्री. भावे हे होते.

## अयोध्या

अयोध्येस हनुमानगढीवर राम, हनुमान, भरत इत्यादिकांचीं देवळें आहेत व इच्छाभवन-मंदिर आहे. गांवापासून एका मैलावर शरयू गंगा आहे. तेथें यात्रेकरू स्नानादिक धार्मिक विधि करतात.

पूर्वीं चार आठ आण्यांस पुष्कळ म्हणजे गाडी भरून आंबे मिळत, पण हल्लीं डझनभराहि मिळत नाहींत.



॥ श्रीरामध्यान श्लोक ॥

कल्याणानां निधानं, कलिमलमथनं पावनं
पावनानाम् ।
पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदप्राप्तये
प्रस्थितस्य ।
विश्रामस्थानमेकं, कविवरवचसां
जीवनं सज्जनानाम् ।
बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवताम्
भूतये रामनाम ॥ १ ॥

येथील **स्वर्गद्वार** हा भाग दैवी संपत्तीनें व सृष्टिसौंदर्यानें युक्त आहे. शरयूचें पात्र लांब, रुंद व प्रशस्त पसरलें आहे. तिला घाटहि आहेत. घांटाजवळ श्रीनागेश्वर, शरयू गंगा, काळे राम वगैरे अनेक मनोहर मंदिरें आहेत.

काळेराम मंदिराचे पुजारी महाराष्ट्रीय आहेत. त्यांनीं सुमारें पांच घनफूट जागेंत "श्रीराम, जयराम, जयजयराम" या त्रयोदशाक्षरी मंत्राचा तेरा कोटी जप ज्या वह्यांत लिहिलेला आहे असे एका पुरश्चरणाचे कागद सुव्यवस्थित ठेविले आहेत.

हें स्थळ देवाची भक्ति करण्यास योग्य आहे. यात्रेकरूंस उतरण्यास अनेक धर्मशाळा आहेत. शरयू गंगेंत कासवें फार, पण तीं निरुपद्रवी आहेत. गांवांत माकडांचा उपद्रव फार आहे.

येथील वानर माणसाच्या हरएक वस्तु केव्हांच लांबवून त्यास बुचकळ्यांत पाडून दुःखी करितात. कित्येक वेळां हे त्या वस्तु टाकून गेल्यावर त्या आपणांस मिळाल्यानें ब्रह्मानंद होतो. माझी महत्त्वाच्या वस्तूंची पिशवी ह्या वानरांनीं नेली; पण कांहीं वेळानें ती दुसरीकडे

जवळच ठेवून ते चालते झाले. पंड्याच्या माणसांनीं ती मला परत आणून दिल्यावर मला मोठा आनंद वाटला.

अयोध्या हें एकांत व कांहींसें रम्य स्थळ आहे. परंतु तें पाहून मनाला उत्साह न वाटतां एक प्रकारची उद्विग्नता येते. अयोध्या ही श्रीरामचंद्राची राजधानी या दृष्टीनें तेथें कांहीं प्राचीन ऐश्वर्य पाहावयास मिळेल असा आपला समज असतो. पण तो खोटा ठरतो. अयोध्येचें राज्य मुसलमानांनीं बुडविलें. तेथें एक जुनें हिंदु राजघराणें आहे; पण तें नामधारीच आहे. त्यांचा एक राजवाडा आहे व तोच अयोध्येंत प्रेक्षणीय आहे. खरें म्हटलें तर श्रीरामचंद्राचें केवढें तरी मोठें देवालय येथें असावयास पाहिजे, पण तें मुसलमानांनीं जमीनदोस्त करून येथें एक मशीद बांधली आहे. आणि खुद्द रामाचें देऊळ जवळच झोपडीवजा आहे. ही शोचनीय स्थिति पाहून कोणाहि हिंदूच्या मनाला दुःख होणें साहाजिक आहे. अशा मनःस्थितींत मीहि अयोध्यानगरी सोडली आणि लखनौवरून कानपूरची वाट धरली.

अयोध्या, मोक्ष देणाऱ्या ज्या सात पुरी आहेत त्यांपैकीं एक आहे. तिच्याशिवाय आणखी सहा क्षेत्रें आहेत. त्यांच्याविषयीं पुढील श्लोक आहे.

‘ अयोध्या मथुरा माया; काशी, कांची, अवंतिका ।
पुरी द्वारावतिचैव; सप्तैते मोक्षदायिका ॥ १ ॥ ’

ह्यांतील मायाक्षेत्र म्हणजे हरिद्वार होय.

## कानपूर

मी अयोध्येहून दिनांक १६–७–५० रोजीं सकाळीं निघून लखनौमार्गें कानपुरास उतरलों. कानपूर हें उत्तर प्रदेशांतील मोठें व्यापारी व औद्योगिक शहर आहे. तेथें लाल इमली या नांवाची लोंकरीचीं वस्त्रें विणणारी प्रख्यात गिरणी आहे. त्याशिवाय इतर गिरण्या व चामड्याच्या वस्तु तयार करण्याचे कारखानेहि आहेत. कानपूरची लोकसंख्या मोठी आहे व

तें गंगेच्या कांठीं असल्यामुळें पुष्कळ लोक काशीयात्रा करून परत जातांना येथील गंगा शुद्ध म्हणून भरून घेतात. गंगेवर अति मोठा पूल आहे. भोंवतालचा मोठा प्रदेश फार सुपीक व आम्रवृक्षांनीं गजबजलेला आहे. गांवांत दूधदुभतें मनमुराद आहे. कानपुरांत मी बसमधून हिंडलों. त्यावरून वाटलें कीं, येथें अधिक रहावयास मिळालें असतें तर बरें झालें असतें; पण मला तशी सवड नसल्यामुळें तें सुंदर शहर लवकर सोडणें भाग पडलें. कानपुराहून लवकर निघून दिनांक १७–७–५० इ. रोजीं सकाळीं नऊ वाजतां मथुरेस पोंचलों.

## मथुरा

मथुरा, गोकूळ, वृंदावन व गोवर्धन हीं स्थळें श्रीकृष्णाच्या बाल लीलांनीं संस्मरणीय झालीं आहेत. मी स्टेशनावर उतरलों व तेथें एक श्री. धीरज-लाल पंडा भेटला. आतांपर्यंतच्या माझ्या यात्रेंत मला अनेक लोकं भेटले; परंतु त्यांच्यापासून मला मुळींच त्रास झाला नाहीं. पण मथुरेंत मात्र विपरीत प्रकार घडला.



|| श्रीकृष्णध्यान श्लोक ||

गदी शंखी चक्री, विमलवनमाली
स्थिररुचिः ।
शरण्यो लोकेशो, मम भवतु कृष्णोक्षि-
विषयः ॥
श्रियाश्लिष्टो विष्णुः, स्थिरचरगुरुर्वेद
विषयो ।
धियांसाक्षी शुद्धो, हरिरसुरहंताब्ज-
नयनः ॥ १ ॥

ह्या प्रसंगाचें वर्णन नंतर आहे. त्या पंड्यास स्वशक्त्यनुसार दक्षिणा देण्याचें ठरवून त्याच्या घरीं उतरावयास गेलों. त्यानें यात्रेकरूंना आकर्षण वाटण्याकरितां आपल्या घरांतील एका भागाला गांधी आश्रम नांव दिलें

होतें. हल्लीं मनुष्य चर्येवरून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांपैकीं कोणत्या वर्णाचा आहे हें पटकन ओळखूं येत नाहीं. ब्राह्मणांतहि वेद जाणणारे थोडे असतात. मथुरेंत मध्य वस्तींत मुंबईच्या धर्तीची जुम्मा मशीद आहे. येथें विश्राम घाट नांवाचें प्रसिद्ध स्थळ असून घाटावर श्रीकृष्णमंदिर आहे. तें रम्य व पवित्र आहे. ह्याशिवाय द्वारकाधीश, विजय गोविंद, राधाकृष्ण व श्रीरंगादि बरींच देवळें आहेत. यांच्या भोंवतालीं गाई, वांसरें स्वस्थ चित्तानें विहरत असतात. यमुनेच्या डोहांत श्रीकृष्णानें कालिया मर्दन केलें तें स्थळ येथें दाखवितात.

## वृंदावन

मथुरेपासून सहा मैलांवर वृंदावन आहे. तेथें जावयास मोटार अथवा इतर गाड्या मिळतात. त्यास भाडें रुपया सव्वा रुपया पडतें. गोकूळ व गोवर्धन येथें जावयासहि तितकेंच भाडें पडतें. कांहीं सात्त्विक यात्रेकरू चाळीस दिवसांत मथुरेभोंवतीं चौऱ्यायशी कोसांची प्रदक्षिणा करितात. वृंदावन हें शहरी थाटाचें गांव आहे. गीताभवनांतील ग्रंथसंभार, ब्रह्मचारी विद्यार्थ्यांचें अध्ययन व शांतता आल्हाददायक आहेत. येथें अनेक राजे लोकांनीं व राण्यांनीं देवळें बांधून सदावर्तें व धर्मशाळा स्थापून त्यांच्या नेहमींच्या खर्चासाठीं कायमची रक्कम ठेवून त्या रकमेच्या व्याजांतून सर्व खर्च चालेल अशी व्यवस्था केली आहे. यात्रेकरू कंकणें व वेतकाठ्या इत्यादि वस्तु हिमालयांतील क्षेत्रांतून आणून येथील गोकुळांतील देवास अर्पण करितात व आपली यात्रा पूर्ण झाली असें समजतात. येथें सर्व प्रकारचें सामान व खाद्य पदार्थ मिळतात. रस्तेहि चांगले आहेत; पण पुरेसे दिवे नाहींत. गोकुळ वृंदावन यांची प्रसिद्धि गोधनाविषयीं आहे. तिला अनुसरून वृंदावनांत हल्लीं सुमारें नऊशें गाई आहेत.

येथेंच दरसाल आषाढ शुद्ध द्वितीयेस भगवान् श्रीकृष्णाची रथांतून मिरवणूक निघते. त्या वेळीं भोंवतालच्या गांवांतून तेथील देवांचे रथ वृंदावनांत कृष्णाच्या भेटीस येतात. येथें मथुरेचे श्रीमंत मारवाडी शेठ

बन्सीलाल ह्यांनीं अत्युत्तम श्रीकृष्णमंदिर बांधलेलें आहे. त्यावर हत्ती, बैल, सिंह, गरुड, मारुति व कांहीं देवदेवता ह्यांच्या मूर्ति काढून मंदिर सुशोभित करण्यांत आलें आहे. मंदिराला सोन्याचे सात आठ कळस आहेत. मंदिराला फार मोठें उत्पन्न असून त्याची व्यवस्था मंदिराचे अधिपति पाहतात. मी वृंदावनास गेलों तेव्हां वार्षिक मेळा चालू होता. मजबरोबर पंडाहि होता. आम्ही टांग्यांतून वृंदावनास गेलों. देवांच्या भोगांचे दर तीन रुपये सहा आण्यांपासून एकशें एक रुपयांपर्यंत आहेत. त्यांपैकीं कोणत्याहि एका दराचें द्रव्य अटक्याबद्दल पुजाऱ्यास दिलें तरच दर्शन होतें. मी शेवटचा अटका घेतला व मला एक वनमाळा प्रसाद म्हणून मिळाली. वनमाळा ही एक पवित्र सुंदर वस्तु आहे. ती सोन्याच्या माळे-सारखी दिसते. ही माळ गवताची असून तें गवत मथुरेच्या आसपास फार होतें. साधारण एका पैशास एक माळा मिळते. ती एक माळ गळ्यांत घातली म्हणजे सोन्याच्या सांखळीप्रमाणें शोभते. अशा तीन चार माळा गळ्यांत घातल्या म्हणजे सोन्याची कंठी घातल्याप्रमाणें मनुष्य सुंदर दिसतो. या माळा गवताच्या फुंकण्याच होत. ह्यांचा प्रसार इतर क्षेत्रांतहि व्यापाऱ्यांनीं केलेला आहे.

वृंदावन पाहून झाल्यावर मी **गोकुळ** व **गोवर्धन** क्षेत्रेंहि पाहिलीं. मथुरेहून गोकुळ सात मैलांवर आहे. येथें एक गोशाळा असून तींत दोन हजार गाई आहेत. सदावर्तें व धर्मशाळा आहेत. येथें अटका पावणे सात रुपयांपासून सोळा रुपयांपर्यंत आहे. वसुदेव, देवकी, श्रीकृष्ण इत्यादि कांहीं देवळें आहेत.

श्रीकृष्णाच्या देवळांत भक्तजन त्याच्या मूर्तीस पाळण्यांत घालून झोके देतात. वसुदेव श्रीकृष्णाला मथुरेहून गोकुळास घेऊन आला, त्या वेळीं यमुनेनें दुभंग होऊन त्याला वाट दिली, तें स्थळ पंडे लोक दाखवितात. तसेंच श्रीकृष्णानें लोणी चोरून खाल्लेलें स्थळ, माती खाल्लेलें स्थळ, यशोदेनें त्याला उखळाशीं बांधून ठेविलेलें स्थळ, हीं सर्व स्थळें पंडे

दाखवितात. गोकुळ हें स्वतंत्र संस्थानासारखें आहे. तेथें मुसलमान, खाटिक, घाण्यांतून तेल काढणारे तेली ह्यांना राहावयास जागा तेथील लोक देत नाहींत. कांदा, लसूण व मसुरी डाळ तेथील लोक खात नाहींत.

गोकुळाहून मथुरेस परत आल्यावर मी गोवर्धन पर्वत पाहावयास गेलों. श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत आपल्या करंगळीवर सात दिवस धरून लोकांचें पर्जन्यापासून रक्षण केलें, त्याबद्दल गोकुळवासियांनीं श्रीकृष्णाची पूजा केली. त्या प्रसंगाचें स्मरण म्हणून प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध प्रतिपदेला तेथील लोक मोठ्या थाटानें त्याचा उत्सव करितात. गोवर्धन पर्वताला यात्रेकरू प्रदक्षिणा घालतात. ती प्रदक्षिणा सात मैलांची आहे. मथुरेहून दिनांक १९–७–५० इ. रोजीं बुधवारीं सकाळीं नऊ वाजतां दिल्लीस जावयास निघालों. त्या वेळीं मी ठरविलेला पंडा धीरजलाल याचा व माझा खटका उडाला. मी पूर्वी केलेल्या ठरावाप्रमाणें दक्षणा व इतर खर्चांची रक्कम जितकी द्यावयाची तितकी दिली होती, तरी तो गोप्रदान म्हणून मजपाशीं पंच्याहत्तर रुपये मागूं लागला.

मला मथुरा, गोकुळ, वृंदावन हीं तिन्ही क्षेत्रें पाहाण्यास व मथुरेंत राहाण्यास एकंदर एकवीस रुपये खर्च आला होता. तेव्हां ह्यापेक्षां जास्त खर्च करणें माझ्या शक्तीबाहेरचें असल्यामुळें मी त्याला तुळशीपत्र म्हणून एक रुपया देण्यास तयार झालों; पण तो व त्याचे सातआठ भाईबंद माझें ऐकेनात व ते मजबरोबर वर्दळीवर आले. पंडा मला सोडीना व मी चालूं लागलों असतांना मला वाटेंत वारंवार आडवूं लागला. मी त्याच्या या वागणुकीला अतिशय त्रासून गेलों व शेवटीं भरबाजारांत आलों असतां मोठ्यानें काठी आपटून पोलिसाला हांक मारूं लागलों. ती ऐकून बरेचसे लोक माझ्याभोंवतीं जमले व त्यांपैकीं एका वृद्ध गृहस्थानें मजपासून एक रुपया घेऊन पंड्यास दिला व त्याची कशीबशी समजूत घालून मला त्याच्या कचाट्यांतून सोडविलें !

## दिल्ली


मी मथुरेहून निघून दिल्लीस दिनांक २०।७।५० इ. रोजीं रात्रीं ११॥ वाजतां पोंचलों. दिल्लीचे दोन भाग आहेत. (१) जुनी दिल्ली व (२) नवी

दिल्ली. जुन्या दिल्लींत महाराष्ट्रीयांना उतरण्याच्या सोयीकरितां नया बाजारांत 'महाराष्ट्रीय स्नेहसंवर्धक मंडळ' नांवाची जुनी संस्था आहे. दिल्लींत उतरणाऱ्या कोणाहि महाराष्ट्रीयाला तिचा लाभ घेतां घेतो. तेथें वाचनालय, लहान मराठी शाळा या साऱ्या सोयी असून, संस्थेचे सुमारें तीनशें सभासद आहेत. येथें संस्थेनें भोजनाची सोय केली नसली तरी तिच्या तळमजल्यांत श्रीयुत फाटक यांचें उपाहारगृह आहे व वे. गोखले भटजी माफक द्रव्यांत भोजन घालतात.

जुनी दिल्ली तिच्या जुनाटपणास शोभेल अशी अस्वच्छ आहे. जुन्या दिल्लीचें स्टेशन मोठें असून तें जंक्शनचें स्टेशन आहे. येथून निरनिराळ्या दिशांना वाटा फुटतात. अमृतसर, हरिद्वार, कलकत्ता, मुंबई या स्थळांना गाड्या जातात. हें स्टेशन मोठें असलें तरी मुंबईच्या बोरीबंदर स्टेशनाप्रमाणें सुंदर व व्यवस्थित नाहीं. जुन्या दिल्लींत पहाण्याजोगीं स्थळें म्हटलीं म्हणजे जुम्मा मशीद, लाल किल्ला हीं होत. चांदणीचौक हा रस्ता जुन्या दिल्लींतील मुख्य पेठेचा प्रसिद्ध रस्ता होय.

लाल किल्ला शहाजहान बादशाहानें इ.स. १६३९ मध्यें बांधविला. किल्ला बांधण्यास दहा वर्षें लागून दोन कोटी रुपये लागले. लांबी तीन हजार फूट व रुंदी अठराशें फूट आहे. तट साठ फूट उंच व यमुनेच्या बाजूस एकशें दहा फूट लांब आहे. किल्ल्याभोंवतीं पंचाहत्तर फूट रुंद व तीस फूट खोलीचा खंदक होता. हल्लीं हा बुजविला आहे.नंदनवन महाल फारच प्रेक्षणीय आहे. जुम्मा मशीद ही भव्य व संगमरवरी दगडी इमारत आहे. तेथून कांहीं अंतरावर प्रसिद्ध लाल किल्ला आहे. याच किल्ल्यांत मोंगल बादशाहाचे प्राचीन राजवाडे 'दिवाण इ आम' 'दिवाण इ खास' या राजसभा आहेत. आंत बागहि मोठा आहे. तेथील पदार्थसंग्रहालयांत नाना प्रकारच्या रेशमी कापडाचे नमुने, युद्धप्रसंगाचीं चित्रें व जुन्याच बंदुका ठेविल्या आहेत. किल्ल्याला आंत शिरण्यास दोन आणे फी पडते. लाला लजपतराय, लोकमान्य टिळक ह्यांचीं स्मारकें जुन्या दिल्लींत करण्यांत आलीं आहेत.

तेथील म्युनिसिपल मार्केटास 'लाला लजपतराय' व बाजारास 'लोकमान्य टिळक' अशीं नांवें दिलीं आहेत.



अशोकचक्र

लाल किल्ला यमुनेच्या कांठीं आहे व त्याच नदीवर राजघाट आहे. म. गांधी यांचें येथें दहन केल्यामुळें त्यास विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. गांधीजींच्या दहन-भूमीवर एक प्रशस्त चौथरा बांधला असून त्याच्या भोंवतालीं थोडीशी बाग व बागेच्या भोंवतीं मोठें थोरलें आवार आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें दहा एकर असावें. त्या आवारामधून पाण्याचा पाट वाहात आहे. एकंदर आवार अति स्वच्छ आहे.

जुन्या दिल्लीपासून सुमारें दोन अडीच मैलांवर नवी दिल्ली आहे. हिची सर्व रचना अगदीं नाविन्य-पूर्ण आहे. पाश्चात्य धर्तीचें हें नगर असून तें इंग्रजांनीं वसविलें आहे. नवी दिल्ली बांधण्यास तीस हजार मजूर सतत अठरा वर्षें खपत असून पंधरा कोटी रुपये खर्च आला ! रंगीबेरंगी एक लक्ष घनफूट संगमरवरी दगड लागला. विटा इतक्या लागल्या कीं, त्या एकापुढें एक मांडल्या तर चार वेळां

पृथ्वीप्रदक्षिणा होतील. राजरस्त्यांची लांबी पन्नास मैल होईल. रिंज नांवाच्या टेकडीवर रेडिंग रोडवर हिंदुमहासभा-भवन व बिर्ला लक्ष्मीनारायणमंदिर हीं आहेत. हिंदी पार्लमेंटची इमारत फारच नयनमनोहर आहे. तेथील रस्ते भव्य, बागा रमणीय, चौक नमुनेदार आहेत. पण घरें मात्र मुंबईसारखीं उंच मजलेदार नसून एकमजली बैठीं आहेत. तेथील रस्तेहि फारसे गजबजलेले नसतात. नव्या दिल्लीच्या मध्यभागीं पार्लमेंटरी हाउस, राष्ट्राध्यक्षांची राहावयाची जागा, सचिवालय इत्यादि भव्य इमारती आहेत. नव्या दिल्लींत व तिच्या भोंवतालीं इतर प्रेक्षणीय स्थळें म्हटलीं म्हणजे कुतुबमिनार, हुमायून कबर, इंद्रप्रस्थ अथवा पुराणा किल्ला, फेरोजशहाचा कोटला, जन्तर–मन्तर ( वेधशाला ), लक्ष्मीनारायण मंदिर इत्यादि होत. कुतुबमिनार ही अतिशय उंच इमारत असून तिच्यावर चढून भोंवतालीं पाहूं लागलें कीं डोळे फिरतात. या घाटावर हा मनोरा पूर्वी गुप्तवंशांतील एका राजानें आपल्या कन्येला अत्युच्च स्थानावरून सूर्यास स्तवितां यावें म्हणून बांधिला.

हुमायूनची कबरहि पाहाण्यासारखी आहे. फेरोजशहाचा कोटला हा किल्ल्यासारखा असून आतां अगदीं मोडकळीस आला आहे. आंत अशोकस्तंभ असून त्याची उंची सुमारें दोनशें फूट असावी. जन्तरमन्तर म्हणजे **वेधशाळा** ही जयपूरचा राजा सवाई जयसिंग यानें बांधली आहे. तिच्यावरून ग्रहताऱ्यांचे वेध घेतात. **लक्ष्मीनारायण** मंदिर हें लाखों रुपये खर्चून बिर्लाशेठजींनीं बांधलें आहे. तें संगमरवरी दगडाचें आहे. त्यांतील शिल्पकला व धार्मिक सत्कृत्यें पाहून मी अगदीं थक्क झालों. तें इतकें मनमोहक आहे कीं, त्यांतून बाहेर पडावेंसें वाटत नाहीं. दिल्लींतील कॅनाट सर्कल हा भाग मुंबईतील फोर्ट भागासारखा आहे.

अलीकडे दिल्ली स्वराज्यांत भारताची राजधानी झाल्यामुळें शेंकडों महाराष्ट्रीयांना दिल्लीस जावें यावें लागतें व हजारों महाराष्ट्रीय नोकरीपेशाच्या निमित्तानें दिल्लीचे रहिवासी बनले आहेत. ह्या सर्वांच्या सोयीकरितां

पहाडगंजाजवळ 'महाराष्ट्रीय भवन' नांवाची नवी व मोठी इमारत बांधण्यांत आली आहे. तेथें परस्थ महाराष्ट्रीयांना राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय केली आहे. तसेंच तें महाराष्ट्रीयांच्या उत्सवांचें व समारंभांचें केंद्र बनलें आहे.

दिल्लींत एक दृश्य दिसतें तें पाहून मनाला फार दुःख झालें. पाकिस्तान निर्माण झाल्यानंतर पश्चिम पंजाबमधून निर्वासितांचे जे लोंढे पूर्वेकडे वाहूं लागले, त्यांपैकीं बरेचसे निर्वासित दिल्लींत राहावयास आले. तेथील बहुतेक धर्मशाळा व देवालयें निर्वासितांनीं भरलीं आहेत. त्यांची स्थिति एकंदरींत शोचनीय वाटली.


दिल्ली पाहून झाल्यानंतर **सोनपत, पानपत** व **कुरुक्षेत्र** पाहाण्याचा मानस होता; तीं पाहाण्याकरितां दिल्लीहून ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत बसमधून सोनपत-पानपतला गेलों. तिकिटास ११ आणे पडले. दिल्ली सोडल्यापासून ठिकठिकाणीं निर्वासित लोक आढळूं लागले. सोनपतालाहि त्यांचा असाच एक तळ असून त्यांचीं बायका–मुलें एका तलावावर कपडे धुतांना दिसलीं. सोनपत गांव बऱ्यापैकीं असून त्यांत बाजार व हायस्कूल आहे. गांवाभोंवतीं मोठमोठीं गवताळ मैदानें आहेत. सोनपतांत फार वेळ न थांबतां पानिपतला बसनेंच जावयास निघालों. दिल्लीपासून सोनपत जितक्या अंतरावर आहे, जवळ जवळ तितक्याच अंतरावर सोनपताहून पानिपत आहे. कारण तेथें जाण्यास मला बारा आणे भाडें पडलें व तीन तास लागले पानिपत येथें जैनांच्या मंदिरवजा धर्मशाळेंत मी उतरलों. त्या वेळीं तेथें एक वैद्यांची सभा चालू होती. तिच्यांत मी दहा मिनिटें भाषण करून त्यांना माझे मुद्दे समजावून सांगितले. ते असेः—त्यांनीं संपूर्ण देशी औषधें श्रद्धेनें वापरावीं. रोग्यास प्रत्यक्ष स्पर्श न करितां केवळ त्यांस पाहून त्याच्या रोगाची परीक्षा करावी व जनतेचें आरोग्यरक्षण होईल असे उपाय योजावेत.

पानिपतच्या एका मशिदीला आठ दहा खांब कसोटीच्या दगडाचे आहेत. प्रत्येक खांब दहा फूट उंच व एक फूट व्यासाचा आहे. तेथील

देवीच्या मंदिरांत निर्वासित भरगच्च भरलेले होते. पानिपताहून स्टेशनावर जातांना एक शेत लागलें. त्यांत पेटा ( कोहळा ) ह्याचें शेत होतें. त्याच्या फळाची मिठाई दिल्लीस विकत मिळते. पानिपत येथें इ. स. १७६१ त मराठे व अफगाण ह्यांचें तुंबळ युद्ध झालें, त्या युद्धांत भाऊ-साहेब, विश्वासराव, बळवंतराव मेहेंदळे असे लढवय्ये कामास येऊन लाख दोन लाख सैनिकांचा चुराडा उडाला. तें स्थळ पाहाण्याचें मनांत फार होतें. पण तें दूर असल्यामुळें पाहावयास मिळालें नाहीं. येथील देवींचें देऊळ त्या वेळीं मराठ्यांनीं बांधिलें असून त्याला ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारांनीं उत्पन्न लावून दिलें आहे.

पानिपतापासून कुरुक्षेत्र तीन तासांच्या रस्त्यावर आहे. त्याला बसनें जाण्यास पंधरा आणे भाडें पडलें. तेथें रात्रीं धर्मशाळेंत मुक्काम केला. ही प्राचीन रणभूमि ७० मैल लांब व वीस मैल रुंद होती, शुकदेवांनीं परीक्षित राजास जेथें महाभागवत ऐकविलें, तें शुक–ताल स्थळहि येथें जवळ आहे.

सकाळीं उठून एका मैलावरील सूर्यकुंडांत स्नान, संध्या, देवपूजा, तर्पणादि विधि आटोपले. भीष्म शरपंजरीं पडले असतां त्यांना तहान लागली असतां अर्जुनानें बाण मारून एक तीर्थ उत्पन्न केलें तें हेंच होय. याच ठिकाणीं कौरव–पांडवांचें युद्ध झालें व येथेंच श्रीकृष्णानें अर्जुनास गीता सांगितली व विराटरूपदर्शन दिलें. त्या ठिकाणांवर गीताभवन हें मंदिर अलीकडे बांधिलें आहे. येथून जवळच ठाणेश्वर गांव आहे. त्यांत एक पुरातन शिवालय व मशीद आहे. हेंहि प्राचीन रणक्षेत्र असून त्यावर पृथ्वीराज चव्हाण व महमंद घोरी ह्यांची लढाई झाली. कुरुक्षेत्रांत एक दिवस राहून दिल्लीस रेल्वेनें परत आलों. त्यास भाडें दोन रुपये पडले.



अर्जुन

आतां दिल्लींत कांहीं पाहावयाचें राहिलें नसल्यामुळें दिनांक १५।८।५०

इ० रोजीं रात्रीं दहाच्या गाडीनें निघून दुसरे दिवशीं सकाळीं नऊ वाजतां **जयपुरास** खुशाल पोहोंचलों. भाडें चार रुपये पडलें. येथें उतरण्यास धर्मशाळा आहेत. जयपुरास संगमरवरी देव-देवतांच्या अतिमनोहर मूर्ति तयार करितात. पदार्थसंग्रहालय, सूर्यनारायण मंदिर, राजदरबाराचा चंद्रमहाल, अमेरमहाल, श्रीगोविंदजी मंदिर हीं स्थळें प्रेक्षणीय आहेत. पदार्थसंग्रहालय हें फारच महत्त्वाचें आहे. त्यांत वाघ, सिंह, अस्वलादि पशु व हंस, कोकीळ इ. पक्षी आहेत. अमेर महालांत जयपूरच्या राजांचे पुतळे व फोटो आहेत. श्रीगोविंदजी मंदिर अति विस्तृत, उंच, भव्य व नक्षीदार आहे. जयपूर स्टेशनाजवळ महात्मा गांधींचा पुतळा साध्या साधु-वेषांत उभारिला आहे. जयपूर शहर एकंदरींत अति स्वच्छ व सुंदर आहे.

## पुष्करतीर्थ

जयपूर पाहून झाल्यावर मला पुष्करतीर्थ पाहावयाचें असल्यामुळें मी प्रथम जयपुराहून दिनांक १७।८।५० इ. रोजीं आठ वाजतां निघून दोन वाजतां अजमिरास आलों. दिल्लीहून जयपूर अडीचशें मैल व जयपुराहून **अजमीर** सव्वाशें मैल आहे. अजमीराहून पुष्करतीर्थ सहा मैल आहे. तेथें बसनें जाण्यास एक रुपया भाडें पडलें. पुष्करास श्रीरंगनाथ, ब्रह्मदेव हीं देवळें मुख्य आहेत. पुष्कर सरोवर फारच मोठें आहे. तें तीन फर्लांग लांब व दोन फर्लांग रुंद आहे. पुष्कर गांव या तीर्थाच्या कांठानें वसलेला आहे. त्याच्या पलीकडे एक मोठा डोंगर असल्यामुळें त्या तीर्थाची शोभा वाढली आहे. रंगनाथाचें मंदिर अति मोठें व सुंदर नक्षीदार आहे. येथील ब्रह्मदेवाचें मंदिर फारसें मोठें नसलें तरी त्यांत गेल्यावर मनाला आनंद होतो. देवळांत ब्रह्मदेवासमोर त्याचें वाहन म्हणून दगडी राजहंस आहे. भारतांत ब्रह्मदेवाचीं मंदिरें फारच तुरळक आहेत. यामुळें या मंदिरास विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. पुष्करास फार वेळ न थांबतां मी बसनें परत अजमीरास आलों. अजमीर गांव स्वच्छ आहे. तेथें बंगलेहि सुंदर आहेत. तेथील महाराष्ट्रीय मंडळांत उतरण्याची सोय आहे. महाराष्ट्रीय कुटुंबें तेथें थोडीं असलीं तरी आदरातिथ्यशील आहेत.

अजमिरापासून चितोडगड रेल्वेनें शंभर मैलांवर आहे. चितोडगडाकडे आपण जाऊं लागलों म्हणजे उंटांचे तांडे दिसतात. स्टेशनापासून गांव एक मैल व गांवापासून प्रसिद्ध चितोडगड किल्ला एक मैल आहे. गांवा-प्रमाणें किल्ल्यांतहि वस्ती आहे. चितोड गांव शहरांत मोडण्यासारखें आहे; पण गांवापेक्षां किल्लाच प्रेक्षणीय आहे. किल्ला बऱ्या स्थितींत आहे. त्याची उंची सहाशें फूट व घेर सहा मैलांचा आहे. आंत तीनशें घरें आहेत. किल्ल्याला सात भव्य दगडी दरवाजे आहेत. किल्ल्यांत तलाव बरेच आहेत. पन्नास लहानमोठ्या तोफांचा तोफखाना आहे. कुंभ महाल, पाद्मिनी महाल, फत्तेहप्रकाश या तेथील सुंदर इमारती होत. त्याशिवाय मीराबाईचें सुंदर मंदिर आहे. कुंभमहालांत चितोडचा इतिहासप्रसिद्ध कुंभ राणा राहात होता. पाद्मिनीमहालांत प्रसिद्ध पाद्मिनी राहात होती.

इ. स. १२७२ मध्यें अल्लाउद्दीन पाद्मिनीवर मोहित होऊन त्यानें तिला भेटीस बोलाविलें; तेव्हां तिनें भेटीस येण्याचें कबूल करून भेटीची वेळ ठरविली. ह्या प्रसंगीं स्त्रीवेषांत भरपूर रजपूत शस्त्रधारी वीर अल्ला-उद्दिनास मेण्यांतून भेटण्यासाठीं जाऊन त्यांनीं त्याची फजिती केली! आणि पाद्मिनीच्या भीमसिंग पतीस मुक्त केलें. तिनें अल्लाउद्दिनाच्या हातीं न पडण्याकरितां जेथें मैत्रिणींसह जोहार केला, तें स्थळ येथें दाखवितात. मीराबाईच्या देवळांत भगवान् श्रीकृष्णाची मूर्ति, त्याच्या डाव्या हातास महाभक्त मीराबाईची व कुंभ राण्याची अशा मूर्ति आहेत.


गुजरात, राजपुताना ह्या भागांत जैनांची वस्ती बरीच आहे व ते व्यापारी पेशाचे धनिक असल्यामुळें त्यांनीं ठिकठिकाणीं जैन मंदिरें बांधलीं आहेत. त्याच तऱ्हेचें एक भरभक्कम व पांढऱ्या शुभ्र संगमरवरी पाषाणाचें जैन मंदिर येथें आहे. त्याभोंवतीं सत्तावीस तीर्थकरांचीं लहान मंदिरें आहेत. मंदिराजवळ एक भव्य जयस्तंभ आहे. तो काळ्या पाषाणाचा असून अडीचशें फूट उंच व सुमारें पन्नास फूट व्यासाचा आहे. त्यावरून सभोंवतालचा मनोहर देखावा दिसतो. जवळच एक मोठा तलाव आहे.

त्यांत गोमुखांतून पाणी पडतें. तलावाभोंवतालीं सुरेख घाटहि आहे. चित्रकूट गुरुकुलाचे मुख्य स्वामी येथें राहातात. गुरुकुल स्टेशनाजवळ असून त्यांत पंचवीस विद्यार्थी संस्कृतादि विषयांचें अध्ययन करितात.

चितोडाहून **नाथद्वार** साठ मैल अंतरावर आहे. तेथें जाण्यास एक रुपया सात आणे भाडें पडलें. नाथद्वार स्टेशनापासून खुद्द नाथद्वारक्षेत्र दहा मैलांवर आहे. तेथें जाण्यास बसची सोय आहे. तेथें मी दिनांक १९ ऑगस्ट १९५० इ. रोजीं धर्मशाळेंत उतरलों तेथें **बनास**गंगेंत स्नान केलें. तेथें घनश्यामदास राजवैद्य यांचें एक मोफत अन्नसत्र व औषधालय आहे. जवळच एक स्वच्छ पाण्याचा तलाव आहे. दीड मैलावर दोन हजार गाईंची एक मोठी गोशाळा आहे. श्रीनाथद्वार म्हणजे बालाजीचें मंदिर. हें गुजराती पद्धतीचें आहे. येथें अटका देऊन प्रसाद मिळतो. तो प्रसाद पंडे लोक कोणासहि बाजारभावानें विकत देतात. देवाचें दर्शन दोन-तीन तासांच्या फरकानें फक्त पंधरावीस मिनिटें होतें.

## उज्जयनी–महांकाळेश्वर





नाथद्वाराहून दिनांक २०–८–१९५० इ. रोजीं सकाळीं सात वाजतां उज्जयनीस जाण्यास निघालों. तों रतलामवरून दिनांक २१–८–५० इ. रोजीं दुपारीं अकरा वाजतां उज्जयनीस पोंचलों. तेथील गुजराथी शाळेचे मुख्याध्यापक श्री. जव्हेरीलाल लल्लुभाई त्रिवेदी ह्यांच्या कृपेनें गुजराथी समाज भुवनांत राहावयास मोफत जागा मिळाली. त्यांनींच 'श्रीकृष्ण निवास' हिंदु हॉटेल दाखविलें. त्याचे मालक श्री. दामले ह्यांनीं माझी

भोजनाची उत्तम व्यवस्था ठेविली. दुपारीं क्षिप्रेंत स्नान केल्यावर महांकाळेश्वराचें दर्शन घेतलें.

महांकाळेश्वराची मिरवणूक श्रावण व कार्तिक या दोन महिन्यांत दर सोमवारीं व दसऱ्याच्या दिवशीं रथांतून निघते. ही मिरवणूक पाहाण्या-सारखी असते. शिवाला रत्नजडित अलंकारांनीं व भरजरीच्या वस्त्रांनीं सजवून रथांत विराजमान करितात. पालखीच्या पुढें व मागें भजनी मेळे भजन करीत जातात. मल्लांचे, तलवारीचे व दांडपट्ट्यांचे खेळ चालू असतात. आणि पालखीच्या पुढें व मागें घोडेस्वार व शिपाई जात असतात. ही मिरवणूक दुपारीं तीन वाजतां निघून श्रीगोपाळ मंदिरांतील श्रीकृष्णास व देवीस भेटून मोठ्या थाटामाटानें परत येते. मंदिराचा सर्व खर्च शिंदे सरकाराकडून होत असतो. उज्जयनींत 'युवराज' नांवाचें सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालय आहे. उज्जयनीनगराच्या बाहेर दोन मैलांवर भर्तृहरि राजाची गुंफा आहे. कालिका देवी, सांदीपनी आश्रम, मंगळनाथ मंदिर, सिद्धवट-वृक्ष, कालिया देहमहाल व वेधशाळा इत्यादि स्थळें पाहाण्यासारखीं आहेत.

उज्जयनीहून इंदूर साठ मैल आहे. तेथें जाण्यास मोटारीहि मिळतात. माणशीं भाडें एक रुपया दोन आणे पडतें. शनिवारीं सकाळीं सात वाजतां उज्जयनीहून निघून ( दिनांक २६–८–५० इ. रोजीं ) दहा वाजतां इंदुरास पोंचलों. इंदुरांत शिसमहाल व कांचमहाल हीं दोन प्रेक्षणीय मंदिरें आहेत. शिसमहाल हें मंदिर तीन मजली व शिसवाच्या लाकडाचें फार मजबूत आहे. तें श्रृंगारिक व मोहक चित्रांनीं नटविलेलें आहे. त्यांत संगमरवरी दगडाचे तरुण स्त्री-पुरुषांचे मोहक पुतळे व सृष्टिसौंदर्याच्या निरनिराळ्या देखाव्यांचीं चित्रें आहेत. कांचमहाल हें जैन मंदिर सन १९२१ मध्यें बांधलें. सर्व तीन मजली मंदिर कांचेचें बनावलें आहे. त्याच्या भिंती, खांब, तक्तपोशी व पृष्ठभागहि कांचेचेच आहेत. निरनिराळ्या क्षेत्रांचे कलाकौशल्ययुक्त व चित्रविचित्र रंगांचे नमुने देवळाच्या भिंतींत

असून त्यांवर बाहेरून कांचा बसविल्या आहेत. त्यांवर उपदेशपर व भक्तिपर वाक्यें उत्तम देवनागरी लिपींत लिहिलेलीं आहेत. दरसाल या मंदिरांत भाद्रपद शु० ५ ते पौर्णिमेपर्यंत दहा दिवस मोठा उत्सव होत असतो. मंदिर अष्टकोनी असून त्यांत तीर्थंकराची मूर्ति आहे. हीं दोन्ही स्थळें एकदां अवश्य पाहाण्यासारखीं आहेत.

इंदुरहून शंभर मैलांवर नर्मदेच्या कांठीं मंडलेश्वर हें क्षेत्र नेमाड प्रांतांत आहे. मंडलेश्वरीं पाहाण्यासारखें विशेष कांहीं नसल्यामुळें मी तसाच महेश्वरीं गेलों. मंडलेश्वराहून महेश्वर पांच मैल आहे. मोटारीचें भाडें माणशीं तीन आणे आहे. महेश्वर ही देवी अहिल्याबाईची एक वेळ राजधानी होती व पतिनिधनानंतर ती आमरण तेथेंच राहात असे. जवळच नर्मदा नदी वाहात असल्यामुळें क्षेत्र फारच रम्य वाटतें. महेश्वरीं महेश्वरचा घाट उत्तम आहे. तेथें नर्मदा लहनशा गंगेप्रमाणें भासते. परतीरास नावेंतून जावें लागतें. पैलतीरीं शालिवाहनाचें मंदिर आहे. महेश्वरांतील सर्व प्रेक्षणीय स्थळें नर्मदेच्या कांठीं आहेत. अहिल्याबाईचा वाडा व तिचें प्रसिद्ध देवघर हीं कांठावरच उंच ठिकाणीं आहेत. तेथून नर्मदेचें पवित्र दर्शन रात्रंदिवस होतें.

महेश्वरीं अन्नसत्र असून त्यांत रोज दहा पंधरा ब्राह्मणांस भोजन मिळतें. लिंगार्चनासाठीं अठ्यायशी ब्राह्मण ठेवले असून ते वर्षांत साडेचार कोटी लिंगार्चन करितात. हा क्रम बहुत वर्षें चालला आहे. त्याबद्दल प्रत्येक ब्राह्मणास रोजीं चार आणे दक्षिणा मिळते. महेश्वरचीं लुगडीं प्रसिद्ध आहेत. महेश्वराहून मी बढवाईस आलों. बढवाई गांव नर्मदेच्या कांठीं आहे. तेथें एक धर्मशाळा आहे. तेथील नागेश्वर मंदिराजवळ यशवंतराव होळकर यांचा दर्यामहाल नांवाचा अर्धचंद्राकृति राजवाडा आहे. बडवाईहून रात्रीं दहाच्या गाडीनें निघून अर्ध्या तासांत मोरटक्का स्टेशनावर उतरलों. तेथून ओंकारमांधाता या क्षेत्रास जाण्याचा मार्ग आहे. त्या मार्गानें बसमधून निघून अर्ध्या तासांत ओंकारमांधाता येथें आलों.

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. १९७५०

## ओंकारमांधाता



येथें अमलेश्वर व ओंकारेश्वर अशीं दोन देवस्थानें आहेत. एक अमलेश्वर हें नर्मदेच्या उत्तर तीरावर व दक्षिण तीरावर ओंकारेश्वर आहे. ह्या दोन्ही कांठांना नर्मदेश्वर घाट आहेत. हीं दोन शिवमंदिरें दोन टेकड्यांवर आहेत. अमलेश्वराच्या उजव्या बाजूस ब्रह्मदेवमंदिर आहे. या भागास ब्रह्मपुरी म्हणतात. डाव्या बाजूस विष्णुमंदिर व कपिल मुनीचें मंदिर आहे. या भागास विष्णुपुरी म्हणतात व ओंकारेश्वराच्या भागास सदाशिवपुरी म्हणतात. नर्मदा उतरून जाण्यास नावा आहेत. ओंकारेश्वराच्या बाजूस कांहीं अंतरावर मांधाता राजाचा वाडा आहे व दोन तीन धर्मशाळा आहेत. अमलेश्वराच्या बाजूसहि धर्मशाळा आहेत. अमलेश्वर मंदिरांत तेरा ब्राह्मण प्रत्येकीं साडेतेराशें शिवलिंगें रोज करून त्यांचा यथासांग अर्चनविधि झाल्यावर तीं विसर्जन करितात. सर्व खर्च अहिल्याबाईच्या

देणगींतून होतो. ओंकारेश्वर भागाभोंवतीं मोठी प्रदक्षिणा करण्यास तीन तास लागतात. ही प्रदक्षिणा तीन कोसांची आहे. या अरण्यांत गौरीशंकर नांवाचें फार तेजस्वी काळ्या कुळकुळीत पाषाणाचें शिवलिंग आहे. त्याची उंची एक पुरुष व रुंदी सहा हात व्यासाची असावी. याला कोणी मांधातेश्वरहि असें म्हणतात.

ओंकारेश्वर—महादेवाचा मेळा म्हणजे मिरवणूक दर श्रावण सोमवारीं पांच वाजतां निघून अमलेश्वराकडून रात्रीं आठ वाजतां स्वस्थानीं येते. ओंकारेश्वराच्या पूर्वेस पलीकडील डोंगरांत श्रीमार्कंडेय ऋषींचें मंदिर आहे. मोरटक्यास परमहंस आश्रम, राम राम म्हणणाऱ्या वारकऱ्यांचा राम मठ व श्रीराजराजेश्वरी देवीमंदिर हीं पाहिलीं. मोरटक्याहून दिनांक ५–९–५० इ. रोजीं सायंकाळीं पांच वाजतां इंदुरास परत आलों.

**इंदुरास** दहा बारा दिवस राहून दिनांक १७–९–५० रोजीं सकाळीं ११॥ वाजतां निघून सायंकाळीं ४॥ वाजतां खांडव्यास पोंहोंचलों. खांडव्याहून मला जगन्नाथपुरीस जावयाचें होतें. तो रस्ता वऱ्हाडांतून असल्यामुळें वऱ्हाडांत जी माझी इष्ट मित्र मंडळी होती त्यांना भेटावें असें साहाजिकच वाटलें म्हणून खांडव्याहून भुसावळ, तेल्हारा, आडगांव, अकोला, अकोट, नागपूर असा मी प्रवास केला. नागपुरास दिनांक २६–९–५० इ. रोजीं पोंचलों. नागपुराजवळ क्षेत्र या दृष्टीनें पहाण्याजोगें स्थळ म्हटलें म्हणजे **रामटेक** हें होय. रामटेक नागपुरापासून पंचवीस मैलांवर आहे. तेथें जाण्यास रेल्वे आहे. श्रीरामचंद्र वनवासांत असतां कांहीं दिवस रामटेकावर राहिले होते. म्हणून तें स्थळ फार पवित्र समजतात. कालिदासाच्या 'मेघदूत' काव्यांत रामगिरि म्हणून ज्याचा उल्लेख आहे तेंच हें रामटेक होय. नागपुराहून दिनांक २८।९।५० इ. रोजीं सकाळीं ७ वाजतां निघून रामटेक स्टेशनावर ८॥ ला पोंचलों. स्टेशनापासून रामटेकाचा पायथा दोन मैल आहे. टांग्याला चार आणे भाडें पडलें. रामटेकावर शिव, दशरथ, वसिष्ठ, राम, सीता व लक्ष्मण यांचीं मंदिरें

आहेत. नागपूरचे राजे भोसले यांनीं दिलेल्या उत्पन्नांतून येथील पूजा, अर्चा, नैवेद्य, चौघडा व रामनवमीचा उत्सव ह्यांची व्यवस्था होते.

रामटेकापासून एका मैलावर अंबाला या गांवीं अंब कुंड आहे. तें अर्धा मैल लांब व पाव मैल रुंद आहे. तीर्थाभोंवतीं बरींच लहान मंदिरें व सभामंडप आहेत. अंबाला गांवीं म्युनिसिपल शाळा आहे. येथें अंब तळ्यांत स्नान केल्याबद्दल माणशीं एक आणा कर द्यावा लागतो. रामटेकाहून रात्रीं दहा वाजतां नागपुरास परत आलों. नागपुरांत श्री. वि. स. फडके ह्यांनीं चालविलेला पॉटरी कारखाना व श्री. दि. प्र. ओगले ह्यांचा कांचेचा कारखाना हे जाऊन पाहिले. हे दोन्ही कारखाने बरेच जुने व भरभराटीच्या स्थितींत आहेत.

नागपूरच्या पूर्वेस छत्तीसगड प्रांत लागतो. त्यांत नागपुराहून दीडशें मैलांवर रायपूर हें प्रसिद्ध शहर आहे. तेथें महाराष्ट्रीयांना उतरण्याकरितां 'महाराष्ट्र मंडळ' ही संस्था आहे. रायपुरास दोन मैलांवर श्रीराम मंदिर आहे. त्याला जातांना वाटेंत बुढा नांवाचा मोठा तलाव आहे. तो पाहून व रामदर्शन घेऊन मी सिंहाचलम्‌ला जाण्याचा बेत केला. **सिंहाचलम्** रायपुराहून तीनशें मैल आहे. तें क्षेत्र आहे व तें आंध्र प्रांतांत आहे. येथें रेल्वेनें जाण्यास सात रुपये भाडें पडतें. सिंहाचलम् स्टेशनापासून सिंहाचलम् गांव चार मैल आहे. त्याशेजारींच सिंहाचलम् हा डोंगर आहे. डोंगराच्या दोहों बाजूस नारळ, सुपारी, केळीं, पेरू, आंबे, रामफळें, सीताफळें, पोपया; बकूळ, चांफा, गुलाब, पारिजातक इत्यादि फळझाडें व फुलझाडें फळा-फुलांनीं डंवरलेलीं होतीं.

डोंगरावर जाण्यास एक हजार पायऱ्या चढाव्या लागतात. डोंगरावर श्रीलक्ष्मीनारायण मंदिर आहे. या मूर्ति चंदनानें लपेटलेल्या असतात. वर्षांतून फक्त एकदां अक्षय्य तृतीयेस मूर्तीचें दर्शन होतें. देऊळ फार मोठें उंच, भव्य, मजबूत व काळ्या पाषाणाचें आहे. दर्शनासाठीं माणशीं दोन आणे फी पडते. चार आण्यांपासून पांचदहा रुपयांपर्यंत अटका

मिळतो. अटक्यांत खिचडी, डाळ, दहींभात व रुपयास चार याप्रमाणें बुंदीचे लाडू मिळतात. सर्व व्यवस्था तेलंगी ब्राह्मण पाहातात. येथें नरसिंहमुखांतून गायमुखाप्रमाणें मांडीएवढें पाणी सतत पडत असतें. त्याखालीं यात्रेकरू स्नान करितात. या देवाची सर्व व्यवस्था मद्रास येथील विजयनगरच्या राजाकडे होती. हल्लीं ती सरकारी अधिकाऱ्यांकडे आहे. देवस्थानाचें वार्षिक उत्पन्न सव्वातीन लक्षांचें आहे व खर्चहि तितकाच आहे. डोंगरावर पन्नास घरें असून त्यांत दुकानें आहेत. मोठाल्या धर्मशाळा आहेत. क्षेत्र फार आल्हाददायक आहे.

सिंहाचलमहून दिनांक ३।१०।५० इ. रोजीं रात्रीं साक्षीगोपाळ या क्षेत्रास जाण्यासाठीं निघालों. हें क्षेत्र सिंहाचलापासून तीनशें मैल अंतरावर असून रेल्वे भाडें सात रुपये पडलें. सिंहाचलापासून साक्षीगोपाळापर्यंतचा प्रदेश भातशेती, ताडमाड, निवडूंग, घायपात, कुंपणें, उसाचीं शेतें, कळकीचीं बेटें व केतकीचीं झाडें ह्यांनीं व्यापून गेला आहे. मी साक्षीगोपाळास दिनांक ४।१०।५० इ. रोजीं दुपारीं आलों. साक्षीगोपाळ या मंदिरांत भगवान् श्रीकृष्ण व राधा यांचें दर्शन घेतलें. या क्षेत्रांत चंदन व राधा असे दोन तलाव आहेत. राधा कुंडाचें पाणी उत्तम आहे. दर्शनापूर्वीं त्यांत स्नान करून संध्या, पूजा तर्पणादि विधि आटोपले. साक्षीगोपाळाचें देऊळ दगडी, कलाकौशल्यांनीं युक्त व अति भव्य आहे. त्याला गोपुरें असून त्यावर राधा व गोपी यांचे मनोहर संगमरवरी पुतळे कोरलेले आहेत.

## जगन्नाथ

साक्षीगोपाळापासून जगन्नाथपुरी अर्ध्या तासाच्या अंतरावर आहे. येथील जगन्नाथाचें मंदिर इंद्रदमन राजानें बांधलेलें आहे. इंद्रदमनाचें मंदिर जनकपूर येथें असून पुरीपासून जनकपूर दोन मैलांवर आहे. इंद्रदमन कुंड आहे. जवळच राम-लक्ष्मण मंदिर आहे. त्यांत कौसल्येच्या पायांत बोचलेला कांटा राम काढीत आहेत असें दाखविलें आहे. जवळच

अनुक्रम 22365 (५५) दिः
क्रमांक 2235 नोंः दिः

नीलकंठ नांवाचें शिवमंदिर आहे. तशाच कुंति, द्रौपदी व श्रीकृष्ण, रोहिणी, कौसल्या अशा पुरुषभर उंचीच्या पाषाणी मूर्ती आहेत.

जगन्नाथ मंदिरांत दर्शन सकाळीं व रात्रीं १० ते १२ च्या दरम्यान फक्त दोन वेळां होतें. भोग म्हणजे प्रसाद दोन वेळां मिळतो. दुपारीं मालपुवा, पुरी व दहीं आणि रात्रीं डाळ—भात, शाक, आंबट फळाचें लोणचें मिळतें. देऊळ अति उंच, लांब, रुंद व भव्य असून कलाकौशल्यानें नटविलेलें आहे. देवळाजवळ मार्केडेय तीर्थकुंड मोठें आहे. त्यांत बरेच यात्रेकरू स्नान करितात. देवळांत बलराम, सुभद्रा व श्रीकृष्ण अशा पुरुषाएवढ्या उंचीच्या तीन सुबक मूर्ति आहेत. ज्या सालीं दोन आषाढ येतात त्या सालीं जुन्या लाकडी तिन्ही मूर्ती जमिनींत पुरतात. त्यापूर्वी देवळांत चंदनाच्या नव्या लाकडी मूर्ती बसवून त्यांची प्राणप्रतिष्ठा करितात. अशा पर्वणीला लाखों यात्रेकरू दर्शनासाठीं येतात.

जगन्नाथाचें देऊळ सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी बांधलेलें आहे.



मंदिराच्या आवारांत बरेच देव-देवता व सुमारें पन्नास लहान मंदिरें आहेत. देवळाला चारहि दिशांस चार मोठे दरवाजे आहेत. देवळाच्या दक्षिणेकडील दरवाजांत सुमारें दहा फूट उंचीचे व चार फूट रुंदीचे भीम व अर्जुन यांचे दोन भव्य पुतळे आहेत. ते अति सुबक व मल्लांसारखे आहेत. पश्चिमेकडील दरवाजापाशीं पाषाणाचा अतिभव्य मारुति आहे. या क्षेत्रीं आश्विन महिन्यांत दशभुजा दुर्गादेवी, गजानन, कार्तिकस्वामी यांच्या सर्व आयुधांसह उत्तम चित्रें करून व उत्तम सजवून त्यांची दसऱ्याच्या दिवशीं थाटाची मिरवणूक काढून तीं समुद्रांत विसर्जन करितात.

पुरीस इतर क्षेत्रांप्रमाणें अटक्याचीच पद्धत आहे. देवास अटक्याचें द्रव्य दोन तीन रुपयांपासून पांच सातशें रुपयांपर्यंत असतें. आपण

आपल्या पंड्यास एक रुपया व नारळ देऊन त्यांच्या पायां पडलें म्हणजे तो यात्रा सुफल झाली असें म्हणतो. पुरीस गांवांत कोणीहि आपल्या घरीं स्वयंपाक करून जेवीत नाहींत असें सांगण्यांत आलें.

पुरी येथील राजा आपल्या राजवाड्यांत राहातो. तो क्षत्रिय आहे. त्याचे सहा हत्ती आहेत. देवळाच्या भोंवतालीं आवाराबाहेर नानाविध दुकानें आहेत. त्यांत सर्व प्रकारच्या जिनसा मिळतात. येथें पुरी नांवाचें कॉलेज, हायस्कुलें व जिल्हा कचेऱ्या आहेत. गांवांत धर्मशाळा व पंड्ये पुष्कळ आहेत. जगन्नाथाचा समुद्रकिनारा स्वच्छ व प्रशस्त आहे. श्रीमंत लोक कलकत्त्याहून हवेकरितां पुरीस समुद्रकिनाऱ्यावर येऊन राहातात. किनाऱ्यावर कलकत्त्याच्या एका मारवाडी शेठजीनें एक सुंदर दगडी शिव-मंदिर बांधून त्याची उत्तम व्यवस्था करून ठेविली आहे. गांवांत खासगी रघुनंदन लायब्ररी व राधाकृष्ण मिशन लायब्ररी अशा दोन आहेत.

जगन्नाथापासून एक मैलावर श्रीलोकनाथाचें शिवमंदिर आहे. मंदिराचें आवार प्रशस्त आहे. विहिरी व नळहि आहेत. त्यांना पाणी मुबलक असतें. मंदिराजवळ पार्वतीसागर म्हणून गोड्या पाण्याचा एक अति मोठा तलाव आहे. तो चौफेर तांबड्या दगडांनीं बांधला असून त्याला चोहों बाजूंस पायऱ्या आहेत. त्यामुळें स्नानाची व कपडे धुण्याची चांगली सोय झाली आहे.

## भुवनेश्वर

माझा पुरींतील मुक्काम अनेक कारणांमुळें फार लांबला. मी तेथें तीन आठवडे राहिलों. पुरीहून भुवनेश्वर हें क्षेत्र सुमारें पन्नास मैलांवर आहे. तेथें जाण्यास बसगाड्या मिळतात. तेथें गेल्यावर मी दूधवाल्याच्या धर्म-शाळेंत दिनांक २०–१०–५० इ. रोजीं उतरलों. ही धर्मशाळा सर्व उपकरणांनीं युक्त व राहाण्यास उत्तम आहे. येथील उडीया ब्राह्मणाच्या खाणावळींत जेवण्याचा विचार होता. पण तेथें अभक्षभक्षणाचा प्रकार दिसल्यामुळें जेवणाचा बेत रहित करून मी दुकानांतील फराळावरच

भागविलें. भुवनेश्वराचें मंदिर अति उंच मनोऱ्यांनीं व नक्षीच्या कामांनीं युक्त आहे. भोंवतालीं गणपतीचें व इतर बरींच शिवमंदिरें आहेत. भुवनेश्वराच्या मंदिरांत हरिहरांच्या सजोड पिंडीचें दर्शन घेतलें. येथील पंडे यात्रेकरूंना त्रास देत नाहींत. एका वेळचे दहा आणे दिले म्हणजे ते भात-भाजीचा प्रसाद पोटभर देतात. भुवनेश्वर ही आतां ओरिसा प्रांताची राजधानी होत असल्यामुळें तेथें नवनव्या इमारती बांधण्याचें काम सुरू आहे. पुरीहून भुवनेश्वरास येतांना मार्गांतील दृश्य कोंकणाप्रमाणें दिसलें. त्यांत भातशेतें, गवताळ जमिनी, नारळी झाडें पुष्कळ आहेत.

जगन्नाथाहून मद्रासला जातांना वाटेंत महत्त्वाचीं क्षेत्रें अशीं तिरुमल्ली, शिवकांची व विष्णुकांची हीं होत. यांपैकीं प्रथम मी तिरुमल्ली येथें जाऊन श्रीव्यंकटेश्वराचें दर्शन घेतलें. हा सर्व प्रवास पूर्व समुद्रकिनाऱ्या-जवळून होतो. तिरुमल्लीपर्यंत जातांना माझे पुढीलप्रमाणें टप्पे झाले.

( १ ) पुरी ते **वाल्टेर** साडेतीनशें मैल, ( २ ) वाल्टेर ते **बेझवाडा** अडीचशें मैल, ( ३ ) बेझवाडा ते काळाहस्ती दोनशें वीस मैल, ( ४ ) काळाहस्ती ते तिरुपल्ली चाळीस मैल, ( ५ ) तिरुपल्ली ते तिरुमल्ली नऊ मैल. बेझवाडा गांव कृष्णेच्या कांठीं असून कांहीं वस्ती डोंगरावर व डोंगराच्या पायथ्याशीं आहे. येथें मी कृष्णेवर स्नानसंध्यादि विधि उरकला. व दुपारीं अकराच्या गाडीनें काळाहस्तीनें स्टेशनास जाण्यास निघालों. रात्रीं दहा वाजतां गुडूर स्टेशनावर पोंचलों. तेथें गाडी बदलून दिनांक २८।१०।५० इ. रोजीं सकाळीं सहा वाजतां दुसऱ्या लाईनच्या गाडींत बसून काळाहस्ती स्टेशनावर सकाळीं ८॥ वाजतां पोंचलों.

काळाहस्ती हें गांव सुवर्णा नदीवर आहे. याची प्रसिद्धि श्रीकाळा-हस्तीश्वर या देवळामुळें आहे. हें देऊळ फार मोठें व नक्षीदार देवांच्या पुतळ्यांनीं सजविलें आहे. त्याला सुमारें अडीचशें खांब आहेत. ह्याचें गोपूर दोनशें फूट उंच व ३० फूट रुंद आहे. त्यावर दशावतारांचे दगडी पुतळे आहेत. सुवर्णगंगेचें पाणी हलकें, शुद्ध व गोड आहे. हींत पूर्वीं

वाळूंत सोनें सांपडत असे त्यावरून हें नांव पडलें आहे. बेझवाडा, काळाहस्ती हीं सर्व ठिकाणें आंध्र प्रांतांत आहेत. आंध्रांतील लोक महात्मा गांधींचे मोठे भक्त समजले जातात. त्यांची ती भक्ति बेझवाडा व काळाहस्ती या दोन्ही ठिकाणीं दृष्टीस पडली. कारण बेझवाड्यास कृष्णा घाटावर गांधीजी व कस्तुरबा ह्यांचे ब्राँझ धातूचे उभे पुतळे आहेत, तसेंच काळाहस्तीश्वराजवळहि गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस ह्यांचे छोटे पुतळे आहेत.

## तिरुमल्ली

काळाहस्तीहून दुपारीं दीड वाजतां रेल्वेनें निघून साडे तीन वाजतां तिरुपल्लीस आलों. **तिरुपल्ली** हा गांव बराच मोठा व शहरासारखा आहे. तिरुपल्लीस श्रीराम मंदिर व गोविंद मंदिर हीं पाहाण्यासारखीं आहेत. ह्यांचीं आवारें मोठीं व गोपुरें उंच व नक्षीदार आहेत. तिरुपल्लीहून तिरुमल्ली क्षेत्र नऊ मैल आहे. म्हणून मी तिरुपल्लीहून दिनांक २९।१०।५० इ. रोजीं पहाटेस चार वाजतां पायीं निघून तिरुमल्लीस आठ वाजतां पोंचलों. येथील व्यंकटेश्वराचें देऊळ प्रसिद्ध आहे. तें डोंगराच्या शिखरावर आहे. त्याला जाण्यास हजार पायऱ्या आहेत. सुमारें दहा मैल दगडी पाखाडीच बांधली आहे. व्यंकटेश्वराची मूर्ति सोन्याची व पुरुषभर उंचीची आहे. देवळाला मात्र घुमट व सात मनोरे आहेत. तिरुमल्ली हें समुद्रसपाटीपासून बत्तीसशें फूट उंच आहे. कांस्य धातूचीं पात्रें येथें विकत मिळतात. तिरुपल्लीहून तिरुमल्लीस चौदा मैल अंतर आक्रमून बस गाडीनें अर्ध्या तासांत जातां येतें. माणशीं भाडें दीड रुपया पडतें. **गोविंद राजपट्टण** धर्मशाळा अति मोठी आहे.

ह्या क्षेत्रीं कोणत्याहि ऋतूंत लग्नमुंजी हीं कृत्यें होतात. ह्या क्षेत्रास पूर्वी 'भूवैकुंठ' म्हणत. स्वर्गीच्या देवताहि **पद्मावतीच्या** निष्ठेसाठीं वचनबद्ध असल्यामुळें ह्या क्षेत्राचें माहात्म्य फारच वाढलें आहे. देवाचे लाखों रुपयांचे दागिने आहेत. येथून तीन मैलांवर पद्मावति क्षेत्र आहे. येथें

पद्मावति व बालाजी अशीं दोन मंदिरें आहेत. देवळाजवळच सुमारें तीनशें फूट लांब व दीडशें फूट रुंद असें पुष्करणीवजा कुंड आहे. त्यांत यात्रेकरू स्नान करितात. ह्या क्षेत्रीं देव नवसास पावला कीं, स्त्रियाहि संन्याशाप्रमाणें आपल्या डोक्याचें मुंडन करितात. येथें धर्मशाळा, बाजार, दवाखाना, तार ऑफिस इत्यादि सोयी आहेत. खाणावळी व उपाहार-गृहेंहि आहेत. तिरुमल्लीचें कार्य आटोपून मी परत तिरुपल्लीस आलों. तेथें त्याच दिवशीं रात्रीं तिरुपल्लीहून अडीच वाजतांच्या गाडीनें निघून **रेणुगुंठ्यास** आलों व रेणुगुंठ्याहून निघून **कांचीस** सकाळीं ८॥ वाजतां पोंचलों. रेणुगुंठा ते कांची यामधील अंतर सुमारें १२५ मैल आहे.

## कांची

कांचीचे शिवकांची व विष्णुकांची असे दोन भाग आहेत. कांची स्टेशनापासून शिवकांची मंदिर दीड मैल आहे. तेथें जाण्यास टांगे मिळतात. देवळाजवळ एक शिवकुंड आहे. त्यांत दिनांक ३०।१०।५० इ. रोजीं स्नानादि कृत्यें आटोपलीं. स्नानानंतर मंदिरांत जाऊन शिवाचें दर्शन घेतलें. हें देऊळ प्रचंड आहे. याचा दिंडी–दरवाजा शनवार-वाड्याहूनहि मोठा आहे. मंदिराला पांच गोपुरें आहेत. त्यांपैकीं एक गोपूर दहा मजली आहे ! त्याशिवाय पार्वतीमंदिर व कार्तिकस्वामीमंदिरहि आहेत. शिवमंदिराचें आवार म्हणजे एक लहान गांवच आहे. त्या आवारांत मुख्य मंदिराच्या भोंवतीं एकशें आठ शिवलिंगें जमिनीवरच ठेवलीं आहेत. कार्तिकस्वामींच्या दोन्ही बाजूंस त्यांच्या दोन पत्न्या आहेत म्हणून पंडे सांगत होते; पण ही गोष्ट रूढि व शास्त्र ह्यांच्याविरुद्ध आहे. कारण कार्तिकस्वामी हा आजीव ब्रह्मचारी होता असें पुराणांत त्याचें वर्णन आहे.

रावणाची लाकडी दशमुखी मूर्ति, शस्त्रास्त्रांसह वीस हात, घुंगुर असलेले दोन पाय वगैरे सर्व चांदीच्या पत्र्यांत मढविलेलीं आहेत. रावणानें कैलासापुढें नृत्य करून त्यास प्रसन्न करून घेतलें होतें. ह्याशिवाय

कैलासेश्वर व विश्वेश्वर अशीं दोन मंदिरें आहेत. हीं देवळें पल्लव राजांच्या वेळचीं सातव्या आठव्या शतकांतील आहेत.

शिवकांचीहून विष्णुकांचीस जाण्यास बस मिळते. तिला माणशीं दोन आणे भाडें पडतें. शिवकांचीच्या मानानें विष्णूकांचींतील विष्णूचें देवालय जीर्ण झालेलें दिसतें. श्रीविष्णूची मूर्ति सुमारें दहा फूट उंच व चार फूट रुंद काळ्या पाषाणाची व शांत मुद्रेची आहे. सभोंवार पन्नास फूट उंच व तीन फूट रुंद असा दगडी भिंतीचा कोट आहे. देवळाच्या आवारांत विहिरी व कुंडें आहेत. तसेंच आदिमाया, श्रीनृसिंह, सुब्रह्मण्य, कामाक्षी यांचीं मंदिरें आहेत.


येथें दुपारीं प्रसाद खिचडीचा व ताकभाताचा असतो. शिवकांचीच्या शंकरास आम्रेश्वर व विष्णूकांचीच्या विष्णूला **वरदराज** अशा संज्ञा आहेत. येथील काष्ठाच्या रंगीत पालीस स्पर्श करणारास खऱ्या पालीचा स्पर्शदोष बाधत नाहीं असें पुजारी सांगतात.

## मद्रास

कांचीवरमहून दिनांक ३१।१०।५० इ. रोजीं आठ वाजतां मोटारीनें निघून अकरा वाजतां **मद्रास** येथें पोंचलों. हें अंतर साठ मैलांचें आहे व त्यास भाडें सव्वा रुपया पडलें. मद्रास शहर मुंबईइतकें मोठें नाहीं व भव्यहि नाहीं. येथील लोकसंख्या वीस लाख आहे. येथें तेलगू, तामील, कानडी व इंग्रजी या भाषा चालतात. येथील रिक्षा माणसेंच ओढतात. येथें महाराष्ट्र भुवन आहे त्यामुळें महाराष्ट्रीयांची भोजनाची व राहण्याची चांगली सोय होते. शहरांत एकांबेश्वर, कार्तिकस्वामी, बालाजी ह्यांचीं मंदिरें व मूर मार्केट आणि मद्रास व सदर्न मराठा रेल्वेचीं मुख्य ऑफिसें हीं महत्त्वाचीं स्थळें आहेत. मद्रासेंतील पार्थसारथी, रत्नजडित श्रीकृष्णाची मूर्ति, शेषशायी भगवान व त्यांची सुपर्णपालखी हीं अवश्य पाहाण्यासारखीं आहेत. येथील कपिलेश्वराच्या गोपुऱ्यावर अनेक दगडी चित्रें आहेत; त्यांत दशावतारी मूर्ति अप्रतिम आहेत. पदार्थसंग्रहालयहि

प्रेक्षणीय आहे. आझार नदी व अड्यार येथील डॉ. बेझंटबाईंची थिऑसफिकल वसाहतहि कित्येक यात्रेकरू पाहातात.


येथील सृष्टिसौंदर्य अप्रतिम आहे. येथील जुनाट वटवृक्ष, भव्य मंदिर, ग्रंथालय, भूर्जपत्रावरील हस्तलिखित भारत ग्रंथ हीं सर्व डॉ. बेझंटबाईंच्या



भगवान श्रीविष्णु

कर्तृत्वाची साक्ष देतात. मद्रासहून त्रिचनापल्ली सुमारें सव्वा दोनशें मैल आहे. तेथें जाण्यास रेल्वेचें भाडें चार रुपये दहा आणे पडलें. त्रिचनापल्लीशेजारींच श्रीरंगम् हें जवळचें स्टेशन आहे. त्रिचनापल्लीपेक्षां क्षेत्र या दृष्टीनें श्रीरंगम्चें माहात्म्य जास्त आहे म्हणून मद्रासहून दिनांक ४।११।५० इ. रोजीं दुपारीं साडेनऊच्या गाडीनें निघून त्रिचनापल्लीस न उतरतां रात्रीं आठ वाजतां श्रीरंगम् स्टेशनवर उतरलों. स्टेशनापासून अर्ध्या मैलावर बन्सीलालशेठ यांची धर्मशाळा आहे. ती श्रीरंगनाथ देवळाजवळ आहे. श्रीरंगनाथाचें देऊळ भव्य व प्रशस्त आहे. त्याला पांच गोपुरें व बरेच खांब आहेत. जवळच कावेरी नदी आहे. देवाचे:पुजारी रामानुजपंथी दिसले. पहिल्या गोपुरावर नृसिंह, कयाधूसह हंसरा प्रल्हाद वगैरे आहेत. देवळाच्या [illegible] बाजूंस अग्रशाला—श्राद्धाच्या जागा आहेत.

श्रीरंगनाथाच्या अनेक दागिन्यांनीं विभूषित केलेल्या दोन सुवर्ण-मूर्ति, श्रीजंबुकेश्वर व जवळच असलेलें श्रीराम मंदिर हीं अति मनोहर आहेत. सर्व देवालयांत अत्युत्तम नक्षीकाम पाहून यात्रेकरू आश्चर्यचकित होतात. मी श्रीरंगम् येथें एक रात्रच असल्यामुळें देवळाचें निरीक्षण मला बारकाईनें करतां आलें नाहीं. मी दुसरे दिवशीं सकाळीं ८॥ वाजतां बसनें निघून त्रिचनापल्लीस गेलों. **त्रिचनापल्ली** हें शहर फार मोठें आहे. तें जिल्ह्याचें ठिकाण आहे. शेजारून कावेरी नदी वाहात असल्यामुळें भोंवतालचा प्रदेश सुपीक व अतिशय मनोहर बनला आहे. त्रिचनापल्लीस पहाण्यासारखें ठिकाण म्हटलें म्हणजे श्रीमंगलमूर्तींचें देवालय होय. तें सुमारें दीड हजार फूट उंचीच्या लाल पहाडावर आहे. देवळाला मोठमोठीं गोपुरें असून तेथें जवळच शंकर, पार्वती व कार्तिकस्वामी ह्यांचीं मंदिरें आहेत. तो पहाड चढण्यास सुमारें एक हजार पायऱ्या आहेत. येथें एक आतिशय मोठी भव्य व पंचरसी धातूंची घंटा आहे. ती एक पुरुषभर उंच व तीन फूट व्यासाची आहे. ती पाहाण्यास प्रत्येक यात्रेकरूकडून एक पैसा शुल्क म्हणजे कर घेतात.



**श्रीमंगलमूर्ति**

त्रिचनापल्लीहून त्याच दिवशीं दुपारच्या ११॥ च्या गाडीनें निघून संध्याकाळीं सहा वाजतां मदुरा शहरीं उतरलों. तें अंतर दीडशें मैल आहे. यावेळीं मदुरेस फार वेळ न थांबतां मदुरेहून दिनांक ६।११।५० रोजीं मी तसाच रामेश्वरीं गेलों. रामेश्वराहून एक महिन्यानें म्हणजे दिनांक ६।१२।५० रोजीं सकाळीं मदुरेस परत आलों. मदुरेंतील प्रसिद्ध देवालय म्हणजे मीनाक्षीचें होय.

## मीनाक्षी

त्याशिवाय गणेश, कार्तिकस्वामी, सुंदरेश्वर इत्यादि मंदिरें आहेत. मीनाक्षी देवळाचें आवार इतकें मोठें आहे कीं, त्यांत एक लहानसें गांव सहज मावेल. मीनाक्षीच्या देवळाच्या आवारांत पांच गगनचुंबी उंच, भव्य व नक्षीदार अशीं गोपुरें आहेत. खांबावर हत्ती व सिंह ह्यांचे पुतळे कोरले आहेत. देवळाच्या स्वतःच्या मालकीचे दोन हत्ती व उंट आहेत. देऊळ सकाळीं ६ ते १२ पर्यंत व सायंकाळीं ५ ते १०॥ पर्यंत उघडें असतें. येथें भिकारी पुष्कळ आहेत. ह्यांपैकीं लहान मुलांस शिक्षण देणें, धट्ट्याकट्ट्यांस



मीनाक्षी



नटराज

कामास लावणें व रोग्यांस औषध देणें इत्यादि व्यवस्था स्थानिक अधिकाऱ्यांनीं अवश्य करावी. मंदिरांत एक कल्याण मंडप व दुसरा

सहस्रखांबी मंडप आहे. हा मंडप नवरात्रांत मोठा उत्सव होतो तेव्हां उघडतात व यात्रेकरूंना यावेळीं तो पहावयास मिळतो. मंदिराच्या खांबावर मार्कंडेय ऋषि, रावण ह्यांचे पुतळे आहेत. मीनाक्षीच्या नाकांत एक हिरा असून डोक्याला रत्नजडित मुकुट आहे. तसेंच जवळपास अग्निवीरभद्र व अघोरवीरभद्र असे दोन पुतळे आहेत. मदुरेपासून दोन मैलांवर '**मारिअमन**' नांवाच्या देवीचा एक पुष्करणीवजा मोठा तलाव आहे. तो सहा पुरुष खोल, तीनशें फूट लांब व दोनशें फूट रुंद आहे. तलावाच्या मध्यभागीं एक बाग असून तिच्यांत उंच मनोरा आहे. त्याची उंची सुमारें शंभर फूट आहे. तेथून मदुरा शहराचा सर्व देखावा दिसतो.

**मदुरा** ही जिल्ह्याची राजधानी असल्यामुळें तेथें सरकारी कचेऱ्या आहेत. मदुरा येथें विणकामाचा मोठा धंदा चालतो. तेथें सूत काढण्याच्या गिरण्या असून ह्यांचें सूत परप्रांतीं रवाना होतें. खुद्द मदुरेंत लुगडीं, धोतरें वगैरे विणणारे दहा हजारांवर हातमाग चालतात. मदुरा ही एक वेळ तिरुमल्लनायक राजाची राजधानी होती. त्याचा तेथें एक राजवाडा आहे. तो त्यानें इ. स. १८६२ त बांधला व त्याच वेळीं त्यानें मीनाक्षी मंदिराचाहि कांहीं भाग बांधला असें म्हणतात.

**पक्षीतीर्थ** नांवाचें एक क्षेत्र आहे. तेथें मदुरेहून मोटारीनें जातां येतें. ज्यास आगगाडीनें जावयाचें असेल त्याला चिंगलपूर अगर सिंगलपेठ स्टेशन जवळ आहे. ह्या तीर्थाच्या पायथ्याशीं ब्रह्मचारी आश्रम व महादेवाचें मंदिर आहे. डोंगरावर चढून छपराच्या सावलींत यात्रेकरू पक्ष्यांची मार्गप्रतीक्षा करीत असतात. नेहमींच्या रिवाजाप्रमाणें खीर व खिचडीचा नैवेद्य शंकरास दाखविल्यावर तो ठराविक शिलेपाशीं मोदकपात्रांत ठेवतात. जवळच्या हौदांत पाणी असतें. इतक्यांत बरोबर साडेबारा वाजतां गरुडाकृति दोन मोठे शुभ्र पक्षी शिवालयास प्रदक्षिणा घालून पात्रांतील व पुजाऱ्याच्या हातांतीलहि खीर व खिचडी खातात व पाणी

पिऊन क्षणार्धांत आकाशांत उड्डाण करितात. पुष्कळ वर्षांपासून हा क्रम सुरू आहे. सर्व प्रेक्षक आश्चर्यचकित होतात.

दक्षिण कानडांत **मुंढा** गांवच्या आसपास वेलदोड्याचें पीक बरेंच निघतें. पाऊस दीडशें इंच लागतो. भुईमुगासारखे वेलदोडे झाडाच्या बुंध्याशीं लागतात. अशा प्रकारचीं हजारों एकरांचीं शेतें चित्तपावनांच्या मालकीचीं आहेत.

**कुंभकोणम्** अगर मंदिरनगर, तंजावरापासून दोन तासांच्या रस्त्यावरील हें क्षेत्र कावेरीच्या कांठीं आहे. येथें बरींच मंदिरें आहेत. येथें श्रीशंकराचार्यांचा मठ आहे. मुख्य मंदिर कोदंडधारी रामाचें आहे. माघांत मोठा उत्सव होतो. नेहमीं रात्रीचे इतके दिवे लावतात कीं, आपणांस दिवाळीच भासते.

## श्रीरामेश्वर

दक्षिण हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध देवळें फार मोठीं असतात. त्यांचें वैशिष्ट्य म्हणजे प्राकार, फार फार प्रशस्त आणि गोपुरें अतिशय उंच, नक्षीदार असतात. 'दक्षिणेंत पाहावें व उत्तरेंत खावें' अशी म्हण आहे. अशा सर्व देवळांपैकीं रामेश्वर हें अतिशय मोठ्या देवळांत मोडतें. तें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक असून तेथें गेल्यावांचून महायात्रा पुरी होत नाहीं. काशीची गंगा रामेश्वरास घातली व रामेश्वराचा सेतु गंगेंत टाकला म्हणजे महायात्रा पूर्ण झाली असें समजतात. रामेश्वर क्षेत्र हें भारताच्या अगदीं टोंकाला समुद्रकांठीं आहे. रामेश्वर गांव फारसें मोठें नाहीं. तेथें जी वस्ती आहे ती बहुतेक भटभिक्षुक व पुजारी यांची आहे. यात्रेकरूंची उतरण्याची सोय त्यांच्याकडे होते. त्याशिवाय धर्मशाळेंतहि होते.

रामेश्वर लिंग असून त्याची स्थापना दाशरथीरामानें केली. त्यासंबंधीं पुढील कथा सांगण्यांत येते. श्रीरामचंद्र लंकेंत रावणाचा वध करून आले; तेव्हां भारताच्या तीरावर शिवलिंगाची स्थापना करण्याचें त्यांनीं योजिलें

त्यासाठीं त्यांनीं श्रीमारुतीरायांची रवानगी काशीस केली. काशीहून श्रीविश्वनाथाकडून त्यांचें आत्मलिंग आणावयाचें होतें; पण तें ठरलेल्या मुहूर्तावर मारुतीनें न आणल्यामुळें, रामानें दुसऱ्या लिंगाची स्थापना केली, ती होत







### ॥ श्रीमारुतिध्यान श्लोक ॥

मनोजवं मारुततुल्यवेगं, जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं, श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥

आहे तोंच मारुती काशीहून लिंग घेऊन आला; त्याहि लिंगाची स्थापना करावी लागली. यामुळें रामेश्वर देवालयाच्या आवारांत दोन शिवलिंगें आहेत. त्यांपैकीं पहिल्याचें नांव 'रामेश्वर' व दुसऱ्याचें नांव 'विश्वनाथ' अशीं आहेत. तसें असलें तरी मुख्य देव रामेश्वर होय.

देवालयाच्या आवारांत सात मातृका, अकरा रुद्र इत्यादि देव-देवता आहेत. याच आवारांत चोवीस तीर्थकुंडें आहेत. रामेश्वरास घालण्याकरितां कित्येक लोक बरोबर गंगा घेऊन येतात. ती कोणाजवळ नसेल व त्याला ती घालावयाची असेल तर रामेश्वरींच ती देवास घालण्यापुरती एक रुपयास विकत मिळते. ती देवास घालावयास पुजाऱ्याच्या स्वाधीन केली म्हणजे तो देवास स्नान करवितो. या पूजेस एकंदर खर्च कमींत कमी पांच रुपये येतो. देवास गंगा अगर बिल्वपत्रें वाहाणें, अटका देणें,

यासाठीं बरीच रक्कम देवालयाच्या स्वाधीन करावयाची असल्यास त्यासाठीं 'पेष्कार' कारभारी नांवाचा एक सरकारी अधिकारी असतो तो त्या देणगीची पावती देतो. 'श्रीरामेश्वर' दक्षिणेकडील एक धाम आहे.

देवळांत गोरगरिबांस देवाचा प्रसाद विकत देण्यांत येतो, त्यांत मूदभर साधा, मसाल्याचा व गूळभात ह्यांची एकेक मूद दोन आण्यांस मिळते. चार आण्यांत एका माणसाचें एक वेळचें पोट भरतें. माझा मुक्काम रामेश्वरास एक महिना होता. तेथें खाणावळी नाहींत. तेथील ब्राह्मणाचें लक्ष तात्पुरत्या येऊन जाणाऱ्या यात्रेकरूंवर असतें. ज्याला बरेंच दिवस राहावयाचें असेल त्याला आपली भोजनाची व्यवस्था करून घेणें बरेंच अवघड जातें. रामेश्वरीं तद्देशीय ब्राह्मणांप्रमाणें महाराष्ट्रांतील कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांचीहि थोडीशी वस्ती असल्यामुळें आपण परप्रांतीं आहों असें वाटत नाहीं.

रामेश्वरी माघ महिन्यांतील शिवरात्रीस मोठा उत्सव होतो. त्यावेळीं लांबलांबचे यात्रेकरू मुद्दाम येथें येतात. ह्याशिवाय आषाढांतील भरणी नक्षत्रापासून दहा दिवस रामेश्वराचा उत्सव होतो. श्रावण शु. १ पासून श्रावण शु. ५ पर्यंत पार्वतीच्या लग्नाचा सोहळा चालतो. तसेंच वैशाखांत वसंतोत्सव व आश्विनांत नवरात्र उत्सव होतात. दर शुक्रवारीं पार्वतीच्या पालखीची मिरवणूक रात्रीं निघते. तिजवर चारहि दिशांना असलेले लांकडी गरुड पार्वतीवर फुलें उधळून चार माळा अर्पण करितात. कार्तिकस्वामींचा वाढदिवस कार्तिक शु. ६ ला होतो. त्यावेळीं त्यांची मिरवणूक निघून तो दैत्यांचा वध करितो असें दाखवितात. हें कार्तिकस्वामींचें मंदिर पश्चिमेच्या दिंडीदरवाजानें रामेश्वर मंदिरांत प्रवेश करितांच उजव्या हातास लागतें व डाव्या हातास गणेशमंदिर आहे.

या उत्सवांत कार्तिकस्वामीचा विवाह कार्तिक शु. ७ ला ब्रह्मदेवाच्या मुली वल्ली व देवसेना ह्यांच्याबरोबर होतो. महाराष्ट्रांत कार्तिकस्वामीचें दर्शन फक्त कार्तिकी पौर्णिमेसच स्त्रियांना विहित असतें. पण

इकडे त्यांचें दर्शन स्त्रिया पुरुषांप्रमाणें केव्हांहि घेतात. रामेश्वर मंदिरांत एक कायमचें प्रदर्शन ठेवण्यांत आलें आहे. त्यांत नाना प्रकारच्या प्रेक्षणीय व मूल्यवान वस्तु ठेविल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणें आहेत : हत्ती, नंदी, राजहंस, गरुड व मारुति या मूर्ती लांकडी असून त्यांस सोन्याच्या पत्र्यानें मढविलें आहे. त्याचप्रमाणें रथ, नंदिकेश्वर, भूतवेताळ व पोपट हे चांदीचे आहेत. दशमुखी रावण, दोन घोडे, सिंह, दोन नंदी हे सोन्याचे आहेत. बिभीषण, हंस व कैलास हे चांदीचे आहेत. कामधेनु, गरुड, दोन मखरें व पालखी हीं सोन्याचीं आहेत.

देवाचा मुकुट दोन लाखांचा आहे. व एकंदर वस्तूंची किंमत चौदा कोटी आहे असें म्हणतात. यांचें दर्शन दुर्लभ असतें, जो पंधरा रुपये फी देईल त्यालाच तें घडतें. पण मला तें एका श्रीमंत मनुष्याच्या बरोबर फुकट पाहावयास मिळालें. रामेश्वरास जनतेच्या दृष्टीनें कांहीं सोई आहेत. व्यापारी समुद्रखाडीकांठचें लव्हाळें सुकवितात. त्यांच्या दोरांना इच्छित रंग देऊन त्यांच्या करंड्या, परड्या, पेट्या वगैरे वस्तूंचा व समुद्रांत सांपडणाऱ्या शंख, शिंपले वगैरे वस्तूंचा व्यापार देवळांच्या नजिक चालतो. गांवाला म्युनिसिपालिटी असून पोस्ट ऑफिस, तार ऑफिस व टेलिफोनहि आहेत. शाळांत तामील व इंग्रजी पांच इयत्तांपर्यंत शिक्षणाची सोय आहे. दूध-दुभत्याचें दुर्भिक्ष आहे. दूध रुपयास शेरभर मिळतें. रामेश्वराचा राजा **रामनाथ** येथें राहातो. त्याचें संस्थान दहा लक्षांचें आहे.

## धनुष्कोटी

रामेश्वरास एक महिना राहाणें झाल्यामुळें मनाला मोठें समाधान वाटलें. शेवटीं धनुष्कोटीस जावयाचें ठरवून दिनांक १९-११-५० इ. रोजीं रात्रीं तीन वाजतां रामेश्वराहून निघून **पामन** स्टेशनावर आलों. रेल्वेचें भाडें आठ आणे पडलें. तेथें गाडी बदलावी लागते. त्याप्रमाणें सकाळीं सहा वाजतां आगगाडींत बसून धनुष्कोटीस सात वाजतां पोंचलों. रामेश्वर व धनुष्कोटी ह्यांमधील अंतर चाळीस मैल असावें. त्या दिवशीं एकादशी

होती. या क्षेत्रास धनुष्कोटी हें नांव पडण्यास तसेंच कारण घडलें आहे. त्याची कथा पुढीलप्रमाणें आहे :

या ठिकाणीं श्रीरामचंद्र लंकेवर स्वारी करण्याकरितां आले असतां समुद्र आडवा आल्यामुळें त्याजपाशीं त्यांनीं पलीकडे जाण्यासाठीं वाट मागितली, पण ती तो देईना म्हणून त्यांनीं धनुष्यास बाण लावून तो सागरावर सोडण्याची तयारी केली. ती पाहातांच समुद्रानें घाबरून त्यांस वाट दिली! याचा अर्थ असा कीं, रामानें लंकेंत जाण्याकरितां या ठिकाणीं सेतु बांधण्यास सुरुवात केली. येथें समुद्रांत लांबपर्यंत खडक दिसतात. तोच रामानें बांधलेला सेतु असावा असें समजतात. या ठिकाणीं मी समुद्रस्नान केलें व समुद्रांतून सेतु म्हणजे वाळू आणून तिचा एक भाग तेथील ब्राह्मणास दिला व दोन भाग मी आपल्यापाशीं ठेविले व तेथून परत त्याच दिवशीं म्हणजे दिनांक २०-११-५० इ. रोजीं दुपारीं अकरा वाजतां निघून रामेश्वरीं दोन वाजतां सुखरूप पोंचलों. आणि तेथें सेतु-माधव नांवाचा देव आहे. त्यास दुसरा भाग अर्पण केला व तिसरा भाग प्रयागास त्रिवेणी संगमांत अर्पण करण्याच्या हेतूनें जवळ ठेवला.

आतां माझें रामेश्वरास कांहीं काम नव्हतें. येथून मला त्रिवेंद्रमला जावयाचें होतें. यासाठीं मला परत मदुरेस जावें लागलें. त्याप्रमाणें मदुरेस दिनांक ६।१२।५० इ. रोजीं सकाळीं आलों. येथून लागलाच निघून त्रिवेंद्रमला आलों. **त्रिवेंद्रम** ही एकवेळ त्रावणकोरच्या राजाची राजधानी होती; पण स्वराज्यानंतर हें संस्थान विलीन झाल्यामुळें तें राज्य लयास गेलें आहे. त्रिवेंद्रम गांव बराच मोठा आहे. त्यांत मोठ्या शहराप्रमाणें विद्यापीठ, महाविद्यालय, हायस्कुलें आहेत. तेथील **पद्मनाभ** हें मुख्य देवस्थान होय. त्याचें देऊळ फारच विस्तीर्ण आहे. त्याचें गोपूरहि भव्य आहे. देवळाबाहेर पद्मनाभ नांवाचें फार मोठें तीर्थ आहे. त्याला चोहों-बाजूनीं पायऱ्या आहेत. त्यांत प्रातःकाळीं स्नान करून व संध्यावंदनादि आटोपून पद्मनाभाचें दर्शन घेतलें. पद्मनाभ हा शेषशायी भगवान्

आहे. त्याची मूर्ति फार मोठी पाषाणी आहे. याशिवाय येथें देवाच्या तीन सोन्याच्या मूर्ती आहेत. त्यांच्या मध्यभागीं विष्णु, डाव्या हातास लक्ष्मी व उजव्या हातास कौंडिण्य ऋषि आहेत. या देवळांतील विशेष म्हणजे येथें पुष्कळ दगडी पऱ्या असून त्यांपैकीं प्रत्येकीच्या हातांत एकेक दिवा आहे. येथील सभामंडप पुष्कळ लांब असून प्रत्येक खणाला एकेक कमान असल्यामुळें सभामंडपाला अपूर्व शोभा आली आहे. या देवळांत एक ठळक दोष दिसला तो हा कीं, ज्या गाभाऱ्यांत पद्मनाभांनीं शयन केलें आहे त्यांत पुरेसा उजेड नाहीं. त्यामुळें देवाचें दर्शन नीट होत नाहीं. ही स्थिति दक्षिणेंतील बहुतेक सर्व देवालयांची आहे. त्यास अपवाद रामेश्वरासारख्या एकाद्या देवालयाचा आहे. त्यांत मात्र विजेचे दिवे असल्यामुळें दर्शन उत्तम होतें.



दीपनृत्य

## कन्याकुमारी

त्रिवेंद्रमहून दिनांक ९।१२।५० इ. रोजीं कन्याकुमारीस जाण्यासाठीं बसनें निघालों. वाटेंत बर्कल, टेनकाशी, कुत्तालम् हीं स्थळें लागलीं. **बर्कल** येथें उतरून तेथील दोन मैलांवरील जनार्दनतीर्थांत मार्जन करून जनार्दनाचें दर्शन घेतलें. जनार्दनतीर्थांत शंभर फुटांवरून पाणी पडतें. या तीर्थांत कित्येक यात्रेकरू स्नान करितात. याचें पाणी उत्तम आहे. जनार्दन मंदिराच्या सर्व भिंतींना त्रिवेंद्रमप्रमाणेंच सर्वत्र दगडी दिवल्यांच्या रांगा आहेत. बर्कलाहून दुसऱ्या दिवशीं सकाळीं दिनांक १०।१२।५० इ. रोजीं टेनकाशीस संध्याकाळीं आलों. **टेनकाशी** म्हणजे दक्षिणेकडील

काशी होय. येथे शिवमंदिर आहे. त्याचें गोपूर फार उंच आहे. दक्षिणेकडील प्रवासांत अरण्यें ब-याच ठिकाणीं दिसतात; पण डोंगर फार थोडे आढळतात व बोगदे तर फार विरळ. पण बर्कलाहून **टेनकाशीस** जातांना त्या प्रकारचा अपूर्व देखावा दिसला. त्या वाटेंत ' सिंकोटा ' नांवाचा मोठा पहाड असून त्याला बोगदेहि आहेत. अरण्यें तर सर्वत्र आहेत.

**कन्याकुमारी** हें भारताचें अगदीं दक्षिण टोंक आहे. येथें पश्चिम समुद्र, बंगाल व हिंदी ह्या तिन्ही सागरांचा संगम आहे. त्याला उत्तम घाट बांधला आहे. कन्याकुमारीदेवी म्हणजे पार्वतीदेवी होय. ती आठ वर्षांची समजून त्या बेताची तिची मूर्ति बनविली आहे. पुष्पकाशी हिलाच नांव कन्याकुमारी मिळालें. हिनें शंकराची पुष्कळ वर्षें आराधना करून प्रलयकाळच्या वेळीं मला आपल्या-बरोबर क्रीडा करण्यास मिळावी असा वर मागून घेतला. तो शिवानें तिला दिला. पण प्रलय-काळची वेळ येईपर्यंत तूं केपकामोरीन ऊर्फ कन्याकुमारी येथें तप करीत राहा अशी शिवानें तिला आज्ञा केली. तो प्रलयकाळचा क्षण केव्हां येईल तें शंकर तिला निवेदन करितात.



कन्याकुमारी

पृथ्वीवरील लोकांचीं चार युगें आहेत. त्यांपैकीं कलियुगाचीं वर्षें चार लक्ष बत्तीस हजार आहेत. ह्यांच्या दुप्पट वर्षें द्वापारयुगाचीं आहेत. ह्यांच्या दुप्पट वर्षें त्रेतायुगाचीं असतात व ह्यांच्या दुप्पट वर्षांचें कृतयुग असतें. ह्या चार युगांचा एक फेरा असे दोन हजार वेळां चतुर्युग फेरे गेले कीं, ब्रह्मदेवाचा एक दिवस भरतो. अशा तीस दिवसांचा एक महिना व बारा महिन्यांचें एक वर्ष होतें. अशीं शंभर वर्षें गेलीं कीं, लहान प्रलय होतो. अशा दहा प्रलयांनंतर विष्णु एकदां जन्म घेतो. असे बारा विष्णु जन्मास येऊन निजधामास गेलें कीं, शिवाचा एक क्षण होतो. ह्या क्षणींच सर्वांचा संहार होऊन महाप्रलय होत असतो. तेथपर्यंत तूं तप करीत राहा. शिवाज्ञेप्रमाणें ही तप करीत आहे.

मंदिराच्या खांबांवर उपवर सुंदर कन्यांचे दगडी पुतळे आहेत. त्यांनीं हातांत दिवे धरले आहेत. कन्याकुमारीस काळभैरव व श्रीकृष्ण यांचीं मंदिरें आहेत. संगमावर स्नान करितांना मोठा आनंद वाटतो. या ठिकाणीं स्वामी विवेकानंद येऊन गेले होते. त्यांच्या शिष्यांनीं म्हणजे रामकृष्ण मिशननें तेथें एक वाचनालय चालविलें आहे.

कन्याकुमारीहून त्याच दिवशीं सायंकाळीं त्रिवेंद्रमला परत आलों व तेथून बर्कल, टेनकाशीकडून निघून एरोड जंक्शनावरून बंगलोरला दिनांक १४।१२।५० इ. रोजीं आलों.

## बंगलोर

बंगलोर हें म्हैसूर संस्थानांत फार मोठें शहर आहे. त्याची लोकसंख्या पुण्याइतकी किंबहुना पुण्याहूनहि अधिक आहे. म्हैसूर संस्थानाच्या म्हैसूर व बंगलोर अशा दोन राजधान्या आहेत. म्हैसूरचे महाराज हे म्हैसुरास राहात असले तरी म्हैसूर शहर बंगलोरपेक्षां पुष्कळ लहान आहे. बंगलोरमध्यें प्रेक्षणीय स्थळें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं लालबाग, कब्बनपार्क, त्यांतील पदार्थसंग्रहालय, बसवन गढी, टाटा रिसर्च इन्स्टिटयूट, ओगले ग्लास वर्क्स व रेशमाची गिरणी हीं विशेष प्रसिद्ध आहेत. बंगलोर स्टेशन फार मोठें आहे. तेथें महाराष्ट्र मंडळ असून त्यांत राहाण्याची सोय होते. ह्या निवासस्थानीं दिनांक १४-१२-५० इ. रोजीं दुपारीं पोंचलों. तेथून जवळच असलेल्या 'सुपर मेस' म्हणजे 'उत्कृष्ट भोजनालय' ह्यांत भोजनाची सोय होते. **महाराष्ट्र मंडळ** हें बंगलोरमधील महाराष्ट्रीयांच्या चळवळींचें केंद्र आहे. तेथील भव्य पटांगणांत प्रसंगविशेषीं व्याख्यानें व खेळ होतात. बंगलोरपासून सोळा मैलांवर **भंगारपेठ** नांवाचें स्टेशन आहे. त्याच्याजवळ **कोलार** येथें सोन्याच्या प्रसिद्ध चार खाणी आहेत. प्रत्येक खाणींत दहा हजार मजूर काम करतात व त्यांतून दररोज **पंधरा विटा** सोनें पूर्ण शुद्धावस्थेंत तयार होतें! ओगले यांच्या कांचेच्या कारखान्यांत टिनच्या म्हणजे जस्ताच्या नानाविध भांड्यांना एनॅमलिंग म्हणजे


पांढऱ्या रोगणाचा मुलामा करण्यांत येतो. याशिवाय चिमणीच्या नळ्या, कंदिलांचे ग्लोब, बाटल्या, चंबू वगैरे होतात. हा कारखाना बंगलोरपासून चार मैलांवर **यशवंतपुरांत** आहे. त्याचे मालक श्री. **शंकर पांडुरंग ओगले** हे आहेत.

त्यांच्या कारखान्याच्या शेजारीं **म्हैसूर लँप वर्क्स** नांवाचा दुसरा कारखाना आहे. त्यांत विजेच्या दिव्यांचे निरनिराळ्या प्रकारचे ग्लोब तयार होतात. एकदां ग्लोब निरुपयोगी झाला कीं, त्यांतील जे भाग पुन्हा नवीन ग्लोब तयार करतेवेळीं उपयोगी पडतील ते घेण्याची प्रथा अवश्य सुरू व्हावी. अगर तो जुना ग्लोब कांहीं युक्तींनीं सुधारून पुन्हा नव्यासारखा उपयोगांत आणतां यावा. संशोधकांनीं ही प्रथा अंमलांत आणल्यास कारखानदार व गिऱ्हाईक या दोघांच्या द्रव्याची बचत निःसंशय होईल. बंगलोरच्या नैर्ऋत्येस दोन मैलांवर चामराज पेठेंत रेशमाची गिरणी आहे. तिचे व्यवस्थापक श्री. **नारायणराव नाईक** हे आहेत. तेथें रेशमाच्या धाग्यास पीळ देऊन त्याच्या लड्या तयार करितात व त्यांस रंग देतात. बंगलोरपासून **म्हैसूर** सुमारें ९० मैल आहे. म्हैसुरांत महाराजांचा जगमोहन राजवाडा, कॉलेजें, सरकारी कचेऱ्या, हायस्कुलें व संस्कृत महाविद्यालय इत्यादि प्रेक्षणीय स्थळें आहेत. जगमोहन राजवाड्यांत चित्रसंग्रह असून त्यांत आग्र्याच्या ताजमहालाचा नमुना, रविवर्म्याच्या तसबिरी, म्हैसुराच्या राजांच्या व युवराजांच्या तसबिरी, हस्तिदंती पदार्थ, सोंगट्या, बुद्धिबळें व चांदीची अंबारी इत्यादि वस्तु आहेत.

## चामुंडी

म्हैसूरपासून तीन मैलांवर **चामुंडादेवीचें** मंदिर टेकडीवर आहे. पुण्यास ज्याप्रमाणें पर्वती देवालय हें प्रसिद्ध आहे त्याप्रमाणेंच म्हैसुरांतहि **चामुंडेश्वरी** प्रसिद्ध आहे. तेथें जाण्यास मोटारीचा सात मैल लांबीचा रस्ता आहे. हें देवालय रात्रीचे पाहाण्यांत खरी मौज असते. ह्या वेळीं शेंकडों विजेच्या दिव्यांच्या प्रकाशानें तें मंदिर सुवर्णाप्रमाणें चमकतें.

तेथून जवळच पाव मैलावर म्हैसूरच्या महाराजांचा संगमरवरी दगडांचा फार सुंदर व मोठा राजवाडा आहे. म्हैसूरच्या राजवाड्यांत जाण्यासाठीं आवारांत अनुकरणीय वाटा आहेत. प्रत्येक वाटेंत तीन फूट उंचीच्या व अर्धा फूट जाडीच्या दोन दोन खांबांमध्यें एकेक मनुष्य सहज जाईल व येईल इतकीच मोकळी जागा ठेविलेली आहे. अशा पांच वाटा आहेत. अशा वाटांमुळें जाणाऱ्या येणाऱ्या मनुष्यांत कधींहि झुंज होत नसते, ही सोय आहे.



देवी–वाहन वाघ

देवीचे दागिने सुमारें पांच लाख रुपये किंमतीचे आहेत. मूर्ति काळ्या पाषाणाची तीन फूट उंचीची आहे. एका दरवाजास चांदीचा पत्रा व दुसऱ्यास पिवळा पत्रा ठोकला आहे. हें मंदिर म्हैसुरापासून तीनशें फूट उंचीवर आहे. त्यास जाण्यास सुमारें एक हजार पायऱ्या चढाव्या लागतात. वाटेंत काळ्या पाषाणाचा वीस फूट उंच व तितकाच लांब व दहा फूट रुंद असा प्रचंड नंदी आहे. देवीचा उत्सव दर मंगळवारीं व शुक्रवारीं होत असतो. रात्रीं आठ ते दहापर्यंत तिची मिरवणूक काढतात. तिच्यापुढें स्त्रीपुरुष डोक्यावर कलश घेऊन नाचतात व भजन करितात व नानाविध वाद्यें वाजवितात.

म्हैसूर संस्थान फार सुधारलेलें आहे. या सुधारणेचें श्रेय त्याचे भूतपूर्व दिवाण **सर विश्वेश्वर अय्या** यांस द्यावयास पाहिजे. म्हैसूर ही अलीकडे झालेली राजधानी आहे. त्या पूर्वीची राजधानी **श्रीरंगपट्टण** ती म्हैसुरापासून जवळच आहे. श्रीरंगपट्टणाभोंवतीं तट आहे; पण तो आतां जीर्ण झाला आहे. श्रीरंगपट्टणचा किल्ला इंग्रज, मराठे व निजाम ह्यांच्या विरुद्ध टिपू सुलतानानें लढविला व शेवटीं टिपू लढतां लढतां कामास आला ! श्रीरंगपट्टण हें नांव त्यांतील श्रीरंगनाथ मंदिरावरून पडलें आहे.

अनुक्रम 23365 (75) दि: ...
क्रमांक ... नोंः दिः 20/5/48

हें मंदिर कावेरीच्या काठीं आहे. मंदिराभोंवतीं किल्लयासारखा भक्कम तट आहे. मंदिराच्या आंत गरुड व शेष यांचे पिवळ्या पत्र्यानें मढविलेले भव्य पुतळे आहेत. ते जणूं काय सोन्याचे दिसतात. मंदिराच्या गाभाऱ्यांत लक्ष्मीनारायणाच्या दोन पित्रळ्या मूर्ति आहेत. त्यांच्या पाठीमागें काळ्या पाषाणाचे शेषशायी भगवान नारायण निजले आहेत. ते दहा फूट लांब, पांच फूट रुंद व तीन फूट उंच असावे. देवळाच्या दरवाजावर जय-विजय हे द्वारपाळ अति भव्य स्वरूपाचे आहेत. देवळाच्या मध्यभागीं एक मोठा स्तंभ आहे. श्रीरंगपट्टणावर मुसलमानांची सत्ता होती. आजहि श्रीरंगनाथ मंदिरासमोर तिचें चिन्ह दिसतें. कारण देवळापुढेंच मोठी जुम्मा मशीद बांधलेली आहे. ती इतकी भव्य आहे कीं, तिच्यापुढें रंगनाथाचें मंदिर फिकें दिसतें. तिचा प्रत्येक खांब सुमारें पन्नास फूट उंच व वीस फूट व्यासाचा आहे. त्यावरूनच या मशिदीची कल्पना कोणासहि करतां येते.

श्रीरंगपट्टणापासून दर्यादौलत नांवाचा मोठा बंगला आहे. हाहि टिपूनेंच बांधला आहे. तो कावेरीच्या कांठीं असल्यामुळें त्याला दर्यादौलत म्हणतात. त्याच्या भोंवतालीं बाग व रिकामी जागा पांचसहा एकर आहे. महाल नक्षीदार आहे. त्याजवर जाण्यास चारहि बाजूंस जिने आहेत. दर्यामहालापासून एका मैलावर दक्षिणेस टिपू, त्याचा बाप, हैदर व त्याची आई यांचीं तीन थडगीं आहेत. प्रत्येकावर लाल कापड व मोर-पिसें आहेत. भोंवतालीं धर्मशाळा आहेत. थडग्याच्या मंदिरांत पंचवीस विजेच्या दिव्यांच्या हंड्या आहेत. हें मंदिर व थडगीं प्रेक्षणीय आहेत. म्हैसुरापासून श्रीरंगपट्टण बारा मैल आहे व कन्नमवाडी हें खेडें आठ मैलांवर आहे.

जवळच **कृष्णराज सागर** स्टेशन आहे. सर विश्वेश्वर अय्या यांच्या कारकीर्दींत कावेरी नदीला मोठा बंधारा घालून धरण बनाविण्यांत आलें. तें फारच विस्तीर्ण असल्यामुळें त्याला **कृष्णराज सागर** हें नांव


देण्यांत आलें. हा बंधारा मैल दीड मैल लांब व एकशें तीस फूट उंच आहे. यांतील पाणी भोंवतालच्या जमिनींना देऊन तो प्रदेश सुपीक करविण्यांत आला आहे. बंधाऱ्याच्या दगडी भिंतींत कावेरीची मूर्ति आहे. तिच्या हातांत कलश दिला असून त्यांतून पाणी पडतें. तिच्या दोन्ही बाजूंस अंगारा बाग आहे, त्याला **वृंदावन** म्हणतात. तो दोन एकर आहे. त्याच्यांत फूल–फळझाडें आहेत. चित्रविचित्र रंगांचीं विलायती झाडेंहि आहेत. त्यामुळें बाग सुंदर झाला आहे. फुलझाडांवरती विजेचे दिवे आहेत. त्यांचें प्रतिबिंब झाडांखालच्या पाण्यांत पडून त्यांत नानाविध रंगांचे दिवे दिसतात. बागेंत शंभर कारंजीं आहेत. त्यांतील पाणी चित्रविचित्र रंगांच्या दिव्यांमुळें इंद्रधनुष्याप्रमाणें दिसतें. ही मौज दर आठवड्यास फक्त शनिवारीं व रविवारीं रात्रीं सात ते नऊ वाजेपर्यंत पाहावयास मिळते.

## शृंगेरी

म्हैसुरास एक आठवडा राहिल्यानंतर श्रीशंकराचार्यांचा **शृंगेरी मठ** पहाण्याची इच्छा झाली. म्हैसुरापासून शृंगेरी दीडशें मैल दूर आहे. म्हैसुराहून रेल्वेनें सोमवार दिनांक ८।१।५१ इ. रोजीं सकाळीं सात वाजतां निघून **अरसिकेरी** स्टेशनावर दुपारीं एक वाजतां उतरलों. तेथून **बेलूर** पन्नास मैल आहे. त्या गांवीं दुपारीं तीन वाजतां पोंचलों व तेथून पुन्हां बसमधून साडेतीन वाजतां निघून रात्रीं साडेनऊ वाजतां शृंगेरीस आलों. तेथें अभ्यागतांकरितां अतिथिगृह आहे. त्यांत रात्रीं दहा वाजतां सुखानें झोंपलों. म्हैसूर ते अरसिकेरी हा प्रदेश अतिशय समृद्ध आहे. त्यांत भात, ज्वारी, ऊंस, एरंडी व वाल हीं पिकें आणि केळीं, आंबे, चिंचा, ताड, माड, पोफळीं, फणस यांचीं विपुल झाडें आहेत. बेलूरहून शृंगेरीस जातांना वाटेंत तीस मैलपर्यंत अरण्य लागलें त्यांत जिकडे तिकडे कळकीचीं बेटें व सागवान वृक्ष दिसत होते. शृंगेरीमठ व त्याच्या भोंवतालची वनश्री पाहून मनांत पवित्र भावना उत्पन्न होतात. जवळच

तुंगा नदी वहात असल्यामुळें तेथील पवित्रतेंत अधिकच भर पडली आहे. तुंगा नदी ज्या डोंगरांत उगम पावते, तेथें परशुरामतीर्थ बनलें. कारण या स्थळीं श्रीपरशुरामाचा परशू, हत्येपासून शुद्ध झाला. **मंत्रालय** स्टेशनाजवळ तुंगभद्रेच्या कांठावर **राघवेंद्र स्वामी** मंदिर आहे. येथें श्रावण वद्यांत आठ दिवस मोठा उत्सव होतो.

दिनांक ९-१-५१ रोजीं सकाळीं उठल्यावर हें वैभव पाहून अंतरात्मा संतुष्ट झाला. सकाळीं तुंगा नदींत स्नान केलें. नदीच्या कांठीं संन्याशांचीं समाधिस्थानें आहेत. जवळच देवळेंहि आहेत; त्यांपैकीं एका देवळांत बसून संध्या, देवपूजा, तर्पण, प्राणायाम, शीर्षासनादि आसनें व नमस्कार इत्यादि कार्यक्रम मनाजोगा पार पडला. श्रृंगेरीस छोटे आचार्य व मोठे आचार्य असे दोन आचार्य आहेत. त्यांपैकीं वड्या शंकराचार्यांचें दर्शन वैशाखांत कांहीं दिवस घडतें व नंतर सहसा घडत नाहीं, पण धाकट्या आचार्यांचें दर्शन बहुधा घडतें. मी सकाळीं त्यांचें दर्शन घेतलें. श्रृंगेरी गांव व आचार्यांचा मठ नदीच्या पश्चिम तीरावर आहे व वडे आचार्य पूर्वतीरावरील बंगल्यांत राहातात. श्रृंगेरीस विद्यारण्य, विद्यानंद, श्री. शारदांबा व श्री. आद्यशंकराचार्य, त्यांच्या पादुका ह्यांचीं मंदिरें मोठालीं आहेत. याशिवाय दुसरीं सुमारें दहा लहान मंदिरें आहेत. या मंदिरांना लागूनच श्रृंगेरी हें लहानसें गांव आहे.



**संन्यासी समाधि**

श्रृंगेरी या स्थळास श्रृंगेरी नांव कां पडलें याविषयीं एक कथा सांगतांत ती अशी:—श्रृंगऋषीचे वडील विभांडक ऋषि यांनीं या क्षेत्रीं तपश्चर्या केली. श्रृंगेरीच्या पश्चिमेस सहा मैलांवर ऋष्यश्रृंग ऋषींचा आश्रम आहे. दशरथ राजानें पुत्रकामेष्टीसाठीं या ऋष्यश्रृंगांना मुद्दाम अप्सरांतर्फें भुलवून नेलें होतें. परंतु दशरथ राजा हा अयोध्येला आणि हा आश्रम

तेथून सुमारें दीड हजार मैलांवर असूनहि हा सुयोग आला. हें विशेष होय. श्रृंगेरीपासून दक्षिणेस दुर्गांबादेवी मंदिर आहे. तें आद्य शंकराचार्यांनीं एक हजार वर्षांपूर्वी स्थापन केलें. या देवळाजवळ विद्यारण्यपूर नांवाचें गांव आहे, तें बहुधा विद्यारण्य स्वामी यांच्या स्मरणार्थ स्थापन केलें असावें.

या गांवीं बापट, मराठे, डोंगरे इत्यादि महाराष्ट्रीय घराणीं आहेत. हीं घराणीं तेथें शेती–बागायत करून राहातात. पैकीं वे. शा. सं. मराठे अग्निहोत्री असून त्यांनीं गेलीं पस्तीस वर्षें अग्निहोत्र चालविलें आहे. अग्निहोत्र चालविण्याबद्दल त्यांस म्हैसूर सरकारकडून दरमहा दहा रुपये, आचार्यांकडून दहा रुपये व इतरांकडून पांच मिळून पंचवीस रुपये मिळतात. श्रृंगेरीस मठातर्फे अन्नसत्र चालवितात. त्यांत रोज वीसपंचवीस यात्रेकरूंस एक वेळ भोजन मिळतें. येथील मुख्य अन्न, सार व भात असतें. श्रृंगेरींतील मुख्य देऊळ शारदांबेचें होय. तें चौकोनी आहे. तें अगदीं साधें आहे. मात्र त्याच्या चाऱ्ही बाजूंस अति मोठे दगडी सिंह कायमचे बसविलेले आहेत. येथील विद्याशंकर मंदिर भव्य, काळ्या पाषाणाचें अष्टकोनाकृति व गोपूरयुक्त आहे. त्यापेक्षां शारदांबा मंदिराची व्यवस्था फार चांगली आहे. ह्यांत वीस विद्युद्दीप आहेत.



देवीला भरजरी वस्त्रें व दागिने भरपूर आहेत. मोठे शंकराचार्य देवळाजवळच्या बंगल्यांत चातुर्मासांत वर्षांतून फक्त दोन महिने रहातात. व बाकीचे दहा महिने तुंगानदीच्या पलीकडील तीरावरील बंगल्यांत रहातात. ते जीवन्मुक्तावस्थेंत असल्यामुळें त्यांचे शिष्य धाकटे शंकराचार्य हे मठाची सर्व व्यवस्था पाहातात. श्रृंगेरी गांवांत पोस्ट-ऑफिस, म्युनिसिपालिटी, कानडी मुलामुलींची शाळा, इंग्रजी शाळा व गुरांचा दवाखाना आहे. श्रृंगेरी गांवांत घराच्या पुढील व मागील ओट्या

पडव्यांत माती, दगड व सीमेंट ह्यांच्या कायमच्या खुर्च्या, बनवून तीं बाकें बसण्यासाठीं ठेवण्याचा धूर्तपणाचा प्रघात आहे. श्रृंगेरी मठ हें सनातन धर्माचें मुख्य पीठ असल्यामुळें त्याच्या वतीनें येथें संस्कृत विद्यालय असणें अपारिहार्य आहे. त्याचें नांव '**सद्विद्या संजीवनी पाठशाळा**' असें आहे. हें पाठशाळागृह आचार्यांच्या मठाभोंवतीं दोन मजली आहे. यांत एक सहस्र विद्यार्थी बसतील इतकी प्रशस्त जागा आहे. पाठशाळेंत ग्रंथसंग्रहालय व वाचनालयहि आहे. येथें तालुका मामलेदार कचेरी आहे. श्रृंगेरी गांव व संस्थानांतील इतर गांवें यांची लोकसंख्या नऊ हजार आहे. संस्थानचे दोन घोडे व तीन हत्ती आहेत.

छोटे शंकराचार्य स्वत: दर शुक्रवारीं सर्व देवांच्या दर्शनासाठीं व भक्तांस दर्शन देण्यासाठीं येतात. त्यांच्या खडावा ठेवण्यास व डोक्यावर मोठी रेशमी छत्री धरण्यास असे दोन नोकर असतात. याशिवाय पेष्कर म्हणजे फडणीस, पुजारी, कारकून वगैरे मंडळी त्यांच्या सेवेस सिद्ध असतात. शारदांबेच्या गाभाऱ्यांत महाराज गेले कीं, कांहीं वेळ गाभाऱ्याचा दरवाजा पुजारी बंद करितो व महाराजांनीं घंटा वाजविल्यावर तो उघडतो. शारदांबादेवीचा रथ दर शुक्रवारीं रात्रीं ८॥ ते ९॥ पर्यंत देवळास तीन प्रदक्षिणा घालतो, रथ भक्त ओढतात. देवीची मूर्ति सोन्याची, रत्नजडित अलंकारानीं युक्त, भरजरी वस्त्रें नेसलेली अशी रथांत असते. रथापुढें वाद्यें वाजत असतात व रथामागून वैदिक, शास्त्री वगैरे वेदघोष करीत असतात. मिरवणूक संपल्यावर मंत्रपुष्प होतो व सर्वांस प्रसाद देण्यांत येतो.

मठाचा एवढा खर्च कसा चालतो याविषयीं कोणासहि कुतूहल वाटेल; परंतु असले प्राचीन मठ व मोठालीं देवस्थानें यांना पूर्वीच्या राजांनीं कायमचीं उत्पन्नें देऊन ठेविलीं आहेत. त्याप्रमाणें याहि मठास भाताचें उत्पन्न दरसाल आठशें पल्ले म्हणजे साठ खंडींवर धान्य आहे आणि सुपारी पन्नास खंडी आहे. मठास वर्षाचें मक्त्याचें उत्पन्न दोन लाख रुपये व भक्तांकडून दरसाल पांच लाख रुपये मिळतात.

श्रृंगेरीला बरेंचसें सौंदर्य तुंगा नदीमुळें आलें आहे. तिचें पात्र शंभर फूट रुंद व पांच फूट खोल आहे. जमिनीपासून तुंगा सुमारें पन्नास फूट खोल आहे. तिजकडे जाण्यास फूट दोन फूट रुंद व पंचवीस फूट लांब अशा पन्नास पायऱ्या आहेत. घाटावरील स्वच्छता राखण्यासाठीं व देखरेखीसाठीं एक नोकर असतो. घाटावर व देवळाच्या आवारांत पादत्राणें घालून जाण्यास सक्त मनाई आहे म्हणून बरेच लोक अनवाणी हिंडतात. अशा व्यवस्थेमुळें नदीचें पाणी अति स्वच्छ राहिलें आहे. तिच्या सर्व बाजूंस पर्वतांच्या रांगा असून त्यांना अनेक शिखरें आहेत. त्यावरूनहि या क्षेत्राचें मूळ नांव श्रृंगगिरी असावें व त्याचा अपभ्रंश श्रृंगेरी असा झाला असावा. डोंगर व नदी म्हटली कीं, झाडी आलीच या नियमाप्रमाणें येथें नदी-भोंवतीं गर्द झाडी आहे.

माझा मुक्काम श्रृंगेरीस येथील अतिथिगृहांत एक महिना होता. भोजन अन्नछत्रांत करीत असे. अन्नछत्रांत जेवण एक वेळ फुकट मिळतें. असें फक्त दोन तीन दिवस मिळतें, पण मला अन्नछत्रांत फुकट जेवावयाचें नव्हतें व जेवणहि दोन्ही वेळां हवें होतें म्हणून मी तशी विनंति तेथील व्यवस्थापकांस केली. त्यांनीं ती मान्य केली म्हणून मला तेथें दीर्घकाल राहतां आलें.

माझा येथील मुक्काम दिनांक १०।२।५१इ. रोजीं संपला. तेव्हां तेथील छोटे शंकराचार्य यांचें दर्शन घेतलें. त्यांनीं तेहतीस मोठ्या रुद्राक्षमण्यांची माळ आणि अक्षता हा प्रसाद दिला. दिनांक ११।२।५१ इ. रोजीं उडुपीस जावयास निघालों. माझा उद्देश केवळ उडुपीस जावयाचा नसून खालीं दक्षिण कानडामध्यें उतरून गोकर्ण महाबळेश्वराचें दर्शन घेण्याचा होता. गोकर्णास जातांना वाटेंत उडुपी, कुमठा, होनावर हीं गांवें लागतात. हा सर्व प्रवास मला मोटारीनें करावा लागला. मधून खाड्याहि लागल्या. त्या नावेंतून तरून जाव्या लागल्या. वाटेनें डोंगर, घाट, झाडी व नद्या हीं लागलीं. याकारणानें प्रवास जरी मनोहर

होता, तरी फार कष्टाचा वाटला. मी श्रृंगेरीहून साडे तीन रुपयांचें तिकीट काढून रविवारीं सकाळीं साडेसहाला निघून संध्याकाळीं उडुपीस आलों. वाटेंत चार ठिकाणीं मोटारी बदलाव्या लागल्या. एकंदर प्रवास सुमारें दीडशें मैलांचा झाला. त्या रात्रीं उडुपीस बालाजीचें दर्शन घेतलें. त्याची मिरवणूक पाहिली व प्रसादहि घेतला. प्रसादास शंभर माणसें होतीं. त्या सर्वांस सांबारें, भात व ताक यांचें जेवण मिळालें. उडुपीपासून पांच रुपये मोटार भाड्यानें सोळा मैल चालल्यावर गैरसप्पाचे धबधब्यास जातां येतें. हा धबधबा शेरावतीचा असून याचें पाणी हजार फूट उंचीवरून एकदम खालीं पडतें. पायऱ्यांच्या मदतीनें तळाशीं जातां येतें. तळाशीं धुकें असल्यामुळें कांहीं दिसत नाहीं. पाण्याच्या आघाताच्या जोरावर वीज उत्पन्न होऊन या शक्तीवर मानवोपयोगी अनेक कामें होतात. अखिल जगांत इतका उंच धबधबा दुसऱ्या कोठेंहि नाहीं. म्हणून तो पाहाण्यास लांब-लांबचीं माणसें येऊन तो पाहून आश्चर्यचकित होतात ! दुसरे दिवशीं सकाळीं दिनांक १२।२।५१ इ. रोजीं उडुपीहून साडेसहाला निघून होनावरला सायंकाळीं पांच वाजतां पोंचलों. तिकिटाला तीन रुपये पडले. वाटेंत पांच ठिकाणीं खाड्या ओलांडाव्या लागल्या. हें अंतर सुमारें दीडशें मैल असावें.

येथें वाटेंत मंगलोरी कौलांचा कारखाना दृष्टीस पडला. महाराष्ट्रांत मंगलोरीं कौलें उत्तम प्रतीच्या इमारतींवर घालतात. तीं कौलें मंगलोर भागांतून येतात म्हणून त्यांस मंगलोरी कौलें म्हणतात. होनावर व कुमठा हीं गांवें त्याच भागांत मोडतात. इकडील भागांत ताड, माड, पोफळी या आहेतच. पण काजूचीं झाडेंहि फार आहेत. होनावरास मी न थांबतां तेथून कुमठें केवळ बारा मैल असल्यामुळें दुसऱ्या मोटारीनें कुमठ्याला मुक्कामास गेलों. कुमठ्यास सुपारीचा मोठा व्यापार चालतो. मी गेलों त्या वेळीं तेथें बालाजीचा मोठा रथोत्सव सुरू होता. व्यंकटेशाची मूर्ति व देवघर

सोन्याचीं आहेत. देवाचा रथ पन्नास फूट उंच व वीस फूट रुंद असावा. त्यांत देवाची मूर्ति ठेवण्याकरितां शिडीनें चढावें लागतें.

## श्रीगोकर्ण महाबळेश्वर

'श्रीगोकर्ण महाबळेश्वर' कुमठ्याहून गोकर्णास रोज दोनदां मोटार सुटते. सकाळीं नऊ वाजतां व सायंकाळीं चार वाजतां सुटते. कुमठ्याहून गोकर्ण वीस मैल आहे. तेथें जाण्यास मला दोन तास लागले. तेथें मी वे. शा. सं. बाळकृष्णभट्ट जोगळेकर यांच्या घरीं उतरलों व देवदर्शन घेऊन त्यांजकडे भोजन केलें. पूर्वपरिचय नसतांहि भटजींनीं आदरातिथ्य चांगलें केलें; म्हणून माझ्या सहा दिवसांच्या मुक्कामांत मी त्यांजकडे राहिलों.

गोकर्णाच्या तिन्ही बाजूंस डोंगर व जंगल आहे. चौथ्या बाजूस म्हणजे पश्चिमेस समुद्र आहे. गांवाच्या मध्यभागीं कोटीतीर्थ असून त्याच्याभोंवतीं घरें आहेत. पाणी मधुर आहे व त्यास घाट बांधिले आहेत. हें तळें पाव मैल रुंद व तीन पुरुष खोल आहे. श्री. जोगळेकरांनीं अग्निहोत्र पाळलें आहे. गांव अगदीं स्वच्छ व माणसेंहि निर्मळ व साधीं आहेत. गोकर्णक्षेत्रीं श्रीमहाबळेश्वर, पार्वती व गणेश यांचीं मंदिरें एकाच आवारांत आहेत. भोंवतालची दगडी भिंत तटासारखी वीस फूट उंच व दोन फूट रुंद आहे. महाबळेश्वराचें लिंग जमिनींत गेलें आहे. त्याचा कानासारखा भाग हातास लागतो. तेथें त्रिकाळ चौघडा झडतो. समुद्र नजिक आहे. महाशिवरात्रीस देवाची रथांतून मिरवणूक निघते. त्या वेळीं पंधरा वीस हजार यात्रेकरू येथें जमतात.

गोकर्णापासून पूर्वेस एका मैलावर भद्रकाळीचें देऊळ आहे. तिची मूर्ति काळ्या पाषाणाची चतुर्भुज आहे. देऊळ तांबड्या पाषाणाचें भक्कम बांधिलें आहे. नवरात्रांत व कार्तिक शु॥ ८ ला मोठें उत्सव होतात. चंडीयज्ञ दहा दिवस करितात.

गोकर्णक्षेत्रासंबंधानें पुढीलप्रमाणें कथा आहेत. रावणाची माता कैकसी, खुद्द रावण, कुंभकर्ण व बिभीषण यांनीं या क्षेत्रांत तप केलें. रावणमाता

कैकसी ही दररोज नेहेमीं लिंगपूजन करून मग अन्न भक्षण करी. तिचें लिंग पंचधान्यांच्या पिठांचें असे. एक वेळ इंद्रानें तें समुद्रांत टाकून दिल्यामुळें कैकसीनें अन्न वर्ज्य केलें! तें पाहून रावणाला फार दुःख झालें व तो आईला आत्मलिंग आणून देतों असें सांगून कैलासास गेला. तेथें त्यानें ऊग्र तप आरंभिलें; अद्भुत् गायन केलें व शंकराला शिरकमलें अर्पून प्रसन्न केलें. तेव्हां शंकरांनीं त्यास वर मागण्यास सांगितलें. रावणानें शंकराच्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्यानें शंकराचें आत्मलिंग व त्याची पत्नी पार्वती ह्यांची मागणी केली. त्याप्रमाणें शंकरांनीं त्यास दोन्ही दिलीं.

तीं घेऊन रावण लंकेकडे जात असतां तें दृश्य पाहून देव दुःख करूं लागले. त्या वेळीं पार्वतीचा पुत्र गणपति यानें गुराख्या ब्राह्मणाचें रूप धारण केलें व तो रावणाच्या वाटेवर गाई चारीत बसला; तों रावण त्या वाटेनें जात असतां गणपतीनें त्यास पाहिलें. यावेळीं रावणास लघुशंकेस बसावयाचें होतें, या स्थितींत आत्मलिंग बाळगणें अपवित्र असल्यामुळें रावणानें तें लिंग बाळगण्यास गणपतीस विनंति केली. कारण तें लिंग जमिनीवर ठेवावयाचें नाहीं असें शंकरांनीं त्यास बजाविलें होतें. गणपतीजवळ तें लिंग दिल्यावर गणपाति रावणास म्हणाला, हें लिंग मी थोडा वेळच घेऊन बसेन. तेवढ्या वेळांत तूं जर आला नाहींस तर तें मी जमिनीवर ठेवून देईन.

रावण लघुशंका करावयास गेला; पण त्याचें तें कृत्य लवकर आटोपतां आटपेना. इकडे गणपाति तर त्यास घाई करूं लागला, तरी रावण येईना असें पाहून गणपतीनें तें लिंग जमिनीवर ठेवून तो गाई राखावयास गेला. तें लिंग जमिनीला जें चिकटून बसलें तें कायमचें बसलें! रावण येऊन पाहातो तों तें लिंग जमिनीवर ठेवलेलें आढळलें. तें पाहून रावण घाबरला व लिंगाजवळ जाऊन तें उचलण्याचा प्रयत्न करूं लागला; पण तें कांहीं केल्या जमिनीपासून सुटेना. तें लिंग ओढीत असतां त्याला गाईच्या कानाचा आकार आला म्हणून या क्षेत्रास 'गोकर्ण महाबळेश्वर' असें नांव पडलें. ह्या लिंगाची पूजा रावणमाता कैकसी, सर्व देव व ऋषि यांनीं आदि

लिंग म्हणून केली. सांप्रत हें लिंग जमिनींत गेलें असून त्याचा फक्त काना-सारखा भाग हातास लागतो.

गणपतीच्या चातुर्यामुळें रावणाला आत्मलिंगास मुकावें लागलें. पार्वतीच्या बाबतींतहि रावणाची स्थिति अशीच चमत्कारिक झाली. शंकराची पत्नी पार्वती हिला रावण घेऊन जातो हें दृश्य देवांना सहन झालें नाहीं म्हणून देव शंकराची प्रार्थना करण्यास गेले तेव्हा शंकर म्हणाले, जी गोष्ट झाली ती झाली. मला तिच्यांत आतां बदल करितां येणार नाहीं; तुमची तशी इच्छाच असली तर तुम्ही भगवान् विष्णूला जाऊन भेटावें म्हणजे तो तुमची काळजी निवारण करील: हें ऐकून देव विष्णूकडे गेले आणि पार्वतीहि विष्णूचा धावा करूं लागली. या दोहोंचा परिणाम विष्णूवर होऊन त्यांनीं रावणाच्या तावडींतून पार्वतीला सोडविण्याचें ठरविलें. त्यांनीं ब्राह्मणाचें रूप धारण केलें व रावण लंकेकडे जात असतां त्याला वाटेंत गांठलें. त्यांनीं रावणास विचारलें, “ बा रावणा, तूं ही सुंदर स्त्री कोठें पैदा केलीस ? ” रावण म्हणाला, “ मला ती शंकरांनीं दिली. ” त्यावर विष्णु हंसून म्हणाले, “ काय तूं वेडा आहेस; असलें ध्यान घेऊन तूं चाललास. एकदां तूं तिच्याकडे पहा तरी. ” हें ऐकतांच रावण हळूच मागें वळून पाहूं लागला तों त्याच्या खांद्यावर अतिकुरूप, विद्रूप व बेढब स्त्री दिसली. त्याबरोबर त्यानें चपापून तिला खालीं टाकून दिलें, तीच ही गोकर्ण महाबळेश्वराची **भद्रकाळी** होय. तिची स्थापना विष्णूंनीं मंदिर बांधून येथें केली. अशा या दोन कथा गोकर्ण व भद्रकाळी ह्यांच्या-विषयीं प्रचलित आहेत.

गोकर्ण नांवाची उपपत्ति वरीलप्रमाणें लागते. पण त्याला ‘महाबळेश्वर’ हा शब्द कां लावण्यांत आला त्याचें कारण पुढीलप्रमाणें असावें. रावण हा महाबलाढ्य, त्याला वीस हात, त्या हातांनीं आपली सर्व शक्ति एकवटून तें लिंग उपटून काढीत असतांहि तें निघेना. इतकें तें रावणा-पेक्षांहि अनंतपटींनीं बलवान् असल्यामुळेंच गोकर्णाला ‘ महाबळेश्वर ’ हें पद जोडण्यांत आलें.

गोकर्णास पांच सहा दिवस राहून क्षेत्राचें सुख अनुभवलें. समुद्रस्नानाहि केलें. बाकीचीं स्नानें कुंडांत केलीं. अशा रीतीनें पवित्र वातावरणांत कांहीं काळ गेल्यावर मी हंपी विरूपाक्षाच्या रोखानें जावयास दि. २०-२-५१ रोजीं निघालों. तो रस्ता **कलघटगी, हुबळी** व **हॉस्पेट** असा होता. गोकर्णाहून सकाळीं सात वाजतां मोटारीनें निघून कलघटगीस दुपारीं बारा वाजतां पोंचलों. भाडें पावणेचार रुपये पडलें. यावरून या दोन गांवांमधील अंतर सुमारें शंभर मैल असावें. कलघटगीपासून हुबळी मोटारभाडें एक रुपया तीन आणे पडलें. हुबळीस मी दुपारीं दोन वाजतां पोंचलों. हें अंतर वीस मैल असावें.

हुबळीस **महाराष्ट्र मंडळ** असून त्याचे चिटणीस **श्री. आपटे** आहेत. त्यांजकडे मी उतरलों. हुबळी हें मोठें व्यापारी शहर आहे व सदर्न रेल्वेचें मोठें जंक्शन आहे. येथूनच **गदग, गुंटकल, हुटगी** इकडे रेल्वेचा फांटा जातो. त्यावरच **विजयानगरास** जाण्याकरितां हॉस्पेट हें स्टेशन आहे, हुबळीची लोकसंख्या सुमारें सव्वा लक्ष आहे. तेथें महाराष्ट्रीयांचीं तीनशें कुटुंबें आहेत. श्री. आपटे हे उत्साही गृहस्थ आहेत. त्यांच्या व इतर महाराष्ट्रीय मंडळींच्या परिश्रमानें येथें महाराष्ट्र मंडळ स्थापण्यांत आलें आहे. त्यांतील ग्रंथसंग्रह मोठा आहे. त्या मंडळाची इमारत वीस हजार रुपये खर्चून बांधलेली आहे. व या इमारतींत प्रवाशांकरितां सर्व प्रकारच्या सोई करण्याचा मंडळाचा विचार आहे.

हुबळी हें धारवाड जिल्ह्यांत तालुक्याचें ठिकाण आहे. व खुद्द धारवाड ही त्या जिल्ह्याची राजधानी आहे; पण आश्चर्य हें कीं, धारवाडापेक्षां हुबळी ही कितीतरी पटींनीं मोठी आहे. असें असूनहि धारवाडला राजधानीचा मान देण्याचें कारण असें दिसतें कीं, धारवाड हें उंच ठिकाणीं असून तेथील हवा थंड आहे. एक दिवस धारवाडास जाऊन येऊन हुबळीहून दिनांक २२-२-५१ इ. रोजीं रात्रीं ९॥ वाजतां निघून हॉस्पेट येथें त्याच रात्रीं तीन वाजतां उतरलों. हुबळी व हॉस्पेट यांजमध्यें अंतर

शंभर मैल आहे. अपरात्रीमुळें स्टेशनावर झोंप घेऊन तेथून बसमधून किष्किंधेस गेलों. हें अंतर दहा मैल आहे.

## किष्किंधा

या बाजूला विशेष हा आहे कीं, हत्तीच्या अंगाएवढाल्या दगडांच्या उतरंडीच्या उतरंडी दिसूं लागतात. ते दगड पांढरे, तांबडे, काळे, केशरी इत्यादि विविध रंगांचे असतात. किष्किंधा हें नांव रामायणांत आलें आहे. येथें वाली रहात होता व वालीचा वध सुग्रीवाची बाजू घेऊन रामानें केला, आज या स्थळास हंपी म्हणतात.



श्रीराम

श्रीरामचंद्र चरणौ मनसा स्मरामि ।
श्रीरामचंद्र चरणौ वचसा गृणामि ।
श्रीरामचंद्र चरणौ शिरसा नमामि ।
श्रीरामचंद्र चरणौ शरणं प्रपद्ये ॥ १ ॥

या प्रदेशाचें महत्त्व आणखी एका कारणानें आहे. येथें विजयानगरचें बलाढ्य राज्य होतें. तेथील राजांनीं तुंगभद्रेच्या उत्तरेकडील बहामनी राजांशीं टक्कर देऊन दक्षिणेकडील हिंदूंचें व हिंदु देवालयांचें परचक्रापासून संरक्षण केलें. त्या विजयानगराचा आतां येथें पत्तादि लागत नाहीं. कांहीं मोडून पडलेले राजवाडे व विठ्ठलमंदिर यासारखीं स्थळें बोट दाखविण्यास आहेत.

हें सर्व पाहून खिन्न झालेला मनुष्य हंपींतील विरूपाक्षाकडे व तुंगभद्रेकडे वळतो. हें प्रचंड देवालय व त्याजपुढील गोपूर पाहून मन थक्क व आनंदभरित होतें. हें शंकराचें स्थान असून त्याची व्यवस्था चांगली ठेवण्यांत आली आहे. तेथून बाहेर पडून तुंगभद्रेच्या घाटावरून हिंडूं लागले म्हणजे मन पवित्र भावनांनीं उचंबळून जातें. तुंगभद्रेचें पाणी अथांग म्हणजे पुष्कळच खोल आहे. तिच्या तीरावर अगदीं एकांतांत हनुमानाचें मंदिर आहे व पलीकडच्या तीरावर **पंपा** सरोवर दाखवितात. पूर्वेस डोंगरांत एक मैलावर **श्रीराम, सीता** व **लक्ष्मण** व **मारुती** यांच्या सुबक व तेजस्वी मूर्ति आहेत. त्यांचें व विरूपाक्षाचें दर्शन घेऊन घाटावर थोडा विसांवा घेतला; पण जेवण न मिळाल्यामुळें तेथें थोडासा फराळ करून व एक मोठा ऊंस खाऊन त्याच्या रसपानानें अंतरात्मा तृप्त केला !

किष्किंधेला फार वेळ न थांबतां मी परत हॉस्पेट स्टेशनावर आलों व तेथून दुपारीं अडीच वाजतां निघून सायंकाळीं गुंटकल या जंक्शनच्या मोठ्या स्टेशनावर उतरलों. तेथून मला श्रीशैलाकडे जावयाचें असल्यामुळें गुंटकलहून त्याच रात्रीं निघून **नंद्याळ** स्टेशनावर रात्रीं १०॥ वाजतां उतरलों. हें अंतर सुमारें दोनशें मैल असावें. **नंद्याळ** स्टेशनावर पहाट होईपर्यंत मला निजणें भाग पडलें. स्टेशनापासून नंद्याळ गांव दोन मैल आहे. तेथें बस स्टँड आहे. आतां माझा आगगाडीचा प्रवास संपला. श्रीशैलाला जाण्याच्या रस्त्याची सुरुवात नंद्याळपासून होते.

## श्रीशैलमल्लिकार्जुन

नंद्याळ तें आत्मकूरपर्यंत मोटारी जातात. पुढचा प्रवास पायींच करावा लागतो. नंद्याळपासून आत्मकूर नांवाचें गांव वीस मैलांवर आहे. तेथें मी दुपारीं अकरा वाजतां पोंचलों. तेथील विहिरीवर स्नान करून खाणावळींत भोजन केलें. तेथें थोडा वेळ विश्रांति घेऊन दुपारीं सपाट्यानें पायींच निघालों. तरी एकंदर वनश्री मनोहर असल्यामुळें प्रवासाचा शीण वाटला नाहीं. वाटेंत ऊंस, भात, कपाशी, ज्वारी यांचीं पिकें करमणूक करण्यास

होतीं व आंबा, चिंच, कडू लिंब हे वृक्ष छाया देण्यास होते. वाटेंत एक मोठा तलावहि लागला. त्यानें मनाला आल्हाद वाटला.

आत्मकुरापासून चार मैलांवर **व्यंकटपुरम्** नांवाचें गांव आहे. तेथें रात्रीं **वस्ती** केली व दुसरे दिवशीं सकाळीं सोळा मैल चालून **पेदाचेरू** या गांवीं रविवारीं सायंकाळीं आलों व तेथें रात्रीं राहून भोजन केलें. नंतर दुसऱ्या दिवशीं म्हणजे सोमवारीं दिनांक २६।२।५१ रोजीं सकाळीं तेथून पायीं निघून दुपारीं बारा वाजतां श्रीशैलमाल्लिकार्जुनास आलों. तेथील कुंडांत स्नानसंध्यादि करून केवळ पाणी पिऊन म्हणजे **इंद्रसभा** करून राहिलों. कारण तेथें कांहींहि जिन्नस मिळेना व जेवणाचीहि सोय लागेना !

मल्लिकार्जुनाचें मंदिर नांवाप्रमाणेंच पर्वतावर आहे. पण हा पर्वत फार मोठा नाहीं. पर्वतीसारखीच ती एक टेकडी आहे. देऊळ मजबूत बांधलें आहे. त्याच्या भोंवतालीं भरभक्कम तट आहे. तो तीस फूट उंच व तीन फूट रुंद आहे. देवळाभोंवतालीं चारहि दिशांना प्रत्येक दिशेस एक असे चार उंच गोपूरें आहेत. देवळावरतीं चारहि बाजूंस चार व मध्यें एक मोठा असे सोन्याचे पांच मनोरे आहेत; तसेच चारहि दिशांना चार दिंडी दरवाजे आहेत. दहा विहिरी आहेत. त्यांपैकीं एक मुबलक पाण्याची पुष्करणीवजा विहीर आहे. मल्लिकार्जुनाचें लिंग शाळुंकीसह सुमारें एक वीत उंच आहे. त्याशिवाय मंदिराच्या आवारांत कार्तिकस्वामी, अन्नपूर्णा, सहस्रलिंग वगैरे बरींच देवळें आहेत.

मल्लिकार्जुनाच्या देवळांत **मल्लिकार्जुन, पार्वती, रावण, नंदी** व **कैलास पर्वत** ह्यांच्या चांदीच्या मूर्ति आहेत. चारहि दरवाजांवर द्वारपाळ आहेत. देवळापासून उत्तरेस दोन मैलांवर पाताळगंगा आहे. पृष्ठभागापासून सुमारें हजार पायऱ्या खालीं उतरून गेल्यावर ही गंगा लागते. ही पाताळगंगा म्हणजे कृष्णा नदीच होय. मल्लिकार्जुनाचें दर्शन घेण्यास मला पावणे दोन रुपये कर द्यावा लागला. महाशिवरात्रीच्या आधीं व नंतर आठ आठ दिवस मिळून एकंदर पंधरा दिवसच भिल्लांनीं यात्रेकरूंस लुटूं

नये म्हणून सरकारी पोलीसद्वारां संरक्षण मिळतें. महाशिवरात्रीच्या दिवशीं मात्र माणशीं कर दोन रुपये असतो. ही यात्रा सुमारें दीड महिना चालू असते व तिचें उत्पन्न देवस्थानाला पन्नास हजारांपर्यंत होतें व तितकाच खर्चेंहि होतो.

मल्लिकार्जुनावर सुमारें दहा धर्मशाळा आहेत. देवाचे पुजारी जंगम माळी आहेत, पण पार्वतीचे पुजारी ब्राह्मण आहेत. यात्रेच्या वेळीं यात्रेकरूंस राहाण्याकरितां आत्मकूर गांवचे सुखवस्तु पाटील मार्गावर ठिकठिकाणीं चौसोपी गवती घरें बांधून ठेवतात. मंदिराच्या आवारांत एक अति मोठें औदुंबराचें झाड आहे. त्याच्याभोंवतीं पार आहे. त्याचा बुंधा दहा पंधरा माणसांच्या वेंगेंत मावणार नाहीं इतका मोठा आहे. त्याची उंची सुमारें साठ फूट होईल.

मल्लिकार्जुनाहून मी दिनांक २७।२।५१ रोजीं परत यावयास निघालों. त्यावेळीं तेथील माही शिवरात्रीच्या यात्रेची तयारी सुरू होती. लोकांस राहाण्यास सोईच्या जागा, दुकानें व उजेडासाठीं विजेचे दिवे ह्यांची तयारी चालू होती. रोज सुमारें दोनशें गाढवें माल घेऊन पेदाचुरीपासून वरतीं जात होतीं. गाढवें लावावयाचें कारण बैल अगर घोडे मिळत नसावे हें असावें. या प्रवासांत मुख्य अडचणी म्हणजे वाहनाची व भोजनाची ह्या आहेत. या अडचणी सुमारें तीस मैलांच्या प्रवासांत भासतात. यामुळें यात्रेकरू जिकिरीस येतो. कांहीं मालवाहू ट्रक जातात येतात. ते एकादे वेळीं उतारूंस न्यावयाला कबूल होतात. पण भाडें अडवून भरमसाट मागतात. तरी सर्वांना श्रीशैलापासून पेदाचुरीपर्यंत दहा मैल चालत यावें लागतें. पेदाचुरीपासून पुढें मला आत्मकूरापर्यंत ट्रकमधून बसून जावयास मिळालें. हें अंतर वीस मैल आहे. या वीस मैलांच्या प्रवासास भाडें दोन रुपये पडलें. मी आत्मकूरला सायंकाळीं साडेपांचला पोहोंचलों.

त्यापूर्वींच पुढील मार्गाच्या मोटारी निघून गेल्यामुळें रात्रीं तेथेंच राहावें लागलें. दुसऱ्या दिवशीं पाहाटेस दिनांक २८।२।५१ इ. रोजीं

स्नानसंध्यादि आटोपून साडेसाताच्या बसनें कर्नूल गांवीं दुपारीं परत आलों. वाटेनें शिंदी, कडूनिंब, एरंड, चिंच यांची गर्दी होती. शेतें मोठमोठालीं बांधाशिवाय होतीं. या बाजूस फळफळावळ म्हणण्यासारखी मिळत नाहीं; परंतु या वेळीं टरबुजें, कलिंगडें मिळत होतीं. या निर्जल प्रदेशांत कलिंगड मिळालें व त्यानें तृषा शांत झाली. याचा मला केवढा तरी आनंद वाटला. कर्नूल हें मी तेथून गेल्यानंतर आंध्र प्रांताच्या राजधानीचें शहर कांहीं काळ झालें. हें महत्त्व त्या वेळीं नव्हतें.

आतां मला औंढ्या नागनाथास जावयाचें असल्यामुळें मी काचीगुडाला म्हणजे हैद्राबादला तिकीट काढून दुपारीं एक वाजतां निघालों. तों सायंकाळीं साडेसात वाजतां उतरलों. हें अंतर शंभर मैल असावें. त्याच स्टेशनाजवळ तुळजाभुवन नांवाची धर्मशाळा आहे. तेथें हैद्राबाद शहरांतील जागेच्या टंचाईमुळें श्री. **राजहंस** नांवाचे **वकील** धर्मशाळेंतच बिऱ्हाड करून राहात होते. त्यांनीं मला मुक्कामास कृपा करून जागा दिली. **हैद्राबाद** हें शहर दहा मैल लांब व चार मैल रुंद आहे. येथील वस्ती बारा लक्ष आहे. त्यांपैकीं सात लक्ष हिंदु व पांच लक्ष मुसलमान आहेत. आतां हैद्राबादेच्या विलिनीकरणामुळें निजामचें माहात्म्य कमी होऊन मुख्य प्रधान श्री. व्ही. के. वेलोदी यांना महत्त्व आलें होतें. त्यांचा वाडा स्वतंत्र मोठ्या किल्ल्या-सारखा, भोंवतालीं बागेसह आहे. खुद्द निजामसाहेब किंकोटी बंगल्यांत राहातात.

हैद्राबादेंत प्रेक्षणीय स्थळें बरींच आहेत. त्यांपैकीं चार मिनार, गड्डीपेट तलाव, निजामसागर, उस्मानिया युनिव्हर्सिटी, पशुसंग्रहालय, पदार्थ-संग्रहालय वगैरे स्थळें प्रमुख होत. चार मिनार हा चार कमानींचा उंच मनोरा आहे. त्याच्या चार बाजूंस चार मोठीं घड्याळें आहेत. ही इमारत तीनशें वर्षांपूर्वीची आहे. हैद्राबादेपासून जवळच इतिहासप्रसिद्ध **गोवळ-कोंडा** किल्ला आहे. तेथें जाण्यास बस तिकिटाचे सहा आणे पडतात. किल्ल्याचा तट सुमारें पंच्याहत्तर फूट उंच व तीन फूट रुंद आहे. त्याला

दिंडीदरवाजे आहेत. ते शनिवारवाड्यासारखे मोठे आहेत. किल्ल्यांत दोन तलाव आहेत. आंत हिंदु व मुसलमान राहातात. उत्तरेच्या बाजूस मशिदींचे घुमट आहेत. पांच सहा सभागृहें आहेत. प्रत्येकांत दोन हजार लोक मावतील इतकीं तीं मोठीं आहेत. शेवटच्या सभागृहास निमूळते पांच मजले आहेत. शेवटच्या मजल्यावरील गच्ची फक्त दोनच मनुष्यें बसतील इतकी, पण हवेशीर आहे. तेथून हैद्राबादच्या सर्व बाजूंचा मनोहर देखावा दिसतो. किल्ला चढण्यास फार सोईचा आहे.

## औंढ्या नागनाथ

हैद्राबादेहून रेल्वेनें औंढ्या नागनाथाकडे जातांना वाटेंत **निजामाबाद, नांदेड, पूर्णा जंक्शन** इत्यादि मोठीं स्टेशनें लागतात. निजामाबाद येथें उत्तम किल्ला आहे. नांदेड गांवीं शिखांचें गुरुगोविंदसिंग मंदिर आहे. पूर्णा हें मोठें जंक्शन असून तेथून हिंगोलीकडे जाण्याचा फाटा फुटतो. त्या फाट्यावर पूर्णेपासून तीस मैलांवर **चोंढी** नांवचें स्टेशन आहे. तेथून औंढ्या नागनाथाला जाण्यास लॉऱ्या मिळतात. हें अंतर पंधरा मैल असून भाडें बारा आणे पडतें. औंढ्या नागनाथास नागनाथाचें देऊळ मुख्य आहे. देवळाच्या भोंवतीं उंच भिंत आहे. औंढ्या नागनाथाचें लिंग वालुकामय आहे. तेथें दोन लिंगें आहेत. एक वरचें व एक खालचें. वरचें लिंग औरंगजेबानें छिन्नविच्छिन्न केलें. तें लिंग दर्शनी असावें. खरें लिंग खालचें म्हणजे गुहेंतलें आहे. तें औरंगजेबास न कळल्यामुळें सुरक्षित राहिलें. औंढ्या हें नांव तेथील स्थळावरून पडलें.

गुहेंतील लिंग जमिनीपासून खालीं चार फुटांवर आहे. शाळुंकी-भोंवतीं चार दगडी खांब आहेत. गाभारा दहा फूट लांब, आठ फूट रुंद व तीन फूट उंच आहे. वरचे देवळांतील शाळुंका पांच फूट लांब, तीन फूट रुंद व लिंग एक घनफूट आहे. गुहेंत दहा समया तेवत असतात. येथें माघ वद्य १४ पासून फाल्गुन शुद्ध २ पर्यंत मोठी यात्रा भरते. शेवटच्या दिवशीं देवाची रथांतून मिरवणूक काढल्यावर उत्सव समाप्त

होतो. जवळच नागनाथाचें तीर्थ आहे. तें काळया पाषाणाच्या पायऱ्यांनीं चौफेर बांधलें आहे. त्याची लांबी दोनशें फूट, रुंदी पन्नास फूट व खोली तीस फूट आहे. येथें मी स्नान केलें. मोठ्या नागकुंडांत कुंतीनें स्नान केलें व जवळच्या लहान कुंडांत द्रौपदीनें स्नान केलें, म्हणून ह्या कुंडास अनुक्रमें सासू–सुनाचीं कुंडें म्हणातत. हीं दोन्ही एकाच कुंडाचे भाग आहेत. देवास कायमचें सरकारी शेतीचें उत्पन्न आहे. त्यांतून देवाचा खर्च चालतो.

औंढ्या नागनाथाहून दुपारीं बारा वाजतां मोटारीनें निघून चौंडी स्टेशनावर आलों व तेथून आगगाडीनें परळी वैजनाथ या क्षेत्रास जावयास निघालों. चौंडीहून पूर्णा जंक्शनला दुपारीं दोन वाजतां आल्यावर सायंकाळीं साडेसहा वाजतां परळी वैजनाथाच्या गाडींत बसलों. ती गाडी दिनांक ५–३–५१ इ. रोजीं रात्रीं ११॥ वाजतां परळी वैजनाथ स्टेशनवर आली.

## परळी वैजनाथ

रात्रभर स्टेशनावर निजून सकाळीं गांवांत रिकामटेकडीवर श्री. हरिभाऊ जोशी यांजकडे उतरलों. देवळाजवळील हरिहरकुंडांत स्नानसंध्यादि कर्में केलीं. देवळाभोंवतीं वीस फूट उंचीची दगडी भिंत आहे. आवारांत बरींच लिंगें आहेत. चारहि बाजूंस चढण्या–उतरण्यास पायऱ्या व दरवाजे आहेत. देवस्थानाची कमिटी आहे. देवाच्या दर्शनाकरितां तोबा उडाला होता; तरी दर्शनाची व्यवस्था कांहींच नव्हती. लोक रांगेनें उभे नव्हते. जो धक्काबुक्की करून पुढें घुसेल त्यालाच काय तें लवकर दर्शन होई, मी म्हातारा मनुष्य आहे; या गर्दींत माझा टिकाव लागावयाचा नाहीं म्हणून मला कृपा करून लवकर दर्शन घडेल अशी तजवीज करावी, अशी पुजाऱ्यांपाशीं विनंति केली; तेव्हांच मला लवकर दर्शन घडलें. हें देऊळ टेकडीवर आहे. त्याचा जीर्णोद्धार देवी अहिल्याबाईनें शके १७०६ त केला. पेशव्यांनीं देवस्थानास बरीच बिघे जमीन इनाम दिल्यामुळें तेथील सर्व अवश्य कर्तव्यें पार पडतात.

परळी वैजनाथाहून दिनांक ७।३।५१ इ. रोजीं भोजन करून अंबाजोगाईला जावयाकरितां परळी वैजनाथ स्टेशनावर बस मिळविण्याकरितां गेलों. परळी वैजनाथ व **अंबा जोगाई** यांमधील अंतर सोळा मैल आहे. बस भाडें निजामी एक रुपया पडलें. अंबाजोगाई याचें सध्यांचें नांव **मोमिनाबाद** असें आहे. अंबाजोगाई स्टँडपासून अर्ध्या मैलावर अंबाजोगाईचें मंदिर आहे. देऊळ दगडी सुरेख आहे. देवळांत तांदूळवजा स्वयंभु सुमारें सव्वा फूट लांब, रुंद व उंच असा देवीचा मुखवटा भिंतींत आहे. ही कुमारिका आहे. भोंवतालीं मारुति, गणपति यांचीं देवळें आहेत. जवळच तलाव आहे. पण पाणी मुळींच नाहीं.

देवीच्या देवळापासून अर्ध्या मैलावर **दासोपंत समाधि, नृसिंहमंदिर** व लहानशी धर्मशाळा आहे. जवळून एक नदी वाहाते, तेथून पुढें अर्ध्या मैलावर **केशवस्वामींची** समाधि व देऊळ आहे. येथून दोन फर्लांगावर नदीच्या कांठीं डोंगरांत **श्रीमुकुंदराज** कवींची समाधि आहे. समाधि आळंदीच्या ज्ञानदेवांसारखी आहे. सुमारें दोनशें पायऱ्या उतरून गेल्यावर समाधिस्थान आहे. त्याच्याखालीं आणखी शंभर पायऱ्या उतरल्यावर नदी आहे. हें स्थान फार रम्य व निवांत आहे. तिन्ही बाजूंस उंच डोंगर, नदी व देऊळ असल्यामुळें परमेश्वराची भक्ति करण्यास हें स्थान अगदीं योग्य आहे. भोंवतालीं पिंपळ, पांढरा चांफा व कडू लिंब हे वृक्ष आहेत.

कांहीं अंतरावर एका शेतांत वडाखालीं एका बोवाची पर्णकुटी आहे. जणूं काय त्यानें ती तपश्चर्या करण्यासाठींच बांधली आहे. हें स्थान पाहून बसनें रात्रीं आठ वाजतां परळीस आलों; पण भटजींचें घर सांपडेना, तेंव्हां एका मनुष्यानें अचानकपणें दिव्याच्या साह्यानें मला भटजींच्या घरीं नेलें. परत निघण्यापूर्वी मुकुंदराजाच्या समाधीपाशीं आलों असतां मुकुंदराज कवीप्रमाणें आपणहि कवि व्हावें अशी त्यांच्या चरणांपाशीं मस्तक ठेवून मनापासून प्रार्थना केली. त्या वेळीं देवळांत उदबत्त्या लावलेल्या नसतांहि पेटत्या उदबत्त्यांचा घमघमाट मोठ्या प्रमाणांत दरवळून चित्तास फार आनंद झाला !

भटजींना ब्राह्मण–सुवासिनींच्या भोजनाबद्दल सव्वा दोन रुपये देऊन परत त्याच रात्रीं परळी वैजनाथ स्टेशनावर आलों व रात्रीं १२॥ वाजतां आगगाडीनें निघून पहाटे अडीच वाजतां परभणी स्टेशनावर उतरलों व तेथून सकाळच्या साडेसात वाजतांच्या गाडीनें निघून औरंगाबादेस दीड वाजतां सुखरूप पोंचलों.

औरंगाबादेस येण्याचें मुख्य कारण असें कीं, मला वेरूळच्या घृष्णेश्वराचें दर्शन घ्यावयाचें होतें. आतांपर्यंतच्या वर्णनांत बारा ज्योतिर्लिंगांपैकीं १ केदारनाथ, २ महांकाळेश्वर, ३ ओंकार–अमलेश्वर, ४ श्रीरामेश्वर, ५ श्रीशैलमल्लिकार्जुन, ६ औंढ्या नागनाथ, ७ परळी वैजनाथ ह्यांची माहिती येऊन गेली आहे. आतां यापुढें घृष्णेश्वराचें वर्णन द्यावयाचें आहे. तत्पूर्वी **औरंगाबाद** व **दौलताबाद** हीं गांवें वाटेवर असल्यामुळें त्यांची माहिती येथें त्रोटक देणें प्राप्त आहे.

औरंगाबाद याचें मूळ नांव 'खिडकी' पण औरंगजेब हा दाक्षिणेचा सुभेदार होऊन इकडे राहावयास आल्यावर त्यानें **खिडकी** हें नांव बदलून त्यास आपल्या स्मरणार्थ 'औरंगाबाद' हें नांव दिलें आहे. औरंगाबाद ही आतां मराठवाड्याची राजधानी झाली आहे. पूर्वी मोंगलांच्या वेळेला या गांवांस जें वैभव होतें तें आतां राहिलें नाहीं. तथापि पूर्ववैभवाचे कांहीं अवशेष अद्यापि तेथें पाहावयास सांपडतात. तरीहि हें जुनें शहर आतां बरेंच मोडकळीस आलें आहे. त्यांत थडगीं व दरगे मुसलमानी रिवाजाचे बरेच आहेत. नव्या मनूंत गांवाची वस्ती वाढत चालली आहे.

येथील प्रेक्षणीय स्थळ म्हटलें म्हणजे **बिबीका मुकबरा** हें स्थळ गांवापासून एक मैलावर आहे. त्याची आग्र्याच्या ताजमहालाबरोबर तुलना करितात. तें ताजमहालाइतकें मोठें नसलें; तरी त्या धर्तीचें व संगमरवरी दगडांचें आहे. त्यांस आठ मनोरे आहेत. त्यावर चढल्यावर सबंध औरंगाबाद शहराचा देखावा दिसतो. मुकबऱ्याच्या भोंवतीं पुष्पें व फळें यांचा बाग आहे. ह्याच्याजवळून **खामा** नदी वाहाते. तिचें पाणी अडवून

नेऊन त्यावर सुमारें वीस कारंजीं बांधण्यांत आलीं आहेत. औरंगाबादेस एकच दिवस राहून दिनांक ११–३–५१ इ. रोजीं सकाळीं आठ वाजतां बसनें निघून नऊ वाजतां **देवगिरीच्या किल्ल्या**जवळ आलों. **देवगिरी** ही यादवांची राजधानी होती. तिचें मुसलमानांनीं दिलेलें हल्लींचें नांव 'दौलताबाद' होय. या किल्ल्यासारखा किल्ला इतरत्र क्वचितच पाहावयास सांपडेल. तो डोंगरी किल्ला असून भूदुर्गासारखा दिसतो. त्याला तीन तट आहेत. मुसलमानांच्या ताब्यांत फार वर्षें राहिल्यामुळें त्याजवर सर्वत्र यावनी छाया पसरली आहे. जिकडे तिकडे त्यांच्या इमारती आहेत; परंतु भारताला स्वराज्य मिळाल्यावर व निजामाचें राज्य विलीन झाल्यावर कित्येक शतकांनीं लाभलेल्या स्वातंत्र्याच्या आनंदप्रदर्शनार्थ येथें कालीच्या देवळांत भारतमातेची चतुर्भुज मनोहर मूर्ति स्थापिली आहे. या किल्ल्यांत बऱ्याच उंचीवर बारद्वारी नांवाची एक बरीच मोठी इमारत आहे. तेथें मनुष्यास विश्रांति घेतां येते व लांबवरचें कित्येक कोस अंतरापर्यंतचें दृश्य पाहावयास मिळतें.

गडावर हिंदूंना अत्यंत पवित्र वाटणारें स्थळ म्हणजे **श्रीजनार्दनस्वामींची समाधि** होय. जनार्दनस्वामी हे एकनाथांचे गुरु. हे या गडावर मुसलमानांचे अधिकारी होते. त्यांची समाधि एका गुहेंत असून आंत पाणी व अंधार असल्यामुळें समाधीचें दर्शन फार कष्टानें घडतें. समाधीवर दत्ताच्या पादुका आहेत. जनार्दनस्वामींच्या समाधीचें दर्शन घेतल्यावर मी गड सायंकाळीं साडेचार वाजतां उतरलों. तेथून घृष्णेश्वर, वेरूळचीं प्रसिद्ध लेणीं व वेरूळ गांव सुमारें तीन चार मैलांवर आहे. तेथें बसनें मी पांच वाजतां पोंचलों. **वेरूळ** गांव हें लहानसें खेडें आहे. त्यांत ब्राह्मणांचीं पंधरा घरें आहेत. त्यांपैकीं एका भटजींकडे उतरलों व त्यांनींच मला घृष्णेश्वराच्या दर्शनास नेलें. रात्रीं त्यांच्या घरीं निद्रा घेतली. गांवाजवळ **वेळा** नांवाची नदी आहे. तिच्यांत दिनांक १२।३।५१ इ. रोजीं स्नानसंध्या उरकून घृष्णेश्वरीं जाऊन त्याजवर रुद्राची एकादशिनी केली.

घृष्णेश्वराचें देऊळ भव्य व मजबूत आहे. तें देवी अहिल्याबाई हिनें बांधलें. मंदिराभोंवतीं पंचवीस फूट उंच व तीन फूट जाड अशी भिंत आहे. देवळाच्या आवारांत एक पुष्करिणी आहे. पण तिला पाणी फार थोडें आहे. तिच्या शेजारी एक मोठा आड आहे. त्याला चाकें बसविलीं असून त्यावरून पाणी काढतात. घृष्णेश्वराची शाळुंका तीन फूट रुंद व पांच फूट लांब आहे. लिंग फूटभर उंच व अर्धा फूट व्यासाचें आहे. सर्व काम उत्कृष्ट आहे. देवालयाभोंवतालीं आंबा, चिंच, कडूलिंब यांचीं झाडें बरींच असलीं तरी बेलाचें झाड मुळींच नाहीं.

घृष्णेश्वरापासून जवळच डोंगरांची रांग आहे. तिच्यांत बौद्ध, हिंदु व जैन लेणीं आहेत. तीं सर्वच मोठीं व भव्य आहेत. बौद्ध लेण्यांमध्यें गौतमबुद्धाच्या मोठमोठ्या दगडी मूर्ति आहेत. सर्व लेण्यांत कैलास लेण्या-सारखें उत्तम दुसरें लेणें एकहि नाहीं. त्याची रचना पाहून मनुष्य अगदीं थक्क होतो ! तेथील भिंतीवरील अवाढव्य मूर्ति पाहून मनुष्य एकटाच असल्यास त्यास त्या एकांताची भीतिच वाटूं लागते. मध्यभागीं कैलासाचें पाषाणांतून कोरून काढलेलें मंदिर आहे. व भोंवतालीं राजवाड्यासारखा दोन तीन मजली चौसोपी भाग आहे. मंदिरांतील शिवलिंग फारच मोठें आहे. मंदिराचा दरवाजाहि राजवाडयासारखा आहे. दरवाजांतून आंत शिरतांच दोन मोठे दगडी हत्ती दृष्टीस पडतात.

हिंदूंच्या या ब्राह्मणी लेण्यांच्या पलीकडे जैन लेणीं आहेत. तींहि भव्य नक्षीदार व सुंदर आहेत. त्यांत जैनगुरु पद्मासनावर ध्यानस्थ बसलेले दिसतात. पाहिलीं बौद्ध लेणीं सोळा, हिंदू लेणीं चौदा व जैन लेणीं पांच मिळून एकंदर लेणीं पस्तीस आहेत. हीं लेणीं पाहून भारतांत शिल्पकला किती उच्च प्रतीस पोंचली होती याचें ज्ञान होऊन कोणाहि भारतीयास एक प्रकारचा अभिमान वाटूं लागतो व परमानंद होतो ! अलीकडे शाळांतून शिकविण्यांत येणारे विषय शक्य तितके सोपे करण्याचा प्रयत्न सुरू आहे; त्यामुळें आपल्याकडील विद्यार्थ्यांची ज्ञानाची पातळी बरीचशी खालीं आलेली दिसते. महाराष्ट्रासारख्या पुढारलेल्या प्रांतांत जर हा अनुभव

येतो; तर मराठवाड्यासारख्या मागासलेल्या प्रांताची काय स्थिति असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. मी वेरूळास आलों होतों.त्यामुळें साहजिकच तेथील प्राथमिक शाळेची पहाणी करण्याची मला इच्छा झाली.

ही शाळा दोन शिक्षकांची असून त्यांपैकीं एक शिक्षक ट्रेनिंगचें शिक्षण घेण्यास औरंगाबादेस गेला असल्यामुळें उरलेल्या एकाच शिक्षकास चारहि इयत्ता संभाळाव्या लागत होत्या. सर्व इयत्तांमिळून चाळीस मुलें होतीं, त्यामुळें शिक्षकाला सर्व इयत्ता ताब्यांत ठेवून त्यांना शिकविणें कठीण जात होतें. त्या योगानें शाळेंत जिकडे तिकडे दंगा सुरू होता. मुलांची चांचणी पाहावी म्हणून मी त्यांस थोडेसे प्रश्न विचारले; तेव्हां त्यांचा अभ्यास कच्चा दिसला. पण जेथें आडांतच नव्हतें तेथें पोहऱ्यांत कोठून येणार ! कारण शिक्षकाचें फळ्यावरील शुद्धलेखन पाहिलें तर तें फारच अशुद्ध दिसलें. त्यांत त्यानें शुद्धलेखनाच्या पुष्कळच चुका करून ठेवल्या होत्या; म्हणून आपला अभिप्राय लेखी देण्याकरितां त्याजपाशीं शेरेबुक मागितलें; तर तें त्यानें देण्याचें नाकारलें. या बाबतींत तक्रारीचें एक पत्र त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे मी पाठविलें; पण तें बहुधा केराच्या टोपलींत गेलें नसेल तरच आश्चर्य होय.

वेरुळास दोन दिवस राहिल्यावर दिनांक १३।३।५१ इ. रोजीं सकाळीं आठ वाजतां बारा आण्यांच्या तिकिटानें बसनें औरंगाबादेस न जातां जवळच्या **दौलताबाद** स्टेशनावर गेलों. गाडीला बराच अवकाश होता व माझ्याहि पोटांत भुकेनें कल्लोळ उडवून दिला होता, म्हणून कोठेंहि जेवणाची सोय न पाहातां जवळच एक मळा दिसला. त्यांत शिरलों. मळ्याचा मालक भला माणूस होता. त्याच्या मळ्यांत गाजरें व पोपया याशिवाय दुसरें कांहीं नव्हतें. त्यामुळें यांवरच कशीबशी भूक भागवून दुपारच्या दोहोंच्या गाडीनें निघून सायंकाळीं पांच वाजतां **मनमाड** स्टेशनावर उतरलों. दुपारीं जेवण न मिळाल्यामुळें भुकेची वखवख

कायमच होती. म्हणून तेथील श्री. जोगळेकरांच्या भोजनालयांत भोजन करून रात्रीं एकच्या प्यासेंजरनें **कल्याणास** सकाळीं आठ वाजतां उतरलों. आतां मला मुंबईस कांहीं दिवस राहून नंतर गुजराथेंतील क्षेत्रें पाहावयास जावयाचें होतें. मनमाडहून मुंबईस येतांना गाडींत एक **महार प्रवासी** भेटला. तो सात्त्विक वृत्तीचा दिसला. त्यानें ढोरें फाडण्याचें पिढीजात काम सोडून देऊन **नाशकास** भाजीपाला व फळफळावळ विकत घ्यावी आणि मुंबईस भायखळ्यास नेऊन ती विकावी हा धंदा सुरू केला होता. फावल्या वेळांत तो शिवणकाम करीत असे. व बाकीचा काळ तो **आत्म-चिंतन** व **प्राणायामांत** घालवीत असे. तो शिवाईदेवीचा उपासक होता. हरिजनांत अशा वृत्तीचा मनुष्य या काळांत आढळावा ही गोष्ट खरोखरच अद्‌भुत होय.

## अंबरनाथ

मुंबईच्या मार्गांत कल्याणास मी उतरलों असतां माझा पुतण्या चि. दत्तात्रय गोविंद जोशी यानें तेथून जवळ असलेलें श्रीअंबरनाथ शिवमंदिर पाहाण्याचें सुचविलें. त्याप्रमाणें त्याला घेऊन लोकल गाडीनें अंबरनाथ स्टेशनावर उतरलों. स्टेशनापासून अंबरनाथाचें मंदिर मैलावर आहे. हें देवालय **उल्हास** नदीच्या कांठीं आहे. या देवळाची महाराष्ट्रांतील प्राचीन व शिल्पदृष्ट्या उत्कृष्ट देवळांत गणना करण्यांत येते. तें काळ्या पाषाणाचें असून त्याजवर सुंदर मूर्ति बसविण्यांत आल्या आहेत. लिंग स्वयंभु आहे. त्याची शाळुंका चार फूट लांब, दोन फूट रुंद असून लिंग वीतभर उंचीचें वरवंट्यासारखें आहे. पूर्वी हें देवालय अगदीं रानांत होतें, पण आतां त्याच्या भोंवतालीं अनेक गिरण्या, कारखाने निघाले आहेत व निर्वासितांची फार मोठी वसाहत झाली आहे. अंबरनाथाहून परत कल्याणास येऊन मुंबईस दिनांक १४।३।५१ इ. रोजीं सायंकाळीं साडे-सात वाजतां ब्राह्मणसभेंत पोंचलों. मुंबईस आतां मी एक वर्षानें आलों. **महालक्ष्मी** स्टेशनाजवळ घाण पाण्याच्या मोठमोठ्या लोखंडी टाक्या

आहेत. या पाण्याचा शास्त्रज्ञ, यंत्रसाह्यानें ग्यास बनवून त्याचा व्यवहारांत जाळण्याच्या कामीं उपयोग करितात.

लहान मोठीं गांवें, पहाड, नद्या, अरण्यें, माळरानें इत्यादि पाहून नंतर मुंबईतील विजेच्या दिव्यांचा लखलखाट, बंगले, बागा, ऐषआरामी लोक, ट्राम, बस, मोटारी, गिरण्या, कारखाने, लोकांची गर्दी, दुकानांतील देवघेव दृष्टीस पडली; तेव्हां मानवी कृति व ईश्वराची अगाध लीला प्रत्ययास येऊन मन परमेश्वर चरणीं विलीन झालें!

## घारापुरी लेणीं

अपोलो बंदरापासून सात मैलांवर घारापुरी लेणीं अथवा "एलिफंटा केव्हज्" आहेत. बॉम्बे स्टीम नेव्हिगेशन कंपनीच्या बोटी भाऊच्या धक्क्यांवरून येथें जातात. राजघाटावर नौका थांबतात. येथें आगरी लोकांचा वस्ती बरीच आहे. सोळाव्या शतकांत हेंहि बेट पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत होतें. तेव्हां राजघाटावर जो दगडी हत्ती होता त्यावरून ह्या भागास 'एलिफंटा केव्हज्' हें नांव पडलें. राजघाटापासून एक मैलावर लेणीं आहेत. येथें शिवतांडव नृत्य, वैभव, शिव–पार्वती विवाह, अर्धनारी नटेश्वर इत्यादि देखावे पाहावयास मिळतात. मुख्य गुंफेंत गंगावतरण देखावा दिसतो. हीं लेणीं पाहून प्राचीन काळींहि कलाकुशलतेंत कितीतरी पराकाष्ठेचीं कारागिरीचीं कामें होत होतीं ह्याची साक्ष पटते.

## कण्हेरी लेणीं

कृष्णागिरी उपवन बोरीवली स्टेशनाजवळ आहे. येथून वनश्री शोभा पाहात आपण कण्हेरी लेण्यांजवळ येतों. हीं लेणीं दोन हजार वर्षांपूर्वीचीं असून नुकतींच बांधल्याप्रमाणें भासतात! हीं शंभरावर आहेत. सर्वांत भगवान् बुद्धाचें लेणें सर्वोत्कृष्ट आहे. येथील शिल्पकला पाहून आपण आश्चर्यचकित होतों!



भगवान् बुद्ध

## वज्रेश्वरी

वसईच्या किल्ल्यांत पोर्तुगीजांनीं सर्व शहरी थाट थाटला. त्या वेळीं त्यांत सरदारहि राहात. इ. स. १७३९ त मराठ्यांनीं त्यांचा नक्षा चिमाजीआप्पाद्वारां पुरा उतरवून टाकल्याचें आपणास आठवतें. वसई स्टेशनापासून अकरा मैलांवर एक तासानें बसमधून प्रवासी वज्रेश्वरीं जातो. हें देवालय श्रीमंत चिमाजीआप्पा पेशवे ह्यांनीं बांधिलें. ह्या

दा. क्र.

देवळापासून एका मैलावर ऊन पाण्याचे झरे अगर उन्हाळीं आहेत. ह्यांत गंधक असल्यामुळें येथील स्नानानें माणसांच्या अंगावरील त्वचेचे रोग समूळ नष्ट होतात. म्हणून असले रोगी मुद्दाम येथें स्नान करून रोगमुक्त होतात. ह्या उन्हाळ्यांजवळ रामेश्वर मंदिर आहे व येथेंच **राम–सीता** व **लक्ष्मण** अशीं तीन गरम पाण्याचीं कुंडें आहेत.

दक्षिण हिंदुस्थान व उत्तर हिंदुस्थान यांतील बहुतेक मुख्य क्षेत्रें आतां पाहून झालीं होतीं. गुजराथेंत मी गेलों नव्हतों. त्या प्रदेशांत जाऊन तिकडील क्षेत्रें पाहावीं या उद्देशानें मुंबईहून दिनांक २१।३।५१ इ. रोजीं सकाळीं नऊ वाजतां बाँबे सेंट्रल स्टेशनावरून **भडोच** शहरीं जावयास निघालों व सायंकाळीं त्या स्टेशनावर उतरलों. हें शहर नर्मदा नदीवर असून नदीचें पात्र सुमारें एक मैल रुंद आहे. तिजवर तितक्याच लांबीचा लोखंडी पूल आहे. भडोचपासून नऊ मैलांवर शुक्लतीर्थ, **कबीरवट** हीं क्षेत्रें आहेत.

## कबीर मंदिर

आमची मोटार भडोचहून दुपारीं बारा वाजतां सुटली. महाराष्ट्रीयांपेक्षां गुजराथेंत रेवा नदीच्या कांठीं राहाणाऱ्या रेवाशी लोकांचा पोषाख कांहींसा वेगळा आहे. ते वर्णानें काळे व कांटक असून अंगांत लांबलचक हरदासी अंगरखा घालतात व फेटा बांधतात. भडोचहून शुक्लतीर्थ सात मैलांवर आहे. तेथें मी दुपारीं एक वाजतां पोंचलों. येथें शुक्लतीर्थ नांवाचा गांव आहे. तेथें शुक्लतीर्थ नांवाचें तीर्थ नसून शुक्लेश्वर नांवाचें शिवमंदिर आहे. त्या-शिवाय मातामंदिर, ओंकारनाथ व विष्णुमंदिर हींहि आहेत. विष्णुमंदिर संगमरवरी पाषाणाचें उत्तम बांधलें आहे. शुक्लतीर्थ नर्मदेच्या ज्या तीरावर आहे त्याच्या विरुद्ध तीरावर कबीरमंदिर व कबीर वटवृक्षहि आहे. कबीरमंदिरांत थडगें आहे. त्यावरून कबीर हा मुसलमान साधु असावा असें वाटतें. कबीरवट हा एक वेळ फार विस्तीर्ण होता; पण आतां त्याचा विस्तार बराच कमी झाला आहे.

मी कबीरवटापाशीं बसलों असतां जवळच कांहीं शेतकरी गाई, बैल, मेंढ्या राखीत होते. गाई–म्हशींचें दूध मी प्यालों आहे, पण मेंढीचें दूध पिण्याचा योग कधीं आला नव्हता; म्हणून त्याजपासून अदपाव मेंढीचें दूध एक आण्याचें घेऊन प्यालों. तें गोड लागलें. हीं क्षेत्रें पाहून परत त्याच दिवशीं भडोचला येऊन रात्रीच्या गाडीनें बडोद्यास गेलों. या दोन शहरां-मधील अंतर चव्वेचाळीस मैल आहे. **बडोदें** स्टेशनाजवळ एक गुजराथी धर्मशाळा आहे. तिच्यांत राहावयास रोज माणशीं दोन आणे भाडें पडतें व सामान ठेवावयास एक पेटी मिळते. त्या पेटीचा तिजवर निजण्याच्या कामींहि उपयोग करितां येतो. अशी ही दूहजबी वस्तु आहे. मजसारखे कितीतरी उतारू या धर्मशाळेंत उतरले होते. बडोदें व तेथील राजे **सयाजी महाराज** गायकवाड यांची कीर्ति मी पुष्कळ वर्षांपासून ऐकत होतों. तेव्हां त्यांचें हें शहर व त्यांतील त्यांची कृति हीं डोळ्यांखालून घालावीं ही माझी फार दिवसांची इच्छा आतां सफळ झाली.

बडोद्यांत मांडवी रोडवर **दांडिया** बाजारांत महाराष्ट्रीयांची वस्ती बरीच आहे. येथें हॉस्पिटल, कॉलेजें, ग्रंथालय, वाचनालय, न्याय–मंदिर, विष्णु-मंदिर, राधाकृष्ण मंदिर, पदार्थसंग्रहालय अशीं किती तरी प्रेक्षणीय व उपयुक्त स्थळें आहेत. बडोद्यांत प्रोफेसर कै. **माणिकराव यांची व्यायाम-शाळा** फार प्रसिद्ध आहे. यांत शस्त्रास्त्रें, व्यायामसाहित्य व ग्रंथसंपत्ति हीं हजारों रुपये किंमतीचीं आहेत. व्यायामशाळेचा दोन लक्षांचा कायमचा निधि असून त्याच्या व्याजांतून संस्थेचा बराचसा खर्च चालतो. बडोद्यांतील दुसरी उल्लेखनीय संस्था म्हणजे **कलाभुवन**. ह्यास जोडून वर्कशॉप असून या संस्थेंतून आजवर हजारों विद्यार्थी निरनिराळ्या प्रकारचें औद्योगिक शिक्षण मिळवून बाहेर पडले आहेत. बडोद्यांत पुतळे कितीतरी आहेत. त्यांत सयाजीराव, शिवाजी व फत्तेसिंग ह्यांचे पुतळे मुख्य आहेत. येथील तिसरी महत्त्वाची संस्था म्हणजे **कीर्तिमंदिर** होय. त्यांत गायकवाडांच्या घराण्यांतील माजी स्त्रीपुरुषांच्या तसबिरी आहेत. बडोद्याहून सायंकाळीं

सहा वाजतां निघून आनंद स्टेशनावर आलों. तेथून डाकुरास जावयास सात वाजतां दुसऱ्या गाडींत बसून रात्रीं नऊ वाजतां डाकूर येथें पंड्याकडे उतरलों.

## डाकूर

डाकूर येथील मुख्य देवालय श्रीरणछोडजीचें होय. दुसरे दिवशीं सकाळीं गौतमी तीर्थावर स्नानसंध्यादि करून रणछोडजीचें दर्शन घेतलें. गौतमीतीर्थ एक मैल लांब, पाव मैल रुंद व पांच पुरुष खोल आहे. याला घाट बांधलेला आहे. देवळाभोंवतीं वीस फूट उंच व दोन फूट रुंदीची भिंत आहे. देवळावर गरुड, हत्ती, सिंह हे दगडी आहेत. देवळाला वीस पिवळे कळस आहेत. रणछोडजीची मूर्ति काळ्या पाषाणाची आहे. तिला सकाळीं नऊ ते अकरापर्यंत निरनिराळे पोषाख व अलंकार घालतात. देवाचे कपडे जरीचे व निरनिराळ्या रंगांचे आहेत. देवाच्या मस्तकाला मंदील व अंगांत अंगरखा घालतात.

त्यास निरनिराळे भोग म्हणजे नैवेद्य दाखवितात. हा नैवेद्य प्रसाद म्हणून विकतात. जो सहा रुपये देईल त्याला पक्वान्नांचा प्रसाद एक वेळ पुरेसा मिळतो. देवाला यात्रेकरूचा सहसा स्पर्श होऊं देत नाहींत. त्याचें दर्शन पांच वाव अंतरावरूनच घ्यावयाचें असतें. फक्त श्रीमंत मनुष्यास हा नियम लागू नाहीं. त्यास वशिल्यानें देवाच्या चरणांवर मस्तक ठेवतां येतें. देवळाला चारी बाजूंस चार दरवाजे आहेत. पुढच्या दरवाजाच्या दोन्ही बाजूंस दोन मोठे उंच व रुंद दीपस्तंभ आहेत. त्या प्रत्येकावर मोठे दिवे लावण्याची सोय केली आहे.

डाकुराहून तीन वाजतां एक्स्प्रेसनें निघून चाळीस मैलांवरील आनंद स्टेशनावर परत आलों. तेथून सायंकाळीं ६॥ वाजतां निघून आठ वाजतां अठ्ठेचाळीस मैलांवरील अहमदाबाद शहरास आलों. स्टेशनावर रेवाभाईची धर्मशाळा आहे. तेथें राहावयास रोज दोन आणे भाडें पडतें. खोली

घेतल्यास माणशी चार आणे भाडें पडतें. त्याशिवाय सामान ठेवण्यास दोन आणे रोज दिले असतां पेटी मिळते. एक रुपया अनामत घेतात. व्यवस्था बरी असते. येथें एका वेळेला शेंपन्नास प्रवासी सहज असतात. धर्मशाळेंत एक पार आहे. त्यावर रेवाभाई व शंकरभाई ह्यांचे दोन पुतळे आहेत. धर्मशाळेंत रात्रीं १० वाजतां घंटा होते. ती होतांच सर्वांनीं झोंपीं जावयाचें असतें. नंतर पहाटे पांच वाजतां निजून उठण्याची घंटा होते.

दिनांक २७।३।५१ इ. रोजीं सकाळीं **भद्र** भागांत महाराष्ट्र मंडळ आहे तें पाहाण्यास गेलों. वाटेनें जात असतां डाकुरची सहज आठवण झाली. तेथील स्त्रीपुरुष व मुलेंमुली ह्यांच्यांपैकीं बरेचजण चकण्या नजरेनें पाहातात असें आढळून आलें. त्याचें कारण भगवान् श्रीकृष्णाचा त्यांस ध्यास, हें असावें. महाराष्ट्र मंडळांत राहाण्याची सोय आहे व ग्रंथालय आहे. जवळच माझ्या परिचयाचे रंगाचे व्यापारी श्री. नारायणराव मोने यांस भेटावयास गेलों. त्यांच्या आग्रहावरून दुपारचें भोजन त्यांजकडे केलें व सिद्धपूर येथील रणछोडजीचे पुजारी कोरान्ने ह्यांची माहिती मिळविली.

**अहमदाबाद** साबरमती नदीवर असून तिजवर तीन पूल आहेत. ते तिन्ही पूल लोखंडी व फार मजबूत आहेत. शहराभोंवतीं मोठाले बुरूज व भव्य तट आहेत. लाल मैदानांत मशिदीजवळ अहमदाबाद येथील मोठमोठ्या सभा भरतात. भद्र हें विशिष्ट भागाला नांव पडण्याचें कारण असें दिसतें कीं, या भागांत भद्रकालीचें मंदिर आहे. तिजभोंवतालीं महाराष्ट्रीयांचीं सुमारें दोनशें बिऱ्हाडें आहेत. अहमदाबादेंत आलेल्या मनुष्याला महात्मा गांधींची आठवण होणें अपरिहार्य आहे. साबरमतीच्या कांठीं त्यांचा **ब्रह्मचर्याश्रम** आहे. सर्व हिंदूंना भगवान् श्रीकृष्णाविषयीं फारच भक्ति वाटते. त्यांतल्या त्यांत गुजराथेंतील वैष्णव जन अधिक भक्तिमान् असतात. याची प्रतीति **गीता-भवन** पाहून येते. या भवनाच्या भिंतीवर श्रीमद्भगवद्गीतेचे सर्व अध्याय लिहिले आहेत.

# सिद्धपूर

अहमदाबादेहून सकाळीं साडेसहा वाजतां निघून रेल्वेनें सिद्धपूरला साडेदहा वाजतां आलों. अहमदाबादेहून सिद्धपूर पंचेचाळीस मैल आहे. सिद्धपुरास श्री. कोराने ड्रॉइंग मास्तर यांजकडे रणछोडजीच्या मंदिरांत उतरलों.



॥ श्रीसरस्वतीध्यान श्लोक ॥

या कुन्देंदुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेष-
जाड्यापहा ॥ १ ॥

सिद्धपुरास **सरस्वती नदी** आहे. या क्षेत्रांत **रुद्र-महाल** नांवाची इमारत आहे. यांत सुमारें साठ फूट उंच व वीस फूट रुंद अशीं चार दालनें आहेत. नक्षीदार देवदेवता ह्यांच्या मूर्ति आहेत. ही इमारत एक मजली आहे. तिजवर आणखी दहा मजले होते. पण ते सर्व पडले. हा रुद्रमहाल सिद्ध राजानें पूर्ण केला म्हणून या क्षेत्रास 'सिद्धपूर' हें नांव मिळालें. या महालावर शिवलिंग होतें. तें तेराव्या शतकांत अल्लाउद्दिनानें विच्छिन्न केलें. येथील मुख्य देवालय महादेवाचें होय. त्याच्या आवारापाशीं, एक धर्मशाळा व आवारांत विहीर आहे. हें मंदिर बडोदा सरकारनें बांधलें असून सर्व खर्च सरकारांतून

चालतो. त्या मंदिराशिवाय विष्णु राधाकृष्ण, पंचमुखी मारुती, सरस्वती अशीं मंदिरें आहेत.

विष्णूचा सहावा अवतार **श्रीपरशुराम** यानें येथेंच तप करून मातृहत्येचें महापातक नष्ट केलें व आपल्या मातेचा उद्धार केला म्हणून या क्षेत्रास **मातृगया सिद्धपूर** असें म्हणतात. येथें आदले दिवशीं क्षौर व उपोषण करून दुसऱ्या दिवशीं मातेचें श्राद्ध बिंदुमाधवाच्या शेजारच्या धर्मशाळेंत करितात. येथें आई, आजी व पणजी ह्यांचे तीन पिंड व आईच्या इतर जन्मांतीलहि अवस्थांबद्दल सोळा पिंड मिळून एकंदर एकोणीस पिंडांचें श्राद्ध फक्त येथेंच होतें !

सिद्धपूर या क्षेत्रांतील तीर्थांत स्नानें केल्यानें पुनर्जन्म मिळत नाहीं अशी श्रद्धा आहे. सरस्वती नदी, रुद्रावर्त, कुरुक्षेत्र, प्रयाग, सिद्धपूर व प्रभास ह्या पांच क्षेत्रांत प्रगट झाली व तेथून काहीं अंतरावर गुप्त झाली असें श्रीसरस्वती माहात्म्यांत वर्णन आहे. सरस्वती नदी पुण्याजवळील मुठेएवढी आहे. तिच्यांतील पाणी वाहात असलें तरी तें फारसें खोल नाहीं, पण त्याला ओढ फार आहे. गोड्या जिन्यास खानदेशी लोक एकोरा धान्य म्हणतात. हें धान्य लहान पसाभर रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं त्याचें सत्त्व घेऊन त्यांत चवीसाठीं थोडी पिठी साखर घालून पितात. हें सत्त्व फार पौष्टिक असतें. ह्याचा चोथा ढोरें खातात.

गुजराती लोकांपेक्षां इकडील लोक सशक्त व आडदांड दिसले. येथील गाई, बैल, घोडे वगैरे प्राणी उंच व चांगले धष्ट-पुष्ट दिसले. मुसलमानांची वस्ती बरीच आहे. मुसलमानांत श्रीमंत व्यापारी बरेच आहेत. सिद्धपुराहून मी **मेहसाण्यास** आलों. हें वेस्टर्न इंडिया रेल्वेचें जंक्शन आहे. येथें पेणचे **श्री. शंकरपंत मनोहर** इलेक्ट्रिक इंजिनीअर हे महाराष्ट्र समाजाचे चिटणीस आहेत. समाजाच्या कायमच्या इमारतीसाठीं एका शेठजींनीं शंभर चौरस यार्ड जागा दिली आहे. या गांवीं शंभर महाराष्ट्रीयांचीं बिऱ्हाडें आहेत. दरवर्षी भाद्रपदांत श्रीगणेशोत्सव व आश्विनांत शारदीय उत्सव होत असतात.

त्या वेळीं व्याख्यानें, प्रवचनें व कीर्तनें वगैरे कार्यक्रम होतात. या गांवांत अंबामाता देऊळ व राक्षसास मारीत असलेली मारुति मूर्ति हीं मंदिरें आहेत. मेहसाण्याहून ३०।३।५१ इ. रोजीं रात्रीं ८॥ वाजतां रेल्वेनें निघून राजकोटास सकाळीं नऊ वाजतां पोहोंचलों. मेहसाणा ते राजकोट अंतर एकशें पंचाहत्तर मैल आहे.

**राजकोट** येथें डॉ. ब्राम नांवाचे सेवानिवृत्त चीफ मेडिकल ऑफिसर बरींच वर्षें राहात आहेत. त्यांनीं हगवणीवर एक रामबाण औषध सांगितलें. टेंबुर्णीच्या झाडास फळें येतात. तीं बदामाएवढीं मोठीं असतात. त्यांपैकीं एका फळाची पूड करावी, ती दर तीन तासांनीं मोठ्या रोग्यास एक-चतुर्थांश द्यावी व त्यावर त्यानें तीन घोट गरम पाणी प्यावें म्हणजे तो रोगमुक्त होतो. राजकोटचें भाजी मार्केट बरेंच मोठें आहे. शहराची वस्ती दीड लाख आहे. राजकोटास फार वेळ न थांबतां त्याच रात्रीं म्हणजे दिनांक ३१।३।५१ रोजीं रात्रीं नवाच्या गाडीनें निघून दुसरे दिवशीं सकाळीं नऊ वाजतां द्वारका स्टेशनावर आलों. भाडें तीन रुपये पडलें.

## द्वारका

द्वारका हा गांव पूर्वीं गायकवाडांच्या हद्दींत होता, पण गायकवाडाचें राज्य विलीन झाल्यावर द्वारका क्षेत्र भारत सरकारच्या ताब्यांत आलें. गांव फार मोठा नाहीं. वस्ती पंडे लोक व इतर ब्राह्मण ह्यांची आहे. येथें सर्व पाणी खारें व मचूळ आहे. पावसाळ्यांत पावसाचें जें पाणी पडतें तें सांठवून ठेवतात, तेंच वर्षभर पिण्याकडे व स्वयंपाकासाठीं वापरतात. हें पाणी विकत घ्यावयाचें झाल्यास एका घागरीस दोन आणे पडतात. गांवांत सिमेंटाचीं चांगलीं घरें बरींच आहेत. आळ्याहि बऱ्याच असून स्वच्छ आहेत. येथील सुवर्णद्वारका श्रीकृष्णानें बुडविल्यावर सध्यांचें नवें देऊळ विश्वकर्म्यानें एका रात्रींत बांधलें असें म्हणतात. विश्वकर्मा हा देवांचा शिल्पकार होय.

येथें द्वारकानाथाचें बरेंच मोठें देऊळ आहे. ह्याचें शिखर शंभर फूट उंच व पन्नास फूट रुंद आहे. गोपूर दरवाजावर असतें व शिखर मंदिरावर असतें. त्यास दहा खिडक्या आहेत. त्याचा घुमट सोनेरी आहे. त्याजवर पिवळें, तांबडें भव्य निशाण अहोरात्र फडकत असतें. देवाला रोज अकरा भोग दाखवितात. ते अनेक खाद्यपेयें, सुवासिक व रुचकर पक्वान्नांचे असतात. या भोगांचा प्रसाद अटका घेणारास सहजच मिळतो. जगन्नाथाप्रमाणें पंडे प्रसाद विकीत नाहींत. भोग देवळांतच पंचवीस माणसें स्वयंपाक करून तयार करीत असतात. अटका सव्वा रुपयापासून पांचशें रुपयांपर्यंत असतो. द्वारकेस मंदिरें पुष्कळ आहेत. द्वारकेस व विशेषतः काठेवाडांत गाई पुष्कळ आहेत——त्यामानानें म्हशी थोड्या आहेत. द्वारकेला समुद्र जवळ असल्यामुळें द्वारकेंतील सर्व तीर्थांचें पाणी भरतीच्या वेळीं वाढतें.



॥ श्रीकृष्णध्यान श्लोक ॥

श्रिया श्लिष्टो विष्णुः स्थिरचरगुरुर्वेदविषयो ।
धियांसाक्षीशुद्धो हरिरसुरहंताब्जनयनः ॥
गदी शंखी चक्री विमलवनमाली स्थिररुचिः ।
शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोक्षिविषयः ॥ १ ॥

द्वारकेंतील स्त्री-पुरुषांचे दागदागिने व पेहराव आम्हां महाराष्ट्रीयांना कांहींसे चमत्कारिक वाटतात. तेथील स्त्रिया आंतून घागरे नेसतात व त्यावरून लुगडीं पेहरतात, घागरे म्हणजे चुण्या घातलेले परकर होत. ते आंखूड असल्यामुळें लुगड्यांखालीं झांकून जातात. काठेवाडी बायका नथा घालतात, पण त्या महाराष्ट्रीय नथांप्रमाणें लहान नसतात. त्या हातांतील कडीं जेवढीं रुंद

असतात तेवढ्या रुंद असतात. पुरुष कानांत रुपयाएवढ्या आकाराचे सोन्याचे बाळे घालतात. ते आपले गळे व हातपाय चांदीच्या दागिन्यांनीं विभूषित करतात. त्यांच्या अंगांत कमरेपर्यंत अंगरखा असतो. डोक्याला मोठा धोतरी रुमाल, पायांत घट्ट पिवळसर पांढरी विजार, खालीं पायांत अति बोजड कातडी चढाऊ जोडे असतात. हीं सर्व माणसें मजबूत पण स्वभावानें फार लाघवी व नम्र असतात.

द्वारकेहून दिनांक २।४।५१ इ. रोजीं सकाळीं निघून **बेट द्वारकेस** आलों. मुख्य द्वारका व बेट द्वारका यांमधील अंतर बारा मैल आहे. बेट द्वारकेहून अर्ध्या मैलावर गोपी तलाव या नांवाचें तीर्थकुंड आहे. यांत यात्रेकरू स्नान करितात. या तलावांत भगवान् श्रीकृष्णानें सोळा सहस्र गोपींना मोक्ष दिला असें म्हणतात. या तलावापाशीं कोठेंहि जमीन तीन फूट खणल्यावर त्यांत चंदनासारखी माती मिळते. म्हणून या चंदनास गोपीचंदन म्हणतात. तेथें गोपीचंदनाच्या तीन कांड्या एक पैशास मिळत होत्या. या तलावापासून शंभर फूट लांब व पंधरा फूट रुंद असा रस्ता पडावापर्यंत जातो. या पडावांत सुमारें अर्धा तास बसून मी थेट द्वारकेला गेलों. श्रीकृष्णाला **सुदामा** येथें येऊन भेटला म्हणून या द्वारकेस कोणी **भेट द्वारका**हि म्हणतात. सुदामाचा गांव **सुदामपुरी** ओखा बंदराजवळच आहे. बेट द्वारकेस येतांना पडावाला माणशीं आठ आणे भाडें पडतें; पण त्याशिवाय माणशीं म्युनिसिपल कर पांच आणे द्यावा लागतो. तो दिला म्हणजे पंचकोनी शाईचा छाप हातावर अगर अंगावर मारतात.

या द्वारकेची वस्ती तीन हजार असून पन्नास पंडे आहेत. बेट द्वारकेंत शंखासुर तलाव आहे. त्यांत यात्रेकरू स्नान करितात व शंखनारायणाचें दर्शन घेऊन पवित्र होतात. या बेटांत शंख तयार होतात म्हणून या देवाचें नांव शंखनारायण असावें. बेट द्वारकेंत मुख्य मंदिर रणछोडजींचें आहे. याच्या चारहि बाजूंस चार दरवाजे आहेत व गोपुरेंहि आहेत.

मुख्य रणछोडजींच्या देवळावर एकवीस फूट लांब व वीस फूट रुंद असा हिरवा, पांढरा, निळा, पिवळा, भव्य बावटा अहोरात्र फडकत असतो. मंदिराचा कळस सोन्याचा आहे. या देवाचे कोट्यवधि रुपयांचे दागिने होते, त्या वेळीं या बेटावर गायकवाडांचें राज्य होतें. पण तें विलीन झाल्यामुळें येथील सर्वच स्थिति बदलून गेली आहे. त्यामुळें लोक उदासीन बनले आहेत.

या गांवीं गोशाळा असून तिच्यांत दोनशें गाई आहेत. एक **सरकारी वैदिक संस्कृत पाठशाळा** आहे. तिच्यांत सुमारें पंचवीस विद्यार्थी शिकत होते. बेट द्वारकेहून दिनांक ४–४–५१ इ. रोजीं सकाळीं आठाच्या गाडीनें पंचवीस मैलांवरील भाटिया स्टेशनावर उतरलों. तेथें एक वाजतां मोटार मिळाली. तिच्यांत बसून बारा मैल गेल्यावर वाटेंत एक **हर्षसिद्धि** देवीचें देऊळ व डोंगरावर **दुर्गादेवीचें** देऊळ आहे. त्यांचें दर्शन घेतलें. दुर्गादेवीस जातांना एकशें पंचवीस पायऱ्या चढून जावें लागतें. दुर्गादेवीहून होडींत बसून परतीरास गेल्यावर एक रुपया दोन आण्यांचें तिकीट काढून बारा मैलांवरील सुदामपुरीस आलों.

## सुदामपुरी

या वेळीं संध्याकाळ झाली होती. सुदामपुरी म्हणजेच हल्लींचें पोरबंदर होय. बाजारांत सुदामदेवाचें फार मोठें रम्य मंदिर आहे. तें संगमरवरी दगडी आहे. मी गेलों तेव्हां देवळांत प्रवचन सुरू होतें. सुमारें दोनशें पुरुष व दोनशें बायका व शंभर मुलें तें ऐकावयास बसलीं होतीं. येथें कीर्तिमंदिर नांवाची एक प्रेक्षणीय संस्था आहे.

ज्या ठिकाणीं महात्मा गांधींचा जन्म झाला त्या स्थळीं हें मंदिर बांधलें आहे. तें संगमरवरी दगडाचें, अतिभव्य, उंच व मनोहर आहे. मंदिरांत शिरतांच सुमारें पांच हात रुंद व पंधरा हात लांब अशा महात्मा गांधी व सौ. कस्तुरबा, यांच्या तसबिरी आहेत. मंदिरांतील दोन खोल्यांपैकीं एकींत गांधीजींचे वडील व दुसरींत त्यांच्या मातुश्री यांच्या तसबिरा

अनुक्रम..................
क्रमांक ..(१.१.१.) 234 नों: दि: 20/4/84

आहेत. महात्मा गांधी जेथें जन्मले त्या जागीं एक खोली ठेवली आहे. खोल्यांच्या बाहेर भिंतीवर गांधीजी चरक्यावर सूत काढीत आहेत. असा संतवेषांतील सात्त्विक, विरागी फोटो आहे. निरनिराळ्या भागांत संग्रहालय, ग्रंथवाचनालय, बालमंदिर, कापूस कांतणें, औषधालय इत्यादि उपसंस्था आहेत. त्या ठिकाणीं विद्यार्थी–विद्यार्थिनींना दररोज सुस्वभावी, विद्वान्, कलावन्त बनविण्याचें शिक्षण दिलें जातें. मंदिर तीन मजली, पण फार विस्तृत आहे. सुमारें पांचशें विद्यार्थी शिकतील इतकें तें मोठें आहे. मंदिरांतील निरनिराळ्या भागांत सत्याग्रह, अहिंसा, असहकारिता, शून्यता, विनम्रता, ब्रह्मचर्य, स्थितप्रज्ञता, परोपकारिता इत्यादि गुणांविषयीं गांधीजींना जीं आवडलीं तीं सुभाषितें लिहिलीं आहेत. श्रीमद्भगवद्गीतेंतील दुसरे अध्यायांतील स्थितप्रज्ञाचीं लक्षणें संस्कृत श्लोकांत जशींच्या तशींच उतरलेलीं आहेत. या दोन्ही स्थळीं राहून अध्ययन, अध्यापन व ईश्वरी चिंतन करण्याचा मोह पडतो !


म. गांधी


पोरबंदराहून वेरावळ स्टेशनास जाण्यासाठीं दिनांक ५–४–५१ इ. रोजीं सकाळीं आठ वाजतां निघालों. वाटेंत जेतलसर हें जंक्शन लागतें. तेथें दुपारीं १२ वाजतां उतरलों. जेतलसरहून सायंकाळीं ४ वाजतां गाडीनें निघून वेरावळला रात्रीं आठ वाजतां पोहोंचलों. वेरावळपासून दोन मैलांवर सोरटी सोमनाथाचें प्रसिद्ध देवालय आहे. येथें पंधरा दिवस राहिलों.

सोमनाथाहून मोरवीस जाण्यापूर्वी मी वाटेंत वेरावळाहून जुनागड येथें दिनांक २०।४।५१ इ. रोजीं आलों व स्टेशनावर रात्रीं निजलों. जुनागडला भुईकोट किल्ला आहे. सकाळीं जुनागड गांवांत येऊन दिनांक २१।४।५१ इ. रोजीं दुपारीं तीन वाजतां गिरनारला पायीं जावयास निघालों.

## गिरनार

सुमारें दोन मैल चालल्यावर राधादामोदर मंदिर लागलें. त्याच्याजवळच दामोदर नांवाची नदी आहे व नदींतच कुंडें आहेत. नदीचें पाणी

वाहात नव्हतें. नदीच्या दोन्ही बाजूंस फूल—फळझाडांच्या बागा आहेत. तेथून कांहीं अंतरावर **दीर्घमुखी मारुती** मंदिर आहे. आज तेथें हनुमान-जयंती उत्सव सुरू होता. सायंकाळीं सात वाजतां गिरनार पर्वताच्या पायथ्याशीं पोंचलों व रात्र झाल्यामुळें **जेठाभाई** धर्मशाळेंत राहिलों. धर्मशाळेंत राहण्याची उत्तम सोय होती. सकाळीं उठून हजार पायऱ्या चढून गेल्यावर **अंबाबाई** मंदिर लागलें. अंबाबाईची मूर्ति अष्टभुजा असून देऊळ संगमरवरी उत्तम बांधिलें आहे. येथून आणखी हजार पायऱ्या चढल्यावर **गोरखनाथाच्या** पादुकांपाशीं आलों. येथील पुजारी यात्रेकरूंना एक रुपयापासून पांच रुपयांपर्यंत दक्षणा ठेवण्यास सांगतात व तशी दक्षणा ठेवली म्हणजे तुझी गिरनारयात्रा सफल झाली असा त्यास आशीर्वाद देतात.



सिंह

येथून दोन हजार पायऱ्या चढल्यावर मनुष्य गिरनारच्या तिसऱ्या शिखरावर येतो. हें शिखर सर्वांत उंच व चढण्यास कठीण आहे. येथें **श्रीदत्तात्रयाच्या पादुका** आहेत. येथेंहि लोक पादुकांपुढें रुपयापासून अधिक दक्षणा ठेवतात व जे बरीच दक्षणा ठेवतील त्यास पुजारी ‘ तुझी यात्रा सफल झाली ’ असा आशीर्वाद देतो. येथून परत येतांना सुमारें शंभर पायऱ्या उतरल्यावर **दत्ताची धुनी** व **कमंडलू कुंड** आहे. त्यांतील पाणी थंड, शुद्ध व उत्कृष्ट आहे. दत्ताच्या धुनीचे महाराज गरिबांस प्रसाद म्हणून फुकट अन्न देतात व मग भक्तांनीं वाटल्यास देवापुढें इच्छित द्रव्य ठेवावें. सक्ती बिलकूल नसते. या डोंगरावर आंबा, चिंच, उंबर व करवंदी यांची बरीच झाडी आहे.

अंबाबाईच्या मंदिराजवळ साधूंना व गरिबांस अन्न फुकट मिळतें. येथें तीन कुंडें आहेत. त्यांचें पाणी स्वच्छ नाहीं. तरी कांहीं यात्रेकरू त्यांत स्नानें करितात. जवळच शिवमंदिर आहे. त्याचा व्यवस्थापक पंडेबुवा बरेंच द्रव्य अगर दागिने अर्पण केल्याशिवाय या कुंडांतील पाण्यास मुळींच

स्पर्श करूं देत नाहीं. या कुंडांच्या पायऱ्यांवर पैसे, चांदीचीं नाणीं, हसोळ्या, पायांतील वाळे वगैरे बऱ्याच जिनसा कुंडास अर्पण केलेल्या दिसत होत्या. हे पंडये यात्रेकरूंकडून बरेंच द्रव्य वसूल करून जो पुष्कळ द्रव्य देईल त्यासच तीर्थ देऊन, त्याच्या पाठीवर हात ठेवून 'तुझी गिरनार यात्रा सफल झाली' असें म्हणतात. यात्रेकरूंनीं अशा प्रसंगीं फसूं नये.

जेठाभाई धर्मशाळेजवळ जैनांचीं लहानमोठीं दहा मंदिरें आहेत. त्यांत एक अति मोठें आहे. या मंदिराचें आवार फार मोठें व शिखरेंहि बरींच आहेत. त्या आवारांत सभोंवार एकशेंआठ तीर्थंकरांच्या संगमरवरी चित्ताकर्षक पांढऱ्या मूर्ती आहेत. शिखरावरहि देवतांच्या मूर्ती आणि हत्ती, वाघ, सिंह हेहि कोरलेले आहेत. मुख्य शिखर सुमारें शंभर फूट उंच, चाळीस फूट रुंद व केशरी रंगानें सजविलेलें आहे. या देवळांत देणग्या स्वीकारण्यासाठीं व हिशेबासाठीं दोन स्वतंत्र कारकून ठेविले आहेत. सर्व देऊळ आलेल्या मंडळींस दाखविण्याकरितां एक स्वतंत्र मनुष्य आहे. जैनमंदिराकडे व तसेंच वरपर्यंत डोंगरावर जाणाऱ्या यात्रेकरूंच्या सोयीसाठीं गुजराथी पद्धतीचीं फराळाचीं दुकानें आहेत. या दुकानांत मेसूर, बुंदी वगैरे तुपांतील पदार्थ मिळतात. मधून मधून प्रवाशांना प्यावयास पाणी देण्याकरितां स्त्रिया व पुरुष बसलेले असतात.

हा पर्वत चढतांना मला एक बोवा दिसला.तो दोन्ही हातांनीं चिपळ्या वाजवीत होता व मुखानें "भगवान को भजो; अभिमान को त्यजो ॥" असें म्हणत असून त्यास पुष्कळ द्रव्य मिळत होतें. जुनागड व गिरनार यांच्या दरम्यान बसगाड्या जातात व येतात. त्यांस माणशीं भाडें सहा आणे पडतें. ती गाडी पंचवीस माणसें बसतील इतकी मोठी असते. घोड्यांच्या गाड्याहि असतात. त्या गाडीचें प्रत्येक वेळचें भाडें दोन तीन रुपये असतें. गिरनार पर्वताच्या पायथ्याशीं यात्रेकरूंना चढतांना उपयोगी पडतील अशा आंगठ्याएवढ्या जाड व चार फूट लांब काठ्या दोन आण्यांस एकप्रमाणें विकत मिळतात.

गिरनारहून परत जुनागड येथें बसनें आलों. जुनागडाहून दिनांक २२-४-५१ इ. रोजीं वाकानेरला सकाळीं नऊ वाजतां उतरून लागलींच एका तासानें **नजरबाग** स्टेशनावर सकाळीं अकरा वाजतां उतरलों. स्टेशनासमोरच **श्रीमंत परशुराम बळवंत गणपुले** यांचा पॉटरीचा मोटा कारखाना, बागा, बंगले, चाळी, शेतें, विहिरी व विजेचा कारखाना इत्यादि औद्योगिक दृश्यें दिसूं लागतात !

प्रथम गणपुले यांच्या कचेरींत जाऊन कार्यवाहांना भेटलों. तेथें मला परशुरामपंत परगांवीं गेले असल्याचें समजलें, तथापि त्यांच्या घरच्या मंडळींनीं माझी चांगली व्यवस्था लावून दिली. मी त्यांच्या अतिथिगृहांत राहात होतों व गुजराथी भोजनालयांत जेवीत होतों. तेथें असतांना मी मोरवी स्टेशन व बाजार पहावयास गेलों. मोरवीचें स्टेशन राजवाड्यासारखें भव्य आहे. जवळच एक बाग आहे व एका मोठ्या खांबास चारहि बाजूंस चार मोठीं घड्याळें आहेत. वाकानेर ते मोरवी लोकल गाड्या जात येत असतात. या दोन स्थळांत अंतर तीस मैल आहे. मोरवी हें नांव मोर या शब्दावरून पडलें असावें. कारण येथें पहाटेस मोरांचें ओरडणें ऐकूं येत होतें.

शेट परशुरामपंत गणपुले यांना इ. स. १९५४ त एकाहत्तरावें वर्ष लागलें. त्या वेळीं त्यांना जनतेनें एक लक्ष रुपयांची थैली अर्पण केली. ही सर्व रक्कम त्यांनीं देशांत, परदेशांत धंदेशिक्षण घेण्यास जाणाऱ्या लायक विद्यार्थ्यांसाठीं शिष्यवृत्त्या देण्यासाठीं राखून ठेविली आहे. यांचे पॉटरीचे कारखाने बडोदें, ध्रांगध्रा, ठाण, वाकानेर, मोरवी, सिओर वगैरे ठिकाणीं आहेत. सिओर हें ठिकाण भावनगराजवळ आहे. या सर्व कारखान्यांतून चिनी मातीसारख्या मातीच्या भांड्यांच्या जिनसा, पायखान्यांतील पात्रें, औषधी पात्रें, बरण्या, दगड्या, चहादाण्या, कपबशा, कौलें वगैरे सामान तयार होतें.

मोरवी ही पूर्वी राजधानी होती. तेथील राज्य विलीन झाल्यामुळें येथील महाराजांच्या हातांत कांहीं सत्ता राहिली नाहीं. तेथील राजे महाराजा **सर लखजी धीरजी** यांचा बंगला मोरवी स्टेशनापासून अर्ध्या तासाच्या अंतरावर आहे. तो तीन मजली व प्रशस्त आहे. यांच्याच साह्यानें परशुरामपंतांना आपला कारखाना येथें स्थापन करितां आला. हा कारखाना श्री. परशुराम-पंत ऊर्फ काका व त्यांचे पुतणे श्री. अनंतराव हे चालवितात. या कारखान्याचें क्षेत्रफळ एक चौ. मैल आहे. हा इ. स. १९३० मध्यें स्थापन झाला, तेव्हां भांडवल सहा लक्ष होतें तें इ. स. १९५१ मध्यें सोळा लक्ष झालें. या कारखान्यांत एक हजार लोक काम करितात. वार्षिक विक्री पंचवीस लक्ष व खर्च तेवीस लक्ष रुपये आहे.

## सोरटी सोमनाथ

**वेरावळ** हा मोठा व्यापारी गांव आहे. त्यांत आगपेट्यांचा मोठा कारखाना आहे. येथून दोन मैलांवर **प्रभासपट्टण** क्षेत्र आहे. यांत सोमनाथ मंदिर आहे. अति काळोख्या रात्रीं नऊ वाजतां एका बारा वर्षांच्या मुलानें नेमकें मजजवळ येऊन कंदिलाच्या साह्यानें फारच बिकट वाटेतून मला वे. शा. सं. मोंढे ह्यांच्या घरीं अत्यानंदानें नेलें! या देवळाचे पुजारी श्री. मोंढे यांच्याकडे उतरलों. दिनांक ५।४।५१ इ. रोजीं रात्रीं फराळ करून त्यांच्याकडे झोंपीं गेलों. दुसरे दिवशीं त्रिवेणी संगमावर स्नान-संध्यादि कृत्यें आटोपून श्रीसोमनाथाचें दर्शन घेतलें. त्रिवेणी संगमापासून सोमनाथ मंदिर अर्ध्या मैलावर आहे. संगमावर पाणी ढोपरभर व अस्वच्छ होतें. संगमापासून सोमनाथ मंदिराकडे जावयाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंस सुमारें तीन चारशें नारळीचीं झाडें लाविलीं आहेत. त्यांस वेळच्या वेळीं पाणी मिळत असल्यामुळें त्यांची वाढ चांगली होत आहे. जुनें सोमनाथ मंदिर व नवें सोमनाथ मंदिर यांमधील अंतर एक फर्लांग आहे. मी जुन्या सोमनाथाचें दर्शन घेतलें. हें मंदिर श्री. मोंढे यांच्या घराशेजारीं आहे. या देवळावर भगवा झेंडा फडकत असतो!

या देवळापुढें श्रीगणेश, मंकेश्वर व शेषशायी भगवान् हीं लहान देवळें आहेत. त्यांजवरहि भगवे झेंडे फडकत असतात. देवळाच्या गाभाऱ्यांत जाण्यास सुमारें तीस पायऱ्या उतराव्या लागतात. हें लिंग अर्थात् भुयारांत आहे. तें काळें कुळकुळीत व तेजस्वी आहे. त्याचा व्यास दोन फूट व उंची वर्तुळाकार तीन फूट आहे. शाळुंका चार फूट व्यासाची व आठ फूट लांबीची आहे. पिंडीपाशीं दहा नंदादीप अहोरात्र तेवत असतात. शिवलिंगाच्या पुढें पांढरा संगमरवरी नंदी असून तो लाडू खात असलेला दिसतो. नंदीपुढें लाडवांचा ढीग ठेवलेला आहे. गाभारा दहा फूट रुंद, तीस फूट लांब व वीस फूट उंच निमुळता आहे. या देवाची त्रिकाळ पूजा व नैवेद्य होतो. देवळांच्या आवारांत दोन आड आहेत. एकावर हातरहाट व दुसऱ्यावर पंप आहे. आड व धर्मशाळा हीं उदार लोकांनीं बांधून दिलीं आहेत. धर्मशाळा चांगली असून तिच्या तिसऱ्या मजल्यावर उत्तम ग्यालरी गच्चीसारखी विस्तृत आहे.

तिजवरून प्रभासपट्टण व वेरावळ यांचे मनोहर देखावे दिसतात. कांहीं लोक धर्मशाळेंत राहातात व कांहीं गुजराथी कुटुंबें सोमनाथाच्या आवारांत कायमचीं राहातात. शंकराला बिल्वदळ प्रिय आहे; पण तीं बेलाचीं झाडें येथें लावलीं तरी जगत नाहींत. सरदार वल्लभभाई पटेल यांचीच सोरटी सोमनाथाचें नवें देऊळ बांधण्याची कल्पना होती. हें देऊळ बांधण्याचें ठरलें तेव्हां जुन्या देवळांतील शिवलिंग हलवून नवीन देवळांत स्थापन करावें अशी त्यांची मनीषा होती. त्याप्रमाणें त्यांनीं श्री. मोंढे यांना सांगितलें. पण मोंढे पडले धर्मनिष्ठ व निःस्पृह. त्यांनीं वल्लभभाईंना साफ निक्षून सांगितलें कीं, हें कदापीहि होणार नाहीं. हें उत्तर ऐकून उपपंत-प्रधान वल्लभभाई रागावले तर नाहींतच; उलट मोंढे यांच्याविषयीं त्यांचा आदर अधिक वाढला व ते म्हणाले, "आम्हीं हें लिंग न हलवितां नवीन लिंग व नंदी आणून त्यांची नवीन मंदिरांत स्थापना करूं; पण त्या देवाचेहि पुजारी तुम्हीच आम्हांला हवेत!"

## ॥ द्वादश ज्योतिर्लिंगवर्णन ॥

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महांकालं ओंकारे अमलेश्वरम् ।
परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरम् ।
सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ।
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ।
हिमालये तु केदारं घृष्णेशं श्रीवेरुळे ।
एतानि ज्योतिर्लिंगानि सायं प्रातः पठेन्नरः ।
सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥ १ ॥

मी सोमनाथास गेलों तेव्हां नवीन देवळाचें काम सुरू होतें. हा जीर्णोद्धार सातव्या वेळेला होत आहे असें येथील वृद्धांनीं मला सांगितलें. नवीन देवळाचें आवार हजारों माणसें सहज मावतील इतकें मोठें आहे. देवळाच्या दक्षिण, पूर्व व पश्चिम बाजूंस समुद्र आहे. मंदिराच्या भोंवतालचा तट चाळीस फूट उंच व पांच फूट रुंद आहे. मंदिराच्या आवाराची लांबीरुंदी एकेक मैल आहे. नवीन पिंडी व नंदी हीं जयपुराहून दिनांक ६।४।५१ इ. रोजीं वेरावळला आणण्यांत आलीं. देवाच्या प्रतिष्ठापनेचा समारंभ चैत्रांत व्हावयाचा होता; पण तो महिना शास्त्रशुद्ध नसल्यामुळें हा समारंभ वैशाख शुद्ध ५ पासून सुरू होऊन सात दिवसांनीं समाप्त करण्याचें अधिकाऱ्यांनीं तज्ज्ञ पंडितांच्या संमतीनें ठरविलें.

सोरटी सोमनाथास जे यात्रेकरू येतात व ज्यांस शिधा हवा असतो त्यांस श्री. मोंढे हे एका वेळेस पावशेर आटा, पावशेर बटाटे धर्मार्थ देतात. शिधा देण्यापूर्वीं त्या व्यक्तीची जरूर ती माहिती नोंदणी–बुकांत लिहून ठेवतात. सोमनाथाच्या जीर्णोद्धाराचें काम चालू आहे. ह्यासाठीं नेमलेल्या समितींत श्री. नरहर विष्णु ऊर्फ काकासाहेब गाडगीळ, श्री. कन्हय्यालाल मुनशी, श्री. दत्तात्रय वामन रेगे, आय. सी. एस्. इत्यादि गृहस्थ आहेत. मंदिराच्या कायमच्या व्यवस्थेसाठीं, प्रभासपट्टणाच्या पूर्वेस,

वेरावळच्या प्राची रस्त्याच्या दक्षिणेस, हिरण्या नदीच्या पश्चिमेस व त्रिवेणी संगम आणि समुद्र ह्यांच्या उत्तरेस असलेली सुमारें पावणे तीनशें एकर जमीन, तसेंच पूर्वेस कोडीनारच्या बाजूस वासोडा गांवीं सुमारें सहा हजार नारळींच्या झाडांचें उत्पन्नहि देवासाठीं मिळणार आहे.

जीर्णोद्धार फंड जमविण्यासाठीं निरनिराळ्या ठिकाणीं पांच पेट्या ठेवल्या आहेत. येथील कामासाठीं जी रेती लागते ती काठेवाडी बैलगाडींतून वाहून नेतात. ते बैल इतके मजबूत असतात कीं, त्यांच्या इतकें काम करण्यास कोंकणांतील सहा बैल हवेत. मंदिराभोंवतीं ज्या संस्था व्हावयाच्या आहेत त्यांत **गीताभवन** ही एक संस्था आहे. तिच्या इमारतीला जे अठरा खांब लागतील त्यांपैकीं प्रत्येक खांबावर एकेक अध्याय असे १८ अध्याय लिहिले जावयाचे आहेत. एक **वैदिक संस्कृत पाठशाळा**हि सुव्यवस्थितपणें सुरू व्हावयाची आहे. सोमनाथ मंदिराचा गाभारा तीस फूट लांब, वीस फूट रुंद व एकशें पंच्याहत्तर फूट उंच व्हावयाचा आहे. गाभाऱ्याच्या बाहेर संगमरवरी फरशी केलेली आहे. सभामंडप सुमारें तीनशें फूट लांब व दीडशें फूट रुंद आहे. सर्व काम उत्तम करण्यांत आलें आहे. ही जागा तिकोनी आकाराची दीर्घ व वर्तुळाकार बनविली आहे.

श्रीमंत गगपुले यांच्या आश्रयानें त्या अतिथिगृहांत पंधरा दिवस राहिल्यावर प्रतिष्ठापनेचा दिवस जवळ येतांच फिरून सोमनाथास आलों. तेथील कार्यक्रम वैशाख शु. ५ पासून सुरू झाला. तेथें आलेल्या लोकांस खाण्याचे पदार्थ पुरविण्याचें काम भारतीय स्त्री मंडळ व महाजन किशोर मंडळ या दोन संस्थांकडे सोंपविण्यांत आलें होतें.

दिनांक ९।५।५१ इ. पासून इतर पुरोहितांबरोबर माझी राहाण्याची व भोजनाची सोय मोफत झाली. दिनांक ९।५।५१ इ. रोजीं सकाळीं ७॥ ला मंगल कार्यास सुरुवात होऊन ग्रहमक, पुण्याहवाचन वगैरे विधि होऊन निमंत्रित दोनशें ब्राह्मणांस प्रत्येकीं पांच रुपये दक्षणा, चाळीस रुपयांची एकेक शाल, पंधरा रुपयांची एकेक धोतरजोडी, तांब्या, पळी-पंचपात्री, ताम्हन इत्यादि देऊन मधुपर्क संभावना केली!

' श्रीसोमनाथ–जीर्णोद्धार महोत्सव पुरोहित ' ( कर्मकांड ) अशा मजकुराचा एकेक कागदी बिल्ला प्रत्येक पुरोहितास दिला होता. पहिल्या दिवशीं रात्रीं नऊ वाजेपर्यंत रुद्राचा अभिषेक केला. दुपारीं गव्हाचा साजुक तुपाचा शिरा व बटाट्याची भाजी वगैरे पदार्थांचें भोजन झालें. दुसरे दिवशीं दिनांक १०।५।५१ इ. रोजीं अकरा कुंडांत प्रत्येकीं अकरा अशा १२१ ब्राह्मणांकडून तीळ–तुपाचा महारुद्र स्वाहाकार दुपारीं एक वाजेपर्यंत करण्यांत आला. या दिवशीं दुपारीं जिलबीचें मिष्टान्नभोजन होतें. रात्रीं दोन तास मंत्रपुष्प झाला.

तिसरे दिवशीं म्हणजे दिनांक ११।५।५१ इ. रोजीं सकाळीं ९॥ वाजतां नव्या सोरटी सोमनाथ देवाची प्राणप्रतिष्ठा वाईचे **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** ह्यांच्याकरवीं झाली. प्राणप्रतिष्ठेसाठीं भारतांतील सर्व पवित्र नद्यांचें व सागरांचें पाणी व मृत्तिका हीं मुद्दाम आणविलीं होतीं. भारतांतील प्रमुख स्थळांहून निमंत्रित असे अनेक विद्वान् ब्राह्मण आले होते. त्यांस स्वयंसेवकांस व वृत्तपत्रांच्या बातमीदारांस राहावयास मोफत जागा व मोफत भोजन मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली होती.

दिनांक ११।५।५१ सकाळीं नऊ ते अकरापर्यंत दहा हजार अथर्वशीर्षावर्तनें झालीं. संध्याकाळीं ४ ते ५ श्री. बाबू पुरुषोत्तमदास टंडनजींनीं लोकांनीं धार्मिक, सामाजिक व राजकीय बाबतींत कसें वागावें? प्रत्येकानें–शाहाणपणाचें, सच्छिलपणाचें वर्तन कसें ठेवावें ह्याविषयीं उपदेश केला.

यादवांच्या संहारानंतर श्रीकृष्णानें आपला देह ज्या स्थळीं ठेविला त्या स्थळीं **पुण्यस्तंभ** ( शिलास्तंभ ) दिनांक ११।५।५१ इ. रोजीं सायंकाळीं ६ वाजतां नवानगरचे जामसाहेबांच्या हस्तें उभा केला. याच दिवशीं दुपारीं २॥ ते ४॥ पर्यंत **अखिल भारतीय संस्कृत परिषद** झाली. परिषदेचे अध्यक्ष **डॉ. राजेंद्रप्रसाद** हे होते. प्रतिनीधींची फी दोन रुपये होती. प्रतिनिधींना रेल्वेचा निम्मा खर्च माफ होता. या परिषदेंत कॉंग्रेसचे

अध्यक्ष श्री. बाबू पुरुषोत्तमदास टंडन, त्रावणकोर, कोचीनचे महाराज वगैरेंचीं भाषणें झालीं.

शनिवारीं सकाळीं ९ ते १२ पर्यंत रुद्राभिषेकासह सोमनाथाची महापूजा करण्यांत आली. भोजनोत्तर दोनशें पुरोहितांस कोणास दोनशें तर कोणास तीनशें रुपये असे **चाळीस हजार रुपये** दक्षणा म्हणून वांटण्यांत आले. वे. शा. सं. महाबळेश्वरकर पुरोहितांस सातशें रुपये दक्षणा मिळाली. दशग्रंथी ब्राह्मणांस प्रत्येकीं तीनशें रुपये दक्षणा देण्यांत आली.

प्रत्येक दिवशीं संध्याकाळीं एकेक तास ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी व अथर्ववेदी ह्यांचें मंत्रजागर झालें. जेथें अकरा कुंडें होतीं त्यांतील मुख्य कुंडांच्या समोर तीन ओट्यांवर नवग्रह व इतर देवता ह्यांसाठीं मिळून अडीचशें सुपाऱ्या मांडल्या होत्या. त्यांची पूजा कमिशनर श्री. रेगे व त्यांच्या धर्मपत्नी ह्यांनीं षोडशोपचारीं यथासांग केली. नजीकच्या मांडवांत आठ फूट लांब, आठ फूट रुंद व तीन फूट उंच अशा ओट्यावर धान्याचा चित्रविचित्र रंगांचा गालिचा काढिला होता. त्यावर सुमारें सव्वाशें सुपाऱ्या मांडून त्यांची पूजा अधिकारी ब्राह्मणांनीं केली. पांच कुंडांत पिंपळ, वड, खदिर इत्यादि प्रकारच्या घृतमिश्रित समिधांनीं तिन्ही दिवस हवन झालें. त्या पांच कुंडांशेजारीं छत्र, चामर, डमरू, घंटा, शंख व पितळी वाजवावयाचें शिंग इत्यादि वस्तु ठेविल्या होत्या.

अखिल भारतांतील एकशें पंचवीस पवित्र ठिकाणांचें गोडें व खारें पाणी, पन्नास स्थळांची मृत्तिका व पन्नास प्रकारच्या वनस्पति ह्या सर्वांचें शास्त्रोक्त स्नान देवाला दिनांक १०।५।५१ इ. रोजीं सकाळीं आठ ते दहापर्यंत अधिकारी पुरोहितांकडून यथासांग घालण्यांत आलें. सोमनाथाची नवीं पिंडी काळ्या पाषाणाची चार फूट उंच व तीन फूट व्यासाची तेजस्वी अशी आहे. शाळुंका सहा फूट लांब, चार फूट रुंद व दीर्घ वर्तुळाकार नक्षीसह आहे. नंदी सफेत पाषाणाचा पांच फूट लांब, चार फूट रुंद व सर्व आभरणांनीं युक्त आहे. गाभाऱ्याच्या दाराच्या दोन्ही

बाजूंस दोन सुंदर पऱ्या सफेत पाषाणाच्या एक फूट उंचीच्या व अर्धा फूट रुंदीच्या आहेत. गाभाऱ्याच्या आंत दोनशें माणसें बसतील इतका वर्तुळाकार मोठा आहे.

दिनांक १०।५।५१ इ. रोजीं रात्रीं आठ वाजतां सर्व ब्रह्मवृंदांकडून आरती व मंत्रपुष्प करण्यांत आला. एकंदर समारंभ फार थाटाचा झाला! मंडपहि उत्तम शृंगारण्यांत आले होते. आलेल्या मंडळींत वाईचे वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे अर्थात् प्रज्ञानंदस्वामी, पुण्याचे वे. शा. सं. किंजवडेकर, शेंडेशास्त्री, इंदूरचे न्यायरत्न नेनेशास्त्री, रामेश्वरचे रानडे ब्रह्मचारी, मुंबईचे आरोग्य भुवनाचे मालक काका तांबे वगैरे एकंदर समारंभाची व्यवस्था ठेवणारांत होते. सर्वांना तेथील भाषणें ऐकूं जाण्याकरितां दूरध्वनिवाहक यंत्रें लावण्यांत आलीं होतीं. दिनांक ११।५।५१ इ. हा या समारंभांतील मुख्य दिवस होय. या दिवशीं नवीन शिवलिंगाच्या प्रतिष्ठापनेला सकाळीं आठ वाजतां सुरुवात झाली.

ऋग्वेदी, सामवेदी, शुक्ल, कृष्ण यजुर्वेदी व अथर्ववेदी ब्राह्मणांनीं मायक्रोफोनपुढें निवडक ऋचा कांहीं वेळ म्हटल्या. नंतर रुद्रहि म्हटला. हा समारंभ पाहाण्यास स्त्रिया व पुरुष यांस बसण्याकरितां स्वतंत्र व्यवस्था होती. त्याशिवाय जेथें जागा सांपडेल तेथें लोक समारंभ पाहावयास बसले होते. कोणी घरावरील छपरांवर व झाडांवरहि बसले होते. एकंदर प्रेक्षकवर्ग एक लाखावर होता. पायदळ, घोडेस्वार, बंदुकधारी, स्वयंसेवक, स्वयंसेविका, फोटोग्राफर, वार्ताहर हजर होते. बँड, चौघडा वगैरे वाद्यांचा गजर चालूच होता. गाभाऱ्यांत **राष्ट्राध्यक्ष राजेंद्रप्रसाद** यांच्या हस्तें बरोबर नऊ वाजतां सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा झाली! रात्रीं **एकशें एकवीस तोफांची** देवाला सलामी देण्यांत आली. नंतर राजेंद्रप्रसादांचें भाषण झालें. पांच कुंडांपैकीं एका प्रमुख कुंडांत तुपाची संतत धार धरून कृत्य संपविण्यांत आलें. अखेर कमिशनर श्री. रेगे ह्यांनीं सहकुटुंब पुरोहितांची पूजा केली. त्यांनीं त्यांस आशीर्वाद दिले. देवाची मिळकत म्हणून रुपयाएवढ्या आकाराच्या

सुवर्णाच्या बारा प्रतिमा जमा करण्यांत आल्या. त्यावर देवतांच्या मूर्ति होत्या. या दिवशीं दुपारीं सर्व ब्रह्मवृंदांस बेसनांच्या लाडवाचें भोजन देण्यांत आलें.

हा सर्व समारंभ घडवून आणणारे **सरदार वल्लभभाई पटेल** या वेळीं दिवंगत झाले होते ! ही घटना दुःखद होय. तथापि त्यांच्या अनुपस्थितींत त्यांचे प्रतिनिधि श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांनीं समारंभास उपस्थित राहून त्यांचें कार्य उत्तम रीतीनें पार पाडलें ! याबद्दल त्यांस धन्यवाद देणें जरूर आहे. नवानगरचे जामसाहेब ह्यांनीं या कृत्यास एक लाख रुपयांची देणगी दिली. त्यांनीं स्वतः हजर राहून एकंदर कार्यक्रमांत उत्साहानें भाग घेतला.

सोमनाथाचा इतिहास अत्यंत शोकजनक आहे. त्याचें मंदिर सहा वेळां मुसलमानांनीं उध्वस्त केलें व तितक्या वेळां हिंदूंनीं तें पुनः बांधिलें. इ. स. १०२५ त गिझनीच्या महमुदानें या देवळाचा विध्वंस करून अपार संपत्ति स्वदेशीं नेली. कांहीं वर्षांनीं **भीमदेव व कुमारपाल** या राजांनीं तें पुन्हां बांधिलें. पण अडीचशें वर्षांनंतर अल्लाउद्दीन खिलजीचा बंधु अलफरखान ह्यानें इ. स. १२६७ मध्यें तें दुसऱ्यांदा उध्वस्त केलें. त्यानंतर **राजा महीपाल** देव यानें इ. स. १३०८ ते १३२५ पर्यंत पुन्हां बांधिलें. इ. स. १३७५ त पहिला मुसफरशाहा यानें या देवळाचा तिसऱ्या वेळां विध्वंस केला. त्यानंतर **स्थानिक ब्राह्मणांनीं** पुढाकार घेऊन देवळाचा पुन्हा जीर्णोद्धार केला. चौथ्यांदा मुसफरशाहाच्या नातवानें या देवळाचा विध्वंस केला तेव्हां **सर्व हिंदूंनीं** एकजुटीनें पुन्हां याचा जीर्णोद्धार केला ! नंतर इ. स. १४५९ त पहिल्या महंमदशहानें पांचव्यांदा हें देऊळ पाडून त्याची मशीद बनवली व ती औरंगजेबानें पूर्ण केली. कांहीं वर्षांनंतर **देवी अहिल्याबाईनीं** इ. स. १७८८ त देवळाचा जीर्णोद्धार केला; पण जुनागडच्या नबाबानें सहाव्यांदा त्याचा विध्वंस करून मशीद बनविली. आतां तो सर्व भाग साफ करून त्या ठिकाणीं सध्यांचें नवीन देऊळ

सातव्यांदा बांधलें जात आहे. जुन्या देवळाचे कांहीं अवशेष पुराणवस्तु खात्यानें जवळच एके ठिकाणीं जमा करून ठेविले आहेत.

## प्राचीक्षेत्र

प्रभासपट्टण क्षेत्रापासून चौदा मैलांवर पूर्वेस प्राचीक्षेत्र आहे. तेथें जाण्यास मोटारी मिळतात. माणशीं बारा आणे भाडें पडतें. प्राचीस बस स्टँडजवळ एक धर्मशाळा आहे. तेथें राहावयास जागा, भांडीं व अंथरूण प्रत्येकीं दोन आणे भाड्यानें मिळतें. जवळच काठेवाडी ब्राह्मणी भोजनालयांत भोजनाची सोय होते. शंभर पावलांवर पिंपळाचा वृक्ष आहे. पाहिला वृक्ष पांच हजार वर्षांपूर्वी धर्मराजानें लावला तो जुना होऊन नष्ट झाल्यावर तेथें नवीन वृक्ष रुजला व हा क्रम आजतागायत चालू आहे असें सांगतात. या पिंपळाला पार आहे. पिंपळाच्या बुंध्याशीं श्रीकृष्णाची मूर्ति व भोंवतालीं चार दिशांस गणेश, मारुति, अष्टभैरव इत्यादि मूर्ति आहेत. जवळच **सरस्वती** नदी पूर्वेकडे वाहात जात आहे.



॥ श्रीसूर्यध्यान श्लोक ॥

किं छत्रं किन्नु रत्नं तिलकमुत तथा कुण्डलं कौस्तुभो वा।
चक्रं वा वारिजं वेत्यमरयुवतिभिर्यद्बालिद्बोषि देहे ।
ऊर्ध्वे मौलौ ललाटे श्रवसि हृदि करे नाभिदेशे च दृष्टम् ।
**भगवान् श्रीसूर्य** पायात्तद्बोर्कबिंबं सचदनुजरिपुर्वर्धमानः क्रमेण ॥ १ ॥

तिला पाणी पुरुषभर खोल असून तिचें पात्र पन्नास फूट रुंद आहे' पाणी हलकें, स्वच्छ व गार आहे. नदींतच दोन कुंडें आहेत. त्यांना चांगला घाट बांधला आहे. येथें यात्रेकरू अवश्य स्नान करितात. नदीकांठीं बरीच झाडी असून तींत जांभळी, भोंकर, अशोक, कडूनिंब, वड, पिंपळ, पळस इत्यादि वृक्ष आहेत.

या नदीच्या कांठीं विठ्ठलेश्वराचें मंदिर आहे. देवळांत तीनशें माणसें मावतील इतकें तें मोठें आहे. त्याचा पुजारी गुजराथी आहे. त्याला

पगार दरमहा चाळीस रुपये मिळतो. विठ्ठलेश्वरीं दर चैत्र शुद्ध १५ ला मोठा उत्सव होतो. या देवळाला विठ्ठलेश्वर नांव कां पडलें याच्याविषयीं एक आख्यायिका आहे. बडोद्याच्या महाराजांचा विठ्ठल नांवाचा एक नोकर होता. त्यानें हें देऊळ **माधव व लक्ष्मी** यांच्याकरितां म्हणून बांधिलें. माधव व लक्ष्मी यांच्या मूर्ति सरस्वती नदीच्या कांठीं दोन जांभळीच्या झाडांखालीं आहेत. या मूर्ति सुबक आहेत. पण अर्धवट पाण्यांत बुडालेल्या आहेत. याच ठिकाणीं श्रीकृष्ण आले असतां त्यांचा एका पारध्याकडून शरवेध झाला ! त्या ठिकाणच्या या मूर्ति हा विठ्ठल आपण बांधलेल्या नवीन मंदिरांत बसविणार होता, पण श्रीकृष्णानें स्वप्नांत येऊन त्यास सांगितलें कीं, "आम्हांस येथेंच राहूं दे." आमच्यासाठीं विनाकारण तिकडे नेण्याची खटपट करूं नको. तेव्हां विठ्ठलानें मूळचा बेत रहित करून तेथें शिवलिंगाची स्थापना केली व त्यास '**विठ्ठलेश्वर**' असें नांव दिलें. या देवळाची व्यवस्था गायकवाड सरकारकडून ठेवण्यांत आली आहे. या नदीला प्रभासपट्टणाजवळ हिरण्या व कपिला या नद्या मिळून त्यांचा त्रिवेणीसंगम झाला आहे.

प्राचीक्षेत्र पाहून मी परत सोमनाथास यावयास निघालों. त्या वेळीं सायंकाळ झाली होती. परत जाण्यास बस मिळणें शक्य नव्हतें; तोंच परमेश्वरकृपेनें माझी अडचण दूर झाली. मोरवी येथील श्रीमंत चंद्रकांत रूपशंकर ओझा हे सरकारी बोअरिंग इंजिनीयर आहेत. त्यांचे बंधु श्रीसूर्यकांत ओझा हे आपल्या खासगी मोटारींतून सहकुटुंब सोमनाथास चालले होते. त्यांना मी आपल्या मोटारींत घेण्यास विनंति केली. त्यांनीं ती तात्काळ मान्य केल्यामुळें मी अर्ध्या तासाच्या आंत सोमनाथास आलों !

मंगळवार दिनांक १२।५।५१ इ. रोजीं सकाळीं सहा वाजतां सोमनाथाहून पायीं निघालों, तों वेरावळ येथें सात वाजतां पोंचलों. तेथून मेलचें दहा रुपये सहा आण्यांचें बडोद्याचें तिकीट काढून **विरमगांवाला** रात्रीं आलों. त्याच रात्रीं आठ वाजतां दुसऱ्या गाडींत बसून बडोद्यास पहाटे तीन वाजतां पोंचलों. विरमगांव स्टेशनावर आगगाडींत

गर्दी फारच होती, पण तसाच मी डब्यांत घुसून उभा राहिलों. तेथें दोन असुरी वृत्तीचे धटिंगण भेटले व ते माझा गळा दाबूं लागले, पण मी त्यांस बजावलें कीं, जर माझ्या जीवास अपाय झाला तर त्याबद्दल तुम्हांला धनरूपानें सहा हजार रुपये व शासनरूपानें जबर प्रायश्चित्त मिळाल्यावांचून राहाणार नाहीं ! या जरबेनें ते गप्प बसले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं बडोद्यास मी श्री. बाबूराव विनोद यांच्या घरीं सुखरूप पोंचलों.

बडोद्यास फार वेळ न थांबतां दिनांक १६।५।५१ इ. रोजीं मी चांदोर येथें आलों. बडोद्याहून चांदोरचें रेल्वेभाडें पंधरा आणे पडलें. मध्यंतरीं विश्वामित्री व दुभई या दोन स्टेशनांवर मला गाड्या बदलाव्या लागल्या. आतां मला नर्मदातीरीं गरुडेश्वर येथें जावयाचें होतें. तो मार्ग चांदोर ते राज पिंपळा दहा मैल; राजपिंपळा ते गरुडेश्वर दहा मैल असा आहे. हा प्रवास बसमधून केला. चांदोरला दुपारीं तीन वाजतां मी उतरलों. चांदोर हें गांव नर्मदेच्या कांठीं आहे. तेथें नावेस एक आणा भाडें देऊन नदी उतरलों. तेथून मोटारीचें भाडें आठ आणे देऊन राजपिंपळ्यास आलों. राजपिंपळ्याहून गरुडेश्वरीं जाण्यास आठ आणे भाडें पडलें. तेथेंहि नर्मदा गरुडेश्वरीं जाण्यासाठीं पुन्हां ओलांडावी लागते. या वेळीं नावेला एक आणा भाडें पडलें.

## गरुडेश्वर

येथें दत्तमंदिर व श्रीवासुदेवानंद सरस्वती यांचें समाधिस्थान हीं दोन प्रमुख स्थळें आहेत. समाधीच्या पूर्वेस दोन फर्लांगावर नारदेश्वर व गरुडेश्वर अशीं दोन शिवमंदिरें आहेत. या गरुडेश्वर मंदिरावरूनच या क्षेत्राला ' गरुडेश्वर ' हें नांव पडलें आहे. येथें आषाढ शुद्ध १ ला म्हणजे श्रीवासुदेवानंद सरस्वती यांच्या पुण्यतिथीला व मार्गशीर्षांत दत्तजयंतीला जत्रा भरतात. देऊळ प्रशस्त असून फरशी संगमरवरी आहे. सर्वत्र स्वच्छता व टापटीप विशेष आहे. हें स्थळ रम्य असून तेथें कोणासहि राहावेंसें वाटतें. दत्तमंदिर व समाधिस्थान यांचे पुजारी विद्वान् व आचारसंपन्न

असे महाराष्ट्रीय ब्राह्मण आहेत. हे पुजारी दोन असून त्यांस राहावयास जागा फुकट व एक वेळ भोजन व दरमहा वीस रुपये पगार मिळतो. त्यांस दर दिवशीं प्रत्येक देवावर एकेक रुद्राची एकादशिनी करावी लागते. त्याबद्दल त्यांस दरमहा वीस रुपये मिळून प्रत्येकास चाळीस रुपये पगार मिळतो. शिवाय बारा महिने येथें यात्रेकरू येत असतात. त्यांच्याकडून त्यांना प्रत्येकीं सालीना शेंदीडशें रुपये उत्पन्न मिळतें.

देवळाच्या उत्तरेस एक शिवमंदिर असून त्याची धर्मशाळा आहे. कांहीं दत्तभक्त देवळांत नामसप्ताह व श्रीगुरुचरित्रसप्ताहहि करीत असतात. या संस्थानाला शेतीचें उत्पन्न दरसाल चार हजार रुपये व देवापुढील दक्षणा एक हजार रुपये मिळून वार्षिक उत्पन्न पांच हजारांचें आहे. कोणाहि भक्तास संस्थानातर्फे एक वेळ भोजन मिळून सात दिवस राहावयास सांपडतें. या सर्व व्यवस्थेसाठीं दरमहा तीस रुपये पगाराचा एक आचारी आहे. दोन गडी व एक गुजराथी कोठीवाले आहेत. संन्याशांसाठीं एक स्वतंत्र घर आहे.

नारदेश्वराच्या मंदिरांत श्री. टेंबे स्वामी तप करीत असत. येथील एकंदर व्यवस्था उत्तम आहे हें खरें; पण वर्षाच्या तिन्ही ऋतूंत येथील हवा अतिशय कडक असते. गरुडेश्वरीं चार इयत्तांपर्यंत गुजराथी शाळा व पोस्ट ऑफिस आहे. गुजराथी व महाराष्ट्रीय ब्राह्मणांचीं सात घरें आहेत. यामुळें कोणाहि भक्तास मधुकरीवर निर्वाह करून येथें कांहीं दिवस राहातां येतें. याशिवाय शेतकऱ्यांची वस्ती तीनशें आहे. मी येथें तीन चार दिवस राहिलों होतों. एके दिवशीं रात्रीं ८ ते १० पर्यंत मी दत्तासमोर कीर्तन केलें. त्यांत पूर्वरंग "पतिव्रते जैसा, भ्रतार प्रमाण। आम्हां नारायण तैशापरी" या चरणावर केला व



भगवान् श्रीविष्णु

उत्तर रंगाला "बहिणाबाईचें आख्यान" लाविलें. तें श्रोत्यांना फार आवडलें असें दिसलें.

मी गरुडेश्वराहून प्रातःकाळीं सहा वाजतां पडावांत बसून नर्मदेच्या पैलतीरास गेलों व तेथून राजपिंपळ्यास मोटारीनें अकरा वाजतां आलों. **राजपिंपळा** येथें लोकल बोर्डानें बांधलेला धर्मशाळेवजा बंगला आहे. राजपिंपळयाजवळ ओरी, जनकेश्वर, बर्कल इत्यादि स्थळें आहेत. राजपिंपळ्यापासून ओरी पंधरा मैल आहे. तेथें सायंकाळीं चार वाजतां बसनें गेलों. ओरी गांव, श्रीनर्मदेच्या कांठीं आहे. येथें नावेनें नर्मदा उतरून जनकेश्वर या एका मैलावरील गांवीं धर्माधिकारी पुजारी यांजकडे रात्रीं वस्ती केली.

येथील व्यवस्था बरी होती. पंपासह विहीर असल्यामुळें पाण्याची सोय चांगली आहे. विहिरीजवळ एक पांढरा चाफा, औदुंबर व पिंपळ हे वृक्ष आहेत. येथें जनक राजानें तप केलें असें लोक सांगतात. जनकेश्वराहून एक मैल चालून **बर्कल** येथें आलों. येथें नावेंत बसून परतीरावर गेलों व तेथून एक मैल चालून श्रीशुकदेव मंदिरास आलों.

## शुक–व्यास मंदिरें

हा मार्ग नदीच्या कांठानें आहे. शुकदेव मंदिर दगडी व फार मजबूत आहे. देवळाभोंवतीं चार फूट उंच व दोन फूट रुंद दगडी कुसूं आहे. या आवारांत गणेश, राधाकृष्ण मंदिरें व शुकदेव तपपीठ आहे तसेंच **मार्कंडेय** व **रणछोड** मंदिरें आहेत. या देवळाचे मुख्य पुजारी श्री. लक्ष्मणराव भागवत हे श्रीमंत गृहस्थ आहेत. हें मंदिर चाळीस वर्षांपूर्वी एका गुजराथी व्यापाऱ्यानें एक लाख रुपये खर्च करून दुरुस्त केलें आहे. माघमासीं येथें मोठी जत्रा भरते. येथून नावेंत बसून नर्मदा उतरलों. तेथें दहा वाजतां नर्मदेंत स्नान करून सर्व आन्हिक कृत्यें यथास्थित आटोपलीं. येथून अर्ध्या मैलांवर एका श्रीमंत गुजराथी ब्राह्मणाचें **राम-मंदिर** आहे. त्यांत जाऊन रामाचें दर्शन घेतलें व दुपारीं त्यांच्या विनंतीवरून त्यांजकडे भोजन केलें.

॥ **संक्षिप्त भागवतवर्णन श्लोक** ॥

आदौ देवकिदेवगर्भजननं, गोपीगृहे वर्धनम् ।
मायापूतनजीवितापहरणं, गोवर्धनोद्धारणम् ।
कंसच्छेदनकौरवादिहननं, कुंतीसुतःपालनम् ।
एतद्भागवतं पुराणकथितं, श्रीकृष्णलीलामृतम् ॥ १ ॥

॥ **परम भागवतः स्मरण श्लोक** ॥

प्रल्हादनारदपराशरपुंडरीक, व्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ।
रुक्मांगदार्जुनवासिष्ठबिभीषणादीन्, पुण्यानिमान्परमभागवतां स्मरामि ॥

देवळाच्या डाव्या हातास **कैलास शिवमंदिर** आहे. येथें एका मोठ्या आवारांत बरीच शिवलिंगें आहेत. येथें दर्शनास येणाऱ्या माणसास एकेक लवंग प्रसाद म्हणून देतात. जवळच **व्यास** शिवमंदिर आहे. मुख्य पुजारी गुरव आहे व दुसरे पुजारी श्री. काटदरे शिक्षक आहेत. व्यास मंदिरांत **कार्तिक पौर्णिमेस** तीन दिवस मोठा उत्सव होतो. मंदिरासमोर एक मोठा **रांजण**फळाचा वृक्ष आहे. त्याला पार आहे; त्यावर बसून भक्तांना सावली, विश्रांति व गार वारा मिळून आनंद होतो ! याशिवाय एक **सिद्धेश्वर** शिवमंदिर आहे. त्याजवळ एक वाचनालय, **अन्नछत्र** व योगानंदाश्रम व धर्मशाळा हीं आहेत.

योगानंद या आश्रमांत यात्रेकरूंस जागा व भांडीं मिळून स्वतःच्या खर्चानें एक दिवस राहातां येतें. जनकेश्वराहून अर्ध्या मैलावर अनसूया

## अत्रि–अनसूया

॥ **सप्त–ऋषि श्लोक** ॥

कश्यपोऽत्रिभरद्वाजो, विश्वामित्रोऽथ गौतमः ।
जमदग्निर्वसिष्ठश्च, साध्वि चैवाप्यरुंधति ॥ १ ॥

क्षेत्र आहे. तेथें दिनांक २०।५।५१ इ. रोजीं सायंकाळीं आलों. अनसूया गांवाशेजारीं एक **महारोग्याचें रुग्णालय** आहे. त्यांत पाऊणशें

महारोगी आहेत. या रोग्यांच्या अंगास अत्रिऋषि जेथें तपश्चर्या करीत असत तेथील माती लावतात. तें तपस्थान अनसूया मंदिराजवळच आहे. त्यामुळें रोग्यांस आराम वाटतो. येथील प्रत्येक रोग्यास अर्धा शेर तांदूळ, अर्धा शेर आटा व अर्धा शेर दूध देतात. ही सर्व व्यवस्था **सरकारमार्फत** होते. जे श्रीमंत लोक, सावकार व व्यापारी या रुग्णालयास भेट देतात. तेहि रोग्यांना मिष्टान्न, वस्त्रें वगैरे पदार्थ धर्मार्थ देतात. या संस्थेचा वार्षिक खर्च वीस हजार रुपये असावा.

या रुग्णालयापासून एका फर्लांगावर अनसूया मंदिर आहे. मंदिर छोटें आहे. मंदिराच्या गाभाऱ्यांत अनसूयेची मूर्ति असून तिच्या उजव्या हातास विष्णु, डाव्या हातास ब्रह्मदेव व दरवाजावर शंकर आहेत. सर्व मूर्ति शुभ्र पाषाणाच्या आहेत. मंदिराजवळ दोन विहिरी हातराहाटाच्या आहेत. दोन धर्मशाळा आहेत. जे लोक नर्मदा–प्रदक्षिणा करितात त्यांस येथें एका वेळेस पुरेल इतका अवश्य पदार्थांचा शिधा मिळतो. त्यांनीं तो शिजवून खावा. अनसूया देवळाच्या खालीं अत्रिऋषि जेथें तपश्चर्या करीत, तेथें लहानशी घुमटी असून तींत शिवपिंडी आहे. अनसूयेच्या मूर्तीपुढें अत्रिऋषींच्या पादुका आहेत.

अनसूया क्षेत्राहून सकाळीं नर्मदेंत स्नानादि विधि आटोपून दिनांक २१।५।५१ इ. रोजीं सात वाजतां पायीं निघून चार मैलांवरील **शिनोर** गांवीं आलों. सर्व रस्ता नर्मदाकांठानें आहे. उजव्या हातास शंभर फूट उंचीचा डोंगर व डाव्या हातास नर्मदा आहे. मध्यें **कजेठा** गांवीं **सौभाग्य-सुंदरी** हें अनसूयेच्या भगिनीचें मंदिर आहे. देवी निजलेली आहे. शिनोर-लाहि नर्मदेला पांच घाट आहेत. त्यांवर भंडारेश्वर व श्रीकृष्णेश्वर हीं शिव मंदिरें आहेत. त्यांभोंवतालीं कण्हेर, अगस्ता, पारिजातक इत्यादि फुलझाडें आहेत. धर्मशाळा उत्तम आहे. शिनोरच्या दक्षिणेस दोन मैलांवर **मालसर** गांवीं **अंगारेश्वर** अगर **मंगळेश्वर** शिवमंदिर आहे. येथें दर मंगळवारीं व

श्रावण महिन्यांत बरीच यात्रा भरते. बडोद्याचे प्रसिद्ध नवकोट नारायण श्रीमंत मैराळ यांच्या मुलानें शिनोरला एक उत्तम श्रीगणेशमंदिर बांधलें आहे. त्यांतील गणपति संगमरवरी पाषाणाचा व उजव्या सोंडेचा आहे. मी येथून मैलभर चालून श्रीराममंदिरांत आलों व तेथील पुजारी श्री. कोरान्ने यांजकडे सकाळीं नऊ वाजतां पोंचल्यावर त्यांजकडे दुपारीं भोजन करून एकाच्या प्यासेंजर गाडीनें निघून मियांगांव स्टेशनावर उतरलों.

मियांगांवाहून बलसाड स्टेशन १०५ मैल आहे. बलसाडाहून पारडी सात मैल आहे. शिनोरहून मियांगांव साठ मैल आहे. शिनोर ते मियांगांवचें तिकीट पंधरा आणे आहे. मियांगांवाहून बलसाडचें भाडें पावणे तीन रुपये आहे. बलसाडहून पारडीचें भाडें तीन आणे पडलें. मी शिनोराहून दुपारीं दीड वाजतां निघालों; तों बलसाडला रात्रीं दहा वाजतां पोंचलों. तेथून अकरा वाजतां निघून पारडीस रात्रीं बारा वाजतां उतरलों, तेव्हां रात्रीं स्टेशनावर निजलों. तेथून सकाळीं दोन मैल चालून पारडीस पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या बंगल्यांत उतरलों. तेथें शौचमुखमार्जन, स्नान, संध्या, मानसिक पूजा, तर्पण, आसनें, प्राणायाम व सूर्यनमस्कार वगैरे कृत्यें यथासांग उरकलीं. दुपारीं त्यांच्यासमवेत भोजन केलें. पंडितजींचा बंगला व त्याचा परिसर पाहून मनाला फार संतोष वाटला! बंगल्याभोंवतालीं हापूस व पायरी कलमी आंब्याचीं झाडें व इतर फळझाडें व फुलझाडें ह्यांची गर्दी होती. त्यामुळें उन्हाळ्याचा त्रास बिलकुल होत नव्हता. भोजनोत्तर त्यांजबरोबर दीड तास विविध विषयांवर संवाद करून दिनांक २२।५।५१ इ. रोजीं अडीचच्या गाडीनें मुंबईस जाण्यास निघालों व रात्रीं नऊ वाजतां मुंबईस ब्राह्मणसभेंत सुखरूप पोंचलों. पारडी ते मुंबई अंतर दीडशें मैल असून रेल्वेभाडें तीन रुपये पडलें.

## गाणगापूर

आतां भरतखंडांतील बहुतेक क्षेत्रें माझीं पाहून झालीं होतीं. दत्तात्रय क्षेत्रें हीं पहावयाचीं राहिलीं होतीं; म्हणून तीं पाहाण्याकरितां पुण्याहून

दि. १६।६।५२ इ. रोजीं रात्रीं गाणगापुरास जावयास निघालों. रेल्वे भाडें सात रुपये पडलें. गाणगापुराला दुसऱ्या दिवशीं दुपारीं बाराला पोंचलों. स्टेशनापासून गाणगापूर गांव चौदा मैल आहे. तेथें जाण्यास मोटार-गाड्या मिळतात. माणशीं भाडें आठ, दहा आणे पडतें. गाणगापुरास यात्रेकरूंची सर्व सोय पुजारी करितात. उपाध्ये हे यात्रेकरूंचें राहाणें, भोजन, नैवेद्य, मधुकरी इत्यादींची व्यवस्था करितात. मधुकरी या शब्दानें वाचक गोंधळांत पडण्याचा संभव आहे याचा अर्थ जो यात्रेकरू गाणगा-पुरास जातो त्यानें मधुकरी मागितलीच पाहिजे असा नाहीं.



श्रीदत्त

॥ श्रीदत्तध्यान श्लोक ॥

देवाधिदेव विमलेश जगन्निवासा ।
हे भक्त मानस–सरोवर राजहंसा ।
त्रैलोक्य हें तव विलास तूं पूर्णब्रह्म ।
तूं एक वास करण्याप्रति सौख्यधाम ॥ १ ॥

गाणगापुरास मधुकरी मागून राहाणारे देवाचे कांहीं सेवेकरी असतात. गांवांत ब्राह्मणवस्ती फारशी नसल्यामुळें सेवेकऱ्यांना पुरेशी मधुकरी मिळणें जड जातें. म्हणून जे यात्रेकरू गाणगापुरास दर्शनासाठीं येतात त्यांनीं सेवेकऱ्यांना मधुकरी घालण्याकरितां कांहीं द्रव्य पुजाऱ्या-पाशीं अथवा उपाध्यापाशीं द्यावें अशी प्रथा आहे. त्याला अनुलक्षून वरील मधुकरी हा शब्द आहे. येथें जोशी आहेत; ते तेथील अष्टतीर्थांचें दर्शन करून आणतात. सालकरी हक्कदार हे पूजा, महापूजा, पालखी वगैरे कृत्यांत मदत करितात. पूजेसंबंधीं पुढीलप्रमाणें निरख म्हणजे दर आहेत. पादुकांच्या पूजेस सव्वा रुपया, महापूजेस तीन रुपये व पालखीच्या मिरवणुकीस तीस रुपये पडतात.

सुमारें पांचशें वर्षांपूर्वीं महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतावर मुसलमानांचा अंमल होता व ते हिंदूंचा धर्मछळ करून त्यांना बाटवीत होते. अशा

प्रतिकूल काळांत हिंदुधर्माचें रक्षण करणारे जे कित्येक साधु झाले त्यांपैकीं गाणगापूर येथील **श्रीनरसिंह सरस्वति स्वामी** हे एक होत. यांचा जन्म वऱ्हाडांत **कारंजा** या गांवीं झाला. त्यांनीं लहानपणींच संन्यासाश्रम स्वीकारला ! नृसिंहसरस्वतींना श्रीदत्तात्रयाचे अवतार समजतात. त्यांनीं सर्व भरतखंडभर प्रवास करून बद्रिकेदार, काशी, गया, प्रयाग, नृसिंहवाडी, औदुंबर इत्यादि क्षेत्रांत कांहीं दिवस वास्तव्य केलें. ह्या सर्वांपेक्षां त्यांचें वास्तव्य गाणगापुरासच दीर्घकाळ झालें. गाणगापूर हें क्षेत्र कर्नाटकांत **भीमा** नदीच्या कांठीं आहे. तेथून **गुलबर्गा** ही बहामनी राजांची राजधानी अगदीं जवळ आहे.

गाणगापूर क्षेत्राच्या पूर्वेस दोन फर्लांगांवर **कल्लेश्वर** संस्थान आहे. दक्षिणेस भीमा, पश्चिमेस एका मैलावर भागीरथी तीर्थ व विश्रांति कट्टा आहे व उत्तरेस तंतूकाचें देऊळ आहे. गाणगापूर क्षेत्रीं भीमेला घाट नाहीं ही मोठी उणीव आहे. ती आतां स्वराज्यांत तरी दूर होणें अवश्य आहे. गांवाच्या मध्यभागीं **श्रीनृसिंहसरस्वतींचा मठ** आहे. देऊळ दगडी आहे. भोंवतालीं ओवऱ्या आहेत. देवळापुढें सभामंडप आहे. गाभाऱ्यापुढें संगमरवरी उत्तम फरशी आहे. देवाचे सेवेकरी प्रदक्षिणा, जप, स्तोत्रपाठ, गुरुचरित्रपारायण इत्यादि कृत्यांत दंग असतात ! देवळासमोरचा सागवानी मंडप पुण्याचे कै. सरदार बाळासाहेब रास्ते यांनीं बांधला. मुख्य गाभाऱ्याच्या देव्हाऱ्यांत स्वामींनीं स्वहस्तें **पादुका** ठेविल्या आहेत. या पादुकांवर फक्त केशर, कस्तुरी, अष्टगंध व अत्तर वाहातात. या पादुकांचें दर्शन घेण्याची विशिष्ट वेळ असते. गाणगापुराचें महत्त्व या पादुकांमुळेंच वाढलें आहे. याशिवाय देवळांत चांदीची नयनमनोहर **दत्तमूर्ति** आहे. ती एक फूट उंच व एक फूट रुंद आहे. गांवापासून नैर्ऋत्येस दोन मैलांवर अमरजा व भीमा यांचा संगम आहे. महाराज गांवांतून संगमावर जातां येतांना विश्रांतीकरितां ज्यावर बसत असत असा एक कट्टा आहे. हा कट्टा, ज्या शेतकऱ्याचें शेत महाराजांच्या कृपेनें पुष्कळ पिकलें त्या शेतांत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्र(१.३.२.) 233645 दि: 31-5-1927
क्रमांक 234 नों: दि: 20/5/58
संगमाजवळच एक **भस्माचा डोंगर** आहे. त्यांतून पुष्कळ लोक दरसाल भस्म घेऊन जातात. संगमावर संगमेश्वर मंदिर आहे. त्याच्यासमोर पूर्वाभिमुख महाराजांचें देऊळ आहे. या ठिकाणीं पूर्वी एक मोठा अश्वत्थ वृक्ष होता. त्याच्याखालीं महाराज अनुष्ठानास बसत. हा वृक्ष पडल्यावर श्रीमंत बाळासाहेब रास्ते यांनीं येथें पादुका व लिंग स्थापून देऊळ बांधलें. समोरच्या ओट्यावर एक औदुंबर वृक्ष होता, तो वठला होता. त्याजवर महाराजांनीं आपल्या कमंडलूंतील पाण्याचें सिंचन करून त्यास पालवी आणली. तो वृक्ष चाळीस वर्षांपूर्वी पुराबरोबर वाहून गेला.

स्वामींच्या मठांतील दैनिक कार्यक्रम पहाटे तीन वाजतां सुरू होतो. प्रथम चौघडा वाजवून पंधरा मिनिटें काकड आरती चालते व महापूजा विसर्जन होऊन नव्या पूजेस सुरुवात होते. देवळांतील नृसिंह, शालिग्राम, दाक्षिणावर्ति शंख, शिवलिंगें व बाण ह्यांवर लघुन्यास व महान्यासपूर्वक रुद्राची एकादशिनी करितात. मग महाराजांच्या निर्गुण पादुकांचें पूजन व इतर देवांचें पूजन होऊन प्रातःकाळची आरती करितात. जमलेल्या सर्व मंडळींस तीर्थ, पंचामृत देतात. हा कार्यक्रम सकाळीं दहा वाजतां संपतो. माध्यान्हकाळीं बारा वाजतां महानैवेद्य होईपर्यंत सर्वांना पादुकांचें दर्शन व पूजा करितां येते. रात्रीं आठ वाजतां एक तासभर आरती होते. नंतर **इंदुकोटी** स्तोत्र म्हणतात. देवळाभोंवतीं सालकरी पुजारी सर्व देवांस भालदार-चोपदारांसहित वाद्यांच्या गजरांत आरती दाखवीत तीन प्रदक्षिणा घालतात.

दर गुरुवारीं व कोणा भक्तानें खर्चास तीस रुपये दिल्यास इतर वारीं देवाची पालखींतून मिरवणूक निघते. पालखीबरोबर छत्र, दोन चामरें, मशाली, भजनी मंडळी, वाजंत्री व इतर मंडळी असतात. तीन प्रदक्षिणा झाल्यावर सर्व मंडळींस तीर्थप्रसाद व अंगारा देतात. देवळाबाहेर मंडपांत श्रीवासुदेवानंद सरस्वतीकृत **करुण-त्रिपदी-कवन** मोठ्या श्रद्धेनें सर्व म्हणतात. विडा व शेजारतीचीं कवनें म्हणून झाल्यावर देऊळ बंद होतें.

रोज त्रिकाळ पूजेच्या वेळीं चौघडा वाजत असतो. हा श्रीमंत राजेराय-बहादुर दक्षिण हैद्राबाद ह्यांनीं ठेविला आहे. येथें वर्षांत निरनिराळ्या दिवशीं निरनिराळे समारंभ होत असतात. त्यांपैकीं श्रीपाद श्रीवल्लभांचा जन्मोत्सव भाद्रपद शुद्ध ४ स होतो. पौष शुद्ध २ स श्रीनृसिंहसरस्वतींचा मोठा जन्मोत्सव होतो. मार्गशीर्ष शुद्ध १४ स दत्तजयंतीचा उत्सव होतो. श्रीपाद श्रीवल्लभ हे दत्तात्रयाचे प्रथम अवतार व नृसिंहसरस्वती हे दत्तात्रयाचे दुसरे अवतार समजतात.

गाणगापुरास मी सात दिवस राहिलों. त्यांपैकीं तीन दिवसांत गुरुचरित्राचें मनोभावानें पारायण केलें. दिनांक २०।६।५२ इ. रोजीं सायंकाळीं ४॥ ते ६॥ पर्यंत एकनाथ आख्यानावर मी कीर्तन केलें. त्यावेळीं ' **सद्‌गुरु-वांचुनी सांपडेना सोय; धरावे ते पाय आधीं आधीं** " ह्या कवनावर पूर्वरंग झाला. कीर्तनास शंभरावर मंडळी होती. आरती दोन रुपये जमली. त्यांतून एक रुपया ' श्रीहरिकीर्तन पाठशाळा ' पुणें ह्या संस्थेस जमा केला व एक रुपया पुजाऱ्यांस दिला. पवमान व रुद्र ह्यांच्या दोन एकादशिन्या केल्या. या गांवाची हवा उत्तम आहे. गांवकरी लोक गरीबच पण देवभक्त व सालस आहेत. मी दिनांक २३।६।५२ इ. रोजीं सकाळीं सहाच्या मोटारीनें गाणगापुराहून निघून गाणगापूर स्टेशनावर आलों.

## अक्कलकोट

तेथें आठ वाजतां आगगाडींत बसून अक्कलकोट स्टेशनावर उतरलों. या दोन स्टेशनांमधील अंतर पन्नास मैल आहे. अक्कलकोट स्टेशनापासून अक्कल-कोट गांवीं जाण्यास बस गाड्या मिळतात. तिला भाडें आठ आणे पडतें. अक्कलकोटचे महाराज यांनीं ज्या वडाखालीं देह ठेविला तेथें एक देऊळ बांधण्यांत आलें आहे. त्या देवळाचे पुजारी श्री. दिगंबरबोवा यांजकडे उतरलों. त्यांच्या घरीं भोजन केलें. देवळाजवळ पुजाऱ्यांचें वसति-स्थान, अन्नपूर्णागृह व धर्मशाळा आहेत. देवळांत शिवपिंडी व महाराजांचा चांदीचा मुखवटा आहे. अक्कलकोट येथेंच तेथील बुधवार पेठेंत पोस्टाजवळ

समाधिमंदिर आहे. त्यांत महाराजांच्या पादुका आहेत. मंदिर पांचशें लोक वसतील इतकें मोठें आहे. अक्कलकोट महाराजांचे शिष्य श्री. बाळाभाऊ जोशी हे होते. त्यांच्या वंशजांकडेच देवाची सर्व व्यवस्था आहे. दोन्हीं स्थळीं औदुंबर वृक्ष व त्यांस पार आहेत. अक्कलकोट महाराजांचे शिष्य कै. बाळूआण्णा यांचाहि एक मोठा मठ आहे. त्यापुढें बाग, विहीर वगैरे सर्व सोई आहेत. तेथें यात्रेकरूंस एक दिवस राहावयास मिळतें.

अक्कलकोट गांवची वस्ती बारा हजार आहे. गांवांत लिंगायत लोकांचीं अडतीचीं दुकानें आहेत. अक्कलकोट ही राजेसाहेब भोसले यांची राजधानी होती, पण आतां संस्थान विलीन झाल्यापासून राजवाड्यांत सरकारी कचेऱ्या आहेत. राजवाड्यास लागूनच एक मशीद आहे. अक्कलकोटाहून थेट सोलापुरास जाण्यास मोटारी मिळतात. अंतर चाळीस मैल आहे. मी दिनांक २५।६।५२ इ. रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां निघून दीड तासांत सोलापुरास आलों. **सोलापुरांत** जुनें विठ्ठलमंदिर म्हणून एक फार मोठें देऊळ आहे. देवळापाशीं धर्मशाळा आहे. प्रख्यात लावणीकार शिवभक्त **रामजोशी** ह्यांच्या पूर्वजांनीं सुमारें सहाशें वर्षांपूर्वी हें बांधलें आहे. सोलापुरास मोठा भुईकोट किल्ला आहे. त्यांत एक नरसोबाचें देऊळ आहे. किल्ल्यांत सध्यां वस्ती नाहीं. सोलापूर हें फार मोठें व्यापारी शहर आहे. याची लोकसंख्या दोन तीन लक्ष असावी. येथें कांहीं गिरण्याहि आहेत.

## श्रीतुळजापूर

सोलापुरापासून पूर्वेस चाळीस मैलांवर तुळजापूर नांवाचें क्षेत्र आहे. येथील भवानीदेवी प्रसिद्ध आहे. ही शिवाजी महाराजांची कुलस्वामिनी आहे. सोलापुराहून तुळजापुरास जावयास मोटारभाडें माणशीं सव्वादोन रुपये पडतें. तुळजापूर गांव उंचवट्यावर आहे. देवीचें देऊळ जरा खोलगट जागेंत असून तेथें जावयास बऱ्याच पायऱ्या उतराव्या लागतात. डाव्या हातास हौद आहे. देवळाची व्यवस्था पंचसमितीनें चांगली

ठेवली आहे. देवीचे अलंकार लाखों रुपये किंमतीचे आहेत. तिला अनेक मराठे सरदारांनीं उत्पन्नें दिलीं आहेत. देवीची मूर्ति सुबक आहे. देवळांत




तुळजापूरची देवी

जिकडे तिकडे नवसाचे रुपये ठोकलेले आहेत. येथें नवरात्रांत मोठा उत्सव होतो. येथील पुजाऱ्यांस ' भोपे ' म्हणतात.

सोलापुराहून दिनांक २८।६।५२ इ. रोजीं सकाळीं आगगाडीनें विजापुरास जावयास निघालों. सोलापुरापासून विजापूर रेल्वेनें सत्तर मैल आहे. तेथें दुपारीं १२॥ वाजतां पोंचलों. विजापुरास जातांना वाटेंत एक सामाजिक दृश्य दिसलें. तेथें लमाण जातीच्या स्त्रिया होत्या. प्रत्येक स्त्री आंत झग्यावरून लुगडें नेसली होती. या लुगड्यावर रुपयाएवढे पांढरे चमकदार तुकडे बुट्ट्यासारखे दिसत होते. घोट्यापासून वर अर्ध्या पायापर्यंत त्यांनीं वाळे घातले होते व हाताच्या मनगटापासून कोपरापर्यंत हस्तिदंतासारख्या दिसणाऱ्या रुंद चपट्या बांगड्या घातल्या होत्या. पायांत, गळ्यांत, कानांत व नाकांत बरेच अवघड चांदीचे भरपूर दागिने होते. यामुळें त्या बाया विचित्र सोंगासारख्या दिसत होत्या.

**विजापूर** ही एक वेळ आदिलशाहीची राजधानी होती. आदिलशाहीची सत्ता महाराष्ट्रावरहि होती. तें राज्य संपन्न व प्रबळ असल्यामुळें त्या राजवटींत विजापुरांत अनेक सुंदर व भव्य इमारती बांधण्यांत आल्या. त्यांपैकींच **गोलघुमट**, जुम्मामशीद, असारमहाल, आनंदमहाल, जोडघुमट, इत्यादि होत. त्यांपैकीं कांहीं इमारतींत हल्लीं सरकारी कचेऱ्या आहेत. ह्या इमारतींपैकीं बऱ्याच इमारती मशीद व दर्गा ह्या स्वरूपाच्या असल्यामुळें पाश्चात्य प्रवासी या शहराला थडग्यांचें शहर म्हणजे '**कबरस्तान**' म्हणतात. विजापूर ज्या वेळेला आदिलशाहीची राजधानी होती त्या वेळीं तेथील वस्ती फार मोठी असे. पण अलीकडे दोन अडीच वर्षें तें शहर अगदींच रोडावलें होतें व मोडकळीस आलें होतें; पण सध्यां सर्वच शहरांची

वस्ती वाढली, तशी विजापुराचीहि वाढल्यामुळें त्याची लोकसंख्या हल्लीं साठ हजार आहे. विजापुराभोंवतालीं एकांत एक दोन तीन तट बांधून मुसलमान राज्यकर्त्यांनीं त्याला फार मजबुती आणली होती.

विजापूरचा प्रसिद्ध **वोलघुमट** विजापूर शहराबाहेर असून तो स्टेशनावरूनहि दिसतो. हा घुमट सुमारें सव्वातीनशें वर्षांपूर्वी बांधला. त्याचें बांधकाम तीस बत्तीस वर्षें चाललें होतें. याची उंची दोनशें सहा फूट, व्यास एकशें चोवीस फूट व त्याला सात मजले आहेत. या इमारतीच्या मध्यभागीं महमद आदिलशाहा या बादशाहाचें थडगें तळमजल्यावर आहे. या इमारतीला आंतल्या बाजूनें एकशें नऊ फुटांवर ग्यालरी आहे. ग्यालरीची रुंदी अकरा फूट आहे. हा घुमट नांवाप्रमाणेंच वाटोळा असल्यामुळें ग्यालरींतून हिंडतांना त्या इमारतीच्या दगडी भिंतीवर कोठेंहि बारीक आवाज काढला; तरी तो उलट बाजूला मधली पोकळी ओलांडून ऐकूं जातो व त्याचे एकामागून एक निघणारे सात प्रतिध्वनि ऐकून मनुष्य आश्चर्यचकित व कांहींसा भयभीत होतो ! हा घुमट मध्यंतरीं मोडकळीस आला होता. म्हणून तो भारत सरकारानें दोन लक्ष रुपये खर्चून दुरुस्त केला.

या गोलघुमटाच्या इमारतींत ब्रिटिश सरकारच्या वेळेपासून एक पदार्थसंग्रहालय ठेवण्यांत आलें आहे. त्यांत विजापूरचे बादशाहा व त्यांच्या राण्या ह्यांच्या तसबिरी, तसेंच **नाना फडणवीस व सवाई माधवराव** यांच्या तसबिरी आहेत. याशिवाय लोंकरीचे सहा गालिचे, चिनी भांडीं, फारशी व अरबी भाषेंतील पुस्तकें, फारशी भाषेंतील सनदीचे पन्नास कागद, युद्धांतील हत्यारें, देव-देवींचे पुतळे, विजयानगरच्या रामराज्याचा दगडी फुटलेला मुखवटा इत्यादि वस्तु आहेत.

येथील जुम्मा मशीद फारच अवाढव्य आहे. या मशिदींत बादशाहाच्या राजवटींत त्याचे अमीरउमराव नमाज पढण्यास बसत असत. त्यांच्याकरितां सोनेरी बऱ्याच मेहेरपी जमिनीवर काढण्यांत आल्या आहेत. आपण लग्नसमारंभांत जेवावयास बसलों असतां केळींच्या पानांभोंवतीं

रांगोळीच्या जशा मेहरपी काढितों तशा या मेहरपी आहेत. **तासबावडी** नांवाचा मोठा तलाव आहे. त्याच्या भोंवतीं पन्नास फूट उंचीची चौफेर भिंत आहे चाऱ्ही बाजूंस तळ्यांत उतरण्याकरितां कमानी आहेत. तलाव दीडशें फूट लांब रुंद असून फार खोल आहे.

एका बाईनें गोंवऱ्या विकून त्यांचा जो पैसा आला, तो खर्चून एक बुरूज बांधिला म्हणूनच या बुरुजाला उपळ्या बुरूज असें म्हणतात. याच बुरुजावर ' मुलूख मैदान ' नांवाची अति मोठी प्रसिद्ध तोफ आहे. तिला चाकें असल्यामुळें तिला वाटेल तिकडे नेतां येतें. हिची लांबी सोळा फूट व छिद्राचा व्यास अडीच फूट आहे. या बुरुजावरून विजापूरचा सर्व देखावा उत्तम प्रकारें दिसतो.

विजापूरला मी एका खाणावळींत उतरलों होतों. तेथील एक डॉक्टर श्री. वामन वासुदेव फडणीस यांची सहज गांठ पडली. ते विजापुरांतील एक प्रसिद्ध डॉक्टर आहेत. त्यांस सर्पदंशांचा मंत्र येतो. या मंत्रानें त्यांनीं शेंकडों मनुष्यांस वांचविलें आहे. त्यांनीं मला स्वयंस्फूर्तीनें तीन मैलांवरील दोन साधुपुरुषांच्या समाधीचें दर्शन घेण्यास नेलें. त्यांपैकीं एका साधूचें नांव ' कुडली ' महाराज. कुडली म्हणजे कुऱ्हाड. हे चांदीची कुऱ्हाड नेहमीं जवळ बाळगीत म्हणून त्यांचें नांव कुडली महाराज असें पडलें. तें वयाच्या एकशें पंचाविसाव्या वर्षी इ. स. १९३६ त समाधिस्थ झाले. हे शरीरानें धिप्पाड होते. विजापुरांत एक **'दरबार' आड** नांवाचें श्रीमंत घराणें आहे. या कुळांत संतति वांचत नव्हती, पण कुडली महाराजांच्या वास्तव्यानें हें घराणें संतानयुक्त झालें. हे सत्पुरुष चार पांच माणसांस पुरेल इतका चहा आपल्या शिष्याकडून करवीत व तें भांडें झाकून ठेवीत, पण त्या पात्रांतून महाराजांची आज्ञा झाली म्हणजे तो शिष्य चहा देई. तो शेंदोनशें मनुष्यांस पुरत असे ! एका इसमानें कुडली महाराजांची दरिद्री म्हणून निंदा केली. कारण ते पिठाचे रोट विस्तवावर भाजून व सांबाऱ्यांत बुडवून खात असत. त्या इसमास त्यांनीं आपल्या आसनाखालीं

हात घालून द्रव्य घेण्यास सांगितलें. त्यानें हात घालून पुष्कळ रुपये घेतले व तो चालू लागला; तेव्हां महाराजांनीं सांगितलें कीं, हें द्रव्य नेशील तर तुझें निःसंतान होईल! म्हणून त्यानें खिशांत हात घालून पाहिलें तों तें द्रव्य नाहींसें झालें होतें!

दुसरे सत्पुरुष 'श्रीरुक्मांगद' हे होत. यांनीं आदिलशाहाचे मंत्री असतां जिवंत समाधि घेतली होती. त्यांच्या दर्शनास दर गुरुवारीं पुष्कळ भक्त येतात. विजापुरास कपाशी व भुईमूग यांचा व्यापार फार होतो. शेंग-दाण्यापासून तेल काढणाऱ्या गिरण्या येथें पांच सहा आहेत. कापसाचे गठ्ठे बांधणारे कारखानेहि आहेत. विजापुरापासून मिरज ऐंशी मैलांवर आहे. तेथें जाण्यास मोटारी मिळतात. त्यांचा तळ **तासबावडी**जवळ आहे. तेथून दि. २।७।५२ इ. रोजीं दुपारीं १॥ वाजतां मिरजेस जाण्यास निघालों. भाडें चार रुपये पडलें.

मिरजेस सायंकाळीं चार वाजतां पोंचलों व श्रीवासुदेव दत्तात्रय ऊर्फ काका करमरकर यांच्या बिऱ्हाडीं उतरलों. ह्यांनीं उत्तम आदरातिथ्य केलें! त्यांचा पत्ता विजापूरचे श्री. दत्तात्रय काशिनाथ छत्रे यांनीं दिला होता. मिरजेस जातांना वाटेंत पावसाच्या मोठमोठ्या सरीवर सरी आल्या. त्यामुळें गाडींत गळूं लागलें. मिरजेची लोकसंख्या पन्नास हजार आहे. तेथें श्रीसमर्थ रामदास ह्यांची शिष्यीण वेणाबाई ह्यांचा मठ आहे. या मठांत रामदासांनीं वेणाबाईस दिलेल्या **श्रीराम, सीता, लक्ष्मण** यांच्या पितळेच्या मूर्ति आहेत. या मठांतच समर्थांनीं शेणाचा मारुति स्वहस्तें स्थापिला आहे. त्या मठांतील दैनिक कार्यें चालण्याकरितां मठाला स्थावर उत्पन्न आहे.

मिरजेचा किल्ला पूर्वी विजापूरच्या बादशहाच्या ताब्यांत होता. विजा-पूरकरांचा सुभेदार मिरजेच्या किल्ल्यांत राहात असे. किल्ल्यांत नरसिंहाचें मंदिर आहे. त्या मंदिरांतील ब्राह्मणांना बाटविण्याकरितां सुभेदार निघाला, त्यानें त्यांजपुढें मांसपात्र ठेविलें, त्यावर झांकण घातलें. ब्राह्मण भयभीत

होऊन त्यांनीं नरसिंहाची प्रार्थना केली. त्याबरोबर त्या पात्रांतील मांस नाहींसें होऊन तेथें सुवासिक फुलें उत्पन्न झालीं ! तें पाहून सुभेदार चकित झाला. त्यानें ब्राह्मणांस बाटविलें नाहींच, देऊळ सुरक्षित ठेविलें व त्याच्या खर्चाची कायमची व्यवस्था करून दिली ! मिरजेला पूर्वीं पाण्याचा खडखडाट होता. मिरजेचे पूर्वींचे अधिपति श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन ह्यांच्याकडून जी गैरसोय दूर झाली नाहीं; ती गैरसोय कृष्णेचें पाणी सरकारनें नळानें आणून आतां दूर केली आहे !

मिरजेस **अण्णाबाबा** नांवाचे साधु होऊन गेले. ते कोल्हापुराकडील राहाणारे होते. ते लहानपणापासून वेड्याप्रमाणें वागत असल्याचें पाहून त्यांच्या आईबापांनीं नरसोबाच्या वाडीस त्यांना सेवेकरितां आणून ठेविलें. आण्णाबोवा तेथें नग्नावस्थेंत राहात असत. ही पीडा आपल्या गांवीं नको म्हणून वाडींतील कांहीं लोकांनीं ते भिक्षा मागण्यास आले असतां त्यांना मिरच्या घातल्या; त्या त्यांनीं खाल्लया. श्रीदत्तात्रयास आपल्या भक्ताची झालेली चेष्टा न आवडून त्यांनीं त्या पुजाऱ्यांच्या स्वप्नांत येऊन त्यांना काठीनें झोडपलें व बजावून सांगितलें कीं, तुम्ही माझी यथासांग पूजा करितां व 'हा मुलगा मीच आहे.' त्यास मिरच्या खावयास दिल्या हें तुम्ही मोठें पाप केलेंत; म्हणून मी तुम्हांस ही शिक्षा केली आहे. दुसऱ्या दिवशीं हे पुजारी उठून पाहतात; तों त्यांच्या अंगावर वळ उठले होते. तेव्हांपासून या मुलास शरण जाऊन ते त्याची पूज्य बुद्धीनें सेवा करूं लागले !

पुढें हे मिरजेस येऊन राहिले. एकदां सांगलीकरांचा एक हत्ती माजला असतां त्याला आण्णाबोवांनीं नुसत्या नेत्रकटाक्षानें वठणीवर आणिलें ! एका माणसास पोटशूळ लागला होता, तो यांच्या प्रसादानें नाहींसा झाला. मिरजेस हे सुमारें ऐशीं वर्षांपूर्वीं समाधिस्थ झाले. त्या जागीं त्यांची समाधि बांधिलेली आहे. तिजवर चाळीस वर्षांपूर्वी हल्लींचें प्रशस्त मंदिर बांधण्यांत आलें. मिरज हा हल्लीं तालुका झाला असून तेथें हायस्कुलें, खरे स्मारक मंदिर व शांकर तत्त्वज्ञानमंदिर अशा संस्था आहेत. मिरजेहून मला

नरसोबावाडीस जावयाचें होतें. म्हणून मिरजेहून दिनांक ७।७।५२ इ. रोजीं दुपारीं साडेतीनच्या गाडीनें जयसिंगपुरास चार वाजतां उतरलों. मिरजेहून जयसिंगपूर स्टेशन आठ मैलांवर आहे. जयसिंगपुराहून लागलाच मोटारीनें नरसोबावाडीस गेलों.

## नृसिंहवाडी–नरसोबावाडी

जयसिंगपुरापासून नरसोबावाडी नऊ मैल आहे. हा प्रदेश फार सुपीक आहे. वाटेंत ज्वारी, भुईमूग, एरंडी वगैरे पिकें दिसलीं. वाडीस मी श्री रुके उपाध्ये यांजकडे उतरलों. त्यांनीं सर्व

॥ श्रीसदगुरुभ्यो नमः ॥




॥ श्रीदत्तध्यान श्लोक ॥

काषायवस्त्रं करदण्डधारिणं, कमण्डलुं पद्मकरेण शंखं ।

चक्रं गदाभूषित भूषणाढ्यं, श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥

व्यवस्था चांगली ठेविली होती. वाडी कृष्णाकांठीं आहे. तिला उत्तम घांट बांधिला आहे. पाखाडीहि चांगली दगडी बांधिली आहे. औदुंबर, कडूनिंब, पिंपळ व वड ह्यांची बरीच झाडी आहे. घांटावर दत्तांच्या पादुका व दुसरीं लहान मंदिरें आहेत. पादुकांवर बांधिलेलें मंदिरहि फारसें मोठें नाहीं. पावसाळ्यांत नदीच्या पाण्याखालीं पादुका बुडून जात असल्यामुळें आषाढ शु. ५ पासून तों आश्विन शु. ९ पर्यंत देवाची पालखी बंद असते. येथील दैनिक धार्मिक कृत्यें गाणगापुरासारखींच आहेत. चौघडा त्रिकाळ वाजतो. वाडीची लोकसंख्या तीन हजार आहे. हवा, पाणी उत्तम आहे. हें क्षेत्र कृष्णा व पंचगंगा यांच्या संगमावर आहे. कृष्णे-पलीकडे औरवाड व गौरवाड हीं दोन गांवें आहेत. हीं देवाला इनाम आहेत. श्रीनृसिंह सरस्वति हे वाडीस कृष्णेवर स्नान करीत, गाणगापुरीं भिक्षा मागून भोजन करीत व वऱ्हाडांत माहूर क्षेत्रीं झोपीं जात असें सांगतात. येथील ब्रह्मवृंद रोज पवमान–पंचसूक्तें म्हणतात.

### श्रीलक्ष्मीनारायण मिरवणूक



### ॥ श्रीविष्णुप्रार्थना श्लोक ॥

श्रीरामा पुरुषोत्तमा नरहरे, नारायणा केशवा ।<br>
गोविंदा गरुडध्वजा गुणनिधे, दामोदरा माधवा ।<br>
श्रीकृष्णःकमलापते यदुपते, सीतापते श्रीपते ।<br>
वैकुण्ठाधिपते चराचरपते, लक्ष्मीपते पाहि माम् ॥ १ ॥

नरसोबावाडीपासून सुमारें दोन मैलांवर **कुरुंदवाड** नांवाचा मोठा गांव आहे. ही कुरुंदवाडकर पटवर्धनांची राजधानी होती; पण हें संस्थान विलीन झाल्यापासून कुरुंदवाड हा तालुका झाला आहे. कुरुंदवाड–नरसोबावाडी ह्यांच्यामध्यें पंचगंगा नदी आहे. गांवाची वस्ती दहा हजार आहे. गांवांत श्रीलक्ष्मीनारायणाचें सुंदर मंदिर आहे. मूर्ति सुबक असून त्या संगमरवरी दगडाच्या आहेत. देवाच्या दैनंदिन व्यवस्थेकरितां तेथील राजांनीं कायमचें उत्पन्न करून दिलें आहे. मी कुरुंदवाडास वे. शा. सं. सखारामभट्ट येड्डूरकर ह्यांच्या घरीं उतरलों होतों. श्री. वेदाचार्य येड्डूरकर भट्ट ह्यांचें नांव सुप्रसिद्ध आहे. त्यांनीं आपले वेदविद्येचें नैपुण्य महाराष्ट्रांतच काय, पण दिल्लीसहि राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांसहि दाखविलें आहे. ह्या कामीं त्यांची सर्वत्र वाहवा होत आहे, हे **स्मृतिसागर** आहेत.

वेद म्हणणारे ब्राह्मण आजहि कोठें कोठें तुरळक आहेत; पण सखाराम-भटजी हे केवळ तशांपैकीं वैदिक नव्हत. त्यांची स्मरणशक्ति इतकी जबर आहे कीं, ते ऋक्संहिता व श्रीमद्भगवद्गीता उलटसुलट कोठूनहि व कोठपर्यंतहि तोंडपाठ बिनचूकपणें सहज लीलेनें म्हणतात ! परंतु दुर्दैवानें वेदविद्येची दिवसेंदिवस इतकी अवनति होत चालली आहे कीं, सखाराम-भटजींनाहि आपला मुलगा वेदपारंगत करणें अशक्य झालें आहे ! त्यांचे चिरंजीव तुपाचा व्यापार करीत असतात. कुरुंदवाडाहून दिनांक १२।७।५२ इ. रोजीं मोटारीनें **कोल्हापुरास** गेलों. कुरुंदवाड व कोल्हापूर ह्यांत अंतर छत्तीस मैलांचें आहे. भाडें एक रुपया पांच आणे पडतें.

## कोल्हापूर

कोल्हापुरास मी श्रीशंकराचार्य मठ करवीर ह्यांच्या मठांत उतरलों. हा मठ म्हणजे फार मोठा वाडा आहे. मठाचें वार्षिक उत्पन्न चाळीस हजार रुपये आहे. मठाला पंधरा गांवें इनाम आहेत. पसतीस हजार रुपये खर्च आहे. चाळीस नोकर आहेत. जगद्‌गुरूंचें पूर्वाश्रमींचें आडनांव श्री. मारूलकर शास्त्री आहे. त्यांनीं वेद व शास्त्रें ह्यांचा अभ्यास करण्याकरितां

दहा सद्गुणी विद्यार्थी जवळ बाळगले आहेत. त्यांच्या जेवणाखाण्याचा सर्व खर्च मठामार्फत होतो. स्वतः आचार्यहि त्यांस पाठ देतात. सकाळीं व सायंकाळीं मठांत चौघडा वाजतो व गवई घटकाभर गायन करितात. गांवाच्या मध्यभागीं **अंबाबाईचें** प्रसिद्ध देऊळ आहे. देवळाभोंवतालीं श्रीराम, मारुति, दत्त, विश्वनाथ, गणपति इत्यादि मंदिरें आहेत. सभोंवार वड, पिंपळ, उंबर, बेल, बकूळ, अशोक, पारिजातक इत्यादि वृक्ष आहेत. पश्चिमेस मुख्य महाद्वार आहे. **महालक्ष्मी** म्हणजे अंबाबाई उंचीला आठ वर्षांच्या मुलीइतकी आहे. देवळाच्या आवारांत दहा पंधरा उंच दीपमाळा म्हणजे दीपस्तंभ आहेत.



श्रीमहालक्ष्मी

॥ श्रीमहा-लक्ष्मीध्यान श्लोक ॥

अक्षस्त्रक्परशू गदेषु कुलिशं, पद्मं धनुः कुण्डिकां ।
दण्डं शक्तिमासिंच चर्म जलजं, घंटां सुराभाजनं ॥
शूलं पाश सुदर्शने च दधतीं, हस्तैः प्रसन्नाननाम् ।
सेवे सैरिभ मर्दिनीमिह महा,लक्ष्मीं सरोजास्थिताम् ॥

उत्तरेकडे एक मोठी घंटा आहे. ती प्रत्येक आरतीच्या वेळीं वाजविण्यांत येते. देवळाभोंवतीं उंच मजबूत भिंती व चार दरवाजे आहेत. देवीचें वार्षिक जमिनीचें उत्पन्न वीस हजार रुपये व देवीपुढें येणारे बारा हजार रुपये मिळून बत्तीस हजार रुपयांचें उत्पन्न आहे. देवीचे अर्ध्या लाख रुपयांचे दागिने आहेत. ही देवी फार जुनी व फार प्रसिद्ध आहे. ती महाराष्ट्रांतील लाखों लोकांची कुलस्वामिनी आहे. देवीचा मुख्य उत्सव आश्विनांत दहा दिवस होतो व ह्या दहा दिवसांत चंडिकाहवन होतें. देवळांत बाराहि महिने पुराण, भजन, कीर्तन सुरू असतें. देवळांत जाण्याच्या वाटेवर देवीचें पूजासाहित्य, खेळणीं, लुगडीं, खण, मेवामिठाई वगैरे ह्यांचीं दुकानें आहेत. 'आत्मनिवेदनभक्ति' ह्या विषयांवरील तासभर झालेलें माझें प्रवचन सर्वांस फार आवडलें. शंकराचार्यांनीं हरिकीर्तन पाठशाळेच्या ग्रंथालयास त्यांचे सहा ग्रंथ बक्षीस दिले.

कोल्हापूर फार मोठें नगर आहे. तेथील लोकसंख्या सुमारें एक लक्ष आहे. शहराचे शाहूपुरी, लक्ष्मीपुरी, शिवाजी मार्ग इत्यादि भाग आहेत. ही एक वेळ ताराबाई वंशांतील छत्रपतींची राजधानी होती; पण अलीकडे कोल्हापूरचें राज्य विलीन झाल्यापासून शहराचें पूर्वीचें वैभव राहिलें नाहीं.

कोल्हापुराहून दिनांक १५।७।५२ इ. रोजीं पहाटे पांच वाजतां रेल्वेनें निघून सांगलीस दोन तासांच्या अवधींत पोंचलों. कोल्हापुराहून सांगली चाळीस मैल आहे. मिरजेस गाडी बदलावी लागते. सांगलीस मी सेवा-निवृत्त शिक्षक श्रीयुत बर्वे ह्यांजकडे उतरलों. बर्वे हे पूर्वी मजप्रमाणेंच मुंबईस शिक्षक होते. मुंबई सोडल्यापासून त्यांचा मला एकदां सांगलीस येऊन जाण्याचा फार आग्रह चालू होता म्हणून मी त्यांजकडे गेलों. **सांगली** हें कोल्हापुराच्या खालोखाल मोठें व्यापारी शहर आहे. सांगलीच्या पश्चिमेस कृष्णा नदी वाहात असून तिला चांगले घाट आहेत. नदीवर एक मोठा पूल आहे. नदीजवळच गणपतीचें प्रसिद्ध मंदिर आहे. त्याची व्यवस्था श्रीमंत पटवर्धन राजांनीं उत्तम ठेविली आहे. देवाला तीन लाख रुपयांचें कायमचें उत्पन्न आहे. भाद्रपद महिन्यांत गणपतीचा दहा दिवस थाटाचा उत्सव होतो. देवळाभोंवतालीं नारळ, सुपारी, फणस, हीं फळझाडें आणि पारिजातक, वेल इत्यादि फुलझाडें आहेत.

देवळाजवळ एक वैदिक, संस्कृत पाठशाळा मोठ्या भरभराटींत होती. दोनशें विद्यार्थ्यांना राहाण्यास जागा, भोजन व शिक्षण मोफत मिळत असे; पण आतां ती स्थिति राहिली नाहीं. हीच दुरवस्था सर्व ठिकाणच्या वैदिक व संस्कृत पाठशाळांची दिसून येते. याला कारण विद्यार्थीच शिकावयास येत नाहींत हें आहे. विद्यार्थी तरी त्या विद्येवरच चरितार्थ चालत नाहीं म्हणून येत नाहींत. यासाठीं या विद्येला भरपूर उत्तेजन मिळेल अशी संपूर्ण सोय सरकारनेंच केली पाहिजे ! ज्यांचें नांव सांगलींतच काय, पण महाराष्ट्रांतहि सर्वस्वी सर्वतोमुखी झालें आहे असे गृहस्थ म्हटले म्हणजे श्रीमंत

विष्णु रामचंद्र वेलणकर हे होत. त्यांनीं आपल्या विणकामाच्या धंद्यास अगदीं अल्प प्रमाणांत सुरुवात करून तो वाढवीत वाढवीत त्याला मोठ्या गिरणीचें स्वरूप दिलें. त्यावर लाखों रुपये मिळवून 'उद्योगपति' ही श्लाघ्य पदवी मिळवली व आपली इ. स. १९४५ सालीं पांच लाखांची **सुवर्णतुला** करून तें सर्व द्रव्य सार्वजनिक संस्थांस अर्पण केलें ! पण हें वैभवाचें शिखर त्यांनीं गांठून तीन वर्षे झालीं नाहींत; तोंच सन १९४८ सालीं गांधीवधाच्या निमित्तानें अग्निनारायणाचा प्रकोप होऊन सबंध कारखाना त्याच्या भक्ष्यस्थानीं पडला ! पण या अतर्क्य आपत्तीनें खचून न जातां त्यांनीं पुन्हा कंबर बांधून नवी गिरणी उभी केली व तिच्यांत आतां पुन्हां शेंकडों कामगार खपत आहेत. पूर्वी हा आंकडा एक हजारावर होता.

सांगलीपासून नैर्ऋत्येस तीन मैलांवर **हरिपूर** नांवाचें क्षेत्र आहे. त्या गांवीं जाण्याकरितां दिनांक २४।७।५२ इ. रोजीं सकाळीं आठ वाजतां पायीं निघालों. हरिपुरास कृष्णा व वारणा ह्या दोन नद्यांचा संगम आहे व ह्या संगमावर संगमेश्वराचें देऊळ आहे. तें फार प्रेक्षणीय आहे. त्या देवळांत सायंकाळीं ४॥ ते ६॥ पर्यंत माझें कीर्तन झालें. कीर्तनास दोनशें-वर समुदाय जमला होता. हरिपूर गांव रम्य आहे. रस्त्यानें चिंचेचीं झाडें फार आहेत व नदीच्या कांठीं कळकीचीं बेटें आहेत. सांगलीस परत आल्यावर दिनांक २५।८।५२ इ. रोजीं सांगलीहून तीन मैलांवर **माधव-नगर** स्टेशनावर आलों. तेथें दुपारीं ३॥। वाजतां आगगाडींत बसून आठ मैलांवरील **भिलवडी** स्टेशनावर उतरलों. स्टेशनापासून गांव चार मैलांवर आहे.

तेथें जाण्याकरितां सहा आणे देऊन भाड्याचा टांगा केला. जातांना पाऊस भयंकर पडत होता. मध्येंच कृष्णा नदीला फार पाणी आलें होतें. पाण्याला ओढ फार असल्यामुळें टांग्यांतून उतरून गड्याच्या साह्यानें परतीरास गेलों. भिलवडी कृष्णाकांठीं आहे. भिलवडीस पेशवाईतील प्रसिद्ध सरदार परशुरामभाऊ पटवर्धन ह्यांनीं कृष्णेवर सुंदर घाट बांधिला

आहे. भिलवडीची वस्ती सात हजार आहे. ब्राह्मणांचीं घरें तीस आहेत. एक वेळ भिलवडी हें विद्वानांचें आगर होतें. म्हणून येथून पांच विद्वान्, आचार्य होऊन संकेश्वराच्या गादीवर बसून शंकराचार्य झाले होते.

भिलवडी येथें मुंबईच्या ब्राह्मणसभेच्या म्हसकर सूतिकागृहाची एक शाखा आहे. ती डॉ. चंद्राताई शेणोलीकर, एल्. सी. पी. एस्. ह्यांनीं चालविली आहे. तिच्यांत पंधरा स्त्रियांची सोय आहे. त्याशिवाय ह्यांनीं एक मोठा फंड जमवून हायस्कूलहि चालविलें आहे! भिलवडीच्या ईशान्येस अर्ध्या मैलावर **भुवनेश्वरीचें** देवालय आहे. येथें आश्विन व पौष महिन्यांत दहा दिवस उत्सव होतो. या देवीसंबंधीं गुरुचरित्रांत एक कथा आहे. एक ब्राह्मणाचा मुलगा विद्याहीन होता. त्याला सर्व लोक नांवें ठेवीत असत. त्यामुळें तो रागावून या देवीकडे आला आणि त्यानें तपश्चर्या केली; तरी देवी प्रसन्न होईना. म्हणून तिजपुढें त्यानें आपली जीभ कापून ठेविली. तेव्हां देवीनें प्रसन्न होऊन त्याला औदुंबरास जाऊन तपश्चर्या करण्यास सांगितलें. ती त्यानें केल्यावर दत्तप्रभूंनीं याचे मनोरथ पूर्ण केले!

भुवनेश्वरीच्या पश्चिमेस **औदुंबर क्षेत्र** आहे. तें भिलवडीपासून एक मैलावर आहे. दिनांक २८।७।५२ इ. रोजीं भुवनेश्वरीचें दर्शन घेऊन औदुंबरास नावेंतून सकाळीं ११॥ वाजतां गेलों, तेथें श्री. नरहरपंत भट ऊर्फ शिदू पूजारी यांच्या घरीं उतरून दुपारीं गायत्री जप करून देवावर रुद्राची एकादशिनी केली. भटजींस ब्राह्मण-सुवासिनी भोजन व नैवेद्य ह्यांबद्दल साडेतीन रुपये दक्षिणा दिली. सध्यां नदीस पूर आला असल्यामुळें दत्ताच्या पादुका व मंदिर पाण्यांत बुडालें होतें! पादुका पाण्यांत असेपर्यंत देवघर मंदिरांत श्रींचीं सर्व धार्मिक कृत्यें होतात. या मंदिराचा जीर्णोद्धार पुण्याचे दानशूर गृहस्थ श्रीयुत रानडे यांनीं केला आहे. येथें रोज रात्रीं मंत्रजागराचे कांहीं मंत्र कांहीं भटजी हौसेनें म्हणतात. भिलवडीहून दिनांक २९।७।५२ इ. रोजीं दुपारीं १२॥ वाजतां निघून भिलवडी स्टेशनांवर पायीं चालत गेलों व सव्वा चार वाजतां आगगाडीनें निघून पांच वाजतां **किर्लोस्करवाडी** स्टेशनावर उतरलों.

## किर्लोस्करवाडी

येथें किर्लोस्करांचा लोखंडी सामानाचा मोठा कारखाना आहे. तो श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर ह्यांनीं इ. स. १९१० त स्थापन करून भर-भराटीस आणला. त्या कामीं आरंभीं औंधचे राजे कै. श्रीमंत भवानराव बाळासाहेब ह्यांनीं त्यांस तीस एकर जमीन व दहा हजार रुपये दिले! किर्लोस्करांचा हा कारखाना प्रथम लहान प्रमाणावर बेळगांवास सुरू झाला होता. तो लक्ष्मणरावांनीं पुढें कुंडल स्टेशनाजवळ आणिला. तेंव्हां या कारखान्यावरून स्टेशनाचें 'कुंडल' नांव बदलून किर्लोस्करवाडी हें नांव ठेवण्यांत आलें.

या कारखान्यांत लोखंडी नांगर, ऊंसाचे चरक, मोटारीचे कांहीं भाग, विहिरींतून पाणी वर काढण्याचे पंप, शेंगा फोडण्याचीं यंत्रें, तेल गाळण्याचे घाणे, इत्यादि वस्तू तयार होतात. कारखाना पाहाण्यास जे लोक येतात त्या प्रत्येकास भोजनखर्च दर वेळेला दीड रुपयापर्यंत येतो. हा दर फार भारी वाटला! कारखान्याच्या आवारांत फुलझाडें व फळझाडें पुष्कळ आहेत. विद्यार्थ्यांकरितां हायस्कूल आहे. रस्ते चांगले असून सर्वत्र विजेची रोषणाई आहे. कामगारांसाठीं दहाबारा घरें, पोस्ट ऑफिस, छापखाना, वाचनालय, विक्रीचीं दुकानें इत्यादि सर्व सोयी आहेत. नळाला पाणी अहोरात्र असतें. कारखान्याच्या आवारांत कै. सौ. राधाबाई लक्ष्मणराव किर्लोस्कर ह्यांचा दगडी शुभ्र व सुबक पुतळा आहे व सभोंवार बाग आहे.

## ओगलेवाडी

किर्लोस्करवाडीपासून दोन स्टेशनें टाकलीं म्हणजे कऱ्हाड स्टेशन येतें. कऱ्हाड स्टेशनापासून अर्ध्या मैलावर पूर्वांगास ओगलेवाडी आहे. ती कांचकारखान्याकरितां प्रसिद्ध आहे. तिलाहि औंधच्या राजेसाहेबांनींच आश्रय दिला होता. ओगलेवाडी हें ठिकाण औंध संस्थानच्या हद्दींत होतें. तीस एकर जमीन व दहा हजार रुपये भांडवल पंतप्रतिनिधींनीं ओगल्यांना

पुरविलें. हा कारखाना सध्यांच्या ठिकाणीं येण्यापूर्वी सन १९१३ ते १९१५ अखेर किर्लोस्करवाडीं ोता. त्यानंतर तो सध्यांच्या जागीं हालविण्यांत आला. ओगलेवाडी ही किर्लोस्करवाडीइतकी मोठी नसली तरी तितकीच व्यवस्थित व सुरेख आहे. ती सर्व सुखसोयींनीं युक्त आहे. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, पोस्ट, व तार ऑफिस व कामगारांस राहावयास घरें येथें आहेत. येथें कांच, कांचेच्या चिमण्या व इतर कांचेचें सामान, प्रभाकर कंदिल, एॅनमल्ड पाट्या येथें बनावितात. हा कारखाना येथें चाळीस वर्षें चालला आहे. मालाची वार्षिक विक्री छत्तीस लक्ष रुपयांची आहे. यांत दोन हजार मजूर काम करितात. एकंदर वस्ती अडीच हजार आहे.

कऱ्हाडाहून मी रहिमतपुरास आलों. कऱ्हाड स्टेशनापासून रहिमतपूर स्टेशन वीस मैल आहे. रहिमतपूराहून औंध गांव बारा मैल आहे. त्या गांवीं दि. ३१।७।१९५२ इ. रोजीं सकाळीं दहा वाजतां एस्. टी. च्या गाडीनें आलों. माझ्या सफरींत संस्थानांच्या विलीनीकरणामुळें—उध्वस्त झालेल्या राजधान्या पाहाण्याचा प्रसंग मला आला. त्यांपैकींच औंध ही पंतप्रतिनिधींची राजधानी होय. औंधचे अधिपति कै. बाळासाहेब हे विद्वान्, रसिक, गुणज्ञ, चित्रकार व कीर्तनकार होते. त्यांनीं आपल्या शिकवणीनें कांहीं पदवीधरांना कीर्तनकलेंत प्राविण्य मिळवून दिलें होतें. औंध हें सामान्यतः खेडेंच होतें; पण त्याला बाळासाहेबांनीं आपल्या कर्तबगारीनें लहानशा नगराचें वैभव आणून दिलें होतें. तेथील यमाईचें देऊळ, पदार्थसंग्रहालय, ग्रंथसंग्रहालय, हीं त्यांच्या कर्तबगारीची आजहि साक्ष देत आहेत. यमाईचें देऊळ एका उंच टेकडीवर असून तेथें जाण्यास एकशें चौसष्ट पायऱ्या चढाव्या लागतात. हें मंदिर बांधण्यास एक लक्ष रुपये खर्च आला! देवळांत सर्वत्र रामायण व महाभारत ह्यांतील प्रसंगांच्या अतिमनोहर मोठ्या तसबिरी व राजघराण्यांतील स्त्री-पुरुषांच्या स्वतः राजेसाहेबांनीं तयार केलेल्या एकूंण १०० मजबूत व सुंदर तसबिरी लावून

ठेविल्या आहेत. येथील पदार्थसंग्रहालयांत जयपूर, पंजाब, कांग्रा इत्यादि ठिकाणचीं कौशल्यपूर्ण चित्रें, तशींच लढाईचीं हत्यारें, प्लास्टर ऑफ पारिसच्या तरुण स्त्री–पुरुषांचे शृंगारिक लहान पुतळे, चांदीच्या दोन भव्य परातींत खोदलेला रामायण–महाभारत ह्यांचा चित्रमय देखावा इत्यादि वस्तु पाहाण्यासारख्या आहेत. पदार्थसंग्रहालयाच्या इमारतीभोंवतीं फूल–फळ-झाडांचा बाग आहे. त्यांत सहा ऋतूंच्या वर्णनाला धरून एकेक संगमरवरी उपवर स्त्री, विशिष्ट ऋतूच्या साहित्यासह प्रेक्षकांचें स्वागत करण्याकारितां उभी केली आहे व त्या सर्वांच्या पायांशीं असलेल्या ओट्यांवर त्या त्या ऋतूच्या वर्णनाचा एकेक श्लोक दिलेला आहे. डोंगरावरील **यमाईची यात्रा** दरसाल पौष महिन्यांत भरत असते. त्या वेळीं पन्नास हजार लोक यात्रेस येतात.

## औंध

त्या यात्रेंत पांच सहा हजार बैल विक्रीसाठीं आलेले असतात. देवीचें देऊळ पुरातन आहे.

॥ श्रीएकवीराध्यानश्लोक ॥

वालीयुत श्रवण पालीयुगा, ललित चूली–विराज त्कुळा ।
केली गतानुगमरालीकुला, मधुर माली भिरादृतकथा ।
नालिकदृक् कुसुम नालीकपाणिरिह, कालीयशासि सहजा ।
ताली दलाभानु माली सदा भवतु, काली शुभाय ममसा ॥ १ ॥

श्रीएकवीरा देवी ही अत्रि गोत्रोत्पन्न ब्राह्मणांची कुलस्वामिनी आहे. तिचीं मंदिरें, गुहागर, कालें व किन्हई ह्या स्थळीं आहेत.

॥ श्रीएकवीराष्टक ॥

हे देवी किन्हईनिवासिनि जगन्माते धनुर्धारिणी ।
शोभे फार किरातवेष तुजला अंबे जगत्पालनी ।
आलों दीन तुझ्या पदा शरण मी हे एकवीरे सती
तारीं वारुनि आपदा भगवती सर्वेश्वरी पार्वती ॥ १ ॥

वाहे दक्षिणवाहिनी जवळुनी रम्या नदी वांगना ।
वाटे नित्यसमागमें तव बहू ती जाहली पावना ॥
ग्रीष्मीं उष्ण असोनि तीव्र, सरिता शुष्का कदापी न ती
तारीं वारुनि आपदा भगवती सर्वेश्वरी पार्वती ॥ २ ॥
झालें भूषण दिव्य मंदिर तुझें येथें त्रिलोकेश्वरी ।
नेत्राल्हादक कार्य हें प्रतिनिधि पंत प्रतापी करी ।
आला मानव दर्शना, न सहसा हालों म्हणे संप्रती ।
तारीं वारुनि आपदा भगवती सर्वेश्वरी पार्वती ॥ ३ ॥
आहे मंडप दीर्घ विस्तृत कलाकौशल्य संपूर्ण हा ।
चित्रें रेखियलीं मनोहर कशीं येथें प्रयत्नें महा ।
माडी आणिक गोपुरें रिझविती हीं उंच नेत्रांप्रती ।
तारीं वारुनि आपदा भगवती सर्वेश्वरी पार्वती ॥ ४ ॥
गंभीरध्वनि हा त्रिकाल झडतो द्वारापुढें चौघडा ।
बोले फोडितसें सदैव तुमच्या मी पातकांचा घडा ॥
नंदी उत्तम देखणा घडविला हा मूर्तिकारें किती ।
तारीं वारुनि आपदा भगवती सर्वेश्वरी पार्वती ॥ ५ ॥
सृष्टीची दिसते प्रदक्षिणपथीं शोभा मनोहारिणी ।
संसारांतिल यातना विसरती येथें घडी बैसुनी ॥
सायान्ही मृदु वायु वाहत असे उल्हास चित्ता अती ।
तारीं वारुनि आपदा भगवती सर्वेश्वरी पार्वती ॥ ६ ॥
ब्राह्मण भक्तियुक्त करुनी नैवेद्यहि अर्पिती
थाटानें करिती प्रदोषसमयीं सानंद धूपारती ॥
येथें भक्तजनां प्रसन्न करिते सौगंध-शाला अती
तारीं वारुनि आपदा भगवती सर्वेश्वरी पार्वती ॥ ७ ॥
आहे अमृत शैलवासिनि महादेवी तुझ्या संनिधीं
येथें कार्तिक पूर्णिमेस जमते यात्रा सहस्रावधी ।

प्रासादीं तव भक्त औंधनृपती प्रेमें तदा राहती ।
तारीं वारुनि आपदा भगवती सर्वेश्वरी पार्वती ॥ ८ ॥

—मुकुंदराय

देवळाभोंवतीं किल्ल्यासारखा बुरुजी तट आहे. देवळाचें शिखर पंचाहत्तर फूट उंच आहे. देवी काळ्या पाषाणाची सहा फूट उंच आहे. देवीच्या देवळाकडे जातांना ज्या पायऱ्या लागतात, त्या पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंस योग्य अंतरावर भालदार, चोपदार, नारद, तुंबर, गरुड, मारुति यांचे दगडी पुतळे उभे करण्यांत आले आहेत.

श्रीमंत भवानराव बाळासाहेब यांनीं औंधास एक उत्कृष्ट ग्रंथालय निर्माण केलें आहे. त्यांनीं एका विशिष्ट प्रकारची साष्टांग नमस्कार घालण्याची रीत शोधून काढली होती. ते स्वतः त्याप्रमाणें नमस्कार घालीत व लोकांसहि घालण्यास उत्तेजन देत. त्यांनीं त्यांचा एक चित्रपटहि तयार केला होता. या व्यायामानें त्यांची प्रकृति शेवटपर्यंत मजबूत राहिली होती.

औंधास परस्थांची राहाण्याची व भोजनाची अशी सार्वजनिक स्वतंत्र सोय नाहीं. तेथील बाजारपेठेंत श्रीराम मंदिर आहे. त्याचे मालक ह. भ. प. चिंतामणिशास्त्री गोखले यांजकडे मी दोन दिवस राहिलों होतों.

दिनांक २।८।५२ इ. रोजीं मी औंध सोडलें. व रहिमतपूर स्टेशनवर आलों व तेथून आगगाडीनें सोळा मैलांवरील सातारा रोड स्टेशनावर उतरलों व तेथें बसमध्यें बसून **सातारा** शहरांत गेलों. साताऱ्यांत मंगळवार पेठेंत **समर्थ सेवा संघाचे** खजीनदार श्री. हरळीकर यांच्या बंगल्यांत दुपारीं अकरा वाजतां गेलों; त्यांच्या बंगल्याजवळच माझे मुंबईचे परिचित, सेवानिवृत्त तारमास्तर श्री. **गणेश बळवंत शाहाणे** यांचें घर होतें. त्यांजकडे मी राहावयास गेलों. येथें माझें आदरातिथ्य उत्तम झालें !

**सातारा** ही छत्रपति शिवाजी महाराजांच्या वंशजांची राजधानी होती. शेवटचे राजे शहाजी महाराज हे गादीवर असतां इ. सन १८४८ त हें

राज्य खालसा झालें. तेव्हांपासून सातारा ही सातारा जिल्ह्याची राजधानी आहे. पहिले शाहू महाराज यांच्या वेळच्या फार थोडया इमारती सध्यां अवशिष्ट आहेत. गांवाच्या मध्यभागीं दोन राजवाडे आहेत. ते अलीकडे बांधलेले आहेत. महाराजांचे वंशज हल्लीं जलमंदिरांत राहातात.


साताऱ्यांत मुख्य संस्था म्हटल्या म्हणजे दोन आहेत. एक वेस्टर्न इंडिया विमा कंपनी व दुसरें आर्यांग्ल विद्यालय व त्याची अर्कशाळा. या संस्थेंत वैद्यकीचें शिक्षण देण्यांत येतें व अर्कशाळेंत आयुर्वेदीय औषधें तयार होतात. या दोन संस्थांशिवाय भाऊराव पाटील यांनीं ट्रेनिंग कॉलेज, आर्टस कॉलेज व हायस्कूल या शिक्षणसंस्था मागासलेल्या वर्गांकरितां काढल्या आहेत. त्या योगानें सातारा जिल्ह्यांतील बहुजनसमाजांत फार मोठी जागृति उत्पन्न झाली आहे. सातारा हें शहर सुंदर आहे. तें किल्ल्याच्या पायथ्याशीं उतारावर वसलें आहे. साताऱ्यापासून सहा मैलांवर '**सज्जनगड**' हा किल्ला आहे.

## '**सज्जनगड**'

सज्जनगडावर जाण्याकरितां साताऱ्याहून मी दिनांक ७–८–५२ इ. रोजीं सकाळीं साडेसहा वाजतां निघालों. एस्. टी. च्या बसनें अर्ध्या तासाच्या आंत गडाच्या पायथ्याशीं **गजवली** या गांवीं पोंचलों. सज्जन-गडाचें मूळ नांव **परळी** आहे. या नांवाचें गांव सज्जनगडाच्या पायथ्याशीं आहे. समर्थांसारखे सज्जनगडावर राहावयास आले, म्हणून त्याचें नांव सज्जनगड पडलें.

सज्जनगडावर अलीकडे श्रीसमर्थ सेवा संघानें पुष्कळच सुधारणा घडवून आणल्या आहेत. गड चढावयास सोपा असला तरी त्याला पायऱ्या नव्हत्या त्या आतां बांधल्या आहेत. गडावर दोन तलाव आहेत. ते स्वच्छ करून एक पिण्याच्या पाण्याकरितां व दुसरा स्नानादि कामाकरितां वापरण्यांत येतो. समर्थ येथेंच दिवंगत झाले. या जागीं त्यांची समाधि बांधली असून तिजवर श्रीराममंदिर आहे.

## ॥ श्रीसमर्थध्यान श्लोक ॥



शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें । वसिष्ठापरि ज्ञान योगेश्वराचें ।
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्‌गुरू रामदासा ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

समर्थ दिवंगत झाल्यावर औरंगजेब बादशहानें संभाजीस पकडून व त्याचे हाल हाल करून त्यास ठार मारून सर्व महाराष्ट्र पादाक्रांत केला ! त्या वेळीं सज्जनगडहि बादशहानें घेतला. त्या गडावर परशुरामपंत त्रिंबक प्रतिनिधि होते. त्यांनीं समर्थांच्या समाधीचें दार चिणून बंद केलें.

व रामाची मूर्ति **वासोटा** किल्ल्यावर नेऊन बंदोबस्तांत ठेविली. आणि हें परचक्र निघून गेल्यावर पुन्हा त्यांची स्थापना मंदिरांत केली !

समर्थांच्या पश्चात् त्यांच्या शिष्यिणी श्री. अक्का यांनीं गडाची व्यवस्था बत्तीस वर्षें पाहिलीं व शाहू महाराजांच्या कारकीर्दीत त्या समाधिस्थ झाल्या. समर्थांच्या समाधिस्थानीं त्यांचा पलंग, शेज, तसबीर, कुबडी, पाण्याचा हंडा, पिकदाणी, लोटा, काठी इत्यादि वस्तु आहेत. गडावर आंग्लाईचें देऊळ आहे. आंग्लाईची मूर्ति समर्थांना कृष्णेच्या **अंगापूर** येथील डोहांत सांपडली. तिची स्थापना त्यांनीं गडावर केली.

सज्जनगडावर श्रीसमर्थ सेवा संघ या संस्थेचें निवासस्थान आहे. या संघातर्फे दर महिन्याच्या दहाव्या तारखेस 'सज्जनगड' मासिक निघत असतें. या निवासस्थानीं संघाचे पांच दहा इसम काम करीत असतात. समर्थदर्शनास येणाऱ्या भक्तांची राहाण्याची व जेवणाची सोय येथें करण्यांत येते. मी गडावर चार दिवस होतों. हे दिवस पावसाळ्याचे होते. पण त्याप्रमाणें गारठा म्हणण्यासारखा नव्हता. सर्व डोंगर गवतानें झांकून गेला होता. मी तलावावर स्नान करीत असे.

रामाच्या देवळाभोंवतीं पांच सहा ओहऱ्या असून त्यांत कांहीं सेवेकरी राहातात. सभामंडप पांचशें मनुष्यें बसतील; इतका दुमजली मोठा आहे. येथें एक वाचनालयहि आहे. त्यांत सांप्रदायिक पुस्तकें विकत मिळतात. एक दळण्याची गिरणी, पवनचक्की आहे. बागेंत एक ऑइल एंजिन असून त्यामुळें वीज उत्पन्न करितां येते. बागेंत सोनचाफा, कण्हेर, कर्दळ, गुलाब, मोगरा, बकूळ, पारिजात इत्यादि फुलझाडें आहेत.

सज्जनगडावर एकंदर जी सुधारणा करण्यांत आली. तींत बराचसा वांटा शेटजी **गोवर्धनदास** ह्यांचा आहे. त्यांची तसबीर देवळांत ठळक ठिकाणीं लावण्यांत आली आहे. हे श्रीमंत व उदार व्यापारी साताऱ्यास राहात असत. गडावर चार दिवस राहिल्यावर दिनांक ११।८।५२ इ. रोजीं सायंकाळीं चार वाजतां निघून साताऱ्यास आलों व साताऱ्याहून दिनांक

१३।८।५२ इ. रोजीं दुपारीं १२॥ वाजतां बसनें निघून पुण्याच्या भिन्हार्डी साडेचार वाजतां सुखरूप पोंचलों.

## श्रीगजाननाचे तीन अवतार

गजाननाचे मुख्य तीन अवतार झाले. पहिला कश्यप व अदिती यांच्या पोटीं झाला. त्याला दशभुजा अवतार म्हणतात. त्याचें नांव महोत्कट असें होतें. या अवतारांत महोत्कटानें नरांतक, देवांतक, शुंभ व निशुंभ असुरांचा संहार करून जगांत शांति नांदविली ! दुसरा अवतार **त्रिसंध्या** क्षेत्रांत शिवपार्वतीच्या उदरीं झाला. या अवतारांतील त्याचें नांव '**गुणेश**' असें होतें. गुणेशानें सिंदुरासुराचा वध केला. तिसरा अवतार शिवपार्वतीच्या उदरींच कुरूपावस्थेंत झाला, म्हणून मातापित्यांनीं त्याचा वनांत त्याग केल्यावर **पराशरऋषींनीं** त्याचें संगोपन करून त्याला वाढविलें. हा ज्ञान व बल ह्यांनीं संपन्न असल्यामुळें सर्वांना आवडूं लागला ! मोठमोठ्या प्रासादांच्या द्वारांवर याची स्थापना प्रथम **द्वारपाळ** म्हणून होऊं लागली. सबंध भरतखंडांत ह्यांचे उत्सव भाद्रपद व माघ महिन्यांत होतात.

॥ अष्टसिद्धि विनायक क्षेत्रवर्णन श्लोक ॥

स्वस्ति श्रीगणनायको गजमुखो, मोरेश्वरे सिद्धि दे ।
बल्लाळो मुरुडे विनायक इति ख्यातोमहे ओझरे ।
विघ्नेशः खलु रांजणे गणपतिश्चिंतामणि स्थेउरे ।
लेण्याद्रौ गिरिजात्मकः शुभदिने **कुर्यात्सदामंगलम्** ॥ १ ॥

महाराष्ट्रांत व इतर प्रांतांत गणपतीचीं पुष्कळ स्थानें आहेत. 'गणपति पुळें' हें क्षेत्र **रत्नागिरी**पासून पायवाटेनें बारा मैलांवर व मोटारीनें पंचवीस मैलांवर आहे.

## गणपति पुळें

॥ श्रीगणेश प्रार्थना ॥

प्रारंभीं विनती करूं गणपती, विद्यादयासागरा ।
अज्ञानत्व हरोनि. बुद्धिमति दे, आराध्य मोरेश्वरा ।
चिंता, क्लेश, दरिद्र, दुःख अवघें, वेषांतरा पाठवी ।
हेरंबा, गणनायका गजमुखा, भक्तां बहु तोषवी ॥ २ ॥

देऊळ समुद्राजवळ आहे; तें इतकें कीं, कधीं कधीं देवास समुद्रस्नान घडतें. मूळ गणपति डोंगरांत स्वयंभू आहे. त्याच्या दर्शनास जातांना बऱ्याच पायऱ्या उतरून खालीं जावें लागतें. देवाच्या दोन चांदीच्या सुंदर मूर्ति आहेत. त्यांची मिरवणूक दर संकष्टी चतुर्थीस रथांतून काढतात. देवाला प्रदक्षिणा घालणें म्हणजे लहानशा डोंगराला प्रदक्षिणा घालण्यासारखेंच आहे. म्हणून प्रदक्षिणा घालणाऱ्या मनुष्यास पंधरा मिनिटें लागतात. रथाच्या सोहाळयास एक तास लागतो.

या गणेशाची अति उत्तम भक्ति पटवर्धनांचे पूर्वज श्री. हरिहर सच्छील भट्ट येथें पुरश्चरण करून राहात असत. त्यांनीं बारा वर्षांत अन्नसेवन न करितां सप्तधातू वृद्धिंगत करणाऱ्या दूर्वांच्या रसावरच आपली उपजीविका केली ! दूर्वांचा रस अति गुणकारी व औषधोपयोगी आहे. ह्यांवर गणपतीनें कृपा करून त्यांस राज्यप्राप्ति करून दिली. ह्यांच्या वंशांतील पटवर्धन नांवाचे राजे सांगली, मिरज, जमखिंडी वगैरे स्थळांचे झाले.

हा गणपति पटवर्धन संस्थानिकाचें कुलदैवत आहे. त्यांचे वाडेहि तेथें आहेत. त्यांनीं देवास मोठाल्या देणग्या दिल्या आहेत. देवस्थानच्या खर्चासाठीं सरकारांतून दरसाल बाराशें रुपये मिळतात. येथें देवापुढें पहाटेस, माध्यान्हीं व सायंकाळीं चौघडा झडतो. समुद्रकांठच्या पुळणीवरच हें देऊळ वसल्यामुळें त्याला पुळणीच्या ऐवजीं पुळयाचा गणपति म्हणूं लागले असावेत. त्यावरूनच गांवाला पुळें हें नांव पडलें असावें.

## नांदगांव


कुलाबा जिल्ह्यांत जंजिरा मुरूड शहरापासून उत्तरेस सहा मैलांवर नांदगांव म्हणून गांव आहे. तेथें गणेशमंदिर आहे. त्यांतील मूर्ति एकाद्या मोठ्या ज्योतिष्यासारखी गहन विचारांत मग्न असल्याप्रमाणें दिसते. जंजिरा संस्थानाचे माजी दिवाण श्री. कुलकर्णी ह्यांनीं खर्चाकरितां कायमची शेती लावून दिली आहे. या देवाचा उत्सव माघमासीं होतो. या देवाच्या पुजाऱ्यांच्या वंशांत एक विद्वान् शास्त्री गणेशभक्त होऊन गेले. त्यांजवर

जंजिऱ्याच्या नबाबाची फार श्रद्धा होती. त्यासंबंधीं एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. ती अशीः—

एके दिवशीं नबाबाचें व त्यांचें संभाषण चालू असतां त्या ब्राह्मणास नबाबानें आज तिथि कोणती म्हणून विचारलें. तेव्हां त्यानें चुकून अमावास्येऐवजी पौर्णिमा सांगितली. त्यावर नबाबानें त्यास चंद्रदर्शन करून देण्यास विनंति केली. ही विनंति या ब्राह्मणानें नबाबास होडींतून समुद्रांत नेऊन ती पूर्ण केली!

## थेऊर

॥ श्रीगणेशध्यान श्लोक ॥



ध्यायेन्नित्यं गणेशं, परमगुणयुतं,
ध्यानसंस्थं त्रिनेत्रम् ।
एकं देवं त्वनेकं, परमसुखयुतं,
देव देवं प्रसन्नम् ।
शुण्डा दण्डास्थ गण्डो, दलित–
मदजलोल्लोलमत्तातिमालम् ।
श्रीमंत विघ्नराजं, सकलसुखकरं,
श्रीगणेशं नमामि ॥ १ ॥

अष्टसिद्धिविनायकांपैकीं थेऊर येथें विनायकाचें एक स्थान आहे. तें पुण्यापासून दहा मैलांवर आहे. येथें श्रीमंत थोरले माधवराव पेशवे ह्यांची दहनभूमि आहे. तेथें त्यांची धर्मपत्नी साध्वी रमाबाई यांनीं सहगमन केलें म्हणून ह्या क्षेत्रीं दरसाल कार्तिक व. ८ ला श्रीरमा-माधव उत्सव होत

असतो. या क्षेत्रांत गणेशाची भक्ति केल्यानें चित्ताचें चांचल्य नाहींसें होऊन चित्तस्वास्थ्याचा मोठा लाभ मिळतो. याविषयीं एक कथा आहे. ब्रह्मदेवानें चित्तचांचल्य दोषनिवारणार्थ गणपतीची आराधना केली. त्या वेळीं श्रीगणेशानें प्रसन्न होऊन ब्रह्मदेवास येथें दर्शन दिल्यामुळें हें क्षेत्र निर्माण झालें. थेऊर हें क्षेत्र मुळा-मुठा नदीच्या कांठीं आहे. येथें नदीला मोठा डोह आहे. नदीला घाट असून घाटाजवळच रमाबाईचें वृंदावन आहे. देवळाजवळ पेशव्यांचा वाडा पडक्या स्थितींत आहे. थेऊर गांव देवळापासून थोडें दूर आहे. या देवस्थानची व्यवस्था चिंचवड देवस्थानाच्या पंचामार्फत होत असते.

## मोरगांव

अष्टसिद्धिविनायकांपैकीं दुसरें देवस्थान मोरगांवीं आहे. मोरगांव पुण्याच्या आग्नयेस चाळीस मैलांवर आहे. तेथें जाण्यास एस. टी. चें भाडें दोन रुपये पडतें. येथें भाद्रपद व माघ महिन्यांत पहिले चार दिवस उत्सव होतो. मोरगांव हे करा नदीच्या कांठीं आहे. या गांवाजवळ मोर बरेच आहेत; व देवाचें नांवहि **मयूरेश्वरच** आहे. या गांवीं ब्राह्मणांचीं पंचवीस घरें आहेत व इतर लोकसंख्या एक हजार आहे.

या क्षेत्रांत **अंकूशधारी** नांवाचे शास्त्री राहात असत. ते सत्पुरुष व ब्रह्मचारी होते. प्रथम कांहीं दिवस उत्तर हिंदुस्थानांत वास्तव्य करून ते पुढें पंधरा वर्षें येथेंच राहिले होते. ते शके १८४१ त समाधिस्थ झाले. त्यांनीं येथील **योगींद्र** मठाचा जीर्णोद्धार केला. हे कट्टे गणेश उपासक होते. चिंचवडचे साधु मोरया गोसावी यांनीं याच देवाची भक्ति केली. ते दर चतुर्थीस चिंचवडाहून मोरगांवास दर्शनास येत असत.

पुढें वृद्धापकाळीं त्यांना गणपतीचा दृष्टान्त झाला कीं, माझी कमंडलू डोहांत मूर्ति आहे ती काढून तूं चिंचवडास स्थापन कर व तेथेंच त्याची उपासना करीत जा. दर चतुर्थीस इतकें दूर येण्याची यातायात करीत जाऊं नको! त्याप्रमाणें मोरयांनीं त्या डोहांत बुडी मारून मूर्ति काढिली व तिची चिंचवडास स्थापना करून ते उपासना करूं लागले.

## पाली

कुलाबा जिल्ह्यांत पाली नांवाचें एक गांव आहे. तें पूर्वी भोर संस्थानांत होतें. त्यावेळीं सुधागड पेट्याचें ठाणें पालीच होतें. येथें जाण्यास कर्जत स्टेशनावर उतरावें लागतें तेथून नैर्ऋत्येस वीस मैलांवर डोंगराच्या पायथ्याशीं हा गांव आहे. गांव बराच मोठा आहे. तेथें हायस्कूल, मुन्सफ कचेरी, मामलेदार कचेरी, पोस्ट ऑफिस इत्यादि सोई आहेत. एक, ग्रंथालयहि आहे. ब्राह्मणवस्तीहि बऱ्यापैकीं आहे. येथील गणपतीचें देऊळ गांवाच्या एका टोंकाला आहे. देऊळ मजबूत आहे. तेथील गणपतीस बल्लाळेश्वर म्हणतात. बल्लाळ नांवाच्या भक्तानें त्याची स्थापना केली म्हणून त्यास बल्लाळेश्वर हें नांव मिळालें आहे.

॥ श्रीगणेशध्यान श्लोक ॥

कल्याणं वो विधत्तां, करटमदधुनि लोलकल्लोलमाला ।
खेलल्लो लंबकोला हलमुखरितदिक् चक्रवालांतरालम् ॥
प्रत्नं वेतंडरत्नं, सततपरिचलत्कर्णतालप्ररोहत् ।
वातांकूरा जिहीर्षा दरविवृतफणा श्रृंगभूषा भुजंगम् ॥ १ ॥

ही मूर्ति मुरूड जंजिऱ्याहून येथें आणली असा इतिहास आहे. मुरुडास सुमारें साडे तीनशें वर्षांपूर्वी सिद्दींनीं आफ्रिकेंतून येऊन आपलें राज्य दंडाराजपुरीस स्थापन केलें. त्यांचा तेथील हिंदु लोकांवर फार जुलूम होऊं लागला त्या जुलमाला कंटाळून गणेशभक्तांनीं ती मूर्ति तेथून हलवून दूर आड बाजूला डोंगराळ भागांत आणून ठेविली व तिची स्थापना तेथें केली हें संभवनीय वाटतें. या गणपतीचा उत्सव भाद्रपद व माघ शु. १ ते प्रंचमीअखेर पांच दिवस होत असतो.

## मढ

सेंट्रल रेल्वेच्या कर्जत-खोपवली फाट्यावर एका लहान स्टेशनापासून पश्चिमेस नऊ मैलांवर मढ हें क्षेत्र आहे. येथील देवास गणपति म्हणून

संबोधितात. गणेश म्हणजे ब्रह्मणस्पति म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्मस्वरूप असून ओंकार ॐ हें त्याचें रूप आहे. ॐ हें अक्षर अ+ऊ+म् ह्या तीन अक्षरांचें बनलें आहे. अ म्हणजे विष्णुस्वरूप, ऊ म्हणजे शिवस्वरूप व म म्हणजे सूर्यस्वरूप. त्याच्या अंगीभूत ब्रह्मदेव आहे, असें मानतात.

ॐ ही नादात्मिका शक्ति आहे. नादास अर्धमात्रा म्हणतात. बिंदूच्या ठिकाणीं गणेश म्हणजे परब्रह्म आहे. अ+ऊ+म ह्या तिघांच्या अर्धमात्रेसह जेथें मीलन होतें; तेथून सगुणरूपास प्रारंभ होतो. निर्गुणस्वरूप म्हणजे ॐकाररूप होय. ॐमध्यें बिंदूजवळ परब्रह्म, माया व खालीं जीव आहे. उजव्या हाताच्या पोकळ शून्याजवळ अनाद्यनंत व डाव्या बाजूच्या अकारामध्यें 'सच्चिदानंद' आणि खालच्या वांकणाखालीं सर्वशक्तिमान् असें ॐकाराचें असामान्य स्वरूप आहे. "ॐ, ॐ, ॐ, ॐ ब्रह्मानंद ॐ; ॐ, ॐ" कित्येक संन्यासी अशा नामचिंतनांत परब्रह्म-मग्न होतात! इतर गणपतींच्या मंदिरांप्रमाणें येथील देऊळ आहे. त्याची व्यवस्थाहि फार चांगली आहे. गांवांत ब्राह्मणवस्ती फार थोडी असावी.

## रांजणगांव

पुण्याहून अहमदनगरकडे जो रस्ता जातो त्या रस्त्यावर पुण्यापासून बत्तीस मैलांवर रांजणगांव आहे. तेथील गणपतीच्या स्थानाची अष्टसिद्धि विनायकांत गणना करण्यांत आली आहे. मणिपूर ऊर्फ रांजण क्षेत्रीं देव व तीन दानवांचीं राष्ट्रें ह्यांत कांहीं बेबनाव झाल्यामुळें मोठें युद्ध झालें. देव दानवांपेक्षां अधिक धनाढ्य व बलाढ्य असल्यामुळें त्यांना जय नक्की मिळेल असें वाटलें; पण त्यांचा पराभव झाला, म्हणून त्यांनीं महादेवाची मदत घेतली; तरी दुसऱ्या वेळींहि पराजय झाला। नारद शिवास भेटल्यावर पराभवाचें कारण युद्धारंभीं श्रीगणेशस्मरण न केल्यामुळें पराभव झाल्याचें कळलें! म्हणून तिसऱ्या वेळीं गणेशस्मरण करून युद्ध केलें; तेव्हां देवांचा जय होऊन ह्या लढाईत त्रिपुरासूर मारला गेला, व सर्व

देव बंधमुक्त होऊन सर्वत्र आनंदी आनंद झाला ! ह्यावरून कोणत्याहि कार्याच्या आरंभीं व शेवटीं "श्रीगणेश" स्मरण करावें. म्हणजे कार्य निर्विघ्नपणें पार पडतें ! असें आपल्या धर्मांत सांगितलें आहे.

## सिद्धटेक

हें क्षेत्र सेंट्रल रेल्वेवर आहे. पुण्याहून सोलापुराकडे जो रेल्वेचा फांटा जातो त्यावर **बोरीबेल** हें स्टेशन आहें. रेल्वेभाडें दीड रुपया आहे. ह्या स्टेशनापासून सहा मैलांवर सिद्धटेक आहे. हें भीमा नदीच्या कांठीं आहे. देऊळ अति मजबूत असून पेशवाई थाटाचें आहे. हवापाणी उत्तम आहे.


ह्या देवालयाचा गाभारा अहिल्याबाईनीं बांधिला. बडोद्याच्या नवकोट नारायणांपैकीं मैराळ यांनीं प्रथम सभामंडप बांधला. श्री. हरिपंत फडके ह्यांनीं घाट बांधला. ह्यांच्या स्मरणार्थ देवापुढें त्रिकाळ चौघडा सुरू आहे. त्याबद्दल वेतन सरकारांतून मिळतें. प्रदक्षिणा सहा फर्लांगाची आहे. यात्रेकरूंची सोय पुजारी लावतात.

## ओझर

ओझर येथील गणपति अष्टविनायकांपैकीं एक आहे. हें क्षेत्र पुण्याच्या उत्तरेस जुन्नरमार्गावर नारायणगांवापासून सहा मैलांवर कुकडी नदीच्या कांठीं आहे. देऊळ फार मोठें, मजबूत असून शेवटच्या बाजीराव पेशव्यांनीं हें बांधलें आहे. देवळाची व्यवस्थाहि चांगली आहे. जुन्नरजवळ **शिवनेरी** किल्ला आहे. तेथें मराठा-राज्य संस्थापक श्रीशिवाजीमहाराजांचा जन्म झाला. हा किल्ला अवश्य पहाण्यासारखा आहे.

## लेण्याद्रि

अष्टविनायकांपैकीं लेण्याद्रि सुप्रसिद्ध क्षेत्र आहे. लेण्याद्रि जुन्नर-पासून दोन तीन मैलांवर आहे. तो एक लहानसा पर्वत आहे. जुन्नराभोंवतीं बौद्धांचीं शेंसव्वाशें लेणीं आहेत. त्यांपैकीं एक लेणें या पर्वतावर आहे. 'लेणें' हा शब्द 'लयन' या शब्दापासून झाला आहे. पूर्वी येथें बौद्धांचें



श्रीछत्रपति शिवाजी महाराज

लेणें होतें; तें रिकामें पडल्यावर हिंदूंनीं आपल्या गणपतीची स्थापना येथें केली. ह्यावरून त्या स्थानास लेण्याद्रि हें नांव प्राप्त झालें.

बौद्धांचीं चैत्य व विहार अशीं दोन मंदिरें असत. चैत्य हें त्यांचें देऊळ व विहारांत बौद्धांचा निवास असे. त्या विहारांतच भिंतींत हा गणपति आहे. तेथून मोठा कडा तुटला असून त्यावरून दूरवरचा भव्य देखावा दिसतो. त्याच्या शेजारचा चैत्य अति उत्कृष्ट आहे व त्याचें नक्षीकाम वाखाणण्याजोगें आहे. येथील हवापाणी उत्तम आहे. एकांत विपूल आहे व तपश्चर्येस हें स्थान अति योग्य आहे. दर संकष्टी चतुर्थीस येथें बरेच भक्तजन येतात.

## चिंचवड

पुण्यापासून उत्तरेस चिंचवड दहा मैलांवर आहे. चिंचवड हें सेंट्रल रेल्वेचें स्टेशन आहे. स्टेशनापासून एक मैलांवर गांव आहे. चिंचवडास प्रसिद्ध गाणपत्य **मोरया गोसावी** ह्यांची समाधि आहे व ती **पवना** नदीच्या काठीं आहे. चिंचवडास मोरया गोसावी यांनीं बांधिलेलें गणेश-मंदिर आहे. त्याचें नांव मंगल मूर्ति असे आहे. या संस्थानाला उत्पन्न मोठें असून त्याची व्यवस्था सरकारानें नेमिलेल्या पंचांकडे आहे. या देवस्थानचें एकंदर उत्पन्न साठ हजार रुपयांचें आहे. तितकेंच उत्पन्न देववंशांतील कुटुंबास कायमचें तोडून दिलें आहे. देवस्थानांच्या उत्पन्नांतून अष्ट विनायकांची व्यवस्था होते.



कुर्यात् सदा मंगलम्

ओझर व लेण्याद्रि येथील गणपतींना दरसाल दोन तीनशें रुपये मिळतात. मढ व पालीशिवाय इतर अष्टसिद्धि विनायकांस दरसाल कांहीं ठराविक द्रव्य मिळतें. मोरया गोसाव्यांचा वार्षिक उत्सव मार्गशीर्ष शु॥ ३ ते ६ पर्यंत होत असतो. मोरया गोसावी ह्यांपासून सात पिढ्यांतील पुरुष महागणेश भक्त झाले. त्यांचीं दहनस्थळें चिंचवडास ओळीनें असून त्यांवर गणपतीच्या आकृति दिसतात. तेथील सर्व व्यवस्था वैदिकधर्माला अनुसरून आहे.

## आळंदी

आळंदी क्षेत्र पुण्याच्या ईशान्येस तेरा मैलांवर आहे. येथें श्रीज्ञानेश्वर महाराजांची समाधि आहे. **श्रीज्ञानेश्वर** व त्यांचे बंधु व बहीण हीं कांहीं काळ येथें राहात असत. महान् योगी चांगदेव हे वाघावर बसून व हातांत सर्पाचा आसूड म्हणजे चाबूक घेऊन त्यांना भेटावयास आले त्या वेळीं

ज्ञानेश्वरादि भावंडें भिंतीवर बसलीं होतीं. त्यांनीं चांगदेवास पाहातांच त्यांचा गर्वपरिहार करण्याकरितां त्याला ती भिंतच चालवून दाखविली !

तें पाहून चांगदेव त्यांस शरण आले व त्यांचें त्यांनीं शिष्यत्व पत्करिलें ! ज्ञानेश्वरांचे 'भावार्थदीपिका ऊर्फ ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांचीं पारायणें लाखों लोक करितात. आळंदीस आषाढ व॥ ११ व कार्तिक व॥ ११ ह्या दोन दिवशीं मोठी यात्रा जमते. ज्ञानेश्वरांची समाधि इंद्रायणीच्या कांठीं आहे. या देवस्थानची व्यवस्थाहि सरकारनें नेमिलेल्या पंचकमिटीकडे आहे. या देवस्थानाला उत्पन्न मोठें असून त्यांतून त्याचा सर्व खर्च चालतो.



श्रीज्ञानेश्वर महाराज

आळंदीहून ज्ञानेश्वरमहाराजांची पालखी पंढरपुरास पायीं जाण्याकरतां ज्येष्ठ व॥ १० ला तेथून निघते व पंढरपुरास आषाढ शु॥ १० ला पोंचते.


वाटेनें तिला तुकाराम महाराज, सोपानदेव, एकनाथ वगैरेंच्या पालख्या येऊन मिळतात. या पालख्यांबरोबर शेंकडों लोक असतात. आळंदीस म्युनिसिपालिटी, मराठी शाळा, पोस्ट ऑफिस, वारकऱ्यांच्या मुलांना भागवत धर्माचें शिक्षण देण्याकरितां निघालेली संस्था व श्रीनृसिंहसरस्वतींची समाधि ह्या संस्था आहेत. श्रीनृसिंह सरस्वति हे मोठे सिद्धपुरुष होऊन गेले. पुण्यांतील कै. अण्णासाहेब पटवर्धन हें त्यांचे भक्त होते. त्यांची पुण्यतिथि पौष महिन्यांत पौष शु. १५ ला मोठ्या थाटानें होते. त्यावेळीं हजारों लोकांना मुक्तद्वार असतें. आळंदीस कित्येक लोक मुद्दाम सेवा करण्याकरितां येऊन राहातात. आळंदीस यात्रेकरूंकरितां धर्मशाळा वगैरे सोयी आहेत.

## देहू

देहू हें क्षेत्र पुण्याच्या पश्चिमेस पंधरा मैलांवर आहे. तेथें जावयास सेंट्रल रेल्वेचें देहूरोड स्टेशन आहे. त्या स्टेशनापासून सहा मैलांवर इंद्रायणीच्या कांठीं देहू गांव आहे. देहूस तुकारामबुवा रहात असत.

तेथेंच त्यांनीं आपली अभंगरचना केली. त्यांचे अभंग हे पांचवा वेद म्हणून समजतात.

रामेश्वरभटानें त्यांचा छळ केला म्हणून त्यांनीं आपल्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीच्या डोहांत बुडविल्या; तरी ते धरणें धरून इंद्रायणीच्या कांठीं तेरा दिवस बसले ! अखेरीस त्यांच्या तपोबलानें त्या वह्या डोहांतून वर कोरड्या निघाल्या. तो डोह देहूस अजून दाखवितात. देहूस त्यांचें स्वतःचें पांडुरंगाचें देवालय आहे. त्याजपुढें ते कीर्तन, भजन करीत असत. तुकोबाची देहूस समाधि अशी नाहीं, कारण ते सदेह वैकुंठास गेले असा समज आहे. फाल्गुन वद्य २ ही त्यांची पुण्यतिथि असून त्या दिवशीं देहूस मोठी यात्रा भरते.



श्रीतुकाराम महाराज

॥ चित्तशुद्धि बोध ॥

आतां तरी पुढें हाचि उपदेश,
नका करूं नाश आयुष्याचा ।
सकळांच्या पायां माझे दंडवत,
आपुलालें चित्त शुद्ध करा ।
हित तें करावें देवाचें चिंतन,
करूनिया मन शुद्ध भावें ।
तुका म्हणे नाहीं भोळेपणावीण, ( श्रद्धेशिवाय )
जाणीव तें शीण रितें पाप ॥ १ ॥

## जेजुरी

खंडोबा हा कोणी शंकराचा तर कोणी स्कंदाचा म्हणजे कार्तिक स्वामींचा अवतार मानतात. ह्याच्या बायकोचें नांव म्हाळसा व त्याचें वाहन घोडा आहे. खंडोबाचीं देवालयें महाराष्ट्रांत बरींच आहेत. त्यांत साताऱ्याजवळील पाल, औरंगाबादेजवळील सातारा गांव व मिरजेजवळील मंगसुळी या ठिकाणचीं देवस्थानें प्रसिद्ध आहेत. जेजुरी गांव पुण्यापासून तीस मैलांवर आहे. तेथें जाण्यास सदर्न रेल्वेचें जेजुरी हें स्वतंत्र स्टेशन आहे.

जेजुरी स्टेशनापासून एका मैलावर हें खंडोबाचें देऊळ आहे. जेजुरीस इंग्रजी शाळा, पोस्ट ऑफिस, दवाखाना, मराठी शाळा व यात्रेकरूंकरितां धर्मशाळा इत्यादि सोयी आहेत. **खंडोबा** हें लाखों महाराष्ट्रीयांचें कुलदैवत आहे. पूर्वी ज्यांना नवसानें मुलगे व मुली होत असत ते त्यांना खंडोबाला वाहात असत. मुलगा असला म्हणजे त्याला **वाघ्या** व मुलगी असली म्हणजे **मुरळी** म्हणत असत. पण त्या वेळच्या सरकारानें मुरळ्याविरुद्ध कायदा करून ही चाल बंद पाडली आहे.

जेजुरीला दर सोमवती अमावस्येस मोठी यात्रा भरते. त्याशिवाय चंपाषष्ठीचा उत्सवाहि तेथें मोठा होतो. महाराष्ट्रांतील मराठे सरदारांनीं या देवस्थानाला मोठमोठ्या देणग्या दिल्या आहेत. इंदूरच्या होळकर सरकाराचा तेथें चौघडा आहे. खंडोबाचें देऊळ एका डोंगरावर आहे. तें किल्ल्या-सारखें मजबूत बांधलें आहे. येथें जावयास बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात. भंडारा व खोबरें हा या देवाचा प्रसाद देतात. भंडारा म्हणजे हळद होय. जेजुरीचा खंडोबा डोंगरावर आहे. त्याशिवाय त्याच डोंगरावर जरा पुढें चढून गेल्यावर **कडेपठार** आहे. त्यावर खंडोबाचें मूलस्थान म्हणून एक देऊळ आहे.

## वाई

पुण्यापासून छप्पन मैलांवर वाई हें प्रसिद्ध क्षेत्र कृष्णाकांठीं आहे. हें क्षेत्र फार जुनें आहे. पांडव वनवासांत असतां या विराट नगरींत कांहीं काळ त्यांचें वास्तव्य होतें. 'कीचकवध' ह्या ठिकाणीं झाला असें म्हणतात, येथें श्रीमत्परमहंस **रामानंद** व श्री. **प्रज्ञानंद** ह्यासारखे अत्यंत विद्वान्. विरक्त व ब्रह्मनिष्ठ असे थोर महात्मे होऊन गेले ! पेशवाईतील श्रीमंत **सरदार रास्ते** यांनीं वाईत अनेक घाट व देवळें बांधून या क्षेत्रास शोभा व पावित्र्य आणिलें आहे. त्यांनीं विद्वान् ब्राह्मणांना इनाम जमिनी देऊन व घरें बांधून देऊन त्यांची स्थापना येथें केली आहे. त्या भागास धर्मपुरी असें म्हणतात. कृष्णेवर एक गणपतीचें देऊळ आहे. त्यांतील गणपतीच्या अवाढव्य स्वरूपावरून त्याला ढोल्या गणपती म्हणतात.

वाई हें प्राचीन विद्येचें मोठें पीठ होतें! हा त्या क्षेत्राचा लौकिक सुमारें तीनचारशें वर्षें सतत टिकून राहिला होता. पण अलीकडे विद्वान्-वैदिक व शास्त्री ब्राह्मणांना राजाश्रय राहिला नाहीं. त्यामुळें तरुण पिढी इंग्रजी विद्येकडे ओढली गेली व जुनी विद्या मृत्युपंथास लागली. अशा वेळीं कै. वे. शा. सं. **नारायणशास्त्री मराठे** यांनीं आपल्या शिष्यवृंदांच्या मदतीनें ‘ प्राज्ञ पाठशाळा ’ नांवाची शिक्षणसंस्था काढली व तिच्यांत वेद व शास्त्र यांच्या जोडीस इंग्रजी शिक्षण देऊन नवा शिक्षित वर्ग निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यास आरंभीं यश आल्यासारखें दिसलें; पण तेंहि न टिकून ती संस्था आतां मोडकळीस आली आहे. वाई क्षेत्र हेंहि प्राचीन विद्येच्या दृष्टीनें मोडल्यासारखेंच आहे. वाईत **कृष्णाबाईचें** देऊळ असून प्रत्येक घाटावर माघ मासीं व ज्येष्ठ मासीं कृष्णाबाईचे उत्सव होतात. त्या वेळीं कीर्तन, पूजा, अन्नसंतर्पण इत्यादि कार्यें उत्साहानें होतात. दर बारा वर्षांनीं सूर्य कन्या राशीस येतो तेव्हां कन्यागत म्हणतात. त्या वर्षीं लांबलांबचे लोक तीर्थविधीकरितां वाईस येतात.



श्रीकृष्णाबाई

## धौम-महाबळेश्वर

वाईपासून एकोणीस मैलांवर **महाबळेश्वर** हें प्रख्यात क्षेत्र आहे. तेथें कृष्णा, कोयना, सावित्री, गायत्री व वेण्णा ह्या पांच नद्यांचा उगम झाला आहे. त्या उगमस्थानीं एक मोठें पंचगंगा देऊळ बांधिलें असून त्याजवळ ‘ पंचगंगा ’ नांवाचें एक कुंडहि आहे. कुंडाचें पाणी अतिशय थंड असतें. त्यांत भक्तजन स्नान करितात व महाबळेश्वराचें दर्शन घेतात. हें क्षेत्र धौम-महाबळेश्वर होय. येथून तीन मैलांवर नवीन महाबळेश्वरची वस्ती आहे. तिला **नहर** महाबळेश्वर म्हणतात.

महाबळेश्वरची लांबी दहा मैल व रुंदी तीन मैल आहे. भर उन्हाळ्यांत वस्ती दहा हजार असते. उंची ४७०० फूट आहे. सर्वांत उंच शिखर

कॅनाट पीक आहे. उंच शिखरावरून प्रतापगड व समुद्रहि दिसतो. एकापेक्षां एक उंच शिखरें, खोल दऱ्या, धबधबे, वनश्री इत्यादिकांनीं सृष्टिसौंदर्यास बहार आल्यामुळें अत्यानंद होतो! इंग्रजी राज्य होतें तेव्हां उन्हाळ्यांत मुंबई इलाख्याचे गव्हर्नर येथें येऊन राहात असत. त्याशिवाय कांहीं संस्थानिकहि येत. त्या सर्वांचे बंगले महाबळेश्वरीं आहेत. येथील पाणी उत्कृष्ट आहे. त्यांत लोह असल्यामुळें हें पाणी पचावयास कठीण असतें; म्हणून महाबळेश्वरीं प्रकृतीसाठीं राहावयास आलेल्या लोकांना किती एक मैल रपेटीस जावें लागतें; पण हवेच्या थंडपणामुळें त्यांस थकवा न येतां उत्साह वाटतो.

या डोंगरावर झाडी विपुल आहे व वेगवेगळीं टोकें म्हणजे बॉंबे, लडविक, आर्थर सीट इत्यादि. Points पाइंटस् असून तेथून भव्य व रम्य देखावा दृष्टीस पडतो. या महाबळेश्वरास ' धोम महाबळेश्वर 'हि म्हणतात. महाबळेश्वर कृष्णेच्या उगमस्थानीं उंच डोंगरावर आहे व **धोम** हें क्षेत्र जेथें कृष्णा पर्वतावरून खालीं उतरते तेथें कृष्णेच्या कांठीं आहे. गांव लहान आहे. घाटावर नृसिंहाचें देऊळ आहे. येथें नृसिंहजयंतीस मोठा उत्सव होतो. वाईपासून हें क्षेत्र सहा मैलांवर असल्यामुळें वाईचे लोक धोमास नृसिंहजयंतीस जातात.

## भीमाशंकर

भीमाशंकर हें स्थान पुणें जिल्ह्यांतील अंबेगांव पेठ्यांत भीमेच्या उगमापाशीं ऐन घाटमाथ्यावर आहे. त्याच्या पश्चिमेस कोंकण म्हणजे ठाणें जिल्हा येतो. येथें जाण्यास दोन मार्ग आहेत. एक, पुण्याहून खेड, मंचर, घोडें, डिंभें, **पोखरी** या मार्गानें व दुसरा, कोंकणांतून कर्जतवरून **सांडस** मार्गानें जातां येतें. पहिला मार्ग मोटारीचा असून पुण्यापासून भीमाशंकराचें अंतर ७५ मैल आहे. कर्जतकडून भीमाशंकराचा पायथा पांच कोस असून पायथ्याशीं सांडस गांव आहे. तेथून सह्याद्रीचा घाट चढावा लागतो. हा चढ फारच बिकट व मनुष्यास मेटाकुटीस आणणारा आहे. हा चढ चढावयास मला पहाटेच्या वेळींहि तीन तास लागले !

भीमाशंकरास वस्ती अशी नाहींच व राहण्याचीहि मनाजोगी सोय नाहीं. फक्त तेथें देवाचे एक पुजारी राहातात. भीमाशंकराचें देऊळहि लहानच आहे. लिंग भुईबरोबर असून तेंहि विशेष नजरेंत भरण्यासारखें नाहीं. देवळाजवळ दोन कुंडें आहेत. एक स्नानाकरितां व दुसरें पिण्याच्या पाण्याचें आहे. भोंवतालीं दाट अरण्य आहे. जवळच पर्वताच्या खिंडींत भीमेचा उगम दाखवितात; पण वैशाखाच्या महिन्यांत ही जागा कोरडी होती. मी भीमाशंकरास एक दिवस होतों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं घाट उतरून परत कर्जतला आलों. उतरतांना मात्र फार त्रास न होतां दीड तासांत पायथ्याशीं आलों. पुण्याहून भीमाशंकरास मोटारीनें जाण्यास माणशीं पांच रुपये भाडें पडतें. महाशिवरात्रीस येथें मोठी यात्रा जमते.

## त्र्यंबकेश्वर

त्र्यंबकेश्वर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे. गोदावरीचा उगम त्र्यंबकाजवळील ब्रह्मगिरीवर झाला आहे. तेथें गंगाद्वार म्हणून एक पवित्र स्थळ आहे. त्या ठिकाणीं गोदावरी थेंबाथेंबानें खालीं पडत असते, तेथें जाण्यास सुमारें पांचशें पायऱ्या चढाव्या लागतात. या पर्वताच्या पायथ्याशीं ज्ञानेश्वरांचे वडील बंधु व गुरु निवृत्तिनाथ यांची समाधि आहे. त्र्यंबकेश्वर या गांवीं त्र्यंबकेश्वराचें म्हणजे महादेवाचें फार मोठें व भव्य मंदिर आहे. तेथें पूर्वी जुनें महादेवाचें मंदिर मोडून त्या ठिकाणीं मुसलमानांनीं मशीद बांधली होती. ती पाडून श्रीमंत **नानासाहेब** पेशव्यांनीं या ठिकाणीं सध्यांचें मंदिर बांधलें आहे.

गांवांत म्युनिसिपालिटी, शाळा, पोस्ट ऑफिस इत्यादि सर्व सोयी आहेत. ब्राह्मणवस्तीहि बरीच आहे. तीर्थोपाध्ये आलेल्या यात्रेकरूंची सर्व प्रकारची सोय करितात. हे आलेल्या यात्रेकरूंची नोंद प्राचीन काळापासून ठेवितात. तिचा उपयोग कुलवृत्तांत लिहिण्यासहि होतो. देवळाचा सभामंडप व गाभारा असे दोन भाग आहेत. या गाभाऱ्यांत

शंकराचें लिंग असून भोंवतालीं नंदादीप आहेत. या क्षेत्राची विद्वत्तेबद्दल पूर्वीं फार ख्याति होती; पण आतां राजाश्रयाच्या अभावीं तेथें विद्वान् लोक फार थोडे उरले आहेत. हें स्थळ फार रम्य आहे. वनश्री उत्तम आहे. तपश्चर्येला येथील एकांत मानवणारा आहे. म्हणूनच निवृत्तिनाथ त्यांनीं राहण्यास हें स्थळ पसंत केलें. त्र्यंबकेश्वर नाशिकपासून सुमारें एकोणीस मैल आहे. नाशिकहून तेथें जाण्यास एस्. टी. च्या मोटारी मिळतात. त्याला भाडें पावणे दोन रुपये पडतें.

## पंढरपूर



॥ श्रीविठ्ठलध्यान श्लोक ॥

समचरणसरोजं, सांद्रनीलांबुदाभं ।
जघननिहितपाणिं, मंडनं मंडनानां ।
तरुणतुलसिमाला, कंधरं कंजनेत्रम् ।
सदयधवलहासं, विठ्ठलं चिंतयामि ॥ १ ॥

पंढरपूर हें क्षेत्र भीमेच्या कांठीं आहे. तिला तेथें चंद्रभागा म्हणतात. कारण त्या ठिकाणीं तिचा आकार चंद्रकोरेप्रमाणें झाला आहे. पंढरपुरास जाण्यास सेंट्रल रेल्वेच्या कुर्डुवाडी स्टेशनावर उतरावें लागतें. तेथून बार्शी लाईट रेल्वेचा फांटा पंढरपुरास जातो. त्यावर पंढरपूर हें स्टेशन आहे. याशिवाय पुणें, सातारा, मिरज, कऱ्हाड, महाड इकडून पंढरपुरास जाणाऱ्या सडका आहेत. या रस्त्यांनीं एस्. टी. च्या गाड्यांतून पंढरपुरास लोक जातात. पंढरपूर हें भागवतधर्माचें म्हणजे वारकरी पंथाचें फार मोठें केंद्र आहे. तेथें पांडुरंगाच्या दर्शनास हजारों वारकरी दर एकादशीस येतात. याशिवाय आषाढी व कार्तिकी एकादश्यांना तेथें लाखावर यात्रा जमते.

पांडुरंगाचें देऊळ फारच मोठें आहे. त्यांतील मूर्तींची स्तुति

तुकारामासारख्या साधुवृंदांनीं रसाळ वाणीनें केली आहे. देवाच्या पुजाऱ्यांना बडवे म्हणतात. पूर्वीं हल्लींप्रमाणेंच यात्रा फार मोठी भरत असे. त्या वेळीं पुजारी लोक धोतरांचे तोबे करून त्यांनीं यात्रेकरूंस बडवीत व या उपायानें गर्दी मोडीत असत. यावरून त्या पुजाऱ्यांस 'बडवे' हें नांव मिळालें असावें. पंढरपुरांत अनेक साधु राहात असत व विद्वानांचीहि वस्ती फार मोठी होती. अजूनहि या क्षेत्राचें महत्त्व पूर्वींसारखेंच आहे. चंद्रभागेचें वाळवंट फार मोठें व प्रशस्त आहे. नदीला पाणीहि बरेंच असतें. यामुळें परगांवाहून येणारे वारकरी दिंड्या-पताका घेऊन या वाळवंटांत नाचत–बागडत भक्तिभावानें भजन करीत असतात. हें दृश्य पाहून नास्तिकांचें मनहि भक्तिरसानें हेलावल्याशिवाय राहात नाहीं ! पांडुरंगाच्या दर्शनास पूर्वेस नागपुरापासून तों दक्षिणेस बेळगांवपर्यंतच्या गांवागांवांतून भक्तांची गर्दी लोटत असते. पंढरपूर हा गांव तालुक्याचा आहे. त्यांत इंग्रजी मराठी शाळा, मामलेदार कचेरी, मुन्सफ–कोर्ट, म्युनिसिपालिटी, धर्मशाळा, पोस्ट व तारऑफिस इत्यादि सुखसोयी आहेत.

पांडुरंगाचा **पुंडलीक** हा महाभक्त होऊन गेला. तो तरुणपणीं बायकोच्या नादीं लागला होता व आईबापांना जुमानीनासा झाला होता; पण पुढें त्याच्या वृत्तींत **सज्जनसंगतीनें** पालट पडून तो निःसीम मातृ-पितृभक्त बनला ! त्याची ती अलोट भक्ति पाहून पांडुरंग त्याच्या भेटीस आला; पण त्यानें त्याजकडे लक्ष न देतां एक वीट त्याजकडे फेकून दिली व तिजवर त्यास उभें राहण्यास सांगितलें. तेव्हांपासून पांडुरंग म्हणजे विठोबा आज " अठ्ठावीस युगें " विटेवर उभा आहे. पुंडलीक हा पांडुरंगाचा आद्य भक्त म्हणून ' पुंडलीक वर दे हरी विठ्ठल ' असा घोष वारकरी लोक मधून मधून करीत असतात.



पुंडलीक

# पैठण

पैठण हें क्षेत्र फार प्राचीन आहे. दोन हजार वर्षांपूर्वी ही शालिवाहन राजाची राजधानी होती. तेथील विद्वानांची परंपरा फार जुनी आहे. जो मान उत्तरेस काशी क्षेत्रास तोच मान दक्षिणेंत पैठणास होता ! काशी गंगेच्या तीरावर आहे; तर पैठणासहि गोदावरीला गंगाच म्हणतात. या क्षेत्रास जाण्यास दोन रस्ते आहेत. एक अहमदनगर, शेवगांव व पैठण असा मोटारीचा व दुसरा मनमाड ते औरंगाबाद लोहमार्गाचा व औरंगाबाद ते पैठण मोटारीचा असे मार्ग आहेत. ज्ञानेश्वर व त्यांचे बंधु ह्यांचें मौंजीबंधन आळंदीकडील ब्राह्मण करीत ना. तेव्हां ते पैठणास गेले; तरी ब्राह्मण हीं संन्याशाचीं मुलें म्हणून त्यांचा व्रतबंध लावण्यास तयार होईनात ! तेव्हां ज्ञानेश्वरांनीं रेड्याच्या मुखानें वेद वदविला !

ज्ञानेश्वरांचे भक्त एकनाथस्वामी हे पैठणचेच होते. त्यांनीं ज्ञानेश्वरीचें पुन्हां संशोधन करून तिची सुधारलेली आवृत्ति काढली. तीच हल्लीं सर्वांच्या वाचनांत व पठणांत आहे. एकनाथ हे फार थोर साधु होऊन गेले ! त्यांचें 'भागवत' सर्व भक्तांत मान्यता पावलें आहे. त्याशिवाय 'रुक्मिणी स्वयंवर' यासारखे कांहीं ग्रंथ आहेत. नाथांच्या घरीं श्रीकृष्ण श्रीखंड्या होऊन गंध उगाळीत होता व गंगेचें पाणी कावडीनें आणीत होता. अशा आख्यायिका आहेत. त्यांच्या घरांत एक रांजण होता. श्रीकृष्ण कावडीनें पाणी आणून तो भरीत असे !

नाथांची समाधि गंगेच्या कांठीं गांवाबाहेर आहे. तेथें नाथषष्ठीस म्हणजे फाल्गुन व. ६ त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं मोठी यात्रा भरते. पैठणांत शिवदिन केसरी, कृष्ण दयार्णव या साधूंच्याहि समाधि आहेत. पैठण हें रेशमी वस्त्रांविषयीं पूर्वी फार प्रसिद्ध होतें. तेथें पागोटीं, पैठण्या, पितांबर हे होत असत. अलीकडे हें गांव बरेंच मोडकळीस आलें आहे. कांहीं मोठमोठाले वाडे ओस पडले आहेत. पैठण हा तालुक्याचा गांव असून तेथें सरकारी कचेऱ्या आहेत.

## प्रयाग

प्रयागाचें 'अलाहाबाद' असें दुसरेंहि नांव आहे. तें मुसलमानांनीं दिलेलें आहे. अलाहाबाद हें मोठें शहर आहे. ही उत्तर प्रदेशाची राजधानी असून राज्याच्या बहुतेक कचेऱ्या या शहरांत आहेत. अलाहाबादेस गंगा, यमुना ह्यांचा संगम झाला आहे. याला 'त्रिवेणी संगम' असें म्हणतात. म्हणजे तीन नद्यांचा संगम होय. ह्यांतील तिसरी नदी सरस्वति ही गुप्त आहे. या दोन नद्यांचा संगम जेथें झाला आहे तेथें त्यांचें पात्र समुद्रासारखें अफाट आहे. वाळवंटहि अति विस्तीर्ण आहे. सोमेश्वर संगमाच्या पलीकडे आहे. मकरसंक्रमणाच्या वेळीं या वाळवंटांत हजारों यात्रेकरू झोपड्या बांधून व राहुट्या घालून राहातात.

प्रयागे मुण्डनम्, काश्याम् धुण्डनम्, गयायां च पिण्डदानम् ।

असे विधि त्या त्या क्षेत्रांत करण्याचा प्रघात आहे. त्रिवेणी संगमावरचें स्नान मोक्षदायक आहे असें समजतात. संगमस्थानीं **सौभाग्यवति स्त्रियांचें वेणीदान** करतात व विधवांना मुंडन करावें लागतें. पुरुष क्षौर करतात. वेणीदानाच्या वेळीं अवश्य ती सामग्री उपाध्ये यजमानास योग्य वेळीं देतात. त्या वेळीं पति-पत्नी विवाहाच्या सोहळ्याप्रमाणें वधू—वरांचीं वस्त्रें व अलंकार परिधान करितात. फुलांच्या मुंडावळ्या बांधतात व डोक्यांवर फुलांचे मुकुट बांधून व एकमेकांच्या पदरांना गांठी मारून तीं वाजत गाजत नदीतीरीं थाटानें येतात !

हें दांपत्य सौभाग्यवायनें हातांत घेऊन नावेंतून संगमाच्या मध्यस्थानीं येतें. पुरोहितांनीं अवश्य ते मंत्र म्हटल्यावर पति पत्नीस मांडीवर घेऊन तिची चार बोटें वेणी कापून ते केस, गंगेची दक्षिणा व एकादा दागिना हीं सर्व वाद्यांच्या घोषांत गंगामाईस आदरपूर्वक अर्पण करितो. कुटुंबास आरोग्य व आपणांस अखंड सौभाग्य लाभावें म्हणून ती गंगेची प्रार्थना करिते. द्रविड लोक वेणीदान करतेवेळीं सगळ्या मस्तकावरील केसांचें समूळ मुंडन करतात.

संगमाच्या पलीकडे प्राचीन किल्ला आहे. तेथील भुयारांत कुबेर, कपिल मुनि, पांडव इत्यादिकांच्या मूर्ति आहेत. बाहेर अशोकस्तंभ आहे. याशिवाय अक्षय्य असा अश्वत्थवृक्ष आहे. त्या वृक्षावरून गंगेंत उडी टाकली असतां मोक्ष मिळतो, अशी भावना आहे. किल्ला अतिशय मजबूत आहे. ह्या किल्ल्याजवळच दारागंज म्हणून भाग आहे. त्यांतच क्षेत्रोपाध्ये राहातात. तेथें महाराष्ट्रीय सरदारांचे वाडेहि आहेत व महाराष्ट्रीय ब्राह्मणांची वस्ती असून ते यात्रेकरूंचीं प्रयागांतील सर्व धर्मकृत्यें करतात. दर बारा वर्षांनीं कुंभराशीच्या पर्वणीस येथें पुष्कळ यात्रेकरूंचा मेळा जमतो.

## चित्रकूट

ह्या क्षेत्रीं रामायणांतील बरींच कृत्यें घडलीं, कारण रामाचें वास्तव्य या स्थळीं कांहीं काळ होतें. येथें श्रीराममंदिर आहे. वानरसेनाहि आहे. मंदाकिनी घाटावर यात्रेकरू स्नानें, तीर्थादि विधि करतात. ह्या क्षेत्रींच श्रीतुलसीदासांस रामरायाचा साक्षात्कार झाला! मग त्यांना काव्यस्फूर्ति होऊन त्यांनीं 'तुलसीदास रामायण' हा मोठा प्रासादिक ग्रंथ हिंदींत रचला. उत्तर हिंदुस्थानांतील बरेच भक्त ह्या ग्रंथाची मोठ्या श्रद्धेनें, अत्यानंदानें पारायणें करतांना आढळतात.

॥ श्रीवाल्मीकि रामायण श्लोक ॥

आदौ रामतपोवनाधिगमनं, हत्वा मृगं कांचनं ।
वैदेहीहरणं जटायुमरणं, सुग्रीवसंभाषणं ।
वालीनिर्दलनं समुद्रतरणं, लंकापुरीदाहनं ।
पश्चाद्रावणकुंभकर्णहननं एतद्धि रामायणम् ॥ १ ॥

अनेक ऋषि येथें तपश्चर्या करतात. या स्थळीं कोणासहि मायामोह पडत नाहीं, देहांतीं स्वर्ग मिळतो. युधिष्ठिर व नल येथील वास्तव्यानें संकटमुक्त झाले. दमयंती व नळ ह्यांना पुन्हां राज्य मिळालें. अनेक पुराणांत ह्या क्षेत्राविषयीं अति रम्य स्थळ म्हणून वर्णन केलें आहे.

हल्लींहि सद्भक्तांचे सन्मनोरथ येथील रहाणीनें पूर्ण होतात. श्री. दाशरथी रामाच्या व अत्रि ऋषींच्या निवासानें ही जागा तपोभूमि बनली आहे.



राणी दमयंती



नल राजा

प्रयागपासून मध्यें रेल्वेनें त्रेसष्ट मैल माणिकपूर स्टेशन तेथून एकोणीस मैलांवर करवी स्टेशन, येथून चोवीस मैलांवर चित्रकूट स्टेशन आहे. चित्रकुटाहून चार मैलांवर करवी स्टेशनापासून सीतापूर वस्तीचा गांव पांच मैलांवर आहे म्हणून यात्रेकरूंना करवीपासूनच सीतापुराला जाणें फार सोईचें आहे. कारण करवी स्टेशनाला सर्व सोयी होतात.

**प्रेक्षणीय स्थळें**—कामदगिरी प्रदक्षिणा, राघवप्रयाग–स्नान व सीतापुरांतील मंदिरें, कोटितीर्थ, सीतारसोई, हनुमानधारा, केशवगढ, प्रमोदवन, गुप्त गोदावरी स्नान, कैलास पर्वत, भरत कूप व रामशय्या इत्यादि आहेत.

## श्रीकाशी–विश्वेश्वर

काशी हें भारतांतील सर्व क्षेत्रांत पहिल्या प्रतीचें क्षेत्र आहे. काशी भागीरथीच्या तीरावर आहे. वरुणा व असि ह्या दोन नद्या या ठिकाणीं भागीरथीस मिळतात. म्हणून या क्षेत्रास दुसरें नांव ‘ वाराणसी ’ असें आहे. वाराणशी हें नांव हरिश्चंद्र राजाच्या वेळीं काशीला होतें, बनार नांवाच्या हिंदु राजानें ह्या क्षेत्राचा सुधारून विस्तार केला म्हणून ‘ बनारस ’ असेंहि नांव पडलें आहे; सृष्टींतील विविध रस ह्या नगरींत आहेत म्हणून या क्षेत्रास **बनारस** असें म्हणतात. काशीतील मुख्य देव **विश्वनाथ** आहे. त्याचें देऊळ मुसलमानांनीं बऱ्याच वेळां पाडलें होतें. त्या त्या वेळीं हिंदूंनीं तें पुन्हां बांधिलें !

अखेरीस औरंगजेबानें तें पाडून त्या जागीं मशीद बांधिली. त्यानंतर हल्लींचें बांधिलेलें देऊळ आहे, मशिदीसमोर पूर्वींचा नंदी अजूनहि आहे. ह्या नवीन मंदिरांत पहिले विश्वनाथ असल्याचा दृष्टान्त, भक्तांच्या आग्रहास्तव नवीन शाळुंका पिंडी तिरपी झाली !

॥ श्रीविश्वनाथध्यान श्लोक ॥

वेदान्तेषु यमाहुरेकपुरुषं, व्याप्य स्थितं रोदसि ।
यस्मिन्नीश्वर इत्यनन्यविषयः शब्दो यथार्थाक्षरः ।
अंतर्यश्च मुमुक्षुभिर्नियमितः प्राणादिभिर्मृग्यते ।
स स्थाणुः स्थिरभक्ति, योगसुलभो निःश्रेयसायास्तु वः ॥ १ ॥

विश्वेश्वरास पाणी घालण्यास कोणाहि जातीच्या मनुष्यास बंदी नाहीं. विश्वनाथाच्या देवळाप्रमाणें मुसलमानांनीं बिंदूमाधवाचें देऊळ पाडून तेथें मशीद बांधिली. मग दुसऱ्या ठिकाणीं हिंदूंनीं बिंदुमाधवाचें देऊळ बांधिलें. काशीस ज्यास ऐपत आहे व जो भाविक आहे, असा कोणीहि हिंदु मनुष्य गेल्याशिवाय राहात नाहीं. काशीस गंगेवर मोठा पूल आहे. त्यावर उभें राहून गंगेकडे दृष्टि फेकल्यास तिच्या कांठावर शेंकडों देवळांच्या व घाटांच्या रांगा दृष्टीस पडतात !

गंगेचें पात्र फारच रुंद आहे. त्यांत नेहेमीं नावा जा ये करीत असतात. गंगेच्या दुसऱ्या कांठाला रामनगर नांवाचें गांव आहे. तेथें काशीचा राजा राहातो. काशीस महाराष्ट्रीय ब्राह्मणांची वस्ती मोठी आहे. त्यांजकडून महाराष्ट्रीय यात्रेकरूंची व्यवस्था चांगली राहाते. त्याशिवाय पंडे लोकहि आहेत. ते काशीच्या स्टेशनावर येऊन यात्रेकरूंची ओढाताण करितात व त्यांना आपल्या मकाणांत घेऊन जातात, पण त्यांच्या तावडींत न सांपडतां आधीं पत्ता मिळवून कोणाहि महाराष्ट्रीय ब्राह्मणाकडे जाणें सुखाचें असतें. प्रयाग, काशी व गया यांना त्रिस्थळी यात्रा म्हणतात. या तीनहि ठिकाणीं गेल्याशिवाय काशीयात्रा पुरी होत नसते. या तिन्ही

स्थळीं यात्रेची सांगता होण्याकरितां श्राद्धादि विधि आवश्यक आहेत. काशी हें सर्व भरतखंडांत प्राचीन विद्येचें सर्वश्रेष्ठ पीठ समजलें जातें. त्यांत भारतांतील सर्व प्रांतांमधील ब्राह्मण येऊन राहिले आहेत. पूर्वी काशींत अन्नछत्रें पुष्कळ होतीं. त्यांत जेवून ब्राह्मण विद्यार्थी विद्यार्जन करीत, पण आतां तीं अन्नछत्रें बंद झालीं आहेत व ब्राह्मणांचेंहि वेद व शास्त्रें ह्यांच्या अध्ययनावरील लक्ष उडालें आहे ! 'कालाय तस्मै नमः'.

विद्वान् ब्राह्मणहि दिवसानुदिवस कमी होत चालले आहेत. म्हणून **पंडित राजेश्वरशास्त्री द्रवीड** ह्यांनीं काशींत **'सांगवेद विद्यालय'** स्थापन केलें आहे. त्यांत शिकून जे परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांना वर्षासनें देण्यांत येतात. याशिवाय काशींत **संस्कृत विद्यापीठ** आहे. तें सरकारनें आपल्या खर्चानें चालविलें आहे. काशीच्या बाहेर बनारस हिंदु **युनिव्हर्सिटी** नांवाचें आधुनिक पद्धतीचें मोठें विद्यापीठ आहे. हें कै. **पंडित मदन मोहन मालवीय** यांनीं स्थापन केलें. या विद्यापीठांत बहुतेक सर्व शाखांचीं महाविद्यालयें आहेत. ती एक मोठी वसाहतच असून तिच्यांत प्राध्यापकांना राहाण्याकरितां घरें व विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहें बांधिलीं आहेत !

काशीपासून जवळ **सारनाथ** नांवाचें ठिकाण आहे. तेथें उत्खनन करून बौद्धांचे बरेच विहार उकरून काढण्यांत आले आहेत. **जपानी** लोकांनींहि येथें बुद्धाचें एक देवालय बांधिलें असून त्यांतील चित्रें फार सुरेख आहेत. एक पदार्थसंग्रहालयहि आहे. त्यांत उत्खननांत सांपडलेल्या वस्तु ठेविल्या आहेत. कलाकुसरीच्या दृष्टीनें त्या फारच सुबक आहेत. काशींत अस्सल भरजरीचे अनेक पदार्थ बनवितात. येथील ज्ञानवापी कुंड जटिलवान योग्यानें त्रिशूळ मारून उत्पन्न केलें. **राम-रहिमचे भक्त** ज्यांस मनोभावें भजत अशा **कबीराचा** जन्ममृत्यु याच क्षेत्रांत झाला ! **हरिश्चंद्राची** सत्यनिष्ठा त्या क्षेत्रीं कसाला लागली. डॉ. **बेझंटबाईचें** सेंट्रल हिंदु कॉलेज, थिऑसॉफिकल लॉज व **रामकृष्ण सेवाश्रम** वगैरे संस्था येथें आहेत. कांहीं यात्रेकरू पंचवीस कोसांची प्रदक्षिणाहि करितात.

अनुक्रम (१७९) ..... दि: .....
क्रमांक ..... नों: दि: .....



काशी हिंदु विश्वविद्यालयाचे संस्थापक व प्रमुख संयोजक
कै. पंडित मदन मोहन मालवीय

काशीहून परत येतांना यात्रेकरू गंगोदक व काळभैरवाचे गंडे आणितात. गांवीं आल्यावर गंगापूजन करून गंडे आप्तेष्टांना वाटतात.

## विद्याप्रशंसा

यापरि सकळ सुखें जी देई, दुःखें समस्त जी वारी।
त्या विद्यादेवीतें अनन्य भावें सदा भजा भारी ॥ १ ॥

श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकर.

**अध्यक्ष, सांगवेद विद्यालय, गुरुवर्य पंडित राजेश्वरशास्त्री द्रवीड**

॥ श्रीसद्गुरु वंदन श्लोक ॥

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम्।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥

## श्रीगया

गया हें त्रिस्थळींपैकीं शेवटचें क्षेत्र आहे. तें फल्गू नदीच्या कांठीं आहे. फल्गू ही गुप्तगंगा आहे म्हणजे वर वाळवंट व खालीं आंत पाणी अशी ही नदी आहे. गयेच्या पंड्यांना '**गयावळ**' म्हणतात.. बहुधा या पंड्यांकडेच यात्रेकरूंना उतरावें लागतें. गयेस मोठमोठ्या धर्मशाळा आहेत. त्यामुळें यात्रेकरूंची उतरण्याची सोय चांगली आहे. शहरहि फारसें मोठें नाहीं. विद्वान् लोकहि थोडेच आहेत. गयेंतील मुख्य स्थळ म्हणजे **विष्णुपद** होय. हें फल्गू नदीच्या कांठीं आहे. त्याचें देऊळ फारसें मोठें नाहीं. पण त्याचा गाभारा उंच आहे. गाभाऱ्यांत धर्मशिला आहे व तिजवर विष्णूचें मोठें पाऊल आहे.

अनादिनिधनो देवः शंखचक्रगदाधरः।
अक्षय्यः पुंडरीकाक्ष, प्रेतमोक्षप्रदो भव: ॥ १ ॥

या विष्णुपदावर यात्रेकरू पिंडदान करितात व हे पिंड गोमाता खातात. देव व दानव यांचें युद्ध येथें झालें. दानवांचा सेनापति गयासूर होता व

देवांतर्फें स्वतः विष्णु लढत होते. या युद्धांत गयासूर मारला गेला व त्याला येथेंच गाडण्यांत आलें! विष्णुपदीं पिंडदान झाल्यावर गयावळ श्राद्धकर्त्यांचे हात फुलांच्या माळांनीं बांधून व पितृमुक्तीचा त्रिवार उच्चार करून **"तेरे पितर स्वर्ग गये"** असा त्रिवार घोष करतात. श्राद्धाबरोबर षड्रिपूंच्या त्यागाप्रीत्यर्थ कोणत्या तरी आवडीच्या खाण्याच्या पदार्थांचा त्याग करावा लागतो. म्हणून प्रस्तुत लेखकानें त्या वेळीं 'लाल भोपळा' सोडला. गयेपासून तीन मैलांवर बुद्धगया आहे. तेथील **बोधि** वृक्षाखालीं म्हणजे **पिंपळा**खालीं गौतमबुद्धाला ज्ञान झालें! या वृक्षाजवळ बुद्धाचें मोठें मंदिर बांधण्यांत आलें आहे. येथें कांहीं बौद्ध भिक्षु राहतात व बुद्धाची उपासना करतात. येथेंच मंदिराचे पुजारी महंत आहेत. त्यांचा मोठा वाडा आहे व ते हत्ती बाळगून आहेत.

## कलकत्ता

हुगळी नदीच्या कांठीं कलकत्ता शहर बहुत गोष्टींनीं समृद्ध आहे. बेलूर मठाकडे जातांना विवेकानंदांचा मठ लागतो. हुगळींत कासवें आहेत. येथें सुप्रसिद्ध कालीचें मंदिर आहे. जें एका लक्षाधीशानें नवीन बांधलें आहे. तें अति मनोहर व प्रेक्षणीय आहे. कलकत्ता ही भारताची जुनी राजधानी असल्यामुळें येथील रस्ते, मार्केटस्, म्युझियम, सरकारी इमारती, बंगले व बागा वगैरे पाहाण्यासारखीं आहेत. हावरा स्टेशन व पूल पाहून मनुष्य आश्चर्यचकित होतो.



महाकाली

## वैकुंठपूर

हें क्षेत्र गयेपासून पन्नास मैलांवर आहे. हा गांव बंगाल्यांत वारगा जिल्ह्यांत भागीरथीच्या कांठीं संगमावर आहे. येथें कांहीं घाट व बरींच

मंदिरें असून महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते. येथें कोष्टी लोक राहात असून हातमागावरील कापड निघतें.

## मुक्तिनारायण



भगवान् श्रीविष्णु

॥ श्रीविष्णुध्यान श्लोक ॥

यं शैवाः समुपासते शिव इति,
ब्रह्मेति वेदान्तिनो ।
बौद्धाबुद्ध इति प्रमाण पटवः
कर्तेति नैय्यायिकाः ।
अर्हन्नित्यथ जैनशासनरताः,
कर्मेति मीमांसकाः ।
सोऽयं वो विदधातु वाञ्छितफलं, त्र्यैलोक्यनाथो हरिः ॥ १ ॥

ॐ नमो नारायणाय पुरुषाय महात्मने ।
विशुद्धसत्त्वधिष्ण्याय महाहंसाय धीमहि ॥ २ ॥

महाविष्णूच्या आठ प्रसिद्ध क्षेत्रांपैकीं मुक्तिनाथ वा **मुक्तिनारायण** हें एक क्षेत्र आहे. तें हिमालयांत चौदा हजार फूट उंचीवर श्वेत गंडकीच्या उगमापाशीं आहे. तेथूनच पुढें उत्तरेस सुमारें पंच्याहत्तर मैलांवर **दामोदर कुंड** सतरा हजार फूट उंचीवर आहे. या कुंडापासून कृष्ण गंडकीचा उगम झाला आहे. आणि श्वेत व कृष्ण गंडकी ह्यांचा संगम मुक्तिनारायण डोंगराच्या पायथ्याशी बारा हजार फूट उंचीवर काकवेणी गांवापाशीं झाला आहे. महाविष्णूच्या पूजनासाठीं आपण जे शाळिग्राम घेतों ते या दोन '**गंडकीं**'च्या उगमस्थानींच सांपडतात. अन्यत्र कोठेंहि सांपडत नाहींत. मुक्तिनारायणास जाण्याचा मार्ग पुढीलप्रमाणें आहे. मुंबई ते **लखनौ** ८८५ मैल, लखनौ ते **गोरखपूर** १७४ मैल, गोरखपूर ते **नौतनवा** साठ मैल. एकूण १११९ मैलांचा आगगाडीचा प्रवास आहे. नौतनवा-पासून चार मैलांवर **सोनूळा** नांवाचें गांव आहे. तेथें भारताची सीमा

संपून नेपाळ राज्य लागतें. सोनुलापासून बटौल तरी मैल आहे. हा प्रवास करावयास मोटारी आहेत. बटौल ते मुक्तिनारायण १८८ मैल अंतर आहे. दुसरा मार्ग, बटौल ते मुक्तिनारायण १६५ मैल. बागदूण मार्गानें मुक्तिनाथास जातात. हा प्रवास पायीं किंवा घोड्यावरून करावा लागतो.

## दामोदरकुंड

मुक्तिनारायणापासून दामोदरकुंडास जाण्याचा मार्ग पहाडांतील व अत्यंत बिकट आहे. हाहि प्रवास पायीं किंवा घोड्यावरून करावा लागतो. हा प्रदेश अगदीं निर्जन आहे. ह्यांत झाडझूड मुळींच नाहीं व गुहा किंवा गुंफाहि नाहींत. यासाठीं यात्रेकरूनें दोनतीन आठवडे पुरेल इतकें खाद्य आपल्याबरोबर घ्यावयास पाहिजे. त्याचप्रमाणें वस्तीकरतांहि तंबू घ्यावयास पाहिजे.

## पशुपतिनाथ

शंकराचीं बारा ज्योतिर्लिंगें आहेत. त्यांपैकीं केदारनाथ व पशुपति हीं दोन मिळून एक ज्योतिर्लिंग होतें. पशुपतीचें स्थान नेपाळची राजधानी **काटमांडू** या शहराशीं **देवपाटण** भागांत आहे. पशुपतिनाथाचें मंदिर **वाघमति** नदीच्या उजव्या तीरावर आहे. त्या नदीपासून मंदिरापर्यंत सुंदर चिरेबंदी घाट आहे. देवळाचा प्राकार विस्तीर्ण व मोकळा आहे. मुख्य मंदिर भव्य व गाभाराहि प्रशस्त आहे. त्याच्या चारहि दिशांना त्याला शोभणारे असे चांदीनें मढविलेले मोठे दरवाजे आहेत. देवास प्रदक्षिणा घालावयाची वाट पंधरा-वीस फूट रुंदीची आहे.

देवळाबाहेर दारासमोर भला मोठा नंदी आहे. पशुपतीची पिंडी छाती-इतकी उंच आहे. शाळुंका जमिनीबरोबर व मोठी आहे. पिंडीच्या वरच्य अंगास चार दिशांना चार अंगचेच मुखवटे आहेत. माथा सपाट असून त्यावर श्रीयंत्र आहे. असें हें पंचमुखी लिंग आहे.





योगमग्न श्रीशिव



॥ श्रीपशुपतिनाथाखिलार्पण श्लोक ॥

करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा । श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधं ।
विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व । जय जय करुणाब्धे श्रीमहादेव शंभो ॥

प्रत्येक मुखाची पूजा स्वतंत्र असून त्याकरितां तितके पुजारी आहेत. गाभाऱ्यांत पुजारी व शागीर्द यांच्याशिवाय अन्य कोणासहि प्रवेश नाहीं. नेपाळचे राजेहि हा आद्य शंकराचार्यांनीं घालून दिलेला दंडक निष्ठेनें पाळतात. पशुपतीच्या दर्शनास महाशिवरात्रीस तीसचाळीस हजार यात्रा जमते.

त्या वेळीं भारतांतून तेथें जाण्यास पासपोर्ट लागत नाहीं. एरवीं लागतो. प्रवासाचा मार्ग पुढीलप्रमाणें आहे. मुंबई ते **बनारस** ८५० मैल. बनारस ते **रक्सूल** ३२० मैल. रक्सूल ते **अमलेखगंज** चौवीस मैल. हा

प्रवास करण्यास आगगाडी आहे. आमलेखगंजापासून **भीमफेडी** पंधरा मैल आहे. हा प्रवास मोटारीनें करतां येतो. भीमफेडी ते **थानकोट** बारा मैल हा प्रवास पायीं व डोलींतून करावा लागतो. थानकोट ते **देवपाटण** दहा मैल प्रवास मोटारीनें करतात. कटमांडू हें शहर अर्वाचीन सर्व सुधारणांनीं सुसज्ज आहे. येथून हिमालयाचीं अभ्राच्छादित शिखरें दिसल्यावर अत्यानंद होतो ! अर्जुनानें पशुपतिनाथाची उत्तम रीतीनें भक्ति करून त्याजपासून पाशुपतास्त्र मिळविलें! येथील राजे मिष्टान्न देऊन यात्रेकरूंचा सत्कार करतात !

## कैलास

॥ श्रीगंगास्तवन श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित )

शैलेंद्रादवतारिणी निजजले, मज्जजनोत्तारिणी ।
पारावारविहारिणी भवभय, श्रेणी समुत्सारिणी ।
शेषा हेरनुकारिणी हरशिरो, वल्लीदलाकारिणी ।
काशीप्रांतविहारिणी विजयते, गंगा मनोहारिणी ॥ १ ॥

कैलास हें एक पर्वतशिखर आहे. त्याचा आकार हुबेहूब शाळुंका, पिंडी ह्यासारखा आहे. शिखराची उंची तेवीस हजार फूट आहे. हें अक्षय्य हिमाच्छादित असतें. तसेंच तें वरचेवर मेघाच्छादित होऊन दिसेनासें होतें. त्याजवर रोज मेघधारांचा अभिषेक होत असतो ! याच्या पूर्वांगास अठरा हजार पांचशें फूट उंचीवर गौरीकुंड आहे. हें कुंड अजमासें एक मैल घेराचें व चाळीस–पन्नास फूट खोल आहे. त्यांतील पाण्यावर बर्फाचा थर ऐन उन्हाळ्यांत सुद्धां असतो. कैलासाची प्रदक्षिणा बत्तीस मैलांची आहे. ती करण्यास तीन दिवस लागतात.

## मानस सरोवर

कैलास व मानस सरोवर एकमेकांजवळ आहेत. तरी त्यांजमधील अंतर पंचवीस मैलांचें आहे. मानस सरोवर समुद्रसपाटीपासून पंधरा

हजार फूट उंचीवर आहे. त्याचा परीघ पंचावन्न मैल व खोली साडे तीनशें फूट आहे. तें आठ नऊ महिने गोठलेलें असतें. उन्हाळ्यांत मात्र बर्फ वितळून पाणी होतें. पाणी स्फटिकासारखें स्वच्छ व गोड आहे. या सरोवरांत दिवसभर समुद्राप्रमाणें लाटा उसळतात, पण रात्रीं तें अगदीं शांत असतें. त्याचें पाणी इतकें गार असतें कीं, त्याला हात लावला तर कळाच निघतात. अशाहि स्थितींत त्यांत मासे आहेत व राजहंसहि स्वच्छंदानें क्रीडत असतात !

कैलास व मानस सरोवर हीं दोन्ही स्थानें पश्चिम तिबेटांत आहेत. आपणां भारतीयांना तेथें जाण्यास सरकारी परवाना लागत नाहीं. येथें जाण्याचा मार्ग पुढीलप्रमाणें आहेः—मुंबई, झांशी, लखनौ, **बरेली** व **हलद्वानी** हीं स्टेशनें लागतात. हें अंतर अकराशें मैल असून अर्थात् हा प्रवास आगगाडीचा आहे. हलद्वानी हें गांव हिमालयाच्या पायथ्याशीं आहे. येथून अलमोडा ५२०० फूट उंचीवर आहे. **अलमोडा** हें जिल्ह्याचें ठिकाण आहे.

हलद्वानी ते अलमोडा अंतर ऐंशीं मैल असून प्रवास मोटारीनें करावा लागतो. अलमोडा ते **गर्ब्यांग** उंची दहा हजार फूट आहे. अंतर १५० मैल आहे. प्रवास पायीं करावा लागतो. गर्ब्यांग ते **लिपूखिंड**, निर्जन प्रदेश अंतर एकवीस मैल, लिपूखिंड ते **तकलाकोट** अंतर अकरा मैल आहे. तिबेटांतील हें पाहिलें गांव आहे. तकलाकोट ते **मानस सरोवर** दक्षिण कांठ चाळीस मैल आहे. मानस सरोवराची दक्षिण-उत्तर सीमा सोळा मैल आहे. मानस उत्तर कांठ ते **टार्चिन** अंतर पंचवीस मैल आहे. टार्चिन हें गांव कैलासाच्या दक्षिण पायथ्याशीं आहे. त्यांत वस्ती जेमतेम पांच दहा माणसांची आहे. हें गांव नेपाळ सरकारच्या ताब्यांत आहे. टार्चिन ते **डिराफू** गुंफा ही कैलास शिखराची उत्तर बाजू आहे. अंतर तेरा मैल आहे. डिराफू ते गौरीकुंडावरून **झंटूल** फू गुंफेवरून टार्चिन अंतर सतरा मैल आहे. ही प्रदक्षिणा संपवून निघालेल्या ठिकाणीं यात्रेकरू येतात.

गर्ब्यांगपर्यंतचा प्रवास इतका कष्टमय नाहीं. वाटेवर निदान पांच सात

मैलांवर वस्ती लागते. पण तिबेटमधील प्रवास एक **तकलाकोट** गांव सोडलें तर, **अतिकष्टप्रद** व **धोक्याचा आहे**. हा भाग अगदीं उजाड आहे. वस्ती नाहीं व झाडझुडूपहि नाहीं. कोठें गवताची काडीहि दृष्टास पडावयाची नाहीं. रात्रींच्या वस्तीकरितां घर नाहीं व गुहाकपारी सुद्धांहि नाहीं. या हवेंत लवकर दम लागून थकवा मनस्वी येतो! डाकूंचें म्हणजे चोरांचें भय फार असतें. ते अद्ययावत् शस्त्रधारी असतात. मात्र ते दोघां तिघांपेक्षां अधिक नसतात. म्हणून **गर्ब्यांग**पासून परत येईपर्यंतचा प्रवास घोड्यावरून करणें अवश्य असतें. ओझ्यासाठीं झब्बू, **घोडीं** व खेचरें हीं करावीं लागतात. मुक्कामाकरितां **राहुट्या** घ्याव्या लागतात. **गर्ब्यांग** येथें हें सर्व मिळतें व शस्त्रधारी रक्षकहि मिळतात. भाडेंहि फार पडत नाहीं.

तिबेटमध्यें हवेच्या विरळपणामुळें कोणताहि पदार्थ शिजत नाहीं. लाकूड-फांटा नसल्यामुळें अग्निहि तयार करितां येत नाहीं. म्हणून जे पदार्थ दोन तीन महिने टिकतील, आंबणार नाहींत, बुरसणार नाहींत, खंवट होणार नाहींत असे पदार्थ म्हटले म्हणजे पोहे, फुटाणे, खिसमीस, काजू, बदाम, खजूर, शेंगदाणे, मक्याचें पीठ, सातूचें पीठ इत्यादि हे पदार्थ घ्यावेत. गरम कपडे, अंथरूण–पांघरूणसुद्धां अत्यावश्यक आहे. थंडी चाळीस अंशाखालीं असते व दिवसा तुफानी वारे वाहात असतात! मानस सरो-वराच्या तळाशीं उकळी फुटणाऱ्या ऊन पाण्याचे झरे आहेत. ज्यांच्या पाण्याच्या वाफेच्या जोरानें त्याच्या पृष्ठभागावरील बर्फाचे लहान खोली-एवढाले भाग हिवाळ्यांत त्याच्या काठावर फेकले जातात. म्हणून मानस सरोवराचा बर्फाचा पृष्ठभाग भेगा पडलेला असतो. या मानस सरोवरासमीप असलेल्या दुसऱ्या रावणऱ्हद सरोवरांत असे ऊन पाण्याचे झरे नसल्यामुळें याचा बर्फमय पृष्ठभाग भेगाळलेला नसतो.

## राजापूर–गंगा

राजापूर गांव रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागांत आहे. रत्नागिरी-पासून समुद्रमार्गानें राजापूर सुमारें तीस मैल आहे. रत्नागिरीपासून

जैतापूरपर्यंत आगबोटींतून प्रवास करावा लागतो. जैतापूर बंदर आहे. तेथून पडावांतून खाडीमार्गानें राजापुरास जातात. त्याशिवाय आतां रत्नागिरी ते राजापूरपर्यंत एस्.टी.च्या गाड्या जातात. राजापूर हा तालुक्याचा गांव आहे. तेथें पूर्वी इंग्रज व डच ह्यांच्या व्यापाराच्या वखारी होत्या. त्या वेळीं हें फार प्रसिद्ध बंदर होतें व तेथें व्यापारहि मोठा चाले.

राजापुरापासून उत्तरेस तीन मैलांवर एका डोंगराच्या पायथ्याशीं उन्हाळें आहे. तेथून साडेतीनशें पायऱ्या चढून गेल्यावर चौदा कुंडें लागतात. प्रत्येक कुंड पुरुषभर खोल व दहापंधरा फूट लांबीचें चौकोनी आहे. येथें गंगा अकस्मात् प्रगट होते व ती आली म्हणजे एका आठवड्यापासून बहुधा दोन तीन महिने असते. तिनें सर्व कुंडें भरून वाहूं लागतात. ह्या काळांत काशींतील गंगा कांहीं प्रमाणांत कमी होते! असें म्हणतात. गंगा येते त्या वेळीं त्या ठिकाणीं मोठी यात्रा भरते व लोक ह्या कुंडांत स्नानें करून गंगापूजन, ब्राह्मण–सुवासिनी–भोजन व दानधर्म करतात!

## परशुराम

श्रीपरशुरामानें सर्व पृथ्वीचें दान कश्यप ऋषींस दिल्यावर स्वतःस राहण्यास जागा, समुद्र हटवून ज्या स्थळीं राहिले त्या क्षेत्रास परशुराम क्षेत्र किंवा कोंकण म्हणतात. परशुरामानें कोंकणची भूमि समुद्रापासून घेऊन तेथें ब्राह्मणांची वसाहत केली, अशी समजूत आहे. परशुराम नांवाचें देवस्थान संबंध कोंकणपट्टींत चिपळूणाजवळच्या डोंगरावर आहे तेवढेंच होय. हा डोंगर चिपळूणापासून दोन कोसांवर आहे. त्या डोंगरावरील वस्तीस पेढें म्हणतात. येथील देवालय बरेंच मोठें व पुरातन आहे. त्यांत काळ, काम व परशुराम या तिघांच्या प्रत्येकीं पुरुषभर उंचीच्या मूर्ति आहेत. देवस्थानाच्या खर्चाकरितां सरकारांतून प्रतिवर्षी ठराविक उत्पन्न आहे. ह्या ठिकाणीं वैशाख शु. प्रतिपदा ते तृतीयाअखेर तीन दिवस मोठा उत्सव होतो. चतुर्थीस पारणें असतें. त्या दिवशीं मोठ्या प्रमाणावर अन्नसंतर्पण होतें. परशुराम हा विष्णूच्या दशावतारांपैकीं सहावा अवतार होय. तो

जातीनें ब्राह्मण होता. त्याचा बाप जमदग्नि ह्यास त्याची आई रेणुका हिजविषयीं कांहीं संशय आल्यावरून जमदग्नीनें आपल्या सर्व मुलांना तिचा वध करण्याविषयीं आज्ञा केली !

### श्रीपरशुराम भजन

जयजय भार्गवराम, कालकाम परशुराम ।
रेणुकाजमदग्न्याराम, महाजनाधिपत्याराम ॥ १ ॥

### ॥ श्रीपरशुरामध्यान श्लोक ॥



मौर्वी धनुस्तनुरियं च, बिभर्ति मौंजिम् ।
बाणा. कुशाश्च विलसन्ति, करे तथास्याः ॥
धारोज्ज्वलः परशुरेष कमण्डलुश्च ।
तद्वीरशांतरसरूपममुं नमामः ॥ १ ॥

पण ती परशुरामाखेरीज बाकीच्या सर्व मुलांनीं मानिली नाहीं. एकट्या परशुरामानें ती आज्ञा पाळून मातेचा वध तत्काळ केला! तेव्हां जमदग्नीनें प्रसन्न होऊन त्यास वर मागण्यास सांगितलें. त्यानें आईला जिवंत

करण्याचा वर मागितला, त्याप्रमाणें जमदग्नीनें तिला जिवंत केलें! असा परशुराम हा पितृभक्त व मातृभक्त होता. त्यानें आपल्या पित्याचा सहस्रार्जुनानें अपमान केल्यावरून सहस्रार्जुनाशीं युद्ध करून त्यास ठार मारिलें!

परशुरामासारखे एकंदर सात पुरुष पुराणांत चिरंजीव म्हणजे अमर झाले आहेत! त्यांपैकीं परशुराम हा एक होय. ह्यासंबंधीं श्लोक असा आहे.

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः
कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ॥ १ ॥

पेशवाईत परशुरामाच्या डोंगरावर 'ब्रह्मेंद्र स्वामी' नांवाचे सत्पुरुष रहात असत. ते भार्गवरामाचे भक्त होते. दंडा-राजपुरीच्या सिद्दीनें या देवालयाचा विध्वंस केल्यावरून स्वामी देशावर साताऱ्याजवळ **धावडशी** गांवीं येऊन राहिले. तेथें भार्गवरामाचें त्यांनीं नवें देऊळ बांधलें. नंतर पुढें चिपळूणाजवळील परशुरामाच्या देवालयाचा पेशव्यांनीं जीर्णोद्धार करून तेथील सर्व व्यवस्था कायमची लावून दिली! धावडशीस श्रावणांत मोठा उत्सव होतो.

## हरेश्वर

कुलाबा जिल्ह्यांत श्रीवर्धन गांवापासून दक्षिणेस दोन कोसांवर व बाणकोटाच्या पश्चिमेस एक कोसावर हें क्षेत्र समुद्राच्या कांठींच आहे. त्याला हरिहरेश्वर असें दुसरेंहि नांव आहे. या क्षेत्राच्या दक्षिणेस तीन डोंगर आहेत. ते ब्रह्मा, विष्णु व महेश असे देवरूपी समजतात. या देवळाच्या साळुंकींत ब्रह्मा, विष्णु, पार्वती व शंकर देव-देवता आहेत. ही शाळुंका जमिनीपासून पुरुषभर खोल आहे. शाळुंका मोठ्या झोपाळ्याच्या आकाराची आहे. देऊळ दुमजली व पांचशें माणसें बसतील इतकें मोठें आहे.

गाभाऱ्यांत जाण्यास पायऱ्या आहेत. गाभाऱ्यांत पांच सहा नंदादीप सतत तेवत असतात. गाभाऱ्याच्या बाहेर नंदी, गणपति व देवी यांच्या दगडी मूर्ति आहेत. हरेश्वर मंदिराच्या पश्चिमेस **काळभैरव व जोगेश्वरी** ह्यांचें मंदिर आहे. या देवळांत पिशाच्यांनीं झपाटलेल्या माणसांच्या अंगांत संचार होतो; त्या वेळीं धूप घालतात व नगारा वाजवितात.

त्या झपाटलेल्या माणसानें काळभैरवाची सेवा केल्यावर तें पिशाच्च आपल्या इच्छा प्रदर्शित करून त्या पूर्ण झाल्यावर गतीस जातें !

कार्तिक वद्य ८ ला काळभैरवाचा जंगी उत्सव होतो. कार्तिक एकादशीस व महाशिवरात्रीस मोठ्या यात्रा भरतात. आश्विन-कार्तिकांत एक महिनाभर रात्रीं पालखी निघते. मंदिराच्या दक्षिणेस शुक्रतीर्थ आहे. तो एक समुद्राचा भागच आहे. त्यांत जाण्यास पन्नास पायऱ्या उतराव्या लागतात. जवळच उंच डोंगर व त्याच्याखालीं हें तीर्थ आहे. पायऱ्या अरुंद व फुटक्या आहेत. त्यावरून खालीं उतरणें फार कष्टाचें आहे.

जर का पाय घसरून मनुष्य पडला; तर त्याला जलसमाधीच मिळते, कोणा परोपकारी मनुष्यानें हा रस्ता सुधारून तो अगदीं निर्भय केल्यास त्याची तेथें कायमची स्मृति राहील! या पाण्यांत वादळी हवेमुळें भयंकर भोंवरे मधून मधून उत्पन्न होतात. पिशाच्चानें झपाटलेल्या मनुष्यास येथें आणतात. तो या तीर्थांत उडी घेतो. त्यानें उडी घेतली आणि तो बुडूं लागला म्हणजे आंत असलेले लोक त्याला वांचवितात. याला पिशाच्च गतीस गेलें असें म्हणतात. नंतर तो मनुष्य पिशाच्चबाधे-पासून मुक्त होतो !

या तीर्थाचें पाणी समुद्राचें म्हणून खारें आहे. त्याला अत्यंत खळाली व भयंकर ओढ असते. या तीर्थांत लोक स्नान करून पूजन व दानधर्म करितात. उत्तरेच्या डोंगरांत एका लांबट चिंचोळ्या घळींत सावित्री नदीचा उगम आहे. तेथेंहि पूजन करून गंगाजल तीर्थ म्हणून प्राशन करितात. येथून डोंगराभोंवतीं कातळावरून डाव्या हातास समुद्र व उजव्या हातास डोंगर अशा मार्गानें लोक प्रदक्षिणा घालून देवळाकडे येतात. मध्यंतरीं कातळावर पांडवांची यज्ञभूमि, गाईची दुग्धधारा, सीतेच्या दागिन्यांची पेटी, साधूचें समाधि मंदिर वगैरे स्थळें पुरोहित यात्रेकरूंस दाखवितात.

या क्षेत्राची हवा उत्तम आहे, रोगी मनुष्यास थोड्याच दिवसांत आराम वाटतो. जवळच एका मैलावर हरेश्वर आगरी गांव आहे. येथें

दहा-वीस ब्राह्मणांचीं घरें आहेत, क्षेत्र व आगर यांमध्यें एक नदी वाहाते. नदीकांठचे लोक ऊंस, कांदे व भाज्या तयार करितात. ह्या क्षेत्रभागांत जोशी, बोडस या उपनांवाचे ब्राह्मण असून यांचीं पांच दहा घरें आहेत. ते यात्रेकरूंचीं सर्व धार्मिक कृत्यें करितात.

जंजिऱ्याच्या नबाबाच्या घराण्यांपैकीं **बीबीसाब** नांवाची एक स्त्री होती. हिचा येथें एक बंगला व अति मनोहर बाग आहे. त्यांत फुलझाडें व उत्तम हापूस, पायरी, आंबे, केळीं, रामफळ, सीताफळ, सुपारी, नारळ, फणस, कोकम, लिंबें इत्यादि फळझाडेंहि आहेत. या क्षेत्राच्या वर्णनाचा पोथीवजा ग्रंथ आहे. जंजिरा मुरुडचे माजी मुख्य शिक्षक कै. बाळकृष्ण अनंत भिडे यांनीं ह्याचें मराठी भाषांतर केलें आहे. त्याचें नांव **हरिहरेश्वर माहात्म्य** असें आहे. याची किंमत दोन रुपये आहे. दुसरें एक पुस्तक श्रीयुत परांजपे यांनीं लिहिलें आहे. त्याचें नांव **हरेश्वरवर्णन** असून किंमत एक रुपया आहे.

## कनकेश्वर

कुलाबा जिल्ह्यांत अलिबागेपासून सात मैलांवर कनकेश्वर नांवाचें एक शिवस्थान आहे. मुंबईकडील लोक रेवस बंदरावर उतरून मोटारीनें येथें येतात. कनकेश्वर डोंगराच्या पायथ्याशीं **मापगांव** नांवाचें खेडें आहे. तेथून डोंगर चढावयास सातशें पायऱ्या आहेत; त्या पायऱ्या श्री. गोविंद रेवादास नांवाच्या एका व्यापाऱ्यानें बांधिल्या असून त्याच्या दुतर्फा झाडें लावण्याचें काम मापगांवच्या एका सद्‌गृहस्थानें केलें आहे. कांहीं पायऱ्या चढून गेल्यावर गायमांडी नांवाचें ठिकाण लागतें. तेथें एका दगडावर गाईची आकृति कोरलेली आहे.

**॥ गो-महिमा श्लोक ॥**

पृष्ठे ब्रह्मा गले विष्णुर्मुखे रुद्रः प्रतिष्ठितः ।
मध्ये देवगणाः सर्वे रोमकूपे महर्षयः ॥
नागाः पृष्ठे खुराग्रेषु ये चाष्टौ कुलपर्वताः ।
मूत्रे गंगादयो नद्यो नेत्रयो शशिभास्करौ ॥

एते यस्या स्तनौ संति सा धेनुर्वरदास्म्यहम् ।
वर्णितं धेनुमाहात्म्यं व्यासेन श्रीमता त्विदम् ॥
गावो मे अग्रतः संतु, गावो मे संतु पृष्ठतः ।
गावो मे हृदये संतु गवां पथ्ये वसाम्यहम् ॥ १ ॥

लोक असें सांगतात कीं, जुन्या काळीं मुंबईच्या वाळकेश्वराहून एक गाय नित्य नियमानें येथें येत असे आणि आपल्या दुधाच्या चारी धारा कनकेश्वरावर सोडून ती परत जात असे. तिच्या गुराख्याला ही गोष्ट कळली; तेव्हां तो चोरून एक दिवस तिचा पाठलाग करीत निघाला. ही गोष्ट गाईच्या लक्षांत येतांच तिनें कनकेश्वराहून जी उडी घेतली ती या ठिकाणीं, येथें ती गुप्त झाली, तिचें स्मारक म्हणून हें गायमांडी ठिकाण आहे. येथून वर गेल्यावर उजव्या हातास ब्रह्मकुंड व विष्णुकुंड अशीं दोन तीर्थें आहेत. ब्रह्मकुंडाच्या चारहि बाजूंना तांबड्या चिऱ्यांची भिंत असून आंत उतरावयास दोन कमानींचे दरवाजे आहेत.

कनकेश्वराची विधिपूर्वक यात्रा करणारांना चार कुंडांत स्नान करावें लागतें. त्यांत ब्रह्मकुंड हें पहिलें आहे. कनकेश्वराचें मंदिर पंचकोनी कमलाकार आहे. सभामंडप कौलारू असून समोर दोन दीपमाळा आहेत. देऊळ जुनें हेमाडपंती धर्तीचें आहे. गाभाऱ्यांत कनकेश्वराचें लिंग पितळी पत्रा बसविलेल्या शाळुंकेच्या आंत खोल आहे. लिंग खडबडीत व टोंकदार असून त्याच्या भोंवतीं सदैव थोडें पाणी असतें. येथें कार्तिकांत त्रिपुरी पौर्णिमेला व महाशिवरात्रीस अशा दोन मोठ्या यात्रा भरतात. त्या दिवशीं शेंकडों लोक दर्शनास येतात. त्या वेळीं येथें फरसबंदी रस्त्याच्या दोन्ही बाजूंस अनेक दुकानें बसतात.

येथील सर्वांत मोठा जलाशय म्हणजे देवाच्या पूर्वेचें शिवकुंड होय. हें अष्टकोनाकृति आहे. याचा परीघ एकशें दहा यार्ड व खोली पंचवीस फूट आहे. याच्या अष्टदिशांना आठ वाटा आहेत. याचें पाणी फार

पाचक आहे. मंदिराच्या नैर्ऋत्येस दुसरें भीमकुंड असून देवदर्शनापूर्वी कांहीं यात्रेकरू त्यांत स्नान करितात. माळी, गुरव व ब्राह्मण असे या देवस्थानाचे सेवेकरी आहेत. देवळाच्या परिसरांत त्यांचीं घरें आहेत. प्रत्येकास ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें नक्त रुपये व कांहीं मण भात दर वर्षास वर्षासन म्हणून मिळतें. खालचें सोनगांव खेडें देवस्थानास इनाम आहे. देवस्थानास एकंदर सालीना उत्पन्न शंभर खंडी भात आहे! त्याची व्यवस्था पंच कमिटी पहाते.

येथील दुसरें देवस्थान गणपतीचें आहे. तें खासगी मालकीचें आहे. याला चाळीस खंडीचें भाताचें उत्पन्न आहे. येथें सहा धर्मशाळा आहेत. त्यांत भक्त मंडळी सेवेसाठीं आणि रुग्ण मंडळी हवेसाठीं येऊन राहतात. कारण येथील हवापाणी दरवर्षी आश्विनापासून वैशाखाअखेर फार आरोग्य-संवर्धक असतें. पारमार्थिक अगर व्यावहारिक कोणतेंहि महत्त्वाचें सत्कृत्य एकांतांत स्वस्थपणें करण्यास हें स्थळ सर्वथा योग्य आहे. हवापाणी व सृष्टिसौंदर्य या दृष्टीनें गरिबांचें हें माथेरानच आहे.

## अमृतसर

हें शीख लोकांचें अति मोठें क्षेत्र पंजाबमध्यें आहे. पंजाबांत लाहो राजधानीचें मोठें शहर आहे. त्यास हें नांव दाशरथी रामाचे लव, कुश हे सुपुत्र, त्यांपैकीं लवाच्या नांवावरून लाहोर हें नांव पडलें! लव, कुश व श्रीराम ह्यांच्यात झालेल्या लढाईत रामाचे सैनिक लोक बरेच मृत झाले. त्यांस जिवंत करण्यासाठीं श्रीसीतादेवीनें परमेश्वराची प्रार्थना केली; तेव्हां अमृत-वर्षाव होऊन हे सैनिक जिवंत झाले तेव्हांपासून अमृताचें सरोवर म्हणून अमृतसर क्षेत्र बनलें.

ह्यांचा पहिला गुरु, गुरु नानक, ह्यांच्यानंतर आठ गुरु होऊन दहावा गुरु गुरुगोविंद होय. ह्यांच्या मंदिरास "हरिमंदिर" म्हणतात. हें मंदिर अमृत सरोवरामध्यें आहे. त्यांत गुरुग्रंथ सोन्याच्या पलंगावर उघडलेला ठेवतात. हा ग्रंथ गुरु अंजनदेव ह्यानें संस्कृतांत केला असून

त्याचें भाषांतर पंजाबी भाषेंत केलेलें आहे. ह्याची भक्ति, भक्त स्वशक्त्यनुसार नानाविध पदार्थ अर्पण करून मनोभावें करतात. आपण हिंदु ज्याप्रमाणें आपल्या उपास्य देवाचें ' जय सीताराम ', ' जय राधेश्याम ' म्हणून स्मरण करतों त्याप्रमाणें हे ' सत् नाम ' म्हणून मोठ्या गर्जनेनें ईशचिंतन करतात. देवाचें उत्पन्न लाखों रुपयांचें असून खर्चहि तसाच सढळपणें करतात. वर्षांतील सर्वांत मोठा सण दिवाळी असतो, तो मोठ्या बडेजावाने थाटामाटांत साजरा करतात. कोणाहि सद्भक्तास तीन दिवस भोजन व सात दिवस मोफत राहून त्यांचा आदरसत्कार उपभोगितां येतो !

भारतांत हे लोक एका कोटींवर असून ह्यांचा संचार उद्योगधंद्याप्रीत्यर्थ पृथ्वीवरील सर्व खंडांत आहे. हे अस्सल जातीचे लढवय्ये लोक आहेत. हे लोक बांध्यानें उंच, रेखीव व सुदृढ असतात आणि स्वभावानें सुशील व युद्धकलेंत निष्णात असतात. ह्यांच्यांतील पूर्वीं होऊन गेलेला सुप्रसिद्ध महाराजा ' **रणजित सिंग** ' ह्यानें या गुरुद्वारास लाखों रुपये अर्पण करून मंदिराच्या सर्वांगांत योग्य सुधारणा व उत्तम सजावट करून आपलें नांव अजरामर करून ठेवलें आहे !

हे लोक स्वभावानें शांत व प्रेमळ आहेत. आणि ते बंधुभावानें वागतात; पण त्यांच्या संगतींत रहाणारे जर बिथरले म्हणजे अन्यायानें वागूं लागले तर हे त्यांचे ' **कर्दनकाळ** ' बनतात. ह्याचें प्रत्यंतर इ. स. १९४७ त जेव्हां भारतास दुभंग स्वराज्य मिळालें; तेव्हां स्पष्ट प्रत्ययास आलें, त्या प्रसंगीं हिंदु व मुस्लिम ह्यांच्यामध्यें जेव्हां बेबनाव झाला व प्रथम मुसलमानांनीं सहा महिन्यांत दीड लक्ष हिंदूंस यमसदनास पाठविलें; तेव्हां ह्या महाशूर, लढवय्ये भारतवासियांनीं केवळ एका पंधरवड्यांतच सूडबुद्धीनें तीन लक्ष मुस्लिम मनुष्यांची इहयात्रा संपवून त्यांस ' दे माय धरणी ठाय ' करवून आपली मुस्लिमांवर सदैव संपूर्ण दहशत बसविली !

अकबर बादशहाच्या वेळेस गुरु रामदासांनीं हें मंदिर बांधलें. गुरुग्रंथांतील गीतें, भक्त लोक वाद्यांच्या साह्यानें शास्त्रीय गायनांत गातात. अमृत

सर येथील मंदिर फक्त रात्रींचें १०॥ ते २॥ पर्यंत बाहेरच्या लोकांस बंद असतें. इतर वेळीं रोज वीस तास देऊळ उघडें राहून देवाच्या भक्तीचीं नानाविध कृत्यें चालूच राहतात. इतर शहरीं ह्यांचीं मंदिरें सकाळीं व रात्रीं ६ ते ८ दोन दोन तासच उघडीं राहातात. ह्यांच्या गुरुग्रंथांत सनातन वैदिक धर्मांतील प्रसंगोपात्त अनेक देव-देवता-भक्त यांचीं नांवें येतात त्या त्या प्रसंगीं त्यांसहि हे मनोभावें स्तवितात. अशा प्रकारें ऐहिक ऐश्वर्य व पारमार्थिक मोक्ष (ब्रह्मानंद) मिळविण्याचा सदुद्योग हे सतत सुरू ठेवतात.

शांतीपरतें नाहीं सुख, येर अवघेंचि दुःख ।
म्हणोनि शांति धरा; उतराल पैलतीरा ॥

ह्या क्षेत्रांतील वास्तव्यानें इ. स. १९३० त एका शिया पंथी मुस्लिमास येथेंच शांति मिळाल्यामुळें त्यानें आपली चंदनी चवरी देवास अर्पण केली, असें सांगतात. आपले भारताचे प्रमुख **पंतप्रधान** जवाहरलाल **नेहरूहि** म्हणूनच सर्वांच्या सर्व प्रकारच्या खऱ्या कल्याणासाठींच, **विश्वशांतीचा उपदेश** सर्व जगास मनोभावें करीत असतात. म्हणून लोक त्यांस 'शांतिदूत' संबोधितात !

## तीर्थें वास करीत असलेलीं स्थानें

ब्राह्मणाचे दोन पाय, गाय, गाईचा गोठा, बाळाचें मस्तक, डोळे, उजवा कान, सत्यवचन, श्रुति, स्मृति पठण, ईशध्यान करणारें चित्त, विद्वान, सद्विचारी मन, दान देणाराचे व देवपूजा करणाराचे हात, प्राणायाम करणाराचें नाक, शुचिर्भूत आसन, वडील, आजोबा व पणजोबांचें गृह, आषाढ, कार्तिक, माघ व वैशाख ह्या चार मासांपैकीं प्रत्येक महिना तीर्थ असून हे इच्छित सन्मनोरथ पूर्ण करतात. गुरुगृह व देवालय, गंडकी नदी इत्यादि स्थानें तीर्थें मानतात.

## वाघेश्वर

पुण्यापासून पश्चिमेस सह्याद्रीच्या पायथ्याशीं वाघेश्वर नांवाचें क्षेत्र आहे. त्याला जवळचें मोठें गांव **कोळवण** आहे. कोळवणापासून पांच

सहा मैलांवर हें गांव आहे. पुणें ते कोळवण एस्. टी. च्या गाड्या जातात. माणशीं भाडें एक रुपया दोन आणे पडतें. पुण्यापासून वाघेश्वर आदमासें पस्तीस मैल आहे. गांवापासून वाघेश्वर मंदिर पश्चिमेस दोन फर्लांगांवर आहे. देंऊळ हेमाडपंती घाटाचें आहे. देवळाजवळून एक नदी वाहाते. महाशिवरात्रीला येथें मोठी यात्रा भरते.

शाळुंका जमिनीवर असून शिवलिंग जमिनींत आहे. शिवलिंगाच्या तळाशीं कायम पाणी व वाळू असते. स्नान न करतां किंवा अमंगळपणें देवळांत कोणी गेलें; तर त्याला लहान मोठे साप दृष्टीस पडल्याचीं उदाहरणें आहेत. देवळांत तीन दिवसांपेक्षां जास्त दिवस कोणाहि मनुष्यास रहातां येत नाहीं; तसाच कोणी राहिल्यास देवाकडून त्यास जाण्याची सूचना मिळते. हें स्थान स्वयंभू व जागृत आहे. देवळाजवळ मनुष्यवस्ती नाहीं.

## कोळें नृसिंहपूर

सातारा जिल्ह्यांत वाळवें तालुक्यांत शेणोली स्टेशनापासून चार मैलांवर नृसिंहपूर हें क्षेत्र कृष्णाकांठीं आहे. येथील नृसिंहाचें देऊळ फार प्राचीन आहे. या देवळापाशीं कृष्णेचा दहा मैल लांबीचा डोह आहे. या नदीचें पात्र रुंद व फार खोल आहे. पाणी अगदीं संथपणानें वाहात असतें. नदीला तीन घाट आहेत. देवालय मजबूत व एकाद्या किल्ल्याप्रमाणें आहे. मंदिराचें आवार भरपूर आहे. आवारांत राहाण्याजोग्या खोल्या व ओहऱ्याहि आहेत. देवळाला उत्तर व पूर्व दिशांना भव्य दरवाजे आहेत. उत्तर दरवाज्यावर नगारखाना आहे. पश्चिमेस नदीवर जाण्यासाठीं एक लहानसा दरवाजा आहे.

नृसिंहाची मूर्ति मंडपाच्या तळघरांतील भुयारांत जमिनीपासून चाळीस फूट खोल आहे. मंडपांतून खालीं भुयारांत जाण्याचा रस्ता पुष्कळशा वळणावळणांचा व अंधारांतून आहे. हा रस्ता एकशेंवीस फूट लांबीचा आहे. म्हणून दिव्याशिवाय आंत देवदर्शनास जाणें अशक्य आहे. आंतील नरसिंह मंदिर बारा फूट लांब व बारा फूट रुंद आहे. वीस पंचवीस माणसें एकाच

वेळीं व्यवस्थितपणें देवदर्शन घेऊं शकतात. भुयारांत शिरावयाच्या वाटेवर हवेकरतां ठिकठिकाणीं झरोके ठेवण्यांत आले आहेत. भुयाराची बांधणी अत्यंत सुबक व मजबूत आहे. या सर्व मंडपाची व भुयाराची दररोज स्वच्छता ठेवण्याचें काम वहिवाटदार, कुलकर्णी व पुजारी, आपापल्या पाळीप्रमाणें करतात.

श्रीनृसिंहाची मूर्ति कौशल्यपरिपूर्ण, तेजस्वी, भव्य, काळ्या अखंड पाषाणाची व **क्षणोक्षणीं चर्येवरील भाव बदलणारी आहे!** अशी मूर्ति इतरत्र क्वचितच पाहावयास मिळेल. श्रीचें शरीर मनुष्याप्रमाणें व तोंड सिंहाप्रमाणें आहे. तिला सोळा हात आहेत. त्यांत शंख, चक्र, गदा, पद्म, खड्ग इत्यादि आयुधें आहेत. मूर्ति उंबरठ्यावर एकाच पायावर अधिष्ठित आहे. दुसऱ्या पायाच्या मांडीवर, 'हिरण्यकश्यपू दैत्याला आडवा घेतलेला असून दोन्ही हातांच्या नखाग्रांनीं त्याचें पोट विदीर्ण केलें आहे. नखें सुमारें दोन इंच पोटांत रुतलेलीं स्पष्ट दिसतात!

मूर्तीच्या दोन्ही बाजूंस प्रल्हाद, लक्ष्मी, भूदेवी व गरुड अशा लहान मूर्ति आहेत. पाठीमागच्या बाजूस म्हणजे प्रभावळींत दशावतारांच्या मूर्ति अर्ध-गोलाधींत प्रत्येक पुष्पांतून निर्माण झालेल्या अशा दाखविलेल्या आहेत. एकंदरींत कोरीव काम इतक्या बारकाईनें व कुशलतेनें केलेलें आहे कीं, हातापायांच्या रेषा, शिरा, नखेंसुद्धां त्या मूर्तीवर हुबेहूब उठवलेलीं आहेत. नृसिंहमूर्ति साडेचार फूट उंचीची असून मागच्या बाजूसह सहा फूट उंच व तीन फूट रुंद आहे. ही मूर्ति पूर्वीं कृष्णाबाईच्या डोहांत होती. ती कोणा एका साधूनें बाहेर काढून येथें स्थापन केली. त्याची कथा अशी आहे:—

ह्या ठिकाणीं पूर्वीं अरण्य होतें व एक ओढा वाहात होता. ओढ्यांत एक उंबराचें झाड होतें. झाडाखालीं एक अंध साधु तपश्चर्या करीत बसले होते. त्यांना भगवान् विष्णु प्रसन्न होऊन त्यांस असा दृष्टांत झाला कीं, तूं ज्याची आराधना करीत आहेस; तो मी येथून दोन फर्लांगावर कृष्णेच्या डोहांत नृसिंहस्वरूपानें राहिलों आहे. त्या ठिकाणीं गवताच्या पांच पेंढ्या

टाक व ज्या ठिकाणीं पेंढीचा जाळ होईल तेथें मी आहे; असें समज. माझें दिव्य स्वरूप तुला पाहातां यावें यासाठीं मी तुला दिव्य दृष्टि देत आहे. दृष्टांताप्रमाणें या साधूंना दिव्य दृष्टि मिळाली! त्यानें आज्ञेप्रमाणें पांच पेंढ्या सोडल्या. त्यांपैकीं एक पेंढी पेटून जेथें जाळ झाला त्या ठिकाणीं त्या साधूला ती मूर्ति सांपडली व ती त्यांनीं तेथून आणून उंबराच्या झाडाखालीं ठेवली व तेथें बराच काळपर्यंत तिची सेवा करून तेथें ते कालवश झाले!

या ठिकाणापासून कांहीं अंतरावर कुंडल या गांवीं एक राजा राहात होता. त्याला ही बातमी समजली. त्याच्या मनांत ती मूर्ति तेथून काढून आपल्या राजधानींत स्थापन करावी असें आलें म्हणून तो तिला नेण्याकरतां त्या झाडापाशीं आला व मूर्ति हलविण्याचा प्रयत्न करूं लागला; पण ती त्याला कांहीं कल्या हालेना! शेवटीं त्याला दृष्टांत झाला कीं, तुझे प्रयत्न साधणार नाहींत. मला येथून न हलवितां येथेंच मजसाठीं मंदिर बांध. त्याप्रमाणें राजानें तेथें देऊळ बांधिलें. त्याचें काम गवंड्याच्या तीन पिढ्या चाललें होतें. ओढ्याच्या तळजमिनीपासून तें चाळीस फूट खोल असल्यामुळें देऊळ बांधून काढण्यास फार काळ व श्रम करावे लागले. देवळांत भुयाराच्या तोंडाशीं एक शिलालेख आहे. त्या लेखावरून ही लिपी ज्ञानेश्वरकालीन प्राकृत मराठी असावी असें तज्ज्ञांचें मत आहे.

हल्लीं श्रींच्या पुजाऱ्यांचीं दहा घरें येथें आहेत. मूळ पुजाऱ्यापासून हल्लींची पिढी तेरावी आहे. मंदिर इतकें जुनें असूनहि भुयारांतील कोणताहि भाग भंग पावलेला नाहीं. देवाच्या पूजाअर्चेची व्यवस्था कुलकर्ण्यांच्या दहा घरांत वांटलेली असून ती आळीपाळीनें होत असते.

वैशाख शु. १० ते वद्य १ पर्यंत उत्सव—मूर्तीपुढें वरील मंडपांत नृसिंह-जयंतीचा उत्सव होतो. गायन, प्रवचन, पुराण, कीर्तन वगैरे होतात. दररोज ब्राह्मणभोजन असतें. दोनतीनशें पानें होतात. शेवटीं गांवप्रयोजन होतें. त्यावेळीं एक हजार पान होतें. रोज रात्रीं श्रींचा छबीना निघून वाद्यांच्या

व नामगजराच्या घोषांत ग्रामप्रदक्षिणा होते. नृसिंहजयंति वैशाख शु. १४ ला सूर्यास्ताच्या वेळीं होते. वद्य १ ला बारा वाजतां श्रींचा छबीना निघून आरत्या घेत घेत नरसोबाची पालखी नृसिंहतीर्थावर गांवाच्या उत्तरेस दोन फर्लांगावर नदीकांठीं जाते. तेथें जनसंमर्दासह भक्त स्नानें करून पांच वाजण्याच्या सुमारास लोक पालखीसह परत येतात. मग सेवकांना तसेंच पाहुणे मंडळींना श्रीफल व तीर्थप्रसाद दिल्यावर उत्सव समाप्त होतो.

ज्येष्ठ महिन्यांत सुमुहूर्त पाहून नृसिंहमंदिर, भुयारांतून व वरून धुवून काढून श्रीला अभिषेक, नैवेद्य व ब्राह्मणभोजन होतें व रात्रीं शेजारती होऊन तीर्थप्रसाद दिला जातो. विजयादशमीस श्रींचा छबिना गांववेशी-पर्यंत जाऊन आपटा, शमीपूजन होतें. मार्गशीर्ष महिन्यांत काकड आरती, पूजा, खिचडीचा नैवेद्य इत्यादि महिनाभर कार्यक्रम चालू असतो.

## सोंडूर–लोहाचल

बल्लारीपासून सुमारें बारा कोसांवर सोंडूर गांव आहे. हें संस्थान असून त्याचे राजे घोरपडे नांवाचे होते. हा गांव चारी बाजूंनीं उत्तुंग पर्वत-श्रेणींनीं वेष्टित आहे. येथून तीन कोसांवर लोहाचल शिखरावर कार्तिक-स्वामींचें स्थान आहे. येथें कार्तिकस्वामींच्या मंदिरांत, एकमुखी कृष्ण पाषाणी मूर्ति आहे. तिची उंची साडे तीन फूट आहे. जवळ क्रौंच पक्षी आहे. देवालयाचा सर्व खर्च राजाकडून चालतो. येथें एक अगस्तितीर्थ आहे. कार्तिकस्वामीदर्शनार्थ अगस्ति मुनि लोपामुद्रा पत्नीसह आले असतां त्यांनीं हें तीर्थ उत्पन्न केलें. लोहाचल शिखरावर मयूरस्वामी, गुप्तस्वामी वगैरे स्थळें आहेत. येथें कार्तिकी पौर्णिमेस मोठी यात्रा भरते. कार्तिक-स्वामींना सुब्रह्मण्यमूर्ति म्हणतात. भारतांत सहा स्थळीं त्यांचीं मंदिरें आहेत.

## ब्रह्मावर्त

हें क्षेत्र कानपुरापासून भागीरथीच्या दक्षिण तीरावर बारा मैलांवर आहे. पूर्वीं स्वायंभू मनूची राजधानी होती. येथें ब्रह्मदेवानें अश्वमेध यज्ञ केला!

च ब्रह्मेश्वर देऊळ स्थापिलें. ह्यामुळें ह्या क्षेत्राचें हें नांव पडलें. येथें वाल्मीकि ऋषि रहात व त्यांच्या आश्रमांत लवकुशांचा जन्म झाला. इंग्रजांनीं दुसरें बाजीरावास दरमहा आठ लाख रुपये पेन्शन देऊन शेवटीं येथें ठेविलें होतें !

॥ श्रीभारतसावित्री ॥

मातापितृसहस्राणि, पुत्रदारशतानि च ।
संसारेष्वनु भूतानि यान्ति यास्यन्ति चापरे ॥
हर्षस्थानसहस्राणि भयस्थानशतानि च ।
दिवसे दिवसे मूढमाविशंति न पण्डितम् ॥
ऊर्ध्वबाहुर्विरोम्येष नच कश्चित् शृणोति मे ।
धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते ॥

न जातु कामान्नभयान्नलोभात् । धर्मं त्यजेत् जीवितस्यापि हेतोः ।
धर्मो नित्यः सुखदुःखेत्वनित्ये । जीवो नित्यो हेतुरस्य त्वनित्यः ॥

इमां भारतसावित्रीं प्रातरुत्थाय यः पठेत् ।
स भारतफलं प्राप्य परं ब्रह्माधिगच्छति ॥ १ ॥

## नाशिक

महाराष्ट्रांतील फार प्राचीन क्षेत्रांपैकीं, नाशिक हें क्षेत्र आहे. दंडकारण्यांत श्रीरामचंद्र रहात होते, तेव्हां त्यांचा मुक्काम नाशिकच्या जवळपासच होता. नाशिक हें गोदावरी नदीच्या कांठीं असल्यामुळें त्याचा महिमा विशेष आहे. पंचवटी हा नाशिकचाच एक भाग आहे. नाशिक व पंचवटी यांमधून गोदावरी नदी वाहात आहे. पंचवटींत गोऱ्या रामाचें मंदिर आहे. त्या रामाचीच उपासना समर्थ रामदासस्वामींनीं टाकळीस असतांना केली होती. नाशिकपासून नऊ दहा कोसांवर त्र्यंबकेश्वर हें एक मोठें क्षेत्र आहे. तें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे.

नाशकास डॉ. मुंजे ह्यांनीं भोंसला मिलिटरी स्कूल स्थापन केलें आहे त्यांत विद्यार्थ्यांना प्राथमिक लष्करी शिक्षण मिळतें. नाशिक स्टेशनाजवळ नोटा छापण्याचा सरकारी मोठा छापखाना आहे. नाशिकापासून थोड्या अंतरावर देवळाली येथें लष्करी छावणी आहे. नाशिकापासून जवळच चार मैलांवर बौद्धांचीं प्रसिद्ध लेणीं आहेत. त्यांना चांभार लेणीं



म्हणतात. त्याशिवाय जैनांचींहि लेणीं आहेत. नाशिक हें अखिल भारतीय महत्त्वाचें क्षेत्र असल्यामुळें सिंहस्थांत सर्व भरतखंडांतून सहस्रावधि यात्रेकरू नाशिकास स्नानाकरितां येतात व त्यांत कित्येक गोसाव्यांचे मेळेहि असतात. नाशिक हें जिल्ह्याचें ठिकाण असून येथें हायस्कुलें व कॉलेजें आहेत. तेथील हवा थंड असल्यामुळें लांबलांबचे लोक उन्हाळ्यांत तेथें रहावयास येतात. येथील द्राक्षें प्रसिद्ध आहेत. तशीच इतर फळांविषयीं नाशिकाची प्रसिद्धि आहे. नाशिकची वस्ती सुमारें पाऊण लक्ष असावी.

## पुणें

पुणें शहर फार प्राचीन काळापासून पराक्रमांबद्दल सुप्रसिद्ध आहे. हें शहर दोन हजार वर्षांचें जुनें असावें. शिवाजी महाराज बालपणीं या शहरांत रहात असत. पहिल्या बाजीरावानें ही आपली राजधानी करून आपणांस रहाण्याकरितां इ. स. १७२९ त शनिवारवाडा बांधिला. पुणें ही मराठी साम्राज्याची सुमारें शंभर वर्षें राजधानी होती. पेशवाई बुडाल्यानंतर पुणें शहराला मुंबई प्रांताच्या दुय्यम राजधानीचा मान मिळाला. इंग्रजी राज्यांत पुणें शहरानें आपला प्राचीन लौकिक कायम ठेवून तें शिक्षण व राजकारण ह्यांचें अखिल भारतांत एक प्रमुख केंद्र बनलें ! स्वराज्याची चळवळ याच शहरांतून सुरू झाली. न्यायमूर्ति

रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, रँग्लर परांजपे ह्यांसारखे थोर गृहस्थ या शहरास लाभले.

**लोकमान्य, नामदार, बाळ गंगाधर टिळक**



आखिल भारत देशाचे असंतोष-जनक व अनभिषिक्त राजे

नवीन स्वराज्यांतहि पुण्यानें आपल महत्त्व टिकाविलें आहे. महाराष्ट्राचें विद्यापीठ पुण्यास आहे. अखिल भारतीय सैनिकी शिक्षणाचें विद्यालय पुण्याजवळ खडकवासलें येथें आहे. पुणें हें महत्त्वाचें लष्करी ठाणें आहे. येथील हवापाणी उत्तम व हें शहर सुखसोयींनीं युक्त असल्यामुळें सुख-वस्तु लोक पुण्यासच येऊन रहातात. हल्लीं या शहराची वस्ती पांच लाखांहून अधिक आहे. पुण्यांतील प्रेक्षणीय स्थळें म्हटलीं म्हणजे



शनिवार वाडा

शनिवार वाडा, पर्वती मंदिर, बंडगार्डन, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, चतु:श्रृंगी, पुणें विद्यापीठ इत्यादि होत. पुण्यापासून सतरा मैलांवर सिंहगड हा प्रसिद्ध किल्ला आहे व तोहि पहाण्यासारखा आहे.

———



पर्वती

## क्षेत्रस्थानीं करण्याचीं धार्मिक कृत्यें

पुरोहितासह अगर स्वतंत्र क्षेत्रीं जातांच मंदिराच्या बाहेरून अगर आंतून धूळभेट घ्यावी. प्रातःस्मरण, शौचमुखमार्जन, दंतधावन, स्नानविधि, मंत्र-तंत्रासह स्नान करावें. भस्मलेपन, संध्या, प्रत्यक्ष वा मानासिक देवपूजा, तर्पण, सूर्यनमस्कारादि आटोपल्यावर विशिष्ट देव-देवतेची पूजा, अभिषेक ह्यांत एकादशिनी, सहस्रनामादि कृत्यें येतात, बलिहरणासह वैश्वदेव करून ब्राह्मण-सुवासिनींस ऐपतीप्रमाणें मिष्टान्नभोजन, विडा-दाक्षिणादि कृत्यें आटोपावीं. क्षौर, उपोषणादि कृत्यें करून स्वशक्त्यनुसार श्राद्धादि पिंडदानासह अगर चटावरील कृत्यें यथासांग मोठ्या श्रद्धेनें करावीं. मग ऐपत असल्यास मंत्रजागर, प्रवचन, कीर्तन, भजनादि कृत्यें स्वतः अगर विप्रद्वारां यथासांग पाठवणी करून उरकण्याचा प्रघात कित्येक क्षेत्रीं असतो. ऐच्छिक इष्ट ग्रंथाचा सप्ताह किंवा पारायण अथवा नामसंकीर्तन सप्ताह, विशिष्ट मंत्रपुरश्चरण, इष्ट प्रदक्षिणा, नमस्कार, भूपाळ्या, स्तोत्रें, आरत्या, मंत्रपुष्प, ध्यानश्लोक वगैरे नाना प्रकारच्या भक्तींनीं महाभक्त देवास आळवितात व प्रसन्न करून घेतात!

# उपसंहार

**केल्यानें देशाटन, पंडित मैत्री सभेंत संचार ।**
**शास्त्र ग्रंथ विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ॥ १ ॥**

आरंभीं मी प्रवासास निघालों; तेंव्हां माझ्यापुढें प्रवासांतील जावयाच्या स्थळांचा रेखीव असा नकाशा नव्हता; ( १ ) ह्यासाठीं, नकाशाच्या साह्यानें ऐच्छिक स्थळें कोणत्या क्रमानें कशीं पाहिलीं असतां आपला काळ, पैसा व श्रम ह्यांची बचत होईल. हें पूर्वींच ठरवून तदनुरोधानेंच प्रवास करावा. सर्व स्थळांचीं अंतरें, रस्ते व तिकिटांचे पैसे इत्यादि माहिती देणारीं रेल्वे मार्गदर्शक पुस्तकें मिळतात त्यांच्या साह्यानें प्रवास करावा. ( २ ) एकदम लांबचें तिकीट काढण्यानें पैशाची थोडी बचत होते हें खरें आहे; परंतु त्यामुळें मनुष्याला मधल्या अंतरांत जीं पहाण्यासारखीं स्थळें असतील त्यांस मुकावें लागतें; म्हणून स्थळांचा नकाशा डोळ्यांपुढें ठेवून लहान लहान टप्प्यांचीं तिकिटें काढणें सोयीचें असतें. यांत कांहीं अडचणीं आहेत. त्यांतील मुख्य अडचण ही कीं, टप्प्याटप्प्यांनीं तिकीट काढण्यांत कित्येक वेळां रांगेंतच उभें राहावें लागतें व फार वेळ मोडतो.

यात्रा म्हटली म्हणजे कष्ट आलेच. प्रवासांत असतां वेळच्या वेळीं जेवण मिळत नाहीं, झोपहि वेळीं अवेळीं घ्यावी लागते, जागरणें होतात. हीच अडचण स्नानाच्या बाबतींत असते. ( ३ ) यासाठीं प्रवासास निघणारा मनुष्य धट्टाकट्टा, निर्व्यसनी, प्रामाणिक, नियमितपणें व नेमस्तपणें वागणारा, स्वावलंबी, कंटक व मनमिळाऊ असा सुशील, उद्योगी असावा. (४) होता होईतों एकट्यानें प्रवास करूं नये. निदान एक तरी सुस्वभावी जोडीदार असावा, म्हणजे एकमेकाची एकमेकांस मदत मिळून परस्परांवर विसंबतां येतें. नाहींतर बरोबरचें सामान सांभाळणें, तिकीट काढणें, धर्मशाळेंत उतरणें या वेळीं आपला विश्वासू मनुष्य बरोबर नसेल तर प्रवासांतील अडचणी पुष्कळ वाढतात. कोणत्याहि परिस्थितींत द्वंद्वातीत उदासीन वृत्ति सतत ठेवण्याचा अभ्यास सुरूं ठेवावा.

(२) ग्रा. क्र. १७४८

(५) यात्रेंत खर्चाकरितां जो पैसा लागेल तो सगळा बरोबर बाळगूं नये. जरूर तेवढाच बाळगावा व बाकीचा नियोजित मुक्कामावर मनिऑर्डरीनें मागवावा. ( ६ ) बरोबरच्या पैशांत पुरेसा खुर्दा, मोड हीं मुद्दाम ठेवावीं. म्हणजे हमाली, टांगे, बसेस यांकरितां लागणारी चिल्लर प्रसंगीं उपयोगी पडते. (७) अलीकडे यात्रेच्या स्पेशल गाड्या निघूं लागल्या आहेत, त्यांचा फायदा कित्येक यात्रेकरू घेतात. वृद्ध, दुर्बल, परावलंबी व श्रीमंत अशा लोकांना हा प्रवास सोईचा असतो हें खरें; परंतु या प्रवासांत घाई फार होते. स्वस्थता मिळत नाहीं व यात्रा मनाजोगी होत नाहीं आणि स्वातंत्र्य तर मुळींच नसतें. ( ८ ) या कारणानें ज्यांना स्वतंत्रपणें व स्वावलंबनानें **साधी राहाणी** व **उच्च विचारसरणीनें** प्रवास करितां येण्यासारखा असेल त्यांनीं या स्पेशल गाड्यांनीं न जाणें बरें असतें.

( ९ ) अलीकडे मुंबई ते डेहराडूनचे तीन महिने मुदतीचें तिकीट साडे बेचाळीस रुपयांस मिळतें. या तिकिटांत पुरवणीच्या स्थळाचें तिकीट प्रसंगीं काढून यात्रेकरूंस थोड्या खर्चांत मुबलक प्रवास करावयास मिळतो! (१०) विशिष्ट दोन स्थळांचें योग्य भाडें नक्की किती पडेल ? तें माहीत नसल्यास इच्छित स्थळीं पोहोंचतांच, तेथील मंडळी जें योग्य भाडें सांगतील तें देऊं, अशा बोलीनेंच वाहनांत बसावें अगर हमाल करावा. ( ११ ) विशेषत: यात्रेला निघण्यापूर्वींच आपले प्रपंचांतील सर्व व्यवहार न्यायानें सुव्यवस्थित करूनच प्रवासास निघावें. ज्याच्या योगानें आपल्या गैरहजेरींत इतरांस कोणत्याहि प्रकारचा बिलकुल त्रास होणार नाहीं !

**जे जें कांहीं आपणांस ठावें, ते तें हळूहळू शिकवावें ।**
**शहाणे करून सोडावें; सकळां जना ॥ १ ॥** श्रीसमर्थ रामदास

## भवसागर तरणारे साधक

ते जन्मभाजः खलु जीव लोके, येषां मनोध्यायति विश्वनाथम् ।
वाणि गुणांस्तौति, कथां शृणोति, श्रोत्रद्वयंते भवमुत्तरंति ॥ १ ॥

॥ ॐ तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ॥

‘पवित्र भारत वर्णना’विषयीं

# महा थोर लोक काय बोलतात ?

## अभिप्राय

### महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार

लोककल्याण—७७ शनिवार, पुणें २.

कार्तिक शु. ३।१८७५

ता. ९।११।५३

स्वतःच्या बळावर प्राथमिक शिक्षक असतांहि अनेक स्थळीं जाऊन तीर्थयात्रा पुरी करून येऊन बेताच्या खर्चात दक्षतेनें वागून तीर्थयात्रा करूं इच्छिणाऱ्या इतरांस **बरीच उपयुक्त अशी व्यावहारिक माहिती** या पुस्तकांत दिलेली आहे. तीर्थक्षेत्रें व ऐतिहासिक स्थळें हीं चौकसपणें पाहणें आणि त्यांच्याविषयीं यथार्थ माहिती मिळविणें अवश्य वाटेल त्यांना अनेक ग्रंथ काळजीपूर्वक अभ्यासावे लागतील. परंतु साधारण हौशी मुशाफिर किंवा यात्रेकरू इतक्या खोलांत जातातच असें नाहीं. पण व्यावहारिक माहिती व सूचना सर्वांसच उपयोगी असतात. **बरीचशी माहिती आगाऊ मिळवून केलेला प्रवास सुखाचा होतो.** म्हणून या पुस्तकांतील माहिती साधी असली तरी स्वानुभवाची म्हणून ती फार उपयुक्त होईल असें मला वाटतें.

दत्तो वामन पोतदार

कार्याध्यक्ष, टिळक विद्यापीठ, पुणें २.

## ( २ ) संस्कृत अभिप्राय

**श्रीगुरुः शरणम्**

यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम् ।
तृष्णाक्षयसुखस्यैते नार्हतः षोडशीं कलाम् ॥

लोकांमधील कामसुख, अर्थात् स्वतःच्या इच्छा तृप्त झाल्यावर होणारें सुख त्याप्रमाणेंच स्वर्गीय मोठें सुख हीं दोनहि सुखें मिळून जरी घेतलीं; तरी **तृष्णाक्षयानें होणाऱ्या सुखाचा सोळावा हिस्सा** इतकीं सुद्धां तीं होणार नाहींत !

इति बोधितस्य शमसुखस्य वासनाया निरन्तरसुद्बोध एव सर्वाभ्युदयहेतुर्भारतवर्षे लब्धजन्मना निश्चितः । एवंविधवासनोद्बोधकानि स्थलान्येव साधूनां पुण्यतीर्थानां स्वस्थानानि भवन्ति । अतो **निरन्तरं तीर्थयात्रासत्सङ्गत्यादिकमनुतिष्ठन्ति सन्तः** । तत्र साहाय्यकं तीर्थवर्णनैः पुनः पुनः क्रियमाणैरपि पुनः पुनः क्रियमाणमपेक्षत एव । अत एव प्रकृतमेतत् पवित्रभारतवर्णनं पुस्तकं सरसमुपादेयमिति मे मतिरिति निवेदयति—

श्रावण शु. ११ भौमवासरे संवत् २०१४ श्री. **राजेश्वरशास्त्री द्राविडः**

वर वर्णन केलेल्या **शमसुखाच्या वासनेची जागृति** हीच भारतवर्षामध्यें जन्म पावलेल्या माणसाचा **सर्व तऱ्हेनें अभ्युदय करून देणारी आहे,** हें निश्चित आहे ! अशा तऱ्हेचीं वासनोद्बोध करून देणारीं स्थानें म्हणजे साधूंचीं निवासस्थानें किंवा पुण्यतीर्थें हीं होत. यामुळेंच **संत लोक सदा तीर्थयात्रा करीत असतात** किंवा **साधुसमागम मिळवीत असतात.** जरी तीर्थवर्णनें हीं पुनः पुनः केलीं तरी आणखीहि पुनः पुनः तीं वर्णनें केल्यामुळें वरील वासनोद्बोधाला मदतच होत असते. म्हणूनच पवित्र–भारत–वर्णन हें **सरस पुस्तक** अवश्य घ्यावें, असें मी सांगतों.

आ. शु. ११ भौमवासरे संवत् २०१४ }
काशी, सांगवेद विद्यालय. } **राजेश्वरशास्त्री द्राविड.**

पंडित वरेण्य,
अध्यक्ष, सांगवेद विद्यालय ( काशी )

## ( ३ ) अभिप्राय

३४८ शनिवार, पुणें २

१४।९।५७

श्री. केशव बळवंत जोशी यांनीं लिहिलेलें 'पवित्र–भारत–वर्णन' पाहून आनंद झाला. श्री. जोशी तीर्थयात्रांची महती जाणतात. त्यांच्या पावित्र्यावर त्यांची श्रद्धा आहे व त्यांच्या मनावर तसे संस्कार झाले आहेत. या पुस्तकांत हें फलस्वरूप दिसतें. भारतावर प्रेम करणाऱ्या या मनोवृत्तीच्या लोकांना या पुस्तकाच्या वाचनानें अनेक फायदे होतील !

दामोदर विश्वनाथ गोखले, बी.ए., एल्एल्. बी.,
माजी संपादक, केसरी व मराठा, इंग्रजी साप्ताहिक, पुणें नं. २.

---

## ( ४ ) हिंदी अभिप्राय

### पवित्र–भारत–वर्णन

प्रायः सब पवित्र क्षेत्रों का वर्णन इस पुस्तक में आगया है। इसके लेखक श्री. केशव बळवंत जोशी हैं। इन्होंने इन क्षेत्रों में जाकर स्वयं वह ज्ञान प्राप्त किया है जो हरएक भारतवासीके लिये अत्यंत उपयोगी है। इसलिये हम इसके लेखक को धन्यवाद देते है, और भारतके प्रेमी प्रजाजनोंसे आनन्दपूर्वक कहते हैं, कि वे इस पुस्तकको पढें और अपने पवित्र क्षेत्रों का ज्ञान प्राप्त करें।

श्रीपाद दामोदर सातवळेकर,
अध्यक्ष, स्वाध्याय मण्डल,
पारडी ( जि. सुरत ).

दिनांक
२०।९।५७

---

## ( ५ ) अभिप्राय

टिळक रोड, पुणें २
१९।६७

श्री. केशव बळवंत जोशी यांचें ' पवित्र भारत वर्णन ' हें पुस्तक **अत्यंत आल्हादकारक** आहे. श्री. जोशी हे शिक्षण-खात्यांत **मुंबईस मुख्याध्यापक** होते; त्यामुळें त्यांची **भाषा सुबोध** व **प्रसन्न** अशी आहे. हें प्रवासवर्णन असलें तरी त्याला **साहित्याची शोभा** आहे; त्यामुळें या पुस्तकाला एक वेगळाच **आकर्षकपणा** आला आहे. त्यांतून हें वर्णन स्वानुभवावर आधारलेलें असल्यामुळें **निरनिराळे प्रसंग** वांचतांना **प्रत्यक्ष प्रवास केल्याचा आनंद लाभतो.**

प्रत्येक शाळेंतील **वाचनालयांत ठेवावें** इतकें **बोधप्रद; माहितीपूर्ण** व **निरातिशय सुंदर** असें हें पुस्तक लिहिल्याबद्दल मी केशवराव जोशी यांचें **मनःपूर्वक अभिनंदन** करतों.

दिनांक
२।१०।१९५७

—माधव काशिनाथ देशपांडे,
माजी इंग्लिश-प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज, पुणें.

## ( 6 ) REMARK

31 Ferozshah Road, New Delhi-1.
20-10-1957.

It was a **great pleasure to read " Pavitra Bharat Varnan "** of Shri. Joshi Keshav Balvant. In this book he has done an adequate justice to the various holy places in India right from the Himalayas to Rameshwaram in the south. Apart from proving a **good guide for prospective visitors** it gives an adequate idea about the **historical significance of each place.** I think Shri. Joshi deserves **congratulation.**

*Narahar Vishnu Gadgil,*
B.A., LL.B.
Ex-Minister Govt. of India

## ( 7 ) REMARK

I derived great pleasure in going through the Marathi book "Description of Holy Bharat" (पवित्र भारत वर्णन) written by Shri. Keshav Balawant Joshi, retired Head Master, Bombay Municipal Corporation. The Book gives an account of the different places of pilgrimage in India. Being based on first hand experience the book is bound to prove instructive to pious persons intending to go on a pilgrimage. The reader also gets glimpses of the author's study of religious literature. To those who are merely curious the book will supply much historical and interesting information about places of pilgrimage. **It is desirable that children should have an acquaintance with religious culture.** The book promises to be a good medium for achieving this purpose. I think that **it deserves to be kept in all libraries** attached to primary and secondary schools.

*Ramchandra Mahadeo Marathe,*
M.A., LL.B., M.Ed.
Professor of English,
Tilak College of Education,

Dated
24-10-57

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रमांक 23365 दि.
क्रमांक 234 नों. दि.

## "वेदांत भूपाळी"

रामकृष्ण हरि गोविंदा, राजिवनयनारे, आपा राजारामारे । अनाथ-बंधो पतित पावना, करुणावंतारे ॥ ध्रु० ॥

गुरु करुणोदय काळीं; शिव गुरुवर गीतीं गात्रा । स्वहिताकारणें, आपुला आपणचि विचार करावा ॥ इंद्रियांसकट स्थूल नव्हे मी जाणता त्याचा त्याचें कारण विराट नोहे, मी देखणा साचा ॥ स्वरूपीं जे कां विस्मृति;

**तें मायेचें रूप जाणा** । तेंचि येथें कारण; मीच जाणें आपणा ॥ तनुत्रयाचा साक्षी तो मी महाकारण । तेथील चौथें महामायेसी; मीच वोळखण ॥ शबलद्वय उपाधी; निरसितां जीवशिवपण हरलें । शुद्ध पूर्णानंदीं रिघतां; शिवरामचि झालें ॥ १ ॥

मी देह नव्हेसा झालों; तेव्हां उपजणें ना निमणें । रोड, मोठा, वृद्ध, तरुण हें; कांहींच मी नेणें ॥ यापरि विचार करितां, मनुजा सुमनें साक्षेपें ॥ चैतन्य आत्मा मी हें कळतां; विचारहि लोपे ॥ मनसह अंतःकरणाचा परि; देखणाचि वेगळा । वर्णाश्रम सुख दुःखें; येउनी बाधिति कवणाला ॥ क्षुधा तृषादि प्राणधर्म हे; मजला दिसताती । मज मी फिरोनि पाहतां; मग हे कवणा बाधिती ॥ हें जड ऐसें जाणुनि निराळा होउनी पाहतां; । व्यतिरेकेंचि चिदचिद् ग्रंथीं, सुटे तत्वतां ॥ सकळ सच्चिदानंदू; हा हो अन्वयाचा बोधू । तो जाणावा शिवरामाचा परिपूर्णानंदू ॥ २ ॥

विषय इंद्रियें जड ओळखणें; तेचि विरक्ति । चैतन्यकडे वृत्ति फिरविणें, यां नावें भक्ति ॥ मी चिद्धन वृत्तिची प्रतीति; शुद्ध तें ज्ञान । यापरि त्रिवेणींचें; नित्य करावें स्नान ॥ वर्णाश्रमसह युक्ताचारचि, इंद्रियां घडे । विरक्ति, भक्ति, ज्ञान होतां; आपेआप चढे ॥ मुळींचा विचार हरपे; हर्षामर्ष मग कैंचे । शिवराम भजे, पाय पूर्णानंदाचे ॥ ३ ॥

वृत्ति जिकडे धांवे, तिकडे न जावें तीपाठीं । तिचा साक्षी होऊनी पाहतां; स्वरूपीं सदा भेटी ॥ वृत्तिकडे पाहतां; वृत्ति आपणांतचि मुरे । आपण चैतन्य मात्र केवळ; परिपूर्ण उरे ॥ मग देखे, ऐके, स्पर्शी, हुंगे जो जो रस चाखे । बोले, चाले, वेव्हारीतां आपआपणा देखे ॥ सहज समाधि सहजचि भोगी, पूर्णानंदू रे । शिवराम निरावरण; होऊनी आनंदें वावरे ॥४॥

अरुणोदयकाळीं, म्हणतां पदें पांचहि । अर्थी विवरुनी पाहातां; होई देहीं विदेही । सद्गुरु–आज्ञा वचन पाळणें, या नावें । वेव्हारीतां आप आपणां विसरूं न द्यावें । [illegible]रा विसरुनी आठवा ग्रासुनी, आत्मा स्वयें होणें । ग्रासुनी, आत्मा स्वयें होणें ॥ (अज्ञाना विसरुनी, विज्ञाना ग्रासुनी आत्मा स्वयें होणें.) होणें न होणें वृत्तीविण तें आंगीं अनुभवणें ॥ जगीं आपण भरला, आपणामाजीं जग पाहे । तो जाणावा शिवरामाचा, परिपूर्णानंदू आहे ॥५॥

| क्षेत्र | पृष्ठांक |
| --- | --- |
| दामोदर कुंड | १८३ |
| द्वारका | १०७ |
| देहू | १६५ |
| दोनपक्षी तीर्थ | ६४ |
| धनुष्कोटी | ६८ |
| धोम-महाबळेश्वर | १६८ |
| नाशिक | २०१ |
| नृसिंहवाडी | १४१ |
| नैमिषारण्य | ३३ |
| नंद्याळ–महानंदा | ८७ |
| नांदगांव | १५७ |
| परशुराम | १८८ |
| परळीवैजनाथ | ९२ |
| पर्वती | |
| पशुपति-नाथ | |
| प्रयाग | |
| पाली ( बल्लाळ | |
| प्राची क्षेत्र | |
| पुष्कर तीर्थ | ४६ |
| पैठण ( एकनाथ ) | १७३ |
| पंढरपूर | १७१ |
| बदरीनारायण | १६ |
| बुढाकेदार | ९ |
| ब्रह्मावर्त | २०० |
| भीमाशंकर | १६९ |
| भुवनेश्वर | ५६ |
| भुवनेश्वरी | १४७ |
| मढ | १६० |
| मथुरा ( श्रीकृष्ण ) | ३७ |
| मदुरा (मीनाक्षी) | ६३ |
| मानस सरोवर | १८५ |

| क्षेत्र | पृष्ठांक |
| --- | --- |
| मोरगांव | १५९ |
| मुक्तिनारायण | १८२ |
| यमाई देवीमंदिर ( औंध ) | १४९ |
| राजापूर गंगा | १८७ |
| रामटेक | ५२ |
| रामेश्वर | ६५ |
| रांजण | १६१ |
| लेण्याद्रि | १६२ |
| वज्रेश्वरी | १०० |
| वाई | १६७ |
| वाघेश्वर | १९६ |
| वेरूळ | ९५ |
| वैकुंठपूर | १८१ |
| ...्यासमंदिरें | १२७ |
| ...ल्लिकार्जुन | ८७ |
| ...ार | २८ |
| ...म् | ६१ |
| ... | ७६ |
| सज्जनगड | १५३ |
| साक्षी गोपाळ | ५४ |
| सिद्धटेक | १६२ |
| सिद्धपूर ( मातृगया ) | १०५ |
| सिंहाचलम् | ५३ |
| सुदामपुरी ( पोरबंदर ) | ११० |
| सोरटी सोमनाथ | ११५ |
| सोंडूर ( कार्तिकस्वामी ) | २०० |
| हरिद्वार | ३२ |
| हरिपूर | १४६ |
| हरिहरेश्वर | १९० |
| हृषीकेश | २८ |
| क्षेत्र-धार्मिक कृत्यें | २०४ |

REFBK-0009749